म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १९६८

# पारिजात

REFBK-0016585

संपादक
भीमराव कुलकर्णी

४५८
निबंध
६०७१६२
४।३।६७

१९९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक ६०७१६२ वि. निबंध
वर्ग १९९८ नों. दि. ८।३।६७

# पारिजात

१९४५ ते १९६५ या कालखंडातील लघुनिबंधकारांच्या निवडक लघुनिबंधांचा प्रातिनिधिक संग्रह.

संपादक : भीमराव कुलकर्णी

दा. क्र. १६५८५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

कॉन्टिनेण्टल प्रका

REFBK-0016585

किंमत : चार रुपये
आवृत्ती पहिली १९६८.

प्रकाशक : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे २
मुखपृष्ठ : स्टुडिओ सालकर.

# पारिजात

## खंड दुसरा

## अनुक्रमणिका

प्रस्तावना एक

१ पुराणपुरुषाला श्रद्धांजलि : काका कालेलकर १
२ नर-भूषा तु दाढिका : काका कालेलकर ७
३ एकाकी : इरावती कर्वे १२
४ स्त्री व संस्कृति : इरावती कर्वे १७
५ मराठ्यांचा मठ्ठपणा : इरावती कर्वे २२
६ मत्स्यमहालात : दुर्गा भागवत ३१
७ रूपधर फाल्गुन : दुर्गा भागवत ३४
८ चिरदाह : दुर्गा भागवत ४०
९ हे लोक... : वि. वा. शिरवाडकर ४६
१० आरामखुर्ची : वि. वा. शिरवाडकर ५२

११ तिरपी मान : शांताराम ५७
१२ पुस्तकांचं स्त्रीत्व : शांताराम ६३
१३ निसर्ग आणि आम्ही : म. ना. अदवंत ६८
१४ पुराणांतली वांगी : म. ना. अदवंत ७५
१५ मांजराच्या मिशा : भगवंत देशमुख ७९
१६ बिचारा शेखमहंमद : भगवंत देशमुख ८५
१७ आकाशाचा अर्थ : गो. वि. करंदीकर ९४
१८ या जन्मातले पुनर्जन्म : गो. वि. करंदीकर ९८
१९ न चुकणारी माणसे : गो. वि. करंदीकर १०३
२० तीन माकडे : मंगेश पाडगावकर १०९
२१ वॉशिंग्टनची कुऱ्हाड : मंगेश पाडगावकर ११४
२२ अवकाश : माधव आचवल १२०
२३ हुंगावया हवे खोल : माधव आचवल १३०
२४ मरण : मधुकर केचे १३८
२५ आंगण : मधुकर केचे १४६
टीपा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५४१८२ वि. निबंध
वर्ग ९१८ नोंद दि. ६।३१।६१

# प्र स्ता व ना

‘ लघुनिबंध म्हणजे नेमके काय हो ? ’

या प्रश्नाने अजूनही मी एकदम कावराबावरा होतो. पहिला पांढरा केस अजून माझ्या डोक्यावर उगवला नाही. तो आज ना उद्या उगवणारच आहे, याची जाणीव असल्याने मी त्यावेळी मुळी दचकणार नाही, परंतु वरीलसारखा प्रश्न विचारण्यात आला तरी मला चांगलेच दचकायला होते. जे. बी. प्रीस्टलेचे शब्द अगदी तोंडावर येतात, ‘ लघुनिबंध म्हणजे... जो लघुनिबंधकार लिहितात तो निबंध... ’[१]

पण हे शब्द कंठातच जिरतात. कारण अशा रीतीची व्याख्या आजच्या पिढीच्या तोंडावर फेकण्यानं त्यांची तोंडे बंद होण्यासारखी आज परिस्थिती राहिलेली नाही. जमानाच बदलला आहे ना मुळी ! आणि मग अशावेळी मराठीतल्या लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराच्या जनकांनी केलेली लक्षणे आठवू लागतात...

‘ ...या निबंधाला काव्यमय उद्गाराची उपमा साजण्यासारखी आहे; व ज्याप्रमाणे काव्योद्गार जितका सहज तितका सुंदर, त्याप्रमाणे निबंधही जितका विष्कळित व सहज असेल तितकी त्याची मनोज्ञता वाढेल. ताजेपणा आणि मुग्धपणा हे ललितनिबंधाचे प्राणभूत गुण आहेत, आणि रचनेच्या खटाटोपाने त्याला शोभा येण्याऐवजी त्याचा मुग्धपणा व टवटवी मात्र नष्ट होईल— ’[२]

‘...गंभीर निबंधांच्या बाबतीत लेखकाची मनोवृत्ती किंवा मनःस्थिती मह-

भीमराव कुलकर्णी

त्याची नसते. तेथे विषयालाच प्राधान्य येते... तसे पाहिले तर ललित वाङ्मयाच्या कुठल्याही प्रकारात या ना त्या रीतीने लेखकाचे आत्मचरित्र प्रतिबिंबित होत असतेच. पण नाटक, कादंबरी, लघुकथा इत्यादी वाङ्मयप्रकारांपेक्षा लघुनिबंधात त्या आत्मचरित्राचे प्रतिबिंब अधिक स्पष्टपणे व सरळपणे पडते असे मला वाटते. लघुनिबंधाचा जनक मानला गेलेला मॉन्टेन 'माझे लेखन हे आत्मचित्रण आहे' ('It is myself I portray') असे उद्‌गार काढतो याचे मर्म हेच आहे—'[३]

'—गमतीचे विचार हा लघुनिबंधाचा मी प्राण समजतो. एखादी घटना पाहिली की तिच्यातील गंमत आधी माझ्या लक्षात येते. गमतीचे विचार सुचू लागतात. एखादी घटना पाहून गंभीर विचार सुचू लागले, तर त्याचे रूपांतर निबंधात किंवा प्रबंधात होईल आणि गमतीचे विचार सुचू लागले तर लघु-निबंधात होईल...एकदा मध्यवर्ती गमतीचा चमत्कृतिपूर्ण विचार सुचला की त्याची मांडणी आकर्षक, कलापूर्ण, मनोरंजक कशी करता येईल याचा विचार माझ्या मनात सुरू होतो—'[४]

'...निबंधाची आधुनिक कल्पना अशी की तो लिहिताना लेखकाने पदोपदी प्रगट झालं पाहिजे. स्वतःविषयी कलात्मक रीतीने दुसऱ्याला जे जे म्हणून सांगता येत असेल ते ते लेखकानं निबंधात लिहावं अशी परवानगी आहे... आधुनिक लघुनिबंध हा पुष्कळ अंशी संभाषणाच्या स्वरूपाचा असून सुहृद्‌भाव हा त्याचा आत्मा आहे...'[५]

'घ्या, झालं ना समाधान?' म्हणून सुस्कारा टाकण्याइतकीही मनाला फुरसद मिळत नाही. शिक्षकाच्या चाकोरीत सापडलेले ते मन व्याख्या करण्या-ऐवजी पुनःपुन्हा दुसऱ्यांनी केलेल्या व्याख्या आठवू लागतं. डॉ. जॉन्सनची ती प्रसिद्ध व्याख्या मनातून काही केल्या जात नाही. 'An Essay is a loose sally of the mind, an irregular, indigested piece, not a regular and orderly performance.' आणि या व्याख्येबरोबर इंग्रजीतल्या ॲडिसन, स्टील, बेकन इत्यादी निबंधकारांच्या कृती मनामध्ये रेंगाळू लागतात.

१९२६ पासून मराठीत ललितनिबंध अवतरला ही वस्तुस्थिती असली तरी त्यापूर्वीचे मराठीतले सारे निबंधलेखन लालित्यापासून संपूर्णपणे चार हात दूर

होते, असे थोडेच आहे ? मला तर अव्वल इंग्रजीतल्या कालखंडातील भाऊ महाजनांनी लिहिलेल्या काही लेखांपर्यंत मागे जावेसे वाटते. ‘धूमकेतू’च्या दि. ३१ मार्च १८५४ च्या अंकात त्यांनी ‘आनंदनाम संवत्सराचे वार्षिक वर्षफल’ नावाचा लेख लिहिला आहे. मोठा मिष्किल आणि विनोदी आहे तो ! या लेखाला वैचारिक निबंध का म्हणावयाचे ? डॉ. जॉन्सनच्या व्याख्येत हा निबंध बसू शकतो की नाही असे कोणी विचारले तर मला तर नाही म्हणणे कठीण जाईल.

बरे, आगरकरांच्या काही निबंधांकडे दुर्लक्ष करून कसे चालेल ? साध्या सुध्या क्षुद्र विषयांवर आगरकरांनी लेखणी चालविली ती कोणत्या प्रेरणेने ? ‘आमच्या स्त्रियांचा पेहराव’, ‘सोवळ्याची मीमांसा’ ‘आमचे प्रेतसंस्कार’, ‘हजामत’, ‘जोडा’ हे आगरकरांचे विषय पाहिले, तर सामाजिक सुधारणेच्या संदर्भात हिरवे-पिवळे होऊन प्रतिस्पर्ध्यांवर तुटून पडणारे आगरकर अशा सामान्य विषयावर लिहितात, त्या वेळी त्यांच्यासमोर ॲडिसनच्या निबंधांचेच उदाहरण नसेल काय ?

आणि शि. म. परांजपे ? ‘भासाची भवितव्यता’ यासारख्या निबंधांतून काव्यमयतेबरोबर नितांत आत्मनिष्ठाच डोकावत नव्हती का ?

होय, हे सर्व खरे आहे. हलकेफुलके, गमतीने लिहिण्याची परंपरा मराठीत तर १८५४ पासून दिसते. ॲडिसनप्रमाणेच एखाद्या क्षुद्र विषयावर आगरकर लिहितात, परंतु आगरकरांपर्यंत पाहिले तर मराठी निबंधाच्या व सुरुवातीच्या काळात राजकीय आणि सामाजिक जागृतीसाठी ज्ञानप्राप्तीचे, वा प्रसाराचे एक साधन म्हणूनच निबंधलेखनाचे शस्त्र पाजळले गेले आहे. आगरकरांच्या हलक्या फुलक्या विषयांवरच्या निबंधांच्या मांडणीमागे ॲडिसनच्या निबंधांतील खेळकरपणा, सौम्य उपहास वा उपरोध नसून बेकनचे गांभीर्य आहे. मराठी निबंधांतून आत्मनिष्ठा ही अनेक प्रकाराने जरी अवतरली, तरी या सर्व घटकांकडे कलात्मकतेच्या दृष्टिकोनातून पाहिले अगोदर प्रा. फडक्यांनी ! त्यांनी इंग्रजीतल्या ल्यूकस, गार्डिनर, चेस्टरटन, रिचर्ड किंग इत्यादी लेखकांचे निबंध वाचून मराठीत अशा प्रकारच्या निबंध-लेखनासाठी भूमी तयार केली, तिची बैठक निश्चित केली, नितांतसुन्दर असे लघुनिबंध स्वतः लिहून हा वाङ्मयप्रकार मराठीमध्ये एकदम असा काही रुजविला की, पुढे त्यांचे त्यांनाच आपण प्रस्थापित केलेल्या वाङ्मयप्रकारात अधिक उंचीवर

जाणे कठीण होऊन बसले !

फडक्यांच्या नंतर वि. स. खांडेकर व अनंत काणेकर या क्षेत्रात अवतरले. त्या दोघांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे व प्रतिभाशक्तीचे सारे मनोहर विलास त्यांनी १९४० पर्यंत लिहिलेल्या लघुनिबंधांत प्रकर्षाने दिसून येतात.

फडक्यांनी ' विस्कळितपणा ' हे लघुनिबंधाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे असे सांगितले असले तरी, त्यांच्या लघुनिबंधात विस्कळीतपणा चुकूनही सापडत नाही. त्यांनी विस्कळितपणाचा फक्त आव आणलेला असतो, तो केवळ आपल्या विवेचनाला गती देण्यासाठी. त्यामध्ये नाट्यमयता अवतरविण्यासाठी ! त्यांची सौंदर्यासक्ती, तर्कशुद्ध विचारसरणी, टापटीप, शिस्त आणि वाचकांच्या मनाचा पुरेपूर कब्जा घेण्यासाठी आपल्या जीवनातील काही आठवणींचा केलेला कलात्मक परंतु माफक आविष्कार, इ. त्यांच्या वैशिष्टयांतून फडक्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सारे धागेदोरे स्पष्ट होतात. फडक्यांनी वर्णिलेल्या आपल्यासंबंधीच्या काही आठवणी निश्चितपणे त्यांच्या आयुष्यात घडल्याच होत्या, असे छातीठोकपणे मात्र कोणी सांगू नये ! कित्येक वेळेला ती एक फडक्यांची पोजही असू शकते. खांडेकरांचा स्वैर कल्पनाविलास आणि जीवनाबद्दलचा चिंतनशील दृष्टिकोन या प्रकारच्या लेखनाला अतिशय उपकारक ठरला आहे. काणेकरांच्या साऱ्या लघुनिबंधांतून समाजजीवनातील अनेकविध विसंगतीकडे पाहण्याची त्यांची व्यापक दृष्टी किती निरनिराळी रूपे धारण करू शकते, याचे प्रत्यंतर येते.

फडके-खांडेकर-काणेकर यांच्याच बरोबरीने वि. पां. दांडेकर, वि. ल. बर्वे, ना. मा. संत, गो. रा. दोडके यांच्यांसारख्या समर्थ लेखकांनी या वाङ्मयप्रकारात लक्षणीय भर टाकली आहे. खांडेकरांनी या साऱ्या प्रातिनिधिक लेखकांच्या काही निवडक लघुनिबंधांचा आकर्षक असा संग्रह ' पारिजात ' या नावाने सादर केला आहे. या संग्रहाने व त्यास लिहिलेल्या मार्मिक प्रस्तावनेने या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये स्थिर झाल्यासारखी झाली. आणि...

आणि नवीन आलेल्या वाङ्मयप्रकाराचे नेहमी साधारणपणे जे होते, तेच याही वाङ्मयप्रकारात घडून आले. जुन्या गंभीर, विचारप्रवर्तक व वस्तुनिष्ठ निबंधांच्या संदर्भात हा नवीन आलेला निबंधप्रकार खेळकर, लालित्यपूर्ण आत्मनिष्ठ अशा स्वरूपाचा असल्याने त्याला गुजगोष्टी म्हणावे का आत्मनिबंध म्हणावे, का ललित निबंध म्हणावे का लघुनिबंध म्हणावे, या वादाचा धुरळा काही काळ

मराठी वाङ्मयीन प्रांतात काहीसा गाजला आणि त्याला ' लघुनिबंध ' हे नाव एकदा कायमचे रूढ झाले. आणि मराठीतल्या आवाडीच्या लघुनिबंधकारांनी ज्या पद्धतीने हे लघुनिबंध लिहिले, ती पद्धतच या वाङ्मयप्रकाराचे तंत्र बनले, त्याचे व्यवच्छेदक लक्षण बनले. त्या लक्षणांची—तंत्रमंत्रांची चौकट या प्रकाराभोवती पक्की बसली. साध्यासुध्या विषयातून मोठा आशय शोधण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी आपल्या जीवनातील काही घटना, अनुभव वाचकांना विश्वासात घेऊन सांगण्याची भूमिका घेणे, खेळकरपणाने वाचकांशी हितगुज करता करता परिचित, सार्वकालीन आणि सर्वमान्य अशा विषयाची दुसरी बाजू दाखवून वाचकांना चकित करणे, असा साधारपणे या वाङ्मयप्रकाराचा खाक्या ठरून गेला. फडकेखांडेकर काणेकरांसारख्या समर्थ लेखकांनी आपल्या श्रेष्ठ प्रतिभाशक्तीच्या साहाय्याने कलात्मकतेने युक्त असे, त्या चौकटीत राहूनही उत्तमोत्तम लघुनिबंध लिहिले, परंतु त्यांनी आपण होऊन आपणच निर्माण केलेली कोंडी फोडण्याचा प्रयत्न मात्र केला नाही. त्यामुळे या वाङ्मयप्रकाराचे अनुकरण करण्याचा प्रयत्न सन्मान्य लेखकांनी ज्यावेळी केला, त्यावेळी त्याचे बेगडी स्वरूप जाणविण्यास अवधी लागत नाही. आणि मग त्याच्याबद्दलच्या प्रतिक्रिया परखडपणाने व्यक्त होत राहिल्या... १९५६ सालच्या ललित लेखनाचा आढावा घेताना ज्ञानेश्वर नाडकर्ण्यांनी लिहिले, ' हा वाङ्मयप्रकार आता निश्चितच मागे पडला आहे. काही कवींच्या वाङ्मयीन निर्मितीचा ' बाय-प्रॉडक्ट ' म्हणून तो क्वचित आपली चमक दाखवून जातो. परंतु ही चमक जो काव्याला जवळचा त्या कल्पनाविलासाची आणि तदनुषंगिक प्रतिभापूर्ण भाषाशैलीची असते. लघुनिबंध वाचताना चार पावसाळे आपल्यापेक्षा जास्त पाहिलेल्या परंतु प्रौढत्वी निज शैशवास जपणाऱ्या एखाद्या बहुश्रुत मित्राशी दिलखुलास गप्पा मारल्याचा जो अनुभव यायला पाहिजे तो फारच थोड्या निबंधकारांच्या निबंधांत येतो. व्यक्तिनिष्ठ लालित्याऐवजी एखादा जगावेगळा विषय घेण्याची भूतपूर्व यशस्वी लघुनिबंधकाराची लकबच तेवढी सांगाड्याप्रमाणे शिल्लक राहिलेली दिसते. चिंतनशील व्यक्तिमत्त्वातून निर्माण होणाऱ्या शहाणपणाच्या, परंतु समजण्यास सोप्या अशा गोष्टींऐवजी चरबट लेखनशैलीचा चोथा तेवढा हाती येतो... '[६]

प्रा. रा. श्री. जोगांनी तर या लघुनिबंधकारांविरुद्ध मोठी खळबळजनक अशी फिर्यादच गुदरली.[७] बाहेरून रम्य उद्यान दिसावे आणि कुतूहलाने आत प्रवेश

केल्यानंतर ते ‘ धर्मार्थ औषधालय ’ आहे, हे लक्षात आल्यानंतर जसे होते, तसे लघुनिबंधाच्या बाबतीत अलीकडे होते...आपण एखादी लघुकथा वाचत आहोत, असे वाचकाला वाटते न वाटते तोच लेखकाचे तत्त्वप्रतिपादन सुरू होते...आपल्याला जे काही वाटते, त्याच्या विरुद्ध लेखक काही तरी सांगणार आहे, हे गृहीत धरूनच आपण चालतो इतके त्यांचे स्वरूप निश्चित झालेले आहे,...हे लघुनिबंध वाचताना आपण अगदीच मठ्ठ असल्याची वाचकांची भावना होते...इत्यादी. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनीही हा वाङ्मयप्रकार निःसत्व होण्याची कारणे आणि त्याची मीमांसा केली आहे. ’[८]

१९५० नंतर मराठी वाङ्मयातील या लेखन-प्रकारात काही इष्ट ते बदल घडून येत असल्याची चिन्हे दिसू लागली, कारण लघुनिबंध म्हणून जी काही बंधने या वाङ्मयप्रकाराने आपल्यावर लादून घेतली होती, ती हळूहळू सुटू लागली.

आत्मनिष्ठा आणि लालित्य ही या नव्या प्रकारची दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये मानली तर ही वैशिष्ट्ये जेवढ्या प्रकारांनी म्हणून व्यक्त होण्याची शक्यता आहे तेवढे सारे प्रकार हे वस्तुनिष्ठ अशा गंभीर निबंधांपेक्षा निराळे समजून त्यांच्या त्या दृष्टिकोणातून विचार व्हायला हवा. कारण हा नवा निबंध नव्या प्रवृत्तींचा, नव्या समाजरचनेचा नव्या जाणिवांचा निदर्शक आहे. जीवनात मोठमोठ्या विषयांइतकेच नित्यनैमित्तिक विषयांना महत्त्व आहे. खेळकरपणा हा निव्वळ बहाण्याच्या स्वरूपात किंवा समाजात वावरताना यशस्वी होण्यासाठी वापरावयाचा मुखवटा नसून अत्यंत श्रेष्ठ व व्यक्तित्वसंपन्नतेचा तो सहजसुंदर आविष्कार आहे. त्यासाठी नेहमीच गमतीचे विचार मनात येण्याची आवश्यकता नसून अत्यंत गंभीर अशा चिंतनशील दृष्टिकोणातूनही तो अवतरू शकतो. परिचित अशा विषयातील अपरिचित बाजू पाहण्याच्या हव्यासातूनच लघुनिबंध अवतरतो असे नसून कोणत्याही भाववृत्तीचा, किंवा मनोभावनेचा आविष्कारही लेखकाच्या व्यक्तित्वानुसार अनेकविध रूपे धारण करू शकतो...

थोडक्यात सांगायचे म्हणजे हा नवा निबंध—मग त्याला लघुनिबंध म्हणा वा ललितनिबंध म्हणा, मोठा बहुढंगी, बहुरंगी व बहुरूपी आहे. समुद्रात आदळणाऱ्या लाटांप्रमाणे क्षणोक्षणी नित्य नवी रूपे धारण करण्याचे, त्या नव्या रूपांचे जीवनाच्या संदर्भात अर्थ शोधण्याचे त्याला वेड आहे आणि म्हणूनच या नव्या

रूपात कितीही प्रकारांनी तो अवतरला तरी तो कधी शिळा व्हायचा नाही, कधी आवर्तात सापडायचा नाही. सुदैवाने गेल्या काही वर्षांमध्ये जे काही मोजके लेखन या दृष्टीने झाले आहे, त्यामुळेच नव्या या वाङ्मयप्रकाराचे सामर्थ्य आपल्या लक्षात येऊ लागले आहे. ह्या नव्या कालखंडातील या वाङ्मयप्रकाराची निपज मागच्यापेक्षा कमी प्रमाणात असली तरी तिने कात टाकण्याचे प्रयत्न केलेले आहेत. काहींनी रूढ चाकोरीचा अवलंब केला आहे, काहींनी रूढ चाकोरीत राहूनही त्यामध्ये निरनिराळे प्रयत्न करण्याचे काही नेटके प्रयत्न केले आहेत. कित्येक वेळेला या लघुनिबंधाने इतर वाङ्मयीन प्रकारांत हळूच शिरून आपल्या चंचल स्वरूपाची कल्पना दिली आहे. आजच्या नव्या मराठी कथालेखनातील कित्येक कथांचा तोंडवळा लघुनिबंधासारखा आहे. प्रवासवर्णने, विनोदी लेखन, व्यक्तिचित्रणात्मक लेखन इ. प्रकारांतून या लघुनिबंधाने स्वतःचा शिरकाव करून स्वतःला अभिवृद्ध केले आहे.

जातिवंत निबंधकाराने विषयासाठी का अडून बसावे ? आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार करण्यासाठीच या लेखनप्रकाराचा त्याला अवलंब करावयाचा असेल तर मग त्याने आपल्याला येणाऱ्या अनुभवांचे, विविध रंगारूपांचे, जगाच्या आणि आपल्या नात्याचे स्वरूपच केवळ न्याहाळण्याचा प्रयत्न का करू नये ? एखाद्या कवीला भावकवितेत जे साधते तेच एखाद्या प्रतिभावंताला या वाङ्मयप्रकाराच्या साहाय्याने साधण्याचे सामर्थ्य या वाङ्मयप्रकारात दडले आहे. खास त्यासाठी नेहमीच वाचकांशी संवाद करावा, त्यांना विश्वासात घेऊन आपली गुपिते उघडी करावीत असे थोडेच आहे ! कित्येक वेळेला आपण आपल्याशीच उत्कटतेने संवाद करीत असतो. आपणच निरनिराळ्या भूमिकांतून आपल्याला समजावून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. लघुनिबंधाने असा स्वसंवाद का करू नये ? जिथे प्रत्येक क्षण हा स्वचे उलगडणे असते, अशा अवस्थेचा साक्षात्कारस्वरूप जाणिवांचा आविष्कार करता येणे शक्य नाही-काय ?

होय, हे सारे शक्य आहे. पण त्यासाठी लघुनिबंध म्हणून या वाङ्मयप्रकाराने आपल्याभोवती जी बंधने आवळून घेतली आहेत ती अगोदर दूर झाली पाहिजेत. एकंदर अशा प्रकारच्या सर्वच लेखनास ' लघुनिबंध ' या नावाने तरी ओळखावे किंवा त्याला ' ललित निबंध ' हे व्यापक नाव द्यावे.

कित्येकांना हे अर्थात आवडणार नाही. ' लघुनिबंध ' या नावाचा विशिष्ट वाङ्मयीन प्रकार त्याच्या विशिष्ट स्वरूपातच रूढ राहावा, असे काहींना वाटणे साहजिक आहे. खांडेकरांसारख्या विचक्षण रसिकांची हीच भूमिका आहे असे दिसते. त्यांनी लिहिले आहे; आज ' लघुनिबंधाचा विचार करताना एका गोष्टीविषयी थोडे स्पष्ट बोलणे इष्ट होईल. अलीकडे लघुनिबंध व ललितनिबंध या शब्दांची चांगल्या चांगल्या टीकाकारांकडून गल्लत केली जात आहे. हे दोन्ही निबंधांचेच प्रकार असले तरी...त्यांची स्वरूपे मूलतः भिन्न आहेत. दोन्हींतील लालित्याच्या जाती निरनिराळ्या आहेत...माझ्या मते पहिला कितीही गंभीर झाला तरी आत्मनिष्ठ राहतो. दुसरा कितीही काव्यात्म अथवा खेळकर झाला तरी वस्तुनिष्ठ राहतो. '[१]

खांडेकर म्हणतात तसे सर्रास होऊ लागले आहे, हे मात्र खरे आहे. कारण लघुनिबंध आणि ललितनिबंध हे पर्यायी शब्द झाले आहेत आणि त्यांचे निश्चित स्वरूप स्पष्ट न करताच त्यांचा वापर होऊ लागल्यामुळे तर मोठीच अडचण निर्माण झाली आहे. या विषयाचे इंग्रजीतले विवेचन फारसे उपयोगाचे नाही. कारण त्यामुळे आणखी घोटाळे निर्माण होतात. ' निबंध ' आणि ' एसे ' यांच्या चेहऱ्यामोहऱ्यांत साम्यापेक्षा विरोध अधिक आढळून येईल. इंग्रजीत ज्याला खरा निबंध (Essay Proper ) म्हणतात, त्याचे स्वरूप मराठीतील लघुनिबंध व ललितनिबंध या दोन्ही प्रकारांना समजावून घेणारे असे व्यापक आहे. आपण मात्र त्याचे दोन प्रकार करून मोठी अडचणीची अवस्था करून सोडली आहे.

म्हणूनच सुरवातीला मी म्हटले की, कोणी लघुनिबंध म्हणजे नेमके काय हो म्हणून विचारले तर...

हा वाङ्मयप्रकार मोठा लवचिक आहे, मोठा समावेशक आहे, मोठा नाजूक आहे आणि तितकाच राकटही आहे. सामान्य लेखकाला तो कशी हुलकावणी देईल आणि समर्थ लेखकाच्या हातामध्ये किती प्रकारचे पदन्यास करील हे सांगणे कठीण आहे. तो क्षणात फुलासारखा नाजूक व हलकाफुलका वाटेल, तर क्षणात मोठे प्रक्षोभक रूप धारण करील. मुंगीपासून मेरूपर्वतापर्यंत त्याला कोणताही विषय वर्ज्य नाही, आणि तरीही तो त्या विषयाला कलाटणी देऊन लेखकाच्या अंतरंगाचे दर्शन घडवील. व्यक्तिव्यक्तिगणिक वेगवेगळे दृष्टि-

कोण हा निबंध व्यक्त करील. त्यातही त्या त्या क्षणाच्या भाववृत्तीनुरूप त्याला प्रत्येक वेळी आगळेपणा प्राप्त होईल. व्यक्तित्वसंपन्नतेच्या प्रमाणात, अनुभवांची मांडणी करण्याच्या कुवतीनुसार त्या त्या निबंधात वेधकता येईल, आकर्षितपणा येईल. जीवनानुभव, जीवनावलोकन, जीवनचिंतन ही या निबंधाची मुख्य साधने. लेखकाचा दृष्टिकोण, त्याच्या चिंतनाची व्यापकता, अंतःकरणाची सदयता व ऋजुता आणि जीवनाबद्दलचे बालसुलभ उदंड कुतूहल, श्रेष्ठ प्रतीची संवेदनक्षमता इत्यादी वैशिष्ट्ये जेवढ्या अधिकाधिक प्रमाणात आढळतील; तेवढा हा निबंधप्रकार अधिकाधिक व्यक्तिनिष्ठ व परिणामकारक होईल. त्याच्या वैचारिक स्वरूपामुळे त्याला शुद्ध असे कलात्मक स्वरूप सहजासहजी प्राप्त होणार नाही. त्यासाठी जातिवंत अशा प्रतिभावताचीच आवश्यकता आहे. अलीकडच्या काही लेखकांनी सुदैवाने त्याच्या अतिशय शुद्ध स्वरूपाचा आविष्कार घडविण्यात चांगलेच यश मिळविले आहे.

मराठी निबंध-लेखनातील हा शुद्ध स्वरूपाचा आविष्कार हा लघुनिबंधाच्या रूढ चाकोरीपेक्षा ललितनिबंधांच्या द्वारा आविष्कृत झाला आहे. त्याने लघुनिबंध म्हणून मराठीत अवतरलेल्या वाङ्मयप्रकारापेक्षाही आपले सामर्थ्य किती मोठे आहे हे ओळखले आहे. एका दृष्टीने असे म्हणता येईल की, १९२६ पूर्वी ललित-निबंधांच्या रूपाने जे काही थोडेबहुत लिहिले गेले होते, त्याच्याशी या नव्या ललित निबंधाने नाते जोडून घेतले आहे आणि अशा रीतीने त्याला आपले स्वत्व गवसले आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला गोडसे भटजींनी आपल्या सत्तावनच्या आठवणी लिहिल्या, त्यावेळी त्यांनी पाश्चात्य लालित्यपूर्ण प्रवासवर्णनांचे अवलोकन केलेले नव्हते, रमाबाई रानड्यांनी आपल्या आयुष्यातील काही आठवणी लिहिल्या त्यावेळी त्यांनीही त्या लिहीत असलेल्या वाङ्मयप्रकाराचा अभ्यास केला होता असे नव्हे. त्याही पूर्वी हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो !' मध्ये यमू स्वतःच्या व परिस्थितीच्या संदर्भात जे काही चिंतन करीत होती, त्यामधला स्वैरपणा त्या कादंबरीला मोठा उपकारक ठरला होता. अशा प्रकारच्या त्यावेळच्या कृतींमधून आत्मनिष्ठा पुरेपुर व्यक्त होऊन चुकली होती, खेळकरपणा आणि चिंतनशीलता हातात हात घालून प्रसन्नपणे वावरत असल्याचा आगळा अनुभव येऊन चुकला होता...

१९४५–५० नंतर मराठी ललित-निबंधांच्या क्षेत्रात त्या अनुभवांचे अनेक

प्रकाराने पुनरुज्जीवन झाले, आणि म्हणूनच अलीकडील कालखंडात मराठी लघुनिबंधांचे व ललितनिबंधाचे जे निराळे रूप दिसून येऊ लागले, ते रूप न्याहाळता यावे यासाठी ' पारिजाता 'च्या या दुसऱ्या खंडाचे संकलन करणे मोठे जरुरीचे वाटले.

या भागाचे संकलन करताना अलीकडच्या काळातील प्रातिनिधिक लेखक आणि त्यांच्या लेखनातून साकार झालेले निरनिराळे प्रकार अशा रीतीने निवडले आहेत की त्यामुळे या कालखंडाचे या वाङ्मयप्रकाराच्या संदर्भात चांगल्या रीतीने दर्शन घडावे. ज्यामध्ये आत्मनिष्ठा इतकी पुसट—जवळ जवळ नाहीच म्हणा ना—अशा तऱ्हेच्या काकासाहेबांच्या ' नरभूषा तु दाढिका ' या सारख्या संकलनात्मक परंतु तरीही निबंधाचे रूप धारण करणाऱ्या निबंधापासून माधव आचवलांच्या ' हुंगावया हवे खोल ' यासारख्या अतीव आत्मनिष्ठ—निव्वळ संवेदनांच्याच भाषेत बोलणाऱ्या—निबंधापर्यंत, निरनिराळ्या रूपाने हा ' पारिजात ' नटलेला दिसेल !

काकासाहेब कालेलकरांसारखा बहुश्रुत ' हरफन मौला ' ज्यावेळी कोणत्याही विषयावर लिहिताना दिसतो, त्यावेळी खेळकरपणामुळे आणि संपन्न जीवनानुभवाचा सहजसुंदर आविष्कार घडविणाऱ्या त्यांच्या शैलीमुळे त्याला चांगलीच रोचकता प्राप्त होते. काकासाहेबांच्या लेखनात त्यांना आलेल्या अनुभवांची साध्यासुध्या स्वरूपात केलेली मांडणी आढळते आणि तरीही त्यांचे लेखन विलोभनीय वाटते ! आपल्यावर ' दुःखाचा आघात सहसा होत नसतो. ' अशी प्रांजळ कबुली देणारे काकासाहेब, गांधीजींच्या साबरमती आश्रमासमोरील चिंचेचा सर्वसाक्षी वृक्ष पावसाच्या आणि उन्हाच्या माऱ्यामुळे उन्मळून पडला, ही वार्ता ऐकून क्षणभर हलल्यासारखे वाटतात आणि त्यांच्या डोळ्यांसमोर क्षणार्धात त्या वृक्षासंबंधीच्या साऱ्या आठवणी जाग्या होतात. त्याने आपल्या जीवनाशी जोडलेले नाते त्यांना आठवू लागते. गांधीजींसारख्या राष्ट्रपुरुषाच्या आठवणींशी जखडल्या गेलेल्या या वृक्षाचे वर्णन करताना काकासाहेब भावविवश होऊन त्याचे वस्तुस्थितीपेक्षा फुगवून वर्णन करण्याच्या मोहापासून अलिप्त राहतात आणि तटस्थ वृत्तीने आणि तरीही जिव्हाळ्याने त्या वृक्षांशी निगडित असलेल्या आपल्या आयुष्यातील काही सुखद आठवणींची मांडणी करतात. वृक्षांना आपल्या भावना बाहेरून व्यक्त करता येत नाहीत, पण आतून त्यांना सर्व

समजते, या मनूमहर्षींच्या विधानाचा त्यांनी या लेखाच्या पार्श्वभूमीदाखल किती चांगला उपयोग करून घेतला आहे ! काकासाहेबांची बहुश्रुतता अशी नेमक्या त्या ठिकाणी जरुरीपुरती अवतरते. वास्तविक त्यांनी खूप अनुभविले, खूप पाहिले. परंतु त्या सर्वांचे अवडंबर न माजवता जरुरीपुरत्या मार्मिक उदाहरणांची योजना करण्याची योजकताही त्यांच्यामध्ये आहे. त्यांच्या शैलीचा साधेपणा तर एकदम उठून दिसतो.

इरावतीबाईंच्या ललित-निबंधांनी मराठी निबंध-वाङ्मय तर समृद्ध केले आहेत, परंतु या वाङ्मयप्रकाराकडे पाहण्याची एक नवी दृष्टीच दिली आहे. समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणून त्यांचा अधिकार किती तरी मोठा. परंतु आपल्या या विषयांच्या व्यासंगामध्ये त्या दरखेपेस स्वतःला हरवून बसत नाहीत. उलट प्रत्येक निबंधातून त्या ‘ माणूस ’ शोधण्याची धडपड करीत असताना दिसतात. समाजशास्त्राच्या आणि आपल्या संस्कृतीच्या सूक्ष्म अभ्यासामुळे आजच्या जीवनाचे कालच्या संस्कृतीशी असलेले नाते त्यांच्या तात्काळ लक्षात येते आणि त्यामुळेच आजच्या गुंतागुंतीच्या जीवनातील गुंते त्या हलुवार हाताने उलगडून जातात. खरे पाहिले तर, शैलीच्या दृष्टीने त्यांच्या लेखनात कल्पनाशक्तीचा फार मोठा विलास आढळणार नाही. परंतु स्त्रीसुलभ जिव्हाळ्याने त्या प्रत्येक प्रश्नाकडे पाहात असल्यामुळे त्यांच्या साध्या-सुध्या लेखनालाही काव्यमयता येते, सहृदयता येते. त्यांच्या प्रत्येक लेखाची प्रकृती मोठी विचारप्रवर्तक असते ( कित्येक वेळ त्यांचे निबंध अतिशय अस्वस्थ करून सोडतात ). विचार मांडण्याची त्यांची पद्धत कमालीची नाट्यपूर्ण असते. सौम्य, सूक्ष्म असा उपहास त्यांच्या लेखांच्या ठिकाणी झुळझुळ वाहाण्याचा निर्मळ पाण्याप्रमाणे त्यांच्या विचाराचे पैलू अधिकधिक तेजस्वी करीत असतो. ‘ एकाकी ’ सारखा त्यांचा निबंध प्रकृतीने मोठा गंभीर असला तरी त्यामध्येही त्यांच्या वृत्तीचा मोकळेपणा स्पष्टपणे दिसून येतो. मानवी जीवनातील अनाकलनीयतेची, गूढतेची जाणीव देता देताच त्यांच्या या लेखाने त्या गूढतेचा मुखवटा क्षणभर दूर केला असल्याचीही गमतीचा अनुभव वाचकाला येतो. मनाच्या तरलतेचे, अस्वस्थतेचे गोफ उलगडताना त्यांची प्रज्ञा उपनिषदातील गूढरम्य विचारांच्या गाभ्यालाच हात घालताना दिसते. ‘ स्त्री आणि संस्कृति ’ आणि ‘ मराठ्याचा मठ्ठपणा ’ या लेखांतील लालित्यपूर्ण मांडणीमुळे विषयाचे सौरस्य

क्षणाक्षणाला वाढत जाते. ते दोन्ही निबंध वाचल्यानंतर त्यांनी जेवढे काही स्पष्टपणे लालित्याच्या कोंदणातून मांडले आहे, त्यापेक्षा कितीतरी अधिक सुचविले आहे हेच लक्षात येते. इरावतीबाईंनी रूढ लघुनिबंधांच्या पुढचे पाऊल टाकले आहे, हे निःसंशय.

दुर्गाबाई भागवतांनी आपल्या ललितनिबंधांतून आपल्या संवेदनांचे सारे विश्वच शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. निसर्गाकडे पाहण्याची त्यांची दृष्टीच मुळी अतिशय आत्मपर अशी आहे. निसर्ग त्यांना साध्या निसर्गाच्या स्वरूपात दिसतच नाही मुळी ! तो रंग-रूप-नाद-स्पर्शाने नटलेला, अतीव संपन्न अशा व्यक्तिताने युक्त आणि चैतन्याने भरून टाकणारा असा एक जादूगार वाटतो. त्याची बेहोषी मग दुर्गाबाईंना पुरेपूर झपाटून टाकते. दुर्गाबाईंच्या अतिशय संपन्न भाषाशैलीमध्ये वाचकांनाही खिळवून ठेवण्याचे, भारून टाकण्याचे सामर्थ्य आहे. 'मत्स्यमहालात' या अतिशय गंभीर परंतु आत्मपर अशा लेखांमध्ये, पांढऱ्या शुभ्र एनॅमलच्या खिडीत पडलेल्या मानवी मांसाच्या गोळ्याच्या दर्शनाने ढवळून निघालेले दुर्गाबाईंचे मन मानवी जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करता करताच किती परिणामकारकपणे आणि समर्थपणे जीवनाशयाचे पापुद्रे सोलून दाखविते ! आपला सारा अनुभवच इथे त्या सोलीव स्वरूपात व्यक्त करीत असताना दिसतात.

अशाच तऱ्हेच्या अनुभूतीचा श्रेष्ठ आविष्कार करंदीकरांच्या निबंधांनी घडविला आहे. त्यांचा निबंध इतक्या एकसंधपणे आकार घेत असताना दिसतो की, त्याला स्वयंसिद्ध अशा आकृतिबंधाचे स्वरूप येते. मनातील अबोध हुरहूर करंदीकरांनी अनेकवेळा शब्दगत करण्यात यश मिळविले आहे. त्यामुळे त्यांच्या निबंधांतून व्यक्त होणाऱ्या जाणीवांपुढे कृत्रिमतेचे सारे तट कसे गळून पडलेले दिसतात. त्यांच्या कविमनाच्या कवेत आकाशाचा अर्थ गवसला असल्याची सुखद जाणीव देण्याचे सामर्थ्य त्यांच्या गद्याला प्राप्त झाले आहे. त्यांचे गद्य कित्येक वेळेला गद्य न राहता ते गद्यकाव्याचा सहजसुंदर पातळीवर जाते आणि एका पाठोपाठ एक अशा संवेदनांच्या जाणीवा शब्दांच्या चिमटीत पकडून आपल्यासमोर साकार करू लागते.

ही 'किमया' आचवलही करू पाहातात. परंतु स्थापत्य–शिल्पासारख्या कलांच्या आस्वादाची प्रक्रिया ललितनिबंधांच्या माध्यमातून व्यक्त करू पाहणे,

हे फार अवघड कार्य आहे. त्यामुळे त्यांच्या वृत्तीशी वाचक लय साधू शकत नाहीत. त्यांच्यांत आणि वाचकांत अंतर पडत जाते आणि त्यामुळेच सामान्य वाचकांच्या कवेत त्यांचा ' अवकाश ' येऊच शकत नाही. अनुभवाच्या तळाशी जाण्याच्या त्यांच्या मनःप्रकृतीचे मार्ग त्याला सहजासहजी उमजत नाहीत. यासाठी वाचकांची अभिरुची अगोदर तयार करावी लागते आणि लेखक आणि वाचक यांनी काहीसे पुढे येण्याची तयारी ठेवावी लागते. अर्थात वाचकांपर्यंत आपल्या संवेदनाक्षम कलास्वादाच्या जाणीवा पोचविण्यासाठी आचवलासारख्यांनी आहे तेथेच थांबून चालणार नाही.

या वरील लेखकांमध्ये आणखी एका लेखकाचा अंतर्भाव करावा लागेल तो म्हणजे मधुकर केचे यांचा. केचे यांचे कविमन आपल्या अनुभवांची सरळ सरळ मांडणी करते. त्यांचे अनुभवविश्वच मुळी आगळे आहे. त्याला विदर्भाच्या मातीचा कस आहे आणि वास आहे. त्या आपल्या अनुभवविश्वाची मांडणी करण्यासाठी आवश्यक असलेली पारदर्शक अशी भाषाशैली त्यांना वश झाली आहे. त्यांच्या अनुभवांचे वऱ्हाडी बोलीशी जणू अतूट असे नाते आहे.

इरावती कर्वे, दुर्गा भागवत, करंदीकर, आचवल, केचे यांच्या निबंधांनी, ललित-निबंध किंवा लघुनिबंध हा केवळ हलकाफुलका असतो, हा समज सर्वस्वी खोटा पाडला आहे. विशेषतः दुर्गा भागवत, करंदीकर, आचवल, केचे यांच्या निबंधांना सर्जनशील निबंध म्हणावयास हरकत नाही. त्यांमध्ये " उत्स्फूर्तपणा ( अतिशय ) जाणवतो. किंबहुना, यापुढे इतर कुठल्याही कलात्मक वाङ्मयकृती-प्रमाणे ललित निबंधालाही उत्स्फूर्तपणाची कसोटी लावावी लागेल. ही निपज अर्थातच थोडी असेल. पण ती थोडी असणेच हितावह आहे. कारण यातूनच क्षितिजापलीकडच्या असीमतेचा प्रत्यय यायचा असतो. विस्मयाच्या विश्वविराट भावनेची झळाळी इथेच उमटायची असते. व्यक्ती व विश्व यांतले समस्पंदन इथेच व्हायचे असते. अनुभवाची उत्कट लय इथेच लागलेली असते. थोडक्यात सांगायचे तर कवीचेच नव्हे तर महाकवीचे, श्रेष्ठ सृजनशील कलावंताचे बळ इथेच बीजरूपात सापडणेही अशक्य खचित नाही. "[११]

लघुनिबंधाने ललितनिबंधाच्या रूपाने आपली व्याप्ती वाढविली तरी मराठीत फडके-खांडेकर-काणेकरांनी रूढ केलेल्या ' लघुनिबंध ' या वाङ्मयप्रकाराची गोडी काही निराळीच आहे ! आणि म्हणूनच १९५० नंतरच्या कालखंडात शांताराम,

म. ना. अदवंत, वि. वा. शिरवाडकर, भगवंत देशमुख व मंगेश पाडगावकर यांसारख्या विविध प्रवृत्तीच्या लेखकांनी काही मोजके परंतु वैशिष्ट्यपूर्ण लघुनिबंध लिहून लघुनिबंधाचे दालन आशयसंपन्न करून ठेविले आहे. या सर्वांच्या लघुनिबंधांनी त्यांच्या कर्त्यांच्या व्यक्तित्वानुरूप अनेक रूपे धारण केली आहेत. शांताराम व अदवंत यांचे लघुनिबंध वाचताना अपरिहार्यतेने मागील पिढीची आठवण येते. शांताराम यांच्या कल्पनाविलासाने आणि समर्पक उदाहरणांच्या मांडणीने त्यांच्या लघुनिबंधाला रंगतदारपणा येतो. गुणी माणसांची मान फोटोत तिरकी असते, हा आपल्या मित्राने लावलेला शोध गंभीरपणाने मांडण्याचा लेखकाचा बहाणा मुळातूनच अतिशय गमतीदार आहे. गुणी माणसाच्या अभिमानाची जात कोणती असते हे सांगताना लेखकाने दिलेली उदाहरणे एकापेक्षा एक सरस आहेत. त्यांवरून लेखकाच्या सूक्ष्म अवलोकनशक्तीची कल्पना येते. लग्नापूर्वी एखाद्या तरुणीसंबंधाचे आपले बोलणे आणि लग्नानंतरचे बोलणे यांतला फरक लेखकाने कसा नेमका सांगितला आहे ! निबंधाच्या शेवटी म्हाताऱ्याच्या उदाहरणाने त्याला दिलेली कलाटणीही मोठी अर्थपूर्ण आहे. पुस्तकांकडे स्त्रीच्या भूमिकेतून पाहण्यातील काव्यही शातराम यांनी उकलून दाखविले आहे. मात्र हा निबंध वाचताना शांताराम हे प्राध्यापक आहेत आणि तेही इंग्रजी वाङ्मयाचे, हे लक्षात आल्याखेरीज राहात नाही.

प्रा. अदवंतांची प्रकृती मुळातूनच अतिशय सौम्य. त्यांच्या लघुनिबंधांतून त्यांचे सौम्य आणि जिज्ञासू व्यक्तिमत्व चांगल्या रीतीने प्रकटलेले दिसते. प्रतिष्ठितपणाचे कवच अंगावर घेऊन निसर्गसौंदर्यासारख्या मोठमोठ्या आनंदांना आपण कसे मुकत असतो, हे त्यांनी आपल्या नेहमी येणाऱ्या अनुभवांच्या आधारे सोदाहरण दाखविले आहे. वर शांताराम यांच्या पेशाचा उल्लेख केला, तसेच ' निसर्ग आणि आम्ही ' हा निबंध वाचताना अदवंत प्राध्यापक आहेत आणि तेही मराठीचे हे तात्काल लक्षात येते की नाही ? आपल्या निबंधाच्या शेवटी चमत्कृतिजन्य कलाटणी देण्याऐवजी आपल्या निबंधामध्ये आपल्या अनुभवांची त्यांनी जी मांडणी केलेली असते, त्याचेच सार शेवटी ते वाचकांच्या गळी उतरवताना दिसतात. ' पुराणांतील वांगी ' मध्ये उक्ती आणि कृती यांमधील मानवी व्यवहारामध्ये नित्य आढळणाऱ्या विसंगतीवर त्यांनी बोट ठेविले आहे आणि पुराणातील वांगी पुराणांत ठेवून त्याबद्दल तशी प्रामाणिक कबुली देणारा

पुराणिक सर्वसामान्य समाजजीवनात आढळणाऱ्या आमच्यातुमच्यासारख्या लब्धप्रतिष्ठितांपेक्षा श्रेष्ठ कसा, हे सांगितले आहे. सामान्य माणसाच्या जीवनात नित्य येणाऱ्या काही अनुभवांद्वारे सामान्यपणेच तत्त्वविमर्श करण्याची अदवंताची लेखनपद्धती दिसते. अदवंतांच्या शांत, सौम्य व्यक्तित्वाच्या आविष्कारामुळे त्यांचे निबंध अजूनही मोठे वाचनीय वाटतात.

शिरवाडकरांच्या व पाडगावकरांच्या लघुनिबंधांतून त्यांच्यांतील कविमनाचे दर्शन घडते, परंतु दोघांच्या प्रकृतींत असलेल्या भिन्नतेमुळे त्यांच्या आविष्कारात कितीतरी नावीन्याच्या छटा उमटून गेल्या आहेत. शिरवाडकरांच्या ‘ हे लोक...’ सारख्या लघुनिबंधांतून सामाजिक जाणीवांकडे सहानुभूतीने पाहणारी त्यांची सहृदय भूमिका लपत नाही, तर ‘ आरामखुर्ची ’ सारख्या कल्पनाविलासातून कवीच्या अंतरंगामध्ये क्षणभर फेरफटका मारून आल्याचे समाधान मिळते. ‘ हे लोक...’ हा लघुनिबंध वाचतात तो लघुकथेच्या किती जवळ येतो, हेही पाहण्यासारखे आहे. पाडगावकरांच्या विषयाच्या निवडीतच अगोदर चमत्कृती असते आणि त्या विषयाच्या संदर्भात ते आपल्या मनाच्या ओढी कौशल्याने व्यक्त करीत असताना दिसतात.

राहिले फक्त डॉ. भगवंत देशमुख ! त्यांच्या लघुनिबंधांचा ‘ आलोक ’ हा एकमेव संग्रह किती मोठ्या अपेक्षा वाचकांच्या मनात निर्माण करून गेला ! विशेषतः ‘ मांजराच्या मिशा ’, ‘ शेखमहंमदाचे स्वप्न ’ या त्यांच्या लघुनिबंधांतील आत्माविष्कारांची पद्धत काहीशी निराळी वाटावी अशीच आहे. त्यांच्या अनुभवाविष्कारातील प्रांजलपणा तर मोठा विलोभनीय आहे, आणि हे लघुनिबंध वाचताना आपण देशमुखांबरोबर कळत नकळत कसे वाहावत गेलो याचे भानही राहात नाही. खेदाची गोष्ट अशी की, एक अदवंताचा अपवाद सोडला तर साऱ्या लघुनिबंधकारांची या वाङ्मयप्रकाराकडे आपल्या पहिल्यावहिल्या लेखनानंतर पाठ फिरविली आहे !

खरे पाहिले तर आज नियतकालिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असताही हलकाफुलका, खेळकर असा लघुनिबंध क्वचितच कुठे भेटतो. जनसागरात घडणाऱ्या असंख्य घटनांपैकी काही घटना टिपून, त्यांवर गमतीचे भाष्य करून, लोकाभिरुचीला इष्ट वळण देण्याचे या वाङ्मयप्रकाराचे सामर्थ्य फार मोठे आहे. परंतु तसे प्रयत्न करणाऱ्यांचीच मोठी उणीव आहे.

आणि म्हणून हा संग्रह सादर करताना सामान्य वाचक आणि विद्यार्थी यांच्यासमोर या वाङमयप्रकाराचे प्रातिनिधिक स्वरूप ठेवून त्यापासून त्यांनी योग्य ती प्रेरणा घ्यावी असे सांगण्याचा मोह आवरत नाही. कारण आज वृत्तपत्रांतील अग्रलेख केवळ मतप्रदर्शनाचे रकाने बनत आहेत. वृत्तपत्रांतील स्तंभलेखकांनी ललितनिबंधाचे खरे सामर्थ्य न ओळखल्यामुळे नियमितपणे येणाऱ्या कित्येक सदरांना कळाहीन अवस्था प्राप्त झाली आहे. हा वाङ्मयप्रकार नियतकालिकांच्या आधाराने वाढीस लागतो, फोफावतो हे लक्षात घेऊन या वाङ्मयप्रकाराची जोपासना करण्याचे, त्याची विविध रूपे न्याहाळण्याचे नवोदित लेखकांनी मनावर घेतले पाहिजे. अनुभवांचे, कल्पनांचे, संवेदनांचे इंद्रधनुष्य फुलविण्यासाठी लघुनिबंधाइतका दुसरा कोणताही वाङ्मयीनप्रकार उपयुक्त नाही.

● ● ●

## संदर्भ


१. J. B. Priestley, **Essayists Past And Preseut; Introduction.**

२. ना. सी. फडके; **प्रतिभासाधन**, आ. ९ पृ. २१७.

३. वि. स. खांडेकर; '**चांदण्यांत**' माझे लघुनिबंध; १९५९

४. वि. पां. दांडेकर; **पारिजात** सं. वि. स. खांडेकर; प्रस्तावनेतून उद्धृत

५. ना. सी. फडके; **निबंध-सुगंध**; लघुनिबंध म्हणजे काय ? १९६६

६. ज्ञानेश्वर नाडकर्णी; **साहित्य**—मुंबई मराठी साहित्य संघाचे वार्षिक; १९५६; पृ. ४३, ४४

७. रा. श्री. जोग; **विचक्षणा**; एक फिर्याद; १९६२, पृ. ७५–८२

८. वा. ल. कुलकर्णी; **साहित्य आणि समीक्षा**; आजचे मराठी ललित गद्य : काही विचार; १९६३

९. वि. स. खांडेकर, उ. नि.

१०. डॉ. मा. गो. देशमुख; **भावगंध** ( पहिली आवृत्ती : १९५५ ); निबंध आणि एसे यांच्यांतील महदंतर, पृ. ८५

११. दुर्गा भागवत; ४० वे मराठी साहित्य संमेलन, मालवण **ललित वाङ्मय शाखा : अध्यक्षीय भाषण**; १९५८; पृ. ८

# पारिजात

दा. क्र. १६५५५

## १. पुराणपुरुषाला श्रद्धांजलि

माझ्यावर दुःखाचा आघात सहसा होत नसतो. मनुष्यजीवनाची भंगुरता मनावर इतकी ठसली आहे की मानवी जीवनात काहीही घडले तर त्याचे सहसा आश्चर्य वाटत नाही; पण वनस्पतिसृष्टीविषयी तसे नाही. कदाचित माझा पूर्वजन्म अरण्यातच व्यतीत झाला असेल; कारण झाडाविषयी मला जी आत्मीयता वाटते ती माणसाहून निराळी असली तरी कमी नसते.

एकदा कुठेसा रात्री झोपेतून जागा झालो. जवळच नदीकाठी एका लाकडाच्या कारखान्यात लाकडाचे मोठे मोठे ओंडके वाटोळ्या करवतीने कापले जात होते. वृक्षाची हाडे अशा रीतीने कापली जात असलेली ऐकून मला कसेसेच झाले. माझ्या वेदनेविषयी स्नेह्यांशी बोलायला गेलो. त्यांना ते काव्यच वाटले. सहानुभूतीच्या ऐवजी माझ्या वाट्याला कौतुकच आले. मला ते आवडले नाही.

ओरिसामध्ये दुष्काळ पडला. पुष्कळ गुरे मेली. त्यांची हाडे गाड्यांत भरून परदेशी पाठविण्यासाठी शहराकडे जात. हाडकुळ्या बैलांनी हाडांचे गाडे खेचले जात असताना पाहून मला वाटले होते, या बैलांना काय वाटले असेल ?

थोड्या वेळाने लाकडाचे ओंडके भरून दुसरी गाडी आली. तेव्हा वाटले, दुतर्फा उभ्या असलेल्या वृक्षांना स्वकीयांची हाडे पाहून काय वाटत असेल !

पण असले विचार लोकांपुढे मांडण्यात अर्थ नाही एवढे मी समजून चुकलो आहे. पण आज तो समाचार मामांच्या पत्रात वाचायला मिळाला त्याच्याविषयी लिहिल्यावाचून राहावत नाही. मामा लिहितात, " साबरमती आश्रमासमोरील

चिंचेचा सर्वसाक्षी वृक्ष पावसाच्या आणि वाऱ्याच्या मारामुळे उन्मळून पडला आणि आता त्याचे शवच्छेदन चालू आहे. ”

एखाद्या साम्राज्यासारखा मजबूत आणि विस्तीर्ण असा तो वृक्ष कधी काळी उन्मळून पडेल ही कल्पनाच मनात येणे शक्य नव्हते. त्यामुळे मनाला धक्काही बसला आणि आश्चर्यही वाटले. आणि त्या पुराणपुरुषाच्या मला ठाऊक असलेल्या जीवन-यात्रेचे स्मरण ताजे झाले.

गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील आपले काम संपवून भारतात येण्याचे ठरविले तेव्हा देशात सर्वत्र हिंडून स्थायी कुठे राहावे याचा त्यांनी विचार केला. देशाचा सर्वांत मोठा धंदा वस्त्रविद्येचा, त्याला अनुकूल स्थान अहमदाबाद आहे असे समजून आणि स्वतःची भाषा गुजराती असल्यामुळे गुजरातमध्येच आश्रम काढणे इष्ट आहे असे ठरवून ते अहमदाबादला आले आणि प्रथम त्यांनी कोचरबमध्ये दोन बंगले भाड्याने घेऊन सत्याग्रहाश्रमाची स्थापना केली आणि मग आश्रमासाठी चांगलीशी जागा शोधू लागले. ( माझा आग्रह होता की अहमदाबाद आणि मुंबई यांच्यामध्ये सुरतला सत्याग्रहाश्रमाची स्थापना करावी. पण गांधीजींना अहमदाबादच पसंत पडले. )

एके दिवशी गांधीजींचे निकटचे स्नेही डॉ. प्राणजीवन मेहता रंगूनहून अहमदाबादला आले होते. साबरमतीच्या काठी एक चांगलीशी जागा मिळण्याजोगी आहे असे समजल्यामुळे ती पाहण्यासाठी डॉ. प्राणजीवनना बरोबर घेऊन जाण्याचे ठरविले. गुजरातमधील एक प्रख्यात कर्तबगार शेतकरी रणोलीचे नाथाभाई पटेल माझे जुने मित्र. ते मला भेटायला आले होते. पूज्य बापूजींनी त्यांना आणि मलाही बरोबर घेतले. ( कदाचित आश्रमाचे हितचिंतक श्री. पुंजाभाई देखील आमच्याबरोबर असतील. ) आम्ही सर्व कोचरबहून निघालो आणि दुधेश्वर महादेवाच्या मंदिराच्या पुढे चंद्रभागा नदीचा पूल ओलांडून सुचविलेल्या जमिनीवर येऊन पोहोचलो. त्या जमिनीच्या काठी रस्त्याला लागून असलेल्या त्या विशाल पुराणपुरुषाचे—चिंचेच्या झाडाचे—आम्ही प्रथम दर्शन घेतले. रस्त्याने चिंचेची आणि बाभळीची झाडे कमी नव्हती. पण या झाडाचा रुबाब आणि विस्तार काही औरच होता. त्याच्या छायेखाली क्षणभर बसल्यावाचून पुढे जाण्याची वाटसरूची हिंमतच होणार नाही. असे त्या तिंतिणी वृक्षाचे ठाणमांड होते.

आम्ही सर्वांनी ती जागा पाहिली. नदीच्या काठापर्यंत जाऊन आलो. सर्वांनाच ती आवडली. गांधींनी नाथाभाईंना विचारले, "या जमिनीत काय होऊ शकेल? येथे कसली झाडे लावावीत?" मही नदीच्या काठी उत्तम शेती करणाऱ्या त्या शेतकऱ्याने चटकन म्हटले, "या जागेत बाभळीची झाडे होऊ शकतील." आम्ही सगळे हसलो. माझा थोडासा विरसही झाला. त्यावर ते म्हणाले, "असे हसू नका. चांगली मशागत केली की बाभळीचेही उत्पन्न कमी होत नाही." मी म्हणालो, "मला ठाऊक आहे, की मोठ्या मजबूत गाड्या-साठी चाके बहुधा बाभळीच्या किंवा चिंचेच्या लाकडाची करीत असतात." ही जागा विकत घेण्याचे नक्की झाले आणि अहमदाबादमध्ये रोगराई सुरू झाल्यामुळे कोचरबमधून निघून शक्य तितक्या लवकर साबरमतीकाठी स्वतःच्या हक्काच्या जागेत येण्याचे ठरविले. अहमदाबादचे उद्योगपती अंबालाल साराभाई यांनी आपल्या येथून एक मोठा तंबू, दोनचार राहुट्या आणि एक भला प्रशस्त शामियाना आम्हांला देऊ केला. आश्रमाच्या झोपड्या आणि इमारती तयार होताच हे तंबू वगैरे परत करण्याची बोली होती.

आता हे तंबू उभे कसे करावयाचे? आश्रमवासीयांमध्ये मी होतो हरफन मौला. मी म्हणालो, "काश्मिरच्या अमरनाथ यात्रेत सरकारी तंबू उभे करण्यास मी मदत केली होती. मला याचे रहस्य चांगले ठाऊक आहे." झाले. दुसरे दिवशी राहुट्या, तंबू आणि शामियाना यांचे काम येऊन पडताच मी संध्या-काळी आश्रमाच्या जागेवर जाऊन पोहोचलो आणि या चिंचेच्या झाडाखाली मी एक राहुटी ताणून दिली आणि दोन खाटली आत ठेवून आम्ही निजून गेलो. तंबू तयार होण्यापूर्वी त्या चिंचेच्या झाडाचाच आम्ही प्रथम आश्रय घेतला होता.

पुढे तंबू, शामियाना, झोपड्या, इमारती हळूहळू उभ्या झाल्या. आश्रम-वासीयांची संख्या वाढली. आम्ही विहीर खणली. रस्त्याच्या एका बाजूला आश्रम, दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय शाळा असा थाट शोभून उठला. शाळेची मुख्य इमारत म्हणजे छात्रालय या चिंचेच्या झाडाच्या समोरच बांधण्याचे मी पसंत केले. माझ्या मनाने घेतले होते की ही सूक्ष्मपर्णी चिंचच आमच्या संस्थेची अधिष्ठात्री देवता आहे. या चिंचेखालून येता जाताना मी तिला मनोमन नमस्कार करीत असे.

पुढे पुढे त्या रस्त्याने येणारे-जाणारे वाटसरू छायेत बसत असलेले पाहून त्यांच्यासाठी थंड पाण्याचे घडे झाडाखाली ठेवण्याची व्यवस्था झाली. प्रत्येक

वाटसरू शीतल छायेचा स्वीकार करून त्या आतिथेय झाडाला हार्दिक आशीर्वाद देत असत.

दरवर्षी या चिंचेची पाने भुरभुर गळून पडत आणि दरवर्षी नवी येत. आम्हांला तो मोठा उत्सवच होता. गांधीजींचा आश्रम हे बघता बघता अखंड भारताचे राजनैतिक केंद्र बनले. गुजरातपुरते तर आम्ही त्याला धार्मिक, सांस्कृतिक केंद्रही बनविले होते. राजनैतिक आणि प्राकृतिक उत्सव आम्ही आश्रमात उजवीत असू. त्याचे अनुकरण गुजरातमध्ये सर्वत्र होई. आश्रमातील प्रार्थनेतील भजनांचा आणि संगीताचा प्रचारही सर्वत्र होऊ लागला. आमचे भजनी संगीत माता साबरमतीही ऐकत असे, आणि छायादाता चिंचेचा वृक्षही ऐकत असे, आणि मनाला येईल तेव्हा तो डोलतही असे.

या वृक्षाच्या छायेत आम्ही कितीतरी चर्चा केल्या असतील. संकल्प केले असतील. मनू भगवान म्हणतात, " या वृक्षांना काही कळत नाही असे समजू नका. त्यांना आपल्या भावना बाहेर व्यक्त करता येत नाहीत; पण आतून त्यांना सर्व समजते.—अंतःसंज्ञाभवन्त्येते ! " आश्रमाचा सगळा इतिहास या वृक्षाला ठाऊक होता; पण सर्वांत महत्त्वाची घटना याच्याखाली घडली ती ऐतिहासिक होती.

१९३० च्या मार्चमधील बारा तारीख. इंग्रज सरकार सुखासुखी स्वराज्य देत नाही; आपली सैतानी मगरमिठी ढिली करायला ते सरकार तयार नाही; असे पाहून निर्वाणीचा उपाय म्हणून या साम्राज्याचा अंत जवळ आणण्यासाठी गांधीजींनी शेवटचा सत्याग्रह सुरू करण्याचे ठरविले. ते म्हणाले, " मी या सरकारजवळ स्वराज्याची रोटी मागितली—ते मला खडे चारू पाहतात. या साम्राज्याचा अंत झालाच पाहिजे. " स्वराज्य मिळविल्याशिवाय या आश्रमात राहण्यास पुन्हा येणार नाही, असा दृढ संकल्प करून गांधीजींनी ऐंशी साथीदार बरोबर घेऊन साबरमतीहून दांडीच्या समुद्रकाठी जाण्याचे ठरविले. आणि तेथे ज्या गरिबांच्या मिठावर सरकार कर घेत होते त्या मिठाचा कायदा तोडून ब्रिटिश साम्राज्याला आव्हान देण्याचे त्यांनी ठरविले.

प्रार्थनाभूमीच्या रेतीवर बसून सर्वांनी प्रार्थना केली. अहमदाबादचे हजारो नागरिक आश्रमात आणि नदीच्या रेतीत आदल्या रात्री निजले होते. सर्वांनी प्रार्थनेत भाग घेतला. ' वैष्णव जन ' हे पद सर्वांनी बुलंद आवाजाने म्हटले

आणि गांधींसमवेत सर्व दांडी-यात्री याच चिंचेच्या झाडाखाली क्रमाने उभे राहिले.

भगवद्गीतेचा गांधीजींनी केलेला गुजराती अनुवाद ‘ अनासक्तियोग ’ या नावाने त्याच दिवशी छापून तयार झाला होता. या ग्रंथाच्या ऐंशी प्रती आणून उभे असलेल्या ऐंशी लोकांच्या हाती एकेक प्रत आम्ही दिली आणि स्वराज्याचा जयघोष करीत हे ऐंशी स्वातंत्र्यवीर वेगाने निघाले. मी जर पुराणकार असतो तर आकाशातून गंधर्वांनी केलेली पुष्पवृष्टी मला दिसली असती. यात्रा सुरू झाली. कोणाच्याही कल्पनेत नव्हते इतक्या वेगाने गांधी चालू लागले. त्यांचे कसलेले सैनिक त्यांच्या मागोमाग तितक्याच वेगाने चालू लागले. त्यांना पोहोचवायला म्हणून आलेल्या नागरिकांना धावपळच करावी लागली.

कुणीसे मला विचारले, “ गांधीजी इतक्या वेगाने का चालतात ? ” मी म्हणालो, “ ही स्वराज्ययात्रा आहे. गांधीजींना पारतंत्र्य असह्य झाले आहे. ” एवढे म्हणून थांबतो इतक्यात दुसरीही गोष्ट सांगावीशी वाटली. मी म्हणालो, “ गांधी आहेत लष्करी सेनापती. त्यांना ठाऊक आहे की लोक जर आपल्या पुढे पुढे चालू लागले तर त्यांच्या पायाने उडणारा धुरळा स्वतःला व स्वतःच्या सैनिकांना खावा लागेल. दोनशे मैलांची यात्रा ठरलेल्या दिवसांत पुरी झालीच पाहिजे आणि कोणीही आजारी पडता कामा नये. म्हणून त्यांनी हा वेग प्रथमपासून धरला आहे. ”

त्या सबंध यात्रेचे रोमहर्षक वर्णन मला येथे करायचे नाही. ती यात्रा जेथे संपली तेथील वडाचे दर्शन नुकताच घेऊन आलो आहे.

पण गांधीजींच्या स्वराज्य-प्रातीच्या दांडीयात्रेला ज्या झाडाखाली प्रारंभ झाला, त्याला श्रद्धांजली देताना त्याने पाहिलेले ते ऐतिहासिक दृश्य येथे नमूद करणे जरुरीचे होते. दांडीयात्रा सुरू झालेली पाहताच त्या वृक्षाला धन्य धन्य होऊन तो म्हणाला,

“ अद्य मे सफलं जन्म । अद्य मे धन्य जीवितं ॥ ”

यानंतर कितीदा तरी आश्रमाच्या मुलाखतीला मी गेलो आहे आणि त्या पुराणपुरुषाला मी डोळ्यांनी आलिंगन दिले आहे. हल्ली हल्ली त्याची पाने दुर्मिळ झाली होती. त्याच्या चेहऱ्यावर वृद्धापकळा आली होती. मला त्याची थोडी चिंता वाटू लागली होती. पण हा वृक्ष असा उन्मळून पडेल याची मला कल्पनाच

नव्हती. आश्रमाच्या चित्रकाराकडून मी या वृक्षाचे एक रेखाचित्र काढून घेतले होते. त्याचेच आता दर्शन करणे उरले आहे. जगात पुष्कळ वृक्ष आहेत. पण गांधीजींचे दिव्य जन्मकर्म सतत पाहण्याचे भाग्य ज्याला लाभले त्या वृक्षराजाचे जीवन धन्य खरेच. त्याच्या पुण्यस्मृतीला ही श्रद्धांजली अर्पण करून आज कृतकृत्य होतो.

● ● ●

## २ : नर-भूषा तु दाढिका

सध्याचे पुरुषयुग दाढीवर नाराज झालेले दिसते. जो पाहावा तो सकाळी उठल्याबरोबर दाढीवर शस्त्र चालवतो. कित्येक लोक तर सूर्यास्तानंतरदेखील अनार्यपणे दाढीवर शस्त्र चालवतात. प्रथम दाढी गेली, पुढे मिशी लांबीरुंदीने आखुड झाली. आता तीही साफ होऊ लागली आहे.

अशा संकटकाळी जर इतिहासाचे एक अद्भुत प्रकरण वाचकांपुढे रुजू केले तर त्यांना ते खरेही वाटणार नाही. इजिप्तच्या काही राण्या गादीवर बसल्या-बरोबर आपल्या नाजूक गालांवर आणि हनुवटीवर कृत्रिम दाढी चढवू लागल्या. का, तर म्हणे पुरुषांवर राज्य करावयाचे आहे! दाढी पाहिल्यावाचून मंत्री, सेनापती आणि पौरजन आज्ञेचे पालन कसे करतील? राज्य चालवायला राज-दंडापेक्षा दाढीची आवश्यकता त्यांना अधिक भासली.

आपल्या देशाचा इतिहास पाहता, आपले प्राचीन देव दाढीमिशी वाढवीत नव्हते, आणि ऋषिलोक कधी दाढी करीत नव्हते. यामुळे दाढीवाल्या इसमाला पाहताच आपल्या लोकांना ऋषिमुनींचे स्मरण होते. सामान्य गृहस्थाश्रमी जर दाढी वाढवायला गेला, तर लोक त्याला अभद्रपणे विचारतात, "सुतक आलेले आहे की काय?"

कित्येक भटजी पुरश्चरणाला बसले म्हणजे 'पंचकेशी' वाढवितात. व्रतस्थ असल्याचे ते एक लक्षण आहे म्हणे. दक्षिणेकडे आणखी एका प्रकारचा रिवाज दिसून येतो. बायको गरोदर आहे, असे दिसून येताच नवऱ्याला दाढी वाढवावी

लागते. नवऱ्याला अशा रीतीने व्रतस्थ राहिलेले पाहून बायकोला परमसंतोष होत असला पाहिजे. नवरा प्रवासाला गेला, तर पत्नी एकवेणीधरा राहत असे. त्याचप्रमाणे पत्नी गरोदर असेतोपर्यंत पतीने दाढीधर किंवा श्मश्रुधर राहिले पाहिजे. हा समानतेचा न्याय दक्षिणेप्रमाणे उत्तरेलाही मान्य झाला पाहिजे !

ऋषिमुनींच्या नंतर दाढीचा पुरस्कार करण्यात आपल्या देशात मुसलमान आणि शीख यांची गणना होते. हिंदूंनी दाढी काढून शेंडी ठेवली, तर मुसलमानांनी बरोबर याच्या विरुद्ध जाऊन डोके साफ करून दाढी वाढविण्याचे ठरविले. संस्कृतिभेद सर्व बाजूंनी स्पष्ट झाला पाहिजे.

शीख लोक याहून अधिक तर्कनिष्ठ आहेत. संन्यासी गळयाच्या वरचा सगळा भाग साफ करू लागले. तो इथवर की, बिचाऱ्या भुवयादेखील त्यांच्या तडाख्यातून सुटल्या नाहीत. अहिंसक जैन साधूंनी वस्तऱ्यासारखे घातक शस्त्र न वापरता चिमटयाने दाढी-मिशी-केस उपटून काढण्याचे ठरविले, हे पाहून शीख लोकांना केसांची दया आली, आणि त्यांनी ठरविले की, उत्तमांगाच्या एका केसालादेखील धक्का लावायचा नाही. दाढी-मिशी-केस—सर्वांना अशा अशारीतीने अभयदान मिळाल्यामुळे उवांना फार आनंद झाला. त्यांनी या ‘ अभयारण्या ’त वस्ती करण्याचे ठरविले ! पण शीख काही जैन नव्हते की कृमिकीटांचे पालन करतील ! त्यांनी दह्यासारख्या जालीम आम्ल पदार्थांची मदत घेतली, आणि अभयारण्यातदेखील उवा निर्वंश झाल्या.

शीख लोकांनी दाढीमाहात्म्य वाढवल्यानंतर दाढीच्या विस्तारात आपोआप विविधता आली. शीख लोकांत अधिकांश जाट लोक असल्याने दाढी अधोमुख न राहता हनुवटीकडे विभक्त होऊन दक्षिण आणि वाम अशा दोन्ही दिशांनी फैलावली.

दाढीचा विस्तार तर कमी करता येत नाही, आणि तिला काबूत तर ठेवले पाहिजे, अशा परिस्थितीत शीख लोकांनी युरोपियन बायकांप्रमाणे जाळी वापरण्याचा रिवाज सुरू केला आहे. कित्येक लोक दाढीला हवा तसा आकार देऊन रात्री पट्टयाने बांधून ठेवतात आणि दिवस उगवताच दाढीला मोकळी सोडून गावात मिरवतात. बायकोला कह्यात ठेवून स्त्रीस्वातंत्र्यावर लांब-लांब व्याख्याने देण्यासारखाच हा प्रकार आहे.

येथवर झाला स्वदेशातील दाढीचा इतिहास. पण स्वराज्य झाल्यानंतर आता स्वदेशाबाहेर पाहिलेच पाहिजे. आपल्या येथे जो उठला, तो इंग्रजी

पुस्तके वाचून युरोपमधील माहिती आपल्या लोकांपुढे मांडीत असतो. मला अशांचे अनुकरण करावयाचे नाही. तेव्हा युरोपातील फ्रेंच कट, रशियन कट, मार्शल मुस्टॅच, पार्शल मुस्टॅच वगैरे प्रकारचे रसाळ वर्णन न करता मी आफ्रिकेकडे वळू इच्छितो.

सहाराच्या दक्षिणेकडे ज्या निग्रो, बांटू वगैरे जाती राहतात, त्यांचे केस मेंढरासारखे असतात. असे केस डोक्यावर वाढू दिले तर त्यांचे केवढे मोठे कांतार माजते हे मी ॲबिसीनिया किंवा एथियोपिया या देशांत पाहिले. पूर्व किंवा दक्षिण आफ्रिकेचे लोक आता दाढी वाढवू धजतच नाहीत. कारण घामाने भरली असता ती धुऊन काढणे सोपे नाही. पण दाढीचे खरे संकट मी पाहिले, ते सहाराच्या वाळवंटाच्या आसपासच्या मुसलमानांचे. धर्माप्रमाणे त्यांना दाढी तर वाढवावी लागते, आणि वारा जोराने वाहू लागला म्हणजे वाळवंटातील रेती आश्रयासाठी दाढीत दडी मारून बसते. स्वच्छंद विहार करणाऱ्या उवांपेक्षा दडी मारून बसणाऱ्या या वाळूचा भार अधिक. शेवटी तिकडील लोकांनी डोक्यावरील फेट्याचे शेपूट जरा लांब ठेवून ते दाढीभोवती गुंडाळण्याचे ठरविले. कित्येक तर गळ्याभोवती उपरणे गुंडाळून त्यात आपली दाढी लपवतात.

नुकताच चीन-जपानकडे जाऊन आलो आहे. तेथे तीन आठवड्यांत जेवढे संशोधन करता आले, त्यावरून सांगू शकतो की, तेथील लोकांना दाढी बेताचीच उगवत असल्यामुळे प्राचीन राजे लोकांनी तिची मोठ्या आस्थेने जोपासना केली होती. ओठावरील मिशी अगदीच बेताची, आणि ओठांच्या टोकाकडील मिशीचे केस मनसोक्त वाढणारे, असे पाहून त्यांनी दोन्ही टोकांच्या मिशा खोलवर वाढू देऊन त्याच्या टोकाला लिंबू टांगण्याचा प्रयोग केला होता, म्हणे! मला तर हे खरे वाटत नाही. चिनी-जपानी लोकांची तुरळक दाढी पाहिली, म्हणजे देवाने यांना अधिक केस दिले असते, तर बरे झाले असते, असे वाटल्यावाचून राहत नाही. या लोकांचे डोक्यावरील केस मात्र काळेकुळकुळीत, पण अस्वलासारखे राठ असतात. पण ते त्यांच्या चेहऱ्याला शोभतात उत्तम.

मी वर आधुनिक पार्शल मुस्टॅचचा उल्लेख केला आहे. पार्शल मुस्टॅच म्हणजे नाकाच्या रुंदीइतकीच, किंवा त्याहून कमी मिशी ठेवून बाकीची साफ करावयाची. वरच्या ओठाच्या टोकावर केसांचा लहानसा झुबका पुढे आला

म्हणजे मनुष्याचा चेहरा उठावदार दिसतो, हे खरे. पण काश्मीरकडच्या मुसल्मानांनी याच्या उलट प्रकार चालू करण्यात मोठी सोय पाहिली आहे. दाढी-मिशा दोन्ही यथेच्छ वाढू द्यायच्या आणि नाकाच्या रुंदीइतका मिशीचा भाग वस्तऱ्याने किंवा कातरीने साफ करावयाचा. पाणी पिताना किंवा जेवताना घास घेणे या रीतीने सोपे जाते. पुढले दात जर शोभिवंत असले, तर मिशीचा अंतराय दूर झाल्यामुळे ते उठावदार दिसतात; पण चेहऱ्याची शोभा वाढते, असे मात्र म्हणता येत नाही. मिशीच्या दोन्ही टोकांना लिंबे लटकावण्यापेक्षा मिशीला ताव देऊन त्या राठ मिशीच्या टोकावर दोन लिंबे ठेवून देणे हे मर्दुमकीला शोभणारे आहे. तानाजी मालुसरे म्हणे या बहादुरीत पटाईत होते. कथाकलीचे सोंग काढून नाकाच्या टोकावर लिंबू बसण्यापेक्षा मिशीच्या आकड्यांवर लिंबू ठेवणे केव्हाही इष्टच आहे.

इकडून तिकडून गोळा केलेले इतिहाससंशोधन बाजूला ठेवून आता आपण थोडेसे दाढीमनन करू या—देवाच्या राज्यात, निसर्गाच्या राज्यात म्हणा हवे असल्यास—निरर्थक असे काहीच नसते. कपाळावरील घाम डोळ्यांत शिरू नये म्हणून निसर्गाने डोळ्यांवर भुवयांची दोन छपरे केली. काना-नाकांच्या सूक्ष्म इंद्रियांच्या संरक्षणासाठी दोहोंच्या तोंडी निसर्गाने केस वाढविले. पण दाढीचा उपयोग काय ? थंडीपासून संरक्षण म्हणावे, तर कपाळ आणि नाक उघडे पडून देऊन निसर्गाने पक्षपात का केला ?

कित्येक लोक म्हणतात की, ज्याप्रमाणे मोराचा पिसारा लांडोरीचे आकर्षण करण्यासाठी असतो, त्याप्रमाणे दाढीचा पसारा स्त्रियांना मोहित करण्यासाठी असतो. पण या बाबतीत स्त्रियांचाच अभिप्राय घेतलेला चांगला. दाढी-मिशी दोहोंना रजा देऊन आणि डोक्यावरील केसांचा भांग पाडून स्त्री-पुरुषांतील भेद कमी झालेला स्त्रियांना आवडतो, असा सध्याच्या मनूचा निर्णय आहे.

ते कसेही असो, ज्याप्रमाणे ईश्वराने नाक चष्मा ठेवण्याच्या सोईसाठी केले आहे, हे सिद्ध झाले आहे, त्याचप्रमाणे दाढीही सकाळी तोंड पाहण्यासाठी आणि चेहऱ्याची मशागत करण्यासाठी आहे, असेही सिद्ध करता येईल. संस्कृतीमध्ये जसजसा पालट होत जातो, तसतसे दाढीचे प्रयोजन आणि रूप बदलत जाते, एवढे मात्र निर्विवाद सिद्ध आहे. आपल्या पूर्वजांनी पक्षपात टाळण्यासाठी आपल्या साधुपुरुषांना ‘ जटिलो मुण्डी लुंचितकेशः ’ असा त्रिविध

मार्ग मोकळा ठेवला होता. आपली आर्यसंस्कृती सर्वांगपरिपूर्ण होती, हे यावरून सिद्ध होत नाही का ?

• • •

## २ : ए का की

मी एकटी आहे. मी काय एकाकी आहे होय ? मुळीच नाही. माझ्याभोवती माझी काळजी घेणाऱ्यांची गजबज आहे. मग मी काय असहाय आहे ? अंऽ हं. मी हाक मारण्यापूर्वीच कितीतरी हात मला मदत द्यायला तयार आहेत—कितीतरी पाय माझ्यासाठी धावताहेत. इतकी माणसे भोवती आहेत, पण कुणाला म्हणून माझ्या अंतःकरणाचा ठाव सापडला नाही असा का प्रकार आहे—छे ! तसेही नाही. माझ्या अंतःकरणाचा ठाव सापडलेली पण पुष्कळ आहेत. मग मी एकटी कशी ?

मी एकटीच होते—आहे व पुढेही एकटीच असणार आहे, हे उमजायला जवळजवळ सगळे आयुष्य जावे लागले ! सगळ्या गोष्टींचे हे असेच आहे. सर्व आपल्या डोळ्यांपुढे असते, पुस्तकांतून वाचीत असतो—समजले आहे असा भास होत असतो—एक दिवस कसे कोण जाणे—अंतरी एकदम वीज चमकावी असा प्रकाश पडतो व खरोखरचे समजते. मी माझ्या स्कूटरवर बसून स्वतंत्रपणे चालवू लागले तेव्हाची गोष्ट. पहिल्याच दिवशी माझ्यापुढे एक टांगा होता. टांग्याचा वेग किती, मोटारीचा वेग किती या गोष्टी मला अगदी तोंडपाठ होत्या. मला टांग्याच्या पुढून एक वळण घ्यावयाचे होते. मी आपली वाट पहात होते, टांगा पुढे सटकेल आणि मी वळेन म्हणून. एकदम माझ्या डोक्यात लख्ख झाले. अरे मी तर टांग्यापेक्षा कितीतरी जास्त वेगात जाऊ शकते की ! !

इरावती कर्वे

एखादे वेळी डोक्यात प्रकाश पटदिशी पडतो. कधीकधी फार फार वेळ लागतो. मोठ्या श्रमाने मी कितीतरी गोष्टी एकत्र केल्या होत्या. द्राविड भाषांमधील नात्यांचे शब्द माझ्याजवळ जमले होते. वंशावळी पण खूप होत्या. पण द्राविड कुटुंबरचनेचे सूत्र काही लक्षात येत नव्हते. गोळा केलेली माहिती शक्य तितक्या मुद्देसूदपणे मांडून—" अमक्या-अमक्या गोष्टीमागील सूत्र काही उमजत नाही, " म्हणून लेख लिहिला. तो प्रसिद्ध झाला, पण मनाचे काही समाधान होत नव्हते. असे महिनेच्या महिने गेले. असमाधान – सूक्ष्म रुखरुख– हा एक स्थायी भाव होऊन बसला होता. पण वर-वर मात्र मन आणि शरीर इतर कामांत व्यग्र होती. एक दिवस मी सकाळी उठले, ती द्राविड कुटुंबरचनेचे उलगडलेले सूत्र घेऊनच. माझा पूर्वीचा लेख काढून त्यात उल्लेखिलेल्या सर्व गोष्टी डोळ्यांखाली घातल्या. आता कशी साऱ्या विसंगतींना संगती लागत होती — एखादेही टोक विनासंदर्भ, अधांतरी लोंबत राहिलेले नव्हते. जे विचार करकरूनही समजत नव्हते, ते विनासायास हाती आले तरी कसे ? असे काही झाले, म्हणजे मला एका ओळीची आठवण होते.

" नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधना न बहुना श्रुतेन ।
यम् एव एष वृणुते तेन लभ्यः... ॥ "

हा आत्मा आहे ना तो प्रवचनाने मिळत नाही, बुद्धीने हाती लागत नाही, पुष्कळ पढून गवसत नाही. तो स्वतः होऊन ज्याला निवडतो, त्याला तो मिळतो. ही ओळ मनात आली की कॉलेजात शिकलेला इंदुमतिस्वयंवराचा सर्ग आठवतो व डोळ्यांपुढे चित्र उभे राहते ते स्वयंवराचे. किती राजकुमार बिचारे जिवाचा आटापिटा करीत होते, पण तिने ज्याला माळ घातली त्यालाच ती मिळाली. तस्सा खट हा आत्मा आहे. म्हणजे काय खटपटच करू नये ? कोणी म्हणतात, या वाक्यात परमेश्वरी कृपेचे सूत्र गोवलेले आहे. ईश्वर म्हणतात ना, तो तपश्चर्येने लाभत नाही, त्याची कृपा व्हावी लागते !

अगदी ह्याच तऱ्हेने एक दिवस एकदम मला ज्ञान झाले, की मी एकटी आहे.

ध्यानीमनी नसता डोक्यात जो प्रकाश पडतो, त्याला कृपा म्हणता येईल का ? ज्ञानाचा हा झोत मला तरी विजेच्या लोळासारखा वाटला. मी त्यात भाजून निघाले, तडफडले. वरून जिवंत होते, तरी आतून मेल्यासारखी झाले. एकटे असणे ही गोष्ट काय एवढी भयंकर आहे ? जगाच्या गलबल्याने कंटाळून

एकटे असावे असे वाटत नाही का कधी ? मनस्वी राग आला म्हणजे नाही का आपण होऊनच माणूस जगापासून दूर होण्याचा प्रयत्न करीत ?

रागाने दूर निघून जाणे, रुसून कोपऱ्यात बसणे, जगाला कंटाळून लांब जाणे हे सर्व प्रकार खरे एकटेपणाचे नव्हत. आपली चहा होत नाही, लोकांना आपले अंतरंग समजलेच नाही, असे वाटून मनुष्य जेव्हा रागाने जातो, तेव्हा मनाच्या कुठच्या तरी कोपऱ्यात जगाच्या निकटपणाची जाणीव त्याला असतेच. जगाने माझी आज उपेक्षा केली, तरी उद्या त्याला माझी किंमत कळेल, ह्या गावी माझी बूज राहिली नाही. तरी कुठे तरी दुसरीकडे माझ्या भावनेला खासच साद मिळेल, अशी त्याची खात्री असते. ह्या एकान्तवासाची सर्व भूमिकाच लोकसापेक्ष असते. लोकांपासून तोंड वळवले, तरी पशुपक्षी, झाडे ह्यांच्या सहवासांत संतकवी परमेश्वरचिंतन करीत होते, असे दिसते. म्हणजे जरी कोणी रुसले, रागावले, एकान्तवासात गेले तरी एकटे नसते.

मला जे एकटेपणाचे ज्ञान झाले, ज्यामुळे मी इतकी भांब्रावून, गडबडून गेले, तो अगदी खराखुरा, अनादि-अनंत असा एकटेपणा आहे. तो माझाच नव्हे, सर्व जीवजातीचा– ज्यात-ज्यात म्हणून चैतन्य आहे, त्याचा एकटेपणा आहे. आपल्याभोवती जी माणसे आहेत, त्यांना आपण कधी भेटलोच नाही – अशा भेटीची शक्यताच नाही. डोळा डोळ्याला भिडतो, काहीतरी मिळालेसे वाटते, पण ती खरी मिळणीच नाही. स्पर्शाची तीव्र अनुभूती ही भेट नव्हे. एखाद्याचा पायरव कानी पडावा, त्याचे शब्द कानी यावे, पण हे सर्व भेटीचे प्रसंग म्हणजे, समुद्रात सहजगत्या प्रवाहाने एकत्र येणारी लाकडे जशी एकमेकांना टक्कर देतात त्यापेक्षा विशेष, जास्ती असे काही नाही. शेवटचा उपाय म्हणून देवाच्या पायांवर डोके ठेवले. मंदिराच्या दाराशी जरा बसले, तेथेही मनात हाच विचार आला, "अठ्ठावीस युगे ह्या क्षणाची वाट पाहात तू उभा असणार, जन्म-जन्मांतरीच्या फेऱ्यात मी चुकून तुझ्या पायांवर येऊन आदळले." ही काय भेट म्हणायची ? एक आत्मा दुसऱ्या आत्म्याला भेटणेच शक्य नाही.

ह्या परिस्थितीला आल्यावर आपण शेवट गाठला, ह्यापलीकडे जाणे शक्य नाही असे वाटले. माझ्या समजुतीप्रमाणे मी स्वस्थ होते, पण मला न सांगता, न सवरता मन ह्या कोंडीतून सुटण्याचा प्रयत्न करीतच होते. आता पुढे मार्ग नाही, ही कबुली द्यायला मन तयार नसतेच.

नेहमीच्या वाचनातील ओळी व शब्द निराळ्याच संदर्भात मनापुढे यायला लागतात. शब्द तेच – अर्थ प्रत्येक शब्दाचा तोच, पण मनाच्या स्थितीप्रमाणे वाक्यार्थात निराळेपणा किंवा खोली यायला लागते. 'विश्वात्मकें देवें' हे दोन शब्द कितीदा ऐकले असतील, डोळ्यांनी पाहिले असतील, पण ह्या वेळच्या वृत्तीमुळे मन तेथेच घोटाळत राहिले. विश्वात्मकता म्हणजे सर्व एकाकी आत्म्याचे भेटण्याचे स्थान नाही का ? प्रत्येकाला विश्वात्म्याची भेट होण्याची शक्यता आहे– व काही असामान्य व्यक्तींना ते साधलेही होते. विश्वात्म्याशी भेट म्हणजे सर्वत्र विखुरलेल्या एकाकी जीवाशीही भेट, ही परिस्थिती आपोआपच आली की,– ह्या विचारांनी मनाला बरे वाटले. म्हणजे हा नवा विचार मनात आल्याबरोबर माझी लगेच इतरांशी एकात्मता झाली, असे मुळीच नाही. पण 'एकटेपणा'-वर एक तोडगा अस्तित्वात आहे, ह्या जाणिवेनेच बरे वाटले. मी माझी समजूत घातली की एकटेपणा वाटणे म्हणजे आपल्याभोवती कुंपण घालणे आहे. हे कुंपण तुटले, तर सर्वात्म्याशी व त्याद्वारे इतरांशी खरी भेट होण्याची शक्यता आहे. पण मी आपल्याभोवती शब्दांचे जंजाळ पसरीत होते व 'बोलाच्याच कढीभाताने' भूक शमविण्याचा प्रयत्न करीत होते.

ज्या मनाने माझ्यापुढे हा विचार आणला, तेच शत्रूप्रमाणे माझ्यापाठी लागले होते. मी कुठे दम खाईन किंवा विश्रांती घेईन ह्याची सोयच नाहीशी झाली होती. कसे का होईना, माझे समाधान झाले होते ना–पण मन स्वस्थ बसू देत नव्हते. काहीतरी दुवा हाताशी आहे पण सापडत नाही, तसे झाले होते.

नवा दुवा सापडला, तो पण गोष्ट वाचता-वाचताच. पूर्वी वाचलेले पण नक्की आठवेनासे झालेले–फक्त हुरहुरीच्या रूपाने राहिलेले काय होते ते समजले व उलगडा झाला, आणि मनाची धडपड पण थांबली.

"आत्मा एव इदम् अग्रे आसीत् एकः एव। सः अकामयत। बहु स्यां... ।"

पूर्वी पहिल्याप्रथम आत्माच फक्त होता – एक होता. त्याने इच्छा केली, मी पुष्कळ व्हावे–"सः अबिभेत् तस्माद् एकाकी बिभेति"...त्याला भीती वाटली–एकटे असले, म्हणजे अशीच भीती वाटते. "स वै नैव रेमे – तस्मादेकाकी न रमते"......त्याला करमेचना. एकटे असले म्हणजे करमत नाही. मग त्याला वाटले, आपल्याला बायको असावी. एकटे असले, म्हणजे

असेच वाटते.

मला खूप हसू आले. एकदम मनावरचे कितीतरी दिवसांचे दडपण गेले. सर्वात्मा सर्वात्मा म्हणतात ना, तो पूर्वी एक होता – अद्वितीय होता, त्याला एकटे वाटले! त्याला वाटले, पुष्कळ व्हावे!

गम्मतच आहे. एकटे, सर्वात्मक, – दुसरे नाही, असे असले म्हणजे इतर असावेत, असे वाटते. ब्रह्म झाले म्हणून काय झाले, त्याला पण कुणाचे तरी बोलणे ऐकावेसे वाटले, – कुणाला तरी पहावेसे वाटले, म्हणून ते पुष्कळ झाले; आणि त्याचे तुकडे एकमेकांची खरी भेट होत नाही, म्हणून रडतातच. एक असतानाचा एकाकीपणा घालविण्यासाठी तुकटे व्हायचे, आणि पुष्कळ असल्यामुळे वाटणारा एकाकीपणा घालविण्यासाठी विश्वात्म्याकडे धाव घ्यायची. हे चक्र कधीच थांबणार नाही. माझ्या अगदी आतल्या मनाचे पण समाधान झाले वाटते. तेसुद्धा कुरतडायचे थांबून दमलेल्या कुत्र्यासारखे पुढच्या पंजांत डोके टेकून शांत निजले.

• • •

# ४ : स्त्री व संस्कृति

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. मी थोडे दिवस वाईला राहिले होते. त्याच वाड्यात मराठ्याचे एक तरुण जोडपे होते. नवरा उत्तमपैकी गवंडी होता, व बायको एकदोन घरी मोलमजुरी करी. दोघेही देखणी, हसतमुख, नेहमी ठाकठीक पोषाख केलेली अशी असायची. मी ज्यांच्या घरी राहिले होते त्यांना म्हटले, "कसा जोडा छान आहे नाही ?" ते वयस्क गृहस्थ व त्यांच्या पत्नी दोघेही एकदम म्हणाले, "अहो दिसायला छान असून काय उपयोग ? तो माणूस फार निर्दय आहे. महिना-पंधरवड्यात एकदातरी बायकोला मारतो." "ती तर चांगली आनंदी आणि अंगापिंडाने गुटगुटीत दिसते ! तिला माराचे काही फारसे वाटत नाहीसे दिसते." "छेः ! छेः !" काका मान हलवून म्हणाले, "हे तुमचे उद्‌गार फारच अनुदार आहेत. तिला म्हणे माराचे काही वाटत नाही! जणू काय ही रीतच आहे नवराबायकोची !" मी ताबडतोब उत्तरले, "हे पाहा– आपण पुढचे चार दिवस ह्या तालुक्यात हिंडणार आहोत ना, तर मी माझे काम करीन आणि तुम्ही भेटेल त्या शेतकऱ्याला तो बायकोला कधी मारतो का नाही ते विचारा." 'हो-ना' करता करता तसे करायचे ठरले व पुढचे चार दिवस काकांनी प्रत्येक शेतकऱ्याला विचारले, "काय हो, कधी बायकोला मारता का ?" आणि त्यांना उत्तर मिळायचे, "हो, रोजच नाही काय– कधीमधी लागतेच मारावे." काका बिचारे सुधारक, त्यांतून अमेरिकेचे पाणी चाखून आलेले; प्रत्येकाकडून हे उत्तर मिळालेले ऐकून त्यांचे हृदय कसे पिळ-

इरावती कर्वे

वटून निघायचे ! वाईला परत येताना एक खोल निःश्वास टाकून ते मला म्हणाले, " खरोखर, हिंदुस्थानातले पुरुष सुसंस्कृत कधी होणार कोण जाणे ! शिक्षणाने ह्या कार्याला किती वर्षे लागतीलसे वाटते तुम्हांला ? " काकांच्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे मी टाळले; कारण सुसंस्कृत काय आणि असंस्कृत काय, आणि कोण सुसंस्कृत, ह्याबद्दल मला उमजच पडत नव्हता. मी समाजातील गोष्टी फक्त पाहात होते, आणि संस्कृतीची व्याख्या करणे दिवसेंदिवस मला जास्तजास्तच अवघड वाटू लागले होते !

असाच दुसरा एक अनुभव मला आठवला. बालगुन्हेगारांच्या न्यायालयातली गोष्ट. आमच्यापुढे एक तरुण जोडपे हजर झाले होते. नवऱ्याची फिर्याद होती की, बायको सासरी राहत नाही, सारा वेळ माहेरी पळून जाते. बायको म्हणे, नवरा मारतो. नवऱ्याबरोबर त्याचे आईबाप व बायकोबरोबर तिचे आईबाप आले होते, आणि दोघेही आपआपल्या लेकरांना भर देत होती. आम्ही बायकोला नवऱ्याच्या स्वाधीन केले, व त्याच्याकडून लिहून घेतले की, बायकोला मारणार नाही. ते जोडपे व त्यांच्याबरोबरचा परिवार निघून गेला, पण परत पंधरा दिवसांनी ही भांडणारी जोडी माघारी आली. परत त्यांच्या कटकटी चालू झाल्या. मी पाहिले तो नवराबायकोत खोड ठेवायला काही जागा नव्हती. तो चांगला जवान वीस वर्षांचा होता, ती त्याला शोभेशीच चांगली देखणी, धडधाकट, वयाने सुमारे १४–१४॥ ची अशी होती. मी विचारले, " काय रे, बायकोला मारतोस का ? " तसे तो जरा शरमेनेच म्हणाला, " मी कसला मारतो जी ?—जेव्हा तेव्हा मला कोडताचा धाक दाखवते. " तिच्या तोंडावर थोडे तुच्छतेचे व विजयाचे हसू झळकले. मी थोडा विचार करून बायकोच्या आईबापांना व नवऱ्याच्या आईबापांना ह्या जोडप्याच्या बिऱ्हाडी यायला बंदी केली, दोघांकडून जामीन लिहून घेतला आणि नवराबायकोला जायला सांगितले. माझा ऑफिसर मला विचारतो, नवऱ्याकडून न मारण्याबद्दल घेतलेला करार संपला आहे, तो परत लिहून घेतला पाहिजे. मी मानेनेच नकार देऊन त्या जोडप्याची बोळवण करून सहा महिन्यांनी परत कोर्टात हजर राहण्याचा हुकूम दिला. ते प्रकरण गेल्यावर सगळ्यांनी मला विचारले, " आता त्याने तिचा जीव घेतला तर ? " मी म्हटले, " पाहू या काय होते ते. तुम्ही लांबून नजर ठेवा, आणि सतरांदा जाऊन त्यांना सतावू नका. " मी हे सर्व जवळजवळ विसरून गेले

होते, तो सहा महिन्यांनी ऑफिसरने आणून दोघांनाही हजर केले. "काय रे, ठीक चालले आहे ना?" नवरा ह्या कानापासून त्या कानापर्यंत हसत म्हणाला, "हां जी." बायकोला विचारले, "काय ग, तुझं म्हणणं काय आहे?" ती आज माझ्या डोळ्याला डोळा भिडवायला तयार नव्हती. तिचा बेगुमानपणा पार नाहीसा झाला होता. मी तिला परत विचारले, "नवरा मारतो का ग?" "फार नाही जी." तिने उत्तर दिले. दोघांनाही काहीतरी बोलायचे होते पण ती तेथेच घोटाळत उभी होती. इतक्यात तिची आई पुढे झाली व "मुलीला माहेराला न्यायचे आता दिवस आहेत, नेऊ का?" म्हणून विचारू लागली. मी मुकाट्याने दोघा व्याहीविहिणींवरची बंदी उठवली आणि 'शेवट समाधान-कारक लागला' असा शेरा मारून केस निकालात काढली.

आज ह्या पूर्वीच्या गोष्टी पुन्हा आठवल्या. गाडीत मनस्वी गर्दी होती. दुसऱ्या वर्गातसुद्धा लोक उभे होते. मी माझ्या पेटीवर एका कोपऱ्यात बसले होते, तो माझे लक्ष पुढेच उभ्या राहिलेल्या एका तरुण बाईकडे गेले, व मी तिला माझ्याजवळ पेटीवर जागा करून बसायला बोलावले. गेला अर्धा तास स्टेशनवर इकडेतिकडे जाताना मी तिला पाहिले होते. आम्ही अगदी जवळ-जवळ खेटूनच माझ्या लहानशा पेटीवर बसलो. तिने थोड्या वेळाने मला विचारले, "तुम्ही अमक्या–अमक्या ना?" मी "होय" म्हणून अर्थातच तिला "तुम्ही कोण?" म्हणून प्रश्न केला. तिने आपले नाव सांगितले. मी म्हटले, "हां, तुमच्या कविता मी वाचल्या आहेत; त्याच ना तुम्ही?" तिचा काळासावळा पण मोहक चेहरा आनंदाने खुलला. मला तिचा चेहरा गोड व निर्व्याज वाटला. तिचे बोलणे सरळ व खुलास होते. बांधा ठेंगणासाच होता. अंगापिंडानेही ती चांगली सशक्त दिसली. थोडक्यात सांगायचे म्हणजे चार महाराष्ट्रीय बाया असतात तशी ती होती. तिने मोठ्या उल्हासाने आपल्या कामाची माहिती दिली. आपले मुख्य कसे दिलदार आहेत–त्यांचे बोलणे चालणे कसे मनमोकळे असते; काही चुकले तर ते कसे नीट समजावून सांगतात, वगैरे गोष्टी मला ऐकवल्या. तिच्या कचेरीतील मुख्य मला ठाऊक होते. कोणावरही चटकन छाप बसावी असे ते होते. त्यांचा देह धिप्पाड, त्यांचे हसणे सात मजली, त्यांचे बोलणे मोठ्यांदा, ज्याला मध्यम स्थितीतील लोक पापभीरूपणा म्हणतात त्याचा अभाव, स्वभावाने दुष्ट व क्षुद्र नव्हते, पण एकदा

शत्रुत्व आले तर शाब्दिक व वेळ पडल्यास शारीरिक हल्ला करण्यास मागेपुढे न पाहणारे असे होते. साहित्यगुणही त्यांच्यात होते. माझ्याशी बोलणाऱ्या बाईवर त्यांची छाप पडावी ह्यात काहीच नवल नव्हते. पण बायका बोलायला लागल्या म्हणजे घरगुती गोष्टी निघायच्याच. ह्या गप्पा झाल्यावर तिने मला विचारले, "मुलं किती? केवढी आहेत? तुमच्याशिवाय राहतात का?" मीही पण तीच चौकशी केली. बाई उत्तरली, "मला मुलं नाहीत." "खरंच, तुमचं लग्न झालं नसेल, नाही?" "छे! माझं लग्न झाल्याला झाली चांगली सहा वर्षं!" ती म्हणाली. उगीच आपण मुलांबद्दल प्रश्न विचारले असे वाटून मी गप्प बसले. थोडा वेळ थांबून बाई आपणहूनच म्हणाली, "मी माझ्या नवऱ्याबरोबर राहत नाही—" तरीसुद्धा पुढे प्रश्न विचारण्याचा धीर मला होईना. तिलाच काय वाटले कोणास ठाऊक, ती आपली हकीकत पुढे सांगू लागली, "माझे आईवडील वारले व माझ्या एका चुलत्याने मला वाढवले. मी मॅट्रिक झाल्यावर माझ्या मनात नसतानासुद्धा त्यांनी माझे लग्न करून दिले." "तुमचे यजमान अशिक्षित आहेत होय?" मी विचारले. "छे! छे! ते चांगले एम्. ए., पीएच. डी. आहेत. पण माझे मनच त्यांच्याकडे ओढले जाईना." मी मनात म्हटले, "कलिदासानेच मुळी तरुण मुलींना मोकळीक दिली आहे ना! 'तो काही विलोभनीय नव्हता असे नाही—तिला काही समजत नव्हते असेही नाही. पण तिला तो नाही आवडला झाले! कारण व्यक्ती तितक्या प्रकृती!' असे म्हणून त्याने नाही का इंदुमतीच्या स्वयंवराचे वर्णन केले? बाई, त्या इंदुमतीच्याच परंपरेतील तू!" तरीदेखील माझे चार पावसाळे जास्त झाले होते, नवऱ्याजवळ न राहणाऱ्या बाईचे जीवन किती कठीण ह्याची जाणीव मला होती. तिच्या आत्मविश्वासाचे थोडे कौतुक आणि तिच्या मुग्धपणाबद्दल थोडी करुणा वाटूनच मी विचारले, "लग्न मनाविरुद्ध झाले तरी नवरा जर सद्गुणी व सुशिक्षित असेल तर त्याचे—आपले पटते का नाही हे तरी तुम्ही निदान पाहावयाचे होते! कदाचित सहवासाने प्रेम उत्पन्न झाले असते." "तोही प्रयत्न मी करून पाहिला," ती म्हणाली. "काय? त्याचा स्वभाव चमत्कारिक आहे?" मी विचारले. "छेः! तसे काही नाही, ते फार सुस्वभावी आहेत, शिकलेले आहेत," ती थोडी थांबली. नंतर मान हालवून म्हणाली, "त्यांच्यात तडफ म्हणून नाहीच, ते फारच गरीब आहेत

हो ! मी त्यांच्याबरोबर बिऱ्हाड थाटून होते की–कधी एक अवाक्षर नाही की रागावणे नाही !–" माझ्या डोक्यात लख्खकन प्रकाश पडला. मला माझ्या बाईचा अनुभव आठवला, मला कोर्टातील केस आठवली, माझ्या ओळखीचे आणखी एक कुटुंब आठवले. गृहस्थ सुसंस्कृत, विद्वान व रसिक होता—त्याचे ते उदास, करुण डोळे, त्याच्या बायकोचा खुला उमदा चेहरा, त्याच्यावर दिसत असलेला आत्मविश्वास, किंचित पुरुषी उद्धटपणा हे आठवले. ते जगात दंपती होते, पण त्यांचे खरे नाते नवराबायकोचे नव्हते, मित्र-मैत्रिणीचे नव्हते, तर मातापुत्राचे होते. कोर्टातील केस सोपी होती, तिचा निकाल समाधानकारकपणे लावता आला–तेथील मंडळी एकमेकांना ओळखून होती; पण मध्यमवर्गाचे सर्वच अर्धवट. माझ्या शेजारी बसलेली तरुण बाई मला विचारीत होती, "काय हो, आता घटस्फोटाचा कायदा झाला म्हणजे मला नीट काडीमोड मिळेल, नाही का ?" पण माझे मन दुसरेच एक कोडे सोडविण्यात गुंतले होते—वरवर संस्कृतीची आभरणे ल्यालेल्या, पण आतून रानटी पौरुषाची पूजा करणाऱ्या ह्या 'तडफदार' तरुणी आणि सुसंस्कृत, शिक्षणाने, कोमल मनोवृत्ती झालेले अहिंसक तरुण ह्यांची जोडी एकत्र नांदणार कशी ?

● ● ●

## ५ : मराठ्यांचा मठ्ठपणा

केवढे भांडण चालले होते दोघांचे ! सगळी माणसे त्यांच्याभोवती गोळा झाली होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसत होते. तुळशीराम आणि लाला ह्यांच्यांतले भांडण होते ते. तुळशीराम असेल जेमतेम पाच फूट उंच — अंगाने काटकुळा — वजन शंभर पौंडसुद्धा भरले नसते; आणि लाला होता सहा फूट उंचीचा पठाण ! त्याचा लाल्बुंद उग्र चेहरा, बैलासारखी मान, जाड मिलिटरी बूट व निमुळती टोपी ठेवून बांधलेला फेटा ह्यांमुळे तर तो होता त्यापेक्षाही उंच वाटायचा. तो नुसता खाकरला तरी आसपासची पोरे घाबरून पळायची. त्याचे एक एक मनगटच असेल तुळशीरामाच्या मांडीएवढे जाड. "थांब, थांब, तुझा जीवच घेतो," तुळशीराम लालाच्या अंगावर धावला. भोवतालच्या माणसांनी तुळशीरामाला धरून ठेवला. एवढ्यात इंजिनियर कामावर आले व "काय गडबड आहे ?" म्हणून विचारू लागले. "कुछ नहीं मालिक, ये आदमी खाली झगडा करता है." लवून सलाम करीत लाला म्हणाला. तिकडून तुळशीराम शिरा ताणीत ओरडला, "ऐकतोस काय, सायबा ? शाप खोटं बोलतोय तो. मला शिव्या दिल्यान् न् आता गोंडा घोळतो." साहेब दोघांना घेऊन हाफिसच्या खोलीत गेले व तुळशीरामाला शांत करीत झाली हकीकत त्यांनी विचारली. लाला रोजच्याप्रमाणे तयार होऊन बांधकामाच्यापुढे उभा होता. कामकरी येता-येता गर्दीत एकाचा धक्का लागून तुळशीराम ढकलला गेला, व तोल सावरता-सावरता त्याचा पाय लालाच्या शेजारीच ठेवलेल्या

इरावती कर्वे

वळकटीवर पडला. " क्यों साले, बेवकूफ, तुम क्या अंधे हो ? " लालाने गुरकावले. ते सहन न होऊन तुळशीराम लालाचा जीव घ्यायला धावत होता. " अरे तुळशीराम, काय हमरीतुमरीवर येता ? जा पाहू कामाला. — लाला ! माझ्या माणसांना शिव्या दिलेल्या मला खपणार नाहीत. " असे दोघांनाही सांगून साहेबांनी दोघांना दोन दिशांना पाठविले. तरी जाता जाता लाला " बेवकूफ मरगट्ठे ! " असे पुटपुटलाच. ते ऐकून तुळशीराम दारापर्यंत गेलेला तावातावाने परत आला व साहेबांच्यापुढे हात नाचवीत म्हणाला, " बघ सायबा, कसा माजला आहे बैल ! – थांब, त्याला दाखवलंच पाहिजे. त्याची वळकटीच फेकून देतो समुद्रात. " " माझे आई ! जा आता कामावर ! " साहेबांनी परत सांगितले व तुळशीराम निघून गेला. त्या दिवसापासून लाला प्रत्येक काम-कऱ्याला सांगायचा की, तुळशीराम माझा बिछाना दर्यात टाकणार आहे, आणि हसायचा, आणि सगळीजण हसायची. पण तुळशीरामाने लक्षच दिले नाही. तो फक्त जळजळीत दृष्टीने लालाकडे पाहायचा. तुळशीरामाचे काम सर्वांत उंच जागी असायचे. तो होता खारवी. दुसऱ्यांचे डोळे फिरतील इतक्या उंचीवर अरुंद फळ्यांवरून तो खुशाल बेफिकीर इकडून तिकडे जायचा व आपले काम करायचा. उंच वाशांवर चढून परांच्या बांधायच्या, टोकावर कप्पी बसवायची, कप्पीची दोरी सरकली तर वर चढून ती परत बसवायची–ही कामे म्हणजे त्याच्या हातचा मळ. स्वारी तशी सरळ, पण लालाची मग्रूरी तो कधी ऐकून घ्यायचा नाही; आणि सर्वांना धास्ती वाटायची की, एखादे दिवशी लालाने थप्पड मारली तर ह्या काटकुळ्या प्राण्याचा जीवच जायचा म्हणून. ज्या इमारतीचे बांधकाम चालले होते तेथे वरच्या मजल्यावर तुळशीराम निजायचा आणि खालच्या दाराशी लालाचा पहारा असायचा, आणि रोज त्यांच्या कटकटी चालायच्या. ह्या दोघांचे भांडण म्हणजे सायबालासुद्धा कुतूहलाचा विषय होता. ही उंदीर–सिंहाची चुरस मोठी मजेची होती. त्यालाही तुळशीराम लालाची वळकटी समुद्रात टाकणार ह्या कल्पनेचे हसू आले. हे भांडण झाल्यापासून दोन–तीन दिवसांनी साहेब जो कामावर येतो तो त्याला एक अद्‌भुत दृश्य दिसले. कामकरी नुकतेच कामगार आले होते आणि मोठे रंगण करून उभे होते. मध्यभागी लाला रागाने अक्षरशः नाचत होता. त्याच्या तोंडातून शिव्यांचा भडिमार चालला होता. तो तुळशीरामाची गठडी वळायच्या गोष्टी बोलत होता. त्याचा

आधीच लाल असलेला चेहरा रागाने आता फुटणार असे वाटत होते. तो मान उंचावून आकाशात हात नाचवीत " खाली तर ये म्हणजे तुला दाखवतो. " असे वारंवार म्हणत होता. साहेबाने वर पाहिले तर सगळयांत उंच नि अरुंद परांचीवर तुळशीराम एखाद्या माकडासारखा बसला होता व निःशब्द हसत होता. साहेबाला पाहताच लाला जरा थबकला, पण पुढे होऊन सलाम करून त्याने आपले गाऱ्हाणे साहेबांना सांगितले की, ह्या तुळशीरामाने माझी वळकटी कुठे नाहीशी केली आहे ती मला परत करवा. साहेब आलेला पाहताच तुळशीरामही माकडासारखा झरझर खाली आला. " काय रे, लालाची वळकटी तू चोरलीस काय ? कुठे आहे ती ? " " मी नाय चोरली बा–मी ती दर्यात फेकून दिली. " तुळशीराम म्हणाला. लाला म्हणाला, " चोरून वर खोटं बोलतो आहे. माझी दुलई होती व तीत शिवलेले पैसे होते. " तुळशीरामाने लांब हात केला व बोट दाखवून म्हटले, " ती बघ तिकडे मी फेकली–अजून सापडेल. जा जाऊन बघ. " लाला व त्याच्याबरोबर दोघेतिघे धावतच किनाऱ्याशी गेले, व साहेब तुळशीरामाला घेऊन आत गेले. सकाळी लाला उठून बाहेर गेला ही संधी साधून तुळशीरामाने वळकटी पळवून फेकून दिली होती. एवढी हकीकत जो साहेबाला कळते तेवढ्यात लाला आला. त्याचा राग कमी झाला होता– पैसे न् वळकटी भिजलेली, पण काहीही चोरीस न जाता मिळाली होती. तो जरा हसतच म्हणाला, " मालिक, ये बिलकूल बेवकूफ है. रजाईमें सो रुपिया थे वे सब वापस मिले. इसको कुछ पैसेकी बात मालूम नहीं हुई. " साहेबांनी तुळशीरामकडे पाहिले. क्षणभर दोघांचे डोळे भिडले. दोघांच्याही चेहऱ्यावर हसू झळकले. साहेब आणि तुळशीराम दोघेही ' बेवकूफ मरगठ्ठे '–काय हसण्यासारखे झाले त्यांनाच माहीत. एवढे खरे की, त्या दिवसापासून लाला परत तुळशीरामाच्या वाटेस गेला नाही. पण ह्या मठ्ठ मराठ्याने मोठ्या युक्तीने वळकटी हस्तगत करून ती हातोहात न लांबवता समुद्रात कशी फेकली व आपले पैसे कसे परत मिळाले हे सांगताना बाकीचे मठ्ठ मराठे हसत का नाहीत हेही त्याला कधी कळले नाही.

बिचारा लालाच काय, पण इतर परप्रांतीयांनासुद्धा मराठ्यांच्या वागणुकीचे आश्चर्य वाटते. मराठ्यांना व्यवहारच नाही हा सिद्धान्त तर मी आतापर्यंत पाचपंचवीस वेळा तरी ऐकला असेल.

पुष्कळ वर्षांमागची गोष्ट. मी शेटना आमचे नवीन घर दाखवीत होते. घर दाखवून झाल्यावर त्यांनी बारीक चौकशी केली—जमिनीला काय पडले? घराला काय पडले? वगैरे—आणि शेवटी विचारले, "पण ताई, एवढे पैसे कुठून आणले?" मी बेफिकीर स्वरात सांगितले. "थोडे जवळ होते ते दिले व बाकीचे कर्ज काढले—फेडू हळूहळू." शेटनी गंभीरपणे मान हलवली—"छे:, हेच पैसे तुम्ही एखाद्या धंद्यात गुंतलले असते तर तुम्हांला दरवर्षी इतके व्याज आले असते. त्या व्याजापैकी काही भाग देऊन भाड्याचे घर छान घेता आले असते. परत उरलेले व्याज रकमेत टाकून वीस वर्षांत चांगली पुंजी जमवता आली असती. पण तुम्हा मराठ्यांना (महाराष्ट्रीयांना) व्यवहारच कळत नाही. आपले असे घर आणि मागे-पुढे अंगण असले म्हणजे तुम्हांला वाटते स्वर्ग हाती आला." मी हसून म्हणाले, "शेटजी, तुम्ही हेटाळणीने म्हणून जे म्हणाला ते अगदी शंभर टक्के खरे आहे. बँकेतल्या पैशांचे व्याज खाण्यापेक्षा स्वतःची झोपडी का होईना—असली म्हणजे आम्हांला जन्म सफळ झाल्यासारखा वाटतो." ह्या मराठ्यांना काही अक्कलच नाही असा अभिप्राय त्यांच्या तोंडावर दिसला, व त्यांनी आमचा निरोप घेतला.

आमच्या ओळखीच्या परप्रांतीय संस्थानिकांना वर्षासाठी घर घ्यावयाचे होते. घर बघून पसंत केले, वर्षाचा भाडेपट्टा झाला व उद्या राहायला यायचे; एवढ्यात मंडळींच्या लक्षात आले की, घरात विजेचे दिवे नाहीत. आता काय करायचे? दिवस लढाईचे म्हणून वीज कंपनी नव्या घरांना वीज देत नव्हती, व तिथे वशिला चालेना. एवढ्यात राजेसाहेबांना असे आढळले की, त्यांच्याच आळीत एका पाटीलबुवांचा वाडा व जमीन होती. तेथल्या विहिरीसाठी मोठा विजेचा पंप लावला होता—त्यांतून पाटीलबुवांनी मेहरबानीने दोघाचौघा शेजाऱ्यांना विजेच्या तारा जोडून दिल्या होत्या. आणि व्यवहार जरी चोरीचा होता तरी वीज कंपनी तिकडे कानाडोळा करीत होती—तसेच काहीसे संधान राजेसाहेबांनी पाटीलबुवांकडे लावले तर वीज कंपनी त्यात ढवळाढवळ करणार नव्हती. राजेसाहेब लगेच आपल्या भारी किमतीच्या प्रचंड मोटारीत बसले व पाटीलबुवांकडे आले. राजेसाहेबांची मोटार फारच सुरेख व खूपच मोठी होती. आमच्या भिकार गावात काही अशा मोटारी सहजी दिसत नाहीत. त्यांची मोटार गेली की रस्त्याने जाणारी मुले उभी राहून कौतुकाने मोटार बघायची. हाकणारा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
क्रमांक ५७१६२ दि. ...

सुद्धा ऐटीत असे. राजेसाहेबांची मोटार पाटीलबोवांच्या वाड्याजवळ आली, मोटारहाक्या खाली उतरला व वाड्यात जाऊन ' बाहेर अमके अमके आले आहेत, तुमची गाठ घ्यायची आहे, क्षणभर बाहेर आलात तर बरे ' असा निरोप त्याने बैठकीत जाऊन सांगितला. पाटील जरा अनिच्छेनेच उठले व फाटकाशी आले. राजेसाहेब खाली उतरले, रामराम वगैरे झाल्यावर त्यांनी सांगितले, ' हे पलीकडचे घर आम्ही घेतले आहे. तेथे वीज पाहिजे आहे. किती पैशाला तुम्ही कनेक्शन द्याल म्हणून विचारायला आलो आहे. " पाटीलबुवांनी विडा चावीत संथपणे उत्तर दिले, " वा ! फार छान ! आपण आमचे शेजारी होणार, आनंद आहे आम्हांला. पण वीज काही तुम्हांला नाही बुवा देता येणार. " राजेसाहेबांनी व त्यांच्या कारभाऱ्यांनी अतिशय गळ घातली, लोकांच्या चौपट पैसे देण्याचे कबूल केले. पण पाटीलबुवांचे आपले एक उत्तर, " छे, हो ! आधीच दोन चार घरांना दिली आहे—आमच्याच पंपाला पुरी पडत नाही—तुम्हांला नाही देता येत. " राजेसाहेबांनी ही सारी हकीकत मला सांगितली, व मराठ्यांना व्यवहारच कळत नाही म्हणून ते आपल्या मुलखात निघून गेले. घर अंगावर पडू नये म्हणून लगेच दुसरा एक भाडेकरी पाहून वर्षाच्या कराराने त्यांना देऊन टाकले. नवी भाडेकरू बाई होती, घरात तीन-चार मुले होती. बाई राहायला आली व हळूहळू पाटलीणबाईंशी मैत्री झाली. " एकटी बाईमाणूस, शाळकरी मुलं, रॉकेल मिळायची पंचाईत. मुलांचा अभ्यास तरी कसा होणार ? बरं, बंगल्याचं भाडं तरी किती ? आणखी मी गरजू; आत वीज नाही हे मला सांगितलंसुद्धा नाही हो त्यांनी—मी आपली ह्या दिवसांत घर मिळते आहे म्हणून लगेच वर्षाचा भाडेपट्टा की हो केला ! " अशी बाईने आपली हकीकत दोन-चारदा सांगितल्यावर पाटलीणबाईंच्या सांगीवरून कुटुंबवत्सल पाटीलबुवांनी बाईंना लगेच आपली कामकरी माणसे लावून वीज जोडून दिली.

पंधरा दिवसांनी राजेसाहेब परत ह्या गावी आल्यावर त्यांनी बंगल्यात वीज पाहून कसे अकांडतांडव केले, नव्या भाडेकरी बाईला घर मोकळे करण्याची नोटीस कशी दिली, बाई वर्षभर कोर्टात वकील न देता स्वतः कशी भांडली, व शेवटी वर्ष संपता-संपता खऱ्या घरमालकाशी तिने नवा भाडेपट्टा करून संस्थानिकांना कसे हात चोळीत बसवले हे सांगायचे म्हणजे एक मोठा ग्रंथ होईल; पण पाटीलबुवांनी मुळातच वीज द्यावयाचे नाकारले का हे जाणण्याची

मला उत्सुकता होती. काय परप्रांतीयांना आपल्या आळींत थारा द्यावयाचा नाही असा विचार होता की काय पाटीलबुवांचा ? इतका लांब विचार शक्य दिसत नव्हता. पाटीलबुवा काही फारसे शिकलेले नव्हते, पण व्यवहाराला मोठे चतुर म्हणून त्यांचा लौकिक होता. मग त्यांनी पैसा नाकारला का ? बऱ्याच दिवसांनी मला पाटलांच्या वागण्याचे रहस्य उलगडले. हे छोटे राजेसाहेब मोटारीतून उतरून पाटीलबुवांच्या बैठकीपर्यंत पायी गेले असते म्हणजे त्यांना ताबडतोब वीज मिळाली असती. पण पाटीलबुवांना बोलावून आणून मोटारशेजारी बोलणी झाली, त्यामुळे पाटलांची मिजास बिघडली होती. त्यांनी चार जणांना बोलून दाखवले, "राजेसाहेबांचे बूड इतके जड झाले होते काय ?–मला मोटारची ऐटी दाखवतो होय ?–त्याला म्हणावं, तू राजा आहेस तर मी पाटील आहे– वाटेल ते पैसे दिलेस तरी वीज देणार नाही." पैसा मिळत असला म्हणजे कसलाही कमीपणा किंवा लाचारी स्वीकारायला हरकत नाही हे व्यापारी धोरण पाटीलबुवांना नव्हते हे स्पष्ट झाले.

परवाचीच गोष्ट घ्या ना ! आमची गाडी लोणावळ्याला थांबली. डब्यातून घाईघाईने एक पारशी उतरला. त्याला ताजी जांभळे विकत घ्यावयाची होती. डब्याच्या खिडकीजवळ एक कातकरीण एका लहानशा चौकोनी कुरकुलीत करवंदांचे द्रोण भरून विकायला आली. तिला पाहिल्याबरोबर त्या पारश्याने घाई करून सबंध टोपली हिसकावून घेतली व "हेचा दाम काय ?" म्हणून विचारले. बाईने सांगितले, "आठ आणे." ते पैसे तिच्या हातावर ठेऊन गृहस्थाने कुरकुली बायकोच्या हातात दिली. मी आपली जांभळे म्हणून होणारा हा करवंदांचा सौदा स्तिमित होऊन पाहत होते. दोन मिनिटे झाल्यावर बाहेरची कातकरीण म्हणाली, "बाबा, माझी टोपली द्या." तो पारशी म्हणाला, "मग जांभळे न्यावयाची कशात ? तुझ्या टोपलीची किंमत देतो सांग नी !" बाई म्हणाली, "छे ! मला टोपली नाही इकायची." त्याने त्या एक आणा किमतीच्या टोपलीला एक रुपाया देऊ केला तरी तिचे म्हणणे एकच, "मला टोपली इकायची नाही." शेवटी त्याने रागाने सबंधाच्या सबंध टोपली तिला परत दिली. तिने त्याचे आठ आणे परत दिले, व वेळ खाल्ल्याबद्दल चार शिव्या हासडून ती पुढे गेली. त्या पारशिणीला मी हळूच म्हटले, "बाई, ती करवंदे होती–जांभळे नव्हती. तुम्हांला पाहिजे असतील तर तो पाहा पलीकडे

माणूस उभा आहे, त्याच्याजवळ जांभळे आहेत, " बरे झाले टोपली गेली असे म्हणून तिने नवऱ्याकडून जांभुळवाल्याला बोलवले. तो होता एक कुणबी, आणि जी कातकरणीची कथा तीच त्याची पण कथा. तो म्हणे, " मी जांभळं इकायला आनली आहेत. टोपली नाय. हवीतर घ्या, नाहीतर मी पुढे जातो. " शेवटी चरफडत त्या बाईने रुमालात जांभळे विकत घेतली, व तो माणूस आपली जीर्ण टोपली घेऊन निघून गेला. मला मात्र " मराठे लोकांला कसा बेपार कळत नाही " हे पुराण मुंबईपर्यंत ऐकावे लागले.

आजही परत तेच शब्द मी आणखी एका माणसाकडून ऐकत होते. हे गृहस्थ एक सुप्रसिद्ध म्हणा की कुप्रसिद्ध म्हणा, एजंट होते. कोणाला काहीही पाहिजे असो, पुरेसे कमिशन मिळाले की आपण मिळवून देऊ अशी त्यांची प्रतिज्ञा होती, व त्या प्रतिज्ञेला आतापर्यंत कधीही बाध आला नव्हता; पण आज मात्र त्यांनी हात टेकले होते. ते रस्त्यावरून अगदी मंदपणे जात होते. त्यांचा पडलेला चेहरा पाहून मी विचारले, " काय, इकडे कुणीकडे ? बरे नाही वाटते ? हवा पालटायला का आलात ? " " अहो, मी अगदी चांगला बरा आहे. पण किती खटपट केली तरी काम होत नाही म्हणून त्रासलो आहे. " त्यांनी सांगायला सुरुवात केली, " ते पलीकडे, * * * * * * चं रस्त्यावर एक लहानसं घर नाही का, ती जागा व घर मी पंधरा हजाराला मागत होतो. * * * * * * नी सांगितलं आहे माझ्यासाठी घ्या म्हणून. " ते घर व त्या घराची मालकीण माझ्या चांगली माहितीची होती. ती एक पांढरपेशाची पन्नास वर्षे वयाची विधवा होती. तिच्या मुलाने आणि तिने पै-पै करून साठवून शंभर–दीडशे रुपयाला जमीन घेतली होती व त्यावर कांही विटा, काही पत्रे, कांही खोक्याच्या फळ्या अशी विविध सामुग्री जुन्या बाजारातून आणून एक लहानसे घर बांधले होते. घरात राह्यला येऊन दोन वर्षे होतात तो मुलगा वारला व सध्या घरात विधवा सासू, विधवा सून व एक तीन वर्षांचा नातू अशी राहात होती. घरी खायची भ्रान्त होती. सासू चार ठिकाणी काम करी, घरातल्या चार खोल्यांपैकी तीन भाड्याने दिल्या होत्या, व कुटुंबाची कशीबशी गुजराण होत होती. मुंबईला बाँबहल्ला होणार ह्या भीतीने मुंबईचे लोक वाटेल ते पैसे देऊन बाहेरगावी घरे व जमिनी घेत होते. आज तिची दोन तीन हजारांची मालमत्ता पंधरा हजाराला जात होती. ते एजंट पुढे सांगू लागले, " अहो, घरापुढून

मोठा रस्ता म्युनिसिपालिटीने काढला आहे म्हणून इतकी किंमत देतो आहे. म्हातारीला सांगितलेसुद्धा की, जरा मागच्या बाजूला जमीन आहे ती घ्या व घर बांधा. आठ-दहा हजारांत सर्व होईल. काही हजार बँकेत राहतील. पंधरा हजार पुरत नसले तर काय हवे तो आकडा सांगा. पण तिचे आपले एक–' मला घर नि जमीन विकायची नाही. '–आता सांगा, ह्या मठ्ठपणापुढे काय करणार ? आणि अशा माणसांशी व्यवहार तरी कसा करायचा "– ते तावातावाने निघून गेले.

मी समोरच्या मारुतीच्या देवळाकडे तोंड केले व हात जोडून प्रार्थना केली, " देवा मारुतिराया ! मराठ्यांना आणखी थोडे मठ्ठ कर रे–"

• • •

## ६. मत्स्य महालात

" झालं सगळं, चला आत. " हे शब्द कुणी तरी दबल्या आवाजात जवळ कुजबुजले आणि मी दचकून भानावर आले. हीच ती खुर्ची. पहाटेच्या काळोखात घरातून बाहेर पडल्यानंतर मी इथे आले ती दोनतीन तास तशीच खुळ्यासारखी या खुर्चीत अवघडून बसले आहे. किती वेळा पूर्वीदेखील इथेच मी बसलेली होते. पण आता पायाला मुंग्या आल्यासारखे वाटते आहे, तसे नव्हते कधी झाले. आजूबाजूच्या खोल्यांतून या वेळी या प्रसूतिगृहात किती धावपळ चालू आहे. किती तऱ्हेचे आवाज निघताहेत. पण त्या गडबडीत मी नेहमीप्रमाणे सामील होऊ शकत नाही. ती गजबज एकीकडे आणि मन अगदी उलट दिशेला असे आज झाले आहे. निःशब्दपणाचे जाडजूड दडपण कसे छातीवर बसले आहे. आवाजाचे भानच नष्ट केले आहे त्याने.

सूर्योदयाची वेळ ही. असंख्य परमाणूंना दीप्तीच्या लाटांवर खेळवीत, भासमान करीत सूर्याची किरणे खिडकीतून आत शिरताहेत. थंडीची शिरशिरी किती सुखकर वाटते या पहिल्या मृत्युंजय किरणांच्या मिठीत ! पण आज ते थंडीत भासणारे स्पर्शचैतन्याचेही भान हरपले आहे. किरणांचा उजेड अदृश पण गाढ अंधाराने भरल्यासारखा वाटतो आहे. अंधाराच्या उघडलेल्या जबड्यात सारा प्रकाश रिचल्यासारखा वाटतो आहे. त्या आंधळ्या भकास प्रकाशाची गुलाबी झाक प्रेतावरच्या गुलालासारखीच वाटते आहे. नियतीनेच जणू ती गुलाबाची मूठ एका अर्ध्या घडलेल्या मानवी पिंडावर फेकली आहे. ज्या देहाचे भान

दुर्गा भागवत

आम्हांला आहे, पण ज्या देहाला नाव नाही, नाते नाही, जगाचे कोणतेच बंधन नाही असा तो देहाचा गोळा समोरच खाली एका पांढऱ्या शुभ्र एनॅमलच्या गिंडीत पडला आहे. अपुऱ्या दिवसांचा सहा महिन्यांचा तो मानवसंबंधी जीव. गेल्या महिन्यापर्यंत, गर्भांत अगदी लहान पेशी, मग गाठ, मग मासा, मग पुच्छधारी अति विचित्र प्राणी अशी त्याची स्थित्यंतरे होत होती. ती सारी नुकतीच थांबून त्याचे विशाल अमानव प्राणिसृष्टीशी असलेले नाते तुटलेले उघड दिसते आहे आणि मानवाशी सादृश्य चांगलेच प्रस्थापित झालेले आहे. ते केशविहीन पण गोल सुबक मस्तक. ती पाहिजे तशी लवणारी पण बुटकी मान. ते पाठीच्या मध्यभागी फुगून दिसणारे मणक्यांचे उंचवटे. नुकतेच आकार धरू लागलेले ढुंगण. ती मखमली छाती. ते चिमुकले पंजे फुटलेले हात. ती नखांशिवाय असलेली, सताड उघडलेली बोटे. पूर्ण वाढलेले पाय आणि त्यांच्या तळव्यांवर साईच्या पापुद्र्यासारखे दिसणारे कातडीचे तलम आस्तरण. मुलगा आहे हा. डोळे घट्ट मिटलेले पण पापणी फुटलेली नाही, मग भिवया कुठल्या ? ओठ अजून पूर्ण अलग झालेले नाहीत. नाक अपुरेच दिसणारे. हातपाय गळ्याशी दुमडून तो जीव त्या भांड्यांत वारेच्या राजवर्खी चमकणाऱ्या मऊ, फाटलेल्या गिर्दीच्या बाहेर, पण तिलाच चिकटून पडला आहे. बेंबीतून निघालेले नाळाचे भेंडोळे त्यातच गुरफटले आहे. एरवी नवजात अर्भकासारखाच तो लांबून पाहिले तर दिसतो आहे. नुकत्याच झालेल्या गर्भजलाच्या शिंपणीचा मातीसारखाच असणारा तो विशिष्ट गंध खोलीत अजून भरून राहिला आहे. पण त्या गंधाबरोबर निर्माण होणारी चिंता, उत्सुकता, भय, कुतूहल आता राहिलेले नाही. नवजाताच्या आगमनाच्या वेळी असणाऱ्या त्या भयमिश्रित आनंदाच्या लाटा इथे आरंभापासूनच नव्हत्या. पुढचे वेत पुटपुटले जात नव्हते. वेणा नव्हत्या. काही काही नव्हते. गर्भजलाचा तो मंद सेक नव्हता. अकाली येणाऱ्या वृष्टीप्रमाणे जे अनपेक्षित आले, ते गंध घेऊन आले. पण नवजननाचा सोहळा घालविण्यासाठी. गार फेकावी असा तो गर्भाचा गोळा आमच्यांत टाकण्यासाठी. केवळ प्रत्येकाला हतबल वाटण्यास लावण्यासाठी, शून्य अनोळखी नजरा एकमेकांत मिसळण्यासाठी तर नियतीने ती गारपीट केली नाही ना ?

पाच पाकळ्या फुटलेले, साती कोंबांनी अंकुरलेले हे बालक. पण आम्ही

त्याला बालक म्हणू शकत नाही. आणखी दीडएक महिन्याने ते आले असते आणि असेच जन्ममरण दोन्ही मुठीत बरोबर घेऊन आले असते तरी आम्ही चार आसवे गाळली असती. त्याचा देह चार विती कापडात गुंडाळला असता. अंत्ययात्रेच्या मिषाने त्याला लुटूपुटूची सोबत केली असती. कुणाचे कोण ते नाते दप्तरी नोंदवले असते. पण हे शाडूच्या चित्रासारखे पांढरे पण अघटित काही तरी आमच्यापुढे पडले आहे. त्याला मूल म्हणायची आमची प्राज्ञा नाही. गर्भ हे नाव मातृदेहापासून सुटलेल्या व स्वतःचे रंगरूप घेऊन आलेल्या त्याला देणे आम्हांला रुचत नाही. ते आमचे कुणीच नाही आणि तरीही ते आम्हांला आतून ओढते आहे. त्याची ती न घडलेली नखेच जणू तीक्ष्ण होऊन करवतीप्रमाणे आमच्या संवेदना कापून काढताहेत. आम्ही त्याला स्पर्शू शकत नाही. कुणीच मानवी हात त्याला स्पर्शू शकत नाही. ओटीपोटाच्या काळोखी उबदार मखमली साम्राज्यातून बाहेर फेकला गेलेला तो गोळा ल्हानशा गर्तेत आम्ही कोंडू घजणार नाही. मानवातीत भीषण, उन्मत्त विराट शक्तींशी केव्हाच संकेत करून दोन देहांच्या कोंडीतून एक चैतन्य, पाशवी आणि दैवी मुद्रा असलेले केव्हाच पसार झाले आहे. मग हे राहिले आहे काय ? आणि कुणाचे ?

प्रकाश सारखा वाढतो आहे. आणि त्या वाढत्या तिरिपीबरोबर वस्तुस्थिती आणखीच ढोबळ आणि बेढब होत चालली आहे. कशाला हवा असला हा रुक्ष प्रकाश ? सध्या तो नकोच आहे. हवे आहे ते सावट. उषेचे आणि भ्रांतीचे. मेलेला जीव स्वर्गाच्या बगीच्यात जाईल. नंदनवनात परमेश्वर-बागवानाच्या अंकावर आरूढ होईल; दिव्य फुलांचे रूप घेऊन कल्पतरूवर डुलेल. तारा होऊन चमकत हसत आमच्याकडे पाहील. आम्ही पण तिथे कधी येतो, म्हणून रोज वाट पहात राहील. हेच आम्हांला सध्या हवे आहे. पण जिथे जन्माच्या सीमेच्या आधीच मृत्यू आला, तिथे या कल्पनेच्या वैभवाचे सुख तरी आम्ही कुठून भोगणार ? कुठून आला तो ? आणि कुठे गेला ? काय त्याची नियती ? पण इतकेही विचार हा प्रकाश आता पेलू देत नाही. वाराही वाढतो आहे. थंडीने फुटलेल्या गात्रांना झोंबतो आहे आणि त्या गार तीव्र स्पर्शाने आणखी एक नवीनच विद्रूप सत्य डोळ्यांपुढे उभे राहून अंग अंतर्बाह्य शहारते आहे. अगदी थोड्याच वेळात हा गोळा इथून उचलून बाहेर फेकला जाईल. मऊ दुर्गंधी गाळाच्या बरोबर, सगळ्या शहराचा केरकचरा चिमुकल्या मुठींनी छातीशी कवळून

धरून, गटाराच्या वाहत्या धारेतून, मेलेल्या मांजराउंदरांची खेळणी बरोबर घेऊन तो सागराच्या कल्लोळात आपले मुके आक्रंदन मिसळून टाकील. त्या अथांग जलराशीत सारा मळ धुतला जाऊन तो तिच्यातच विलीन होईल.

आम्ही सुस्कारा सोडतो. निर्वाणीच्या सुटकेचा. मानवी गोळ्याचा शेवट कुठल्या तरी महाभूतात अखेर होणार ही एकच कल्पना आम्हांला भ्रमवते. अग्नीने नाही, पृथ्वीने नाही, तरी तुडुंब ताज्या जळाने त्याला स्वीकारले आहे, असे आम्ही पाहतो. भकास सूर्यकिरणे त्याला शोधण्यासाठी सागरपृष्ठ धुंडाळता-हेत; पण ती फुटून तुकडे होईस्तवर शिणली, तरी त्या सागरतळीच्या निळ्या-हिरव्या मत्स्महालात जिथे तो पोचला आहे, तिथवर ती जाऊ शकणार नाहीत. दार उघडते आहे; पण त्या दाराआडचे दृश्य वारा, ऊन, पाऊस, पृथ्वी कुणीच पाहू शकत नाही. मग आम्ही तरी तिथे कशी पोचणार ? पण यातही एक सत्य नेहमीचे परिचयाचे, पण नवीनच उमगले आहे. त्या आमच्या होऊ घातलेल्या पण नियतीने आम्हांला पारख्या केलेल्या बालकाबरोबर आणखीही बालके, कुणी पेशीसारखी, कुणी आणखी कशी, त्याच वाटेने चालली आहेत. कुणी बालकाच्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या आईबापांना घायाळ करून जाणारी, तर कुणी जन्मदात्यांच्या पापविमोचनासाठी आत्माहुती दिलेली, अशी अवांच्छित अर्भकेही या मोकाट अफाट प्रलयप्रवासात सामील झाली आहेत. त्यांतले एखादे कुणाच्या नजरेस पडते आणि एखादी बीभत्स शिवी आणि छद्मी हास्य कुठून तरी निघते. पण त्या उपहासात ही सारी निनावी, वेगळ्या मातापितरांची, वेगवेगळ्या कारणांनी हद्दपार झालेली बालके एकजात सामील होतात. एकमेकांचे पापपुण्य समभावाने वाटून घेतात.

आईबापांची अब्रू, माया, द्वेष, सारे सोडून ती त्या जलराशीत समाधिस्थ होतात. त्या आद्य भौतिक नियतीत विलीन होताना ठोकळ नीति-अनीतीची सारी मूल्ये वारेमाप उधळून ती जातात. या भयाण आणि उत्तुंग क्षणी त्या अगदी क्षुद्र, अपुऱ्या देहातून निघणाऱ्या कुठल्यातरी अज्ञान ज्वालेत नीती वितळते, अनीती भस्म होते, आणि सागरकिनाऱ्यावरचे आम्ही मात्र ते भस्मी-भूत, रंगलेले चार कण हाती घेऊन मोठाले वेदांत घोळवीत बसतो.

● ● ●

## ७ : रूपधर फाल्गुन

वसंताच्या रूपवैभवाचा, नादऐश्वर्यांचा, खजिना फाल्गुनात खुला झाला. पौषाचे ते धुके ओसरले. माघातला सुका व मुका तपकिरीपणा लयाला गेला. देशी शिरीषांच्या झाडावरच्या सुक्या शेंगा वाऱ्याच्या झुळकीबरोबर हालता हालता, पावसाची झिमझिम व्हावी असा अत्यंत सुखकारक नाद करू लागल्या. जणू काही वसंतलक्ष्मीचे नाजूक, नखरेल पाऊल त्या वृक्षाच्या मखमली पर्णांकुरांवर पडून त्याचा पडसाद झाडभर घुमतो आहे. पुष्कळ झाडांच्या सुक्या शेंगा या महिन्यात रात्रीच्या शांत वेळी असाच पावसाच्या सरींचा आभास निर्माण करतात. निसर्गातही आवाजांच्या, रूपांच्या, अशा नकला नेहमी चालू असतात.

मृगजळे ठिकठिकाणी वाढताहेत आणि उन्हाच्या माऱ्याने, पाणी पिऊनही तृप्त न होणारी प्राण्यांची मने स्वतःकडे ओढून घेताहेत. वाढते वारे समुद्रकाठीच्या सुरूच्या झाडांच्या मधून वाहताना कापले गेल्यामुळे समुद्राच्या लाटांचाच घोष उठल्यासारखा वाटतो आहे. चहूंकडे नाजूक नादाच्या लाटा वाहताहेत. झाडात व आकाशात, पक्ष्यांचे प्रणयाने आर्द्र व मधुर झालेले, साद व प्रतिसादींच्या रूपात तानेसारखे वाटणारे आवाज एकमेकात मिसळताहेत. साळुंक्यांच्या आवाजातला किनरेपणा कमी होऊन, त्यांच्या गळ्यांतला गोडवा जणू काही शिरीषाच्या पालवीला दिवसोदिवशी उमलवतो व डुलायला लावतो आहे, पोपटांच्या कर्कश आरोळ्यातून काही तरी जाणते शब्द, कारुण्य व आनंद

दुर्गा भागवत

यांनी काठोकाठ भरल्याप्रमाणे बाहेर पडल्याचा भास होतो आहे. कावळ्यांचा शब्द श्रुतिमनोहर नाही. पण आता प्रणयाने गदगदलेले त्यांचे गंभीर वसके आवाज, त्यांच्यांत आता किती मृदुपणा आणि जाणतेपणा भरला आहे, ते दाखवीत आहेत. प्रणयोन्मादाच्या ऐन क्षणीही कलापूर्ण संयम बाळगणारे हे पक्षी आपल्या गंभीर शब्दांनी ' आयुष्यातला आनंद मनमुराद चाखायचा तर कोणत्याही क्षणी मनावरचा ताबा जाऊ देऊ नका ' असेच जणू सांगत असतात.

या नेहमीच्या सदोदित भांडल्यासारखा कलकलाट करणाऱ्या चिमण्या पाहा ! त्यांचेही आवाज आता किती बदलले हो ! नेहमीचा चिमणा. पण आता त्याचा आवाज आइून ऐकला तर तो चिमण्याचा आवाज नसून कुठल्या तरी फुलचुख्या पाखराचा आहे असे वाटते. शेवग्याची कोवळी पालवी कुरतडणारा हा चिमण्यांचा थवा. अंगाला किती मुरड घालून, त्या ती कोवळी पाने कुरतडताहेत. त्यांचे एरवी गुबगुबीत वाटणारे देह आता कसे खरासारखे लवचिक होऊन ताणले गेले आहेत. कधी कधी खाली डोके करून त्या फांदीवर चक्राकार गिरक्या घेतात. चिमण्यांचा हा कोल्हाटी अवतार काही न्याराच वाटतो. किती चपळ, हलके झाले आहे त्यांचे शरीर ! या माद्यांच्या कोलांट्या आणि त्या वेळी त्या काढीत असलेले खुळखुळ्यांच्या आवाजाप्रमाणे गुडगुडत बाहेर पडणारे स्वर अत्यंत मनोज्ञ असतात. वास्तविक पक्ष्यांच्या माद्या नरांहून बेडौल असतात; पण फाल्गुनातला चिमण्यांचा हा डौल पाहिला की त्यांच्या आसपास वावरणाऱ्या, कंठावर काळा ठिपका असणाऱ्या आणि कामविह्वलतेने शेपटांचा चिमुकला पिसारा फुलविणाऱ्या नरांपेक्षा या माद्या कितीतरी अधिक मोहक वाटतात. त्यांच्या त्या पांढरट गुलाबी चोची, त्यांच्या त्या भस्मी रंगाच्या माना, ती अंगाबरोबर घट्ट बसणारी पिसांची कंचुकी, त्यांच्या या चपळपणाला किती खुलावट आणते आहे. पुष्कळदा मी या चिमण्या नेहमीच्या आहेत की आणखी कुठल्या रानचिमण्या झाडावर बसल्या आहेत, अशा संभ्रमाने त्यांच्याकडे तासतास बघत बसते. तरी पण त्यांचे सारे व्यवहार इतके विजेसारख्या वेगाने होत असतात की, त्यांच्यावर नजर ठरत नाही. पण दुपार कलंडली की, त्या धुळीत अंग घुसळायला बसतात, तेव्हा त्या संथ असतात; त्याच वेळी या तर रोजच्याच चिमण्या हे तेव्हाच पटते. ऐन प्रणयाच्या बहरातसुद्धा स्वतःच्याच रूपात आणि विहारात पूर्ण रमणारी आणि नराला स्वतःच्या काबूत ठेवणारी चिमणीसारखी

मादी विरळाच.

ऐन दुपारची वेळ आहे. पक्ष्यांचे स्वर काही स्पष्ट, काही अस्पष्ट असे एकात एक मिसळून गेले आहेत. पारव्यांचे घुमणे आणि घारींच्या अगदी उंचावरून फुटणाऱ्या कर्कश पण जीवनानंदाने परिपूर्ण अशा आरोळ्या, यातून सप्तसुरांतल्या आणि सर्व तालांतल्या स्थूल छटांचे अजस्र मिश्रण होऊन दुपारच्या शांतीत नादब्रह्माचे गांभीर्य ओतले गेले आहे. आवाज व स्तब्धता यांच्यांतला विरोध नष्ट झाला आहे. ऐन दुपारी सूर्य आग खाली फेकीत असताना पाखरांच्या गळ्यांतून, त्यांच्या उडत्या फडफडणाऱ्या पंखांतून निर्मितीचे वृंदसंगीत झाडाझाडांतून कोंदून वाहत असते. घराघरात ते निनादित होत असते; मनामनाला वसंतागमाची प्रेरणा देत असते. जीवनाच्या उन्मादाची निसर्गाच्या रोमारोमातून फुटून जाणारी उकळी पाहण्यासाठी माध्यान्हीच्या दीर्घ प्रहरी आवाहन देत असते.

जमीन सुकली आहे. सूर्य तापतो आहे. धूळ वर उडते आहे. वाऱ्याच्या झुळकांबरोबर सुकलेली पाने गिरक्यांचा नाच खेळताहेत. तो पाहण्यासाठी ते वृंदसंगीत आम्हांला आवाहन देते आहे. या उष्णकाली पाने गाळून आपला श्वासोच्छ्वास गेले दोन महिने झाडांनी रोखून धरला होता. उन्हामुळे झाडातला अंगरस वाढीला लागला. झाडाझाडावर कोवळ्या पालवीची लाजरी हिरवळ अंग चोरून उभी राहिली. आंबा, फणस सोडल्यास बहुतेक झाडांवरची जुनी पाने गळूनच गेली आहेत. आणि नवी पालवी भराभर फुटते आहे.

झाडाझाडाला पालवी फुटण्याच्या तऱ्हा तरी किती वेगळ्या ! ही पाहा नाजूक सीताफळ. तिच्यावर पालवी अशी फुटली आहे की जणू काही प्रत्येक पान दुसरेच कुठले तरी बाहेरून चिकटवले जाते आहे. समोर करंजाचे झाड आहे ते पाहा, केवढे मोठे आणि जून. पण त्याच्या अंगावर चौफेर पालवी अशी फुटते; एक दिवस सकाळी अचानक असे दिसते की जणू काही रात्री कुणीतरी खोडकर वनदेवता फिकट हिरव्या रंगाची धूळच फुंकर घालून झाडभर उधळून गेली असावी. तसेच ते दुसरे एक ऑस्ट्रेलियन झाड आहे. त्याच्याही निष्पर्ण देहावर पालवी अशी येते आणि ती एकाच दिवसात इतकी वाढते की कुणीतरी हिरव्या रंगाच्या चुळाच एकामागून एक झाडावर टाकते आहे असे वाटते. आणि हे समोरचे शिरीषाचे झाड ! त्याच्या त्या काळ्याभोर खडबडीत आणि

आकाशाला वेढू पाहणाऱ्या महत्त्वाकांक्षी फांद्या. पण त्यांच्या मनांतील कोवळीक जागी होऊन आता तिचीच हिरवी लव बनून तिने त्यांना आच्छादून टाकले आहे. अगदी झाडाच्या अंतरंगातून बाहेर फुटलेली हिरवी उकळीच वाटते आहे ही पालवी म्हणजे.

शिरीषाच्या पोपटी पालवीचा सोनेरी नूर माध्यान्हीच्या उन्हात सांजसकाळच्या लालसर प्रकाशात पाहातच राहावे. दिवसागणिक पोपटी रंग खुलत चालला आहे. हलत्या पानांच्या रूपाने हे हिवाळ्यात श्वास रोखून बसलेले झाड, जोरजोराने श्वासोच्छ्वास करते आहे असे वाटते. आणि त्याचे ते निःश्वास हुंगण्यासाठीच जणू पाकोळ्या भिरीभिरी झाडाच्या माथ्यावर नाचताहेत. चार दिवसांतच पाने वाढून दाट झाली; पाकोळ्यांचा नाचही दुणावला आहे. काय पाहिले त्यांनी ? एक दिवस सकाळच्या सोनेरी उन्हात शिर नम्र करून, मुरकून, एक लाजाळू फूल फिक्का गुलाबी पेहराव करून पानाच्या झुल्यावर बसलेले दिसले. पाकोळ्यांनी त्याचे चुंबन घेतले आणि साऱ्या दुनियेला वसंताचे मधुकोष झाडाझाडावर खुले झाल्याची बातमी त्यांनी दिली. दुसऱ्या दिवशी अर्धे झाड फुलांनी भरले. किसलयांचा उन्मादक सुगंधी चारा पोपटांनी भरपूर खाल्ला. फुलांच्या डहाळीवर अलगद बसून पोपट किती रुचीने आणि रसिकतेने, नाजूक नखरा करीत हे केसर खातात, हे पाहिले की नवल वाटते ! कैऱ्यांना टोचून घायाळ आणि कुरूप करणारे पोपट ते हेच का, असे मनात येते.

आत्यंतिक प्रणय व आत्यंतिक शोक ही या महिन्याची वैशिष्ट्ये का समजायची ? तसेच असावे. नाही तर जरा या बागेत पाहा. किती करुणरसपूर्ण नाट्य या मुंग्यांच्या वारुळावर घडते आहे ! घरातले लहान मूल धावत्या मुंग्यांना पकडण्याच्या छंदात होते. पायरीच्या बाजूला मोठ्या मुंग्यांचा पुंजका होता, तिकडे ते धावले. त्याला मुंग्या डसतील म्हणून मी त्याला उचलून घेतले आणि खाली निरखून पाहिले, तो काय ? एका वारुळाच्या तोंडाशी हा मुंग्यांचा थवा दिसला ! पण थवा कसला ? निर्जीव मुंग्यांचा तो ढीग होता. आणि दुसऱ्या वारुळातून एक एक मुंगी सावकाश येऊन त्यातले एकेक धड कष्टाने वाहून नेत होती. त्यांच्या वारुळातल्या बाळांचा तो खुराक होता. पण जरा काडीने डिवचले तो त्या ढिगाऱ्याच्या आतून राणी मुंगीचे मुंडके व धड—नांग्या तुटलेले शरीर आढळले. बिळातली राणी मुंगी गेली की मुंग्या म्हणे अशा

तऱ्हेने सामुदायिक हाराकिरी करतात. कीटकसृष्टीतला आत्महत्येचा तो प्रकार पाहून माझे मन सुन्न झाले ! प्रत्येक वारुळात पाचसात महिन्यांनी कामकरी मुंग्या अशाच मरतात. राणी मुंगीचे आयुष्य दोन वर्षांचे असते. ती वयात आलेल्या पोरांना कामकरी बनवते आणि आपण प्रसवात गढून जाते.

तसेच मार्गशीर्षात आईपासून पूर्ण सुटे झालेले,:पौषात कावळ्यांना शह देणारे हे मांजराचे पोर, आता खूप मोठे आणि हुशार झाले आहे. त्याचा शिकारीचा छंद वाढला आहे. ते वयात येण्याची लक्षणे त्याच्या डोळ्यांवरून व पोटावरच्या स्तनांवरून दिसून येताहेत. माजलेले बोके या नव्या सुंदर मांजरी-वर नजर ठेवताहेत. एक दिवस एक बोका तिच्या मागे लागला. ती अन-भिज्ञ भाटी जीव घेऊन पळू लागली. बोक्याला चेव आला. त्याची पकड तिच्या-वर पडली. दात तिच्या कुशीत घुसले. ती विह्वळली. इतक्यात बाजूने चीत्कार झाला. तिची आई संतापाने पेटून तिच्याजवळ आली. वाढलेली आणि परि-चित अशी ती मांजरी पाहून बोका तिच्या मागे गेला. पण इतक्यात स्वतःच्या प्रणयाच्या रिंगणात शिरलेल्या त्या प्रतिस्पर्धिनीला, स्वतःच्या लेकीला त्या चिडलेल्या मांजरीने नखांनी रक्त येत होते तिथे फाडून घायाळ केले. ती बिचारी जीव घेऊन पळाली. तेव्हापासून मी पाहते आहे की संधी मिळाली रे मिळाली की ती मांजरी आपल्या पोरीला ठार करण्याच्या हेतूने टपलेली असते. एकी-कडून ही व दुसरीकडून दुसरी एक प्रौढ मांजरी तिच्या आईच्याच भावनेने पेटलेली, त्या नव्या मांजरीच्या पाळतीवर असते. पण ही देखील मोठी शूर व बुद्धिमान आहे. जीवनाच्या संग्रामात यशस्वी होण्याची ईर्षा तिच्यात कमालीची जागृत आहे. मोठ्या मांजरांप्रमाणे कामविव्हलता जागृत न झाल्यामुळे, अजून कोणाही नराच्या आधीन ती होत नाही. ती भावनाच नसल्यामुळे स्वतंत्रपणे जगायचे हेच तिचे एकमेव उद्दिष्ट आहे. आणि म्हणूनच ती लवकरच, त्या मांजऱ्यांवर चढाई करण्यात नाही, तरी त्यांच्यापासून संरक्षण करण्यात पटाईत झाली आहे. प्राण्यांच्या जीवनातील हे असे खेळ पाहून मन भांबावते, उदास होते. नजर भिरभिरते. तोच प्रफुल्ल पळसाचे भगव्या फुलांचे तुरे, त्यांच्या त्या करंजीच्या आकाराच्या, तपकिरी मखमली परकर नेसून बसलेल्या सुंदर कळ्या मन ओढून घेतात, उदासीनता घालवतात. ते ताम्हणीचे निळ्या रंगाच्या फुलांचे बहारदार घोस तर काय वर्णावे ? फुलाफुलांची नाजूक मुरडलेली कडा, पाकळी-

पाकळीचा तो डौलदार नखरा नजर बंदिस्त करून टाकतो. फाल्गुनाची राणीच आहे ही ताम्हण. आणि त्या निर्गंध पांगाऱ्याचा भडक लालपणा, त्याच्या फुलांचा तो तरवारीच्या पात्यासारखा आकार तर काय वर्णावा ? त्या थंड ज्योती घोसदार तुऱ्यांतून झाडभर चमकताना पाहिल्या की आशेचे तांबडे मनात फुटते, मन वसंताकडे धावत जाते; एवढेच नव्हे तर नाचण पक्ष्याच्या उल्हासाने, जे जे म्हणून वसंताचे त्याला अल्लडपणे स्पर्शीत जाते.

• • •

## ८. चि र-दा ह

माझ्या खिडकीच्या बाहेर तीन निंबाची झाडे आहेत. एकमेकांना स्पर्श करीत, एकमेकांच्या आधाराने उभी आहेत. आणि त्यांच्या मागचे बुचाचे झाडही त्यांच्याशी सलगी करीत, पण तरीही आपले उंच माथे तसेच ताठ ठेवून उभे आहे. निंबाच्या झाडांना फुलोरा भरगच्चपणे भरला होता, तेव्हा हे झाड एखाद्या पोक्त शेजारणीप्रमाणे अधूनमधून आपल्या डहाळ्या त्यांच्यापर्यंत पोचवून, नवशिक्या लेकुरवाळ्यांना द्यावा तसा सल्ला अधूनमधून देत होते. उन्हाळ्याच्या झळात क्षणोक्षणी तरळून येणाऱ्या त्यांच्या सुगंधाला आपल्याभोवती लपेटून घेत होते. आणि एकाएकी चैत्री मळभ आले. निंबाचा फुलोरा गळतीला लागला. कढत वाऱ्यावर डहाळ्या फडफडू लागल्या. आणि आज तर एकाएकी वावटळीचा सपकारा या झाडांवर बसला. धुळीच्या लोटात, वाऱ्याच्या झोतात ही चारी झाडे एकच झाली. पसरट विचित्र बुंधा आणि निमुळते, विसंगत, गर्द हिरव्या रंगाचे हडकुळे पोक्त माथे, असे हे झाड त्या वावटळीत पिंगा घालू लागले. ती खरी चार झाडे जणू नाहीशी झाली आणि वावटळीने हे नवेच झाड तयार केले. ते खरे होते आणि खोटे पण. अर्धा तास वावटळीच्या तपकिरी लोळात ते झाड घुमले. साऱ्या मेलेल्या झाडांचे आत्मे एक होऊन घुमतील तसे घुमले. ढगांना झोंबू लागले. काही मिनिटे गेली. वावटळ गर्दावली. झाडही अधिक पिसाटले. ढगे गोळा झाली होती ती पांगू लागली. पांगता पांगता पाच ढगांनी कडे केले. ते रुंदावू लागले. ते रुंदावले. आणि वावटळ

दुर्गा भागवत

थांबली. मी पाहत होते. या ढगांच्या कळ्यात निळ्या आकाशाचे एक जादूचे तळे येईल म्हणून अपेक्षेने पाहत होते. पूर्वी असे ते दोनदा आले होते. असेच चैत्री वावटळीत झाडे घुमत असताना एका पिसाटलेल्या झाडाला भेटायला आले होते. आणि ते झाड न भेटल्याने जणू भरकटत जाऊन विरून नाहीसे झाले होते. झाडाच्या उंच माथ्याला जवळून स्पर्श करू पाहणारे ते आकाशातले निळे तळे. ते तर मेल्या झाडाला भेटायला आले होते. ढगातला निळा प्राण गोळा होऊन सैरभैर पृथ्वीवरच्या हिरव्या मित्राला शोधीत होता. पण मित्र कुठे होता ? इथली ही झाडे तर जिवंत झाडे. त्यांच्या शोधात कशाला तो निळा प्राण येईल ?

पण माझे मन झाडांचा हा दंगा पाहिल्यावर आणि ढगांची गर्दी पाहिल्यावर ह्या निळ्या जलवंतीची अपेक्षा करू लागले. तिची अपेक्षा म्हणजे फिरून ते कोरडे जळणे आले. न संपता सारखे जळणे आले. तिनेच हा दाह निर्माण केला. ती आकाशात तरंगत होती. साऱ्या करड्याकबऱ्या दुधाळ आकाशात तेवढीच वचकभर जागा निळ्या पाणीदार तेजाने भरून गेली होती. आणि त्याच त्या शून्य झालेल्या जागेवर ती थबकली. पिशाच्च ठराविक जागेचा ठराविक माणसाचा कानोसा घेते म्हणतात; तसाच तिने घेतला. आणि तो न दिसल्याने तिने देहाची ती निळी लटकी छाया ताबडतोब सोडून दिली. पसरत, विकट हास्य करीत, काळेबेरे ओबडधोबड अजस्र रूप धारण करून तीही इतर ढगांत मिसळली. आकाश फिरून निर्विकार झाले.

आकाश निर्विकार झाले. स्मशानासारखे निर्विकार झाले. आणि माझे डोळे जमिनीवरच्या त्या रित्या जागेवर खिळले. पाय तिथून हालेनात. दोन विदेही प्राणांचा तो पैशाचिक पातळीवरून चाललेला एकमेकांचा पाठलाग पाहून त्या थडग्यासारख्या पसरट पण बुझवलेल्या खळग्याशी मी सुन्न होऊन उभी राहिले. बाकीची जमीन फरसबंदीची होती. आणि इथेही आता विटांवाळूचा ढीग पडला होता. भिंत आणि विद्यालयाच्या बोळातली ती अरुंद जागा लवकरच स्वच्छ आणि बांधीव होणार होती. माती पायाला येता-जाता लागणार नव्हती. पाचोळा पडणार नव्हता. पक्षी शिटणार नव्हते. कावळे तिथे बसून कर्कशपणे ओरडून विद्यालयाचे शांत वातावरण बिघडवणार नव्हते. चिमण्या कलकलणार नव्हत्या. पूर्वेच्या बाजूने कोंडलेला प्रकाश मोकळा झाला होता. झाडांचे अजस्र धूड साफ

गेल्यामुळे खोलीतले अर्धउजेडाचे वातावरण चांगलेच उजळले होते. वाऱ्याच्या झुळुका अडत नव्हत्या. बाजूच्या घराच्या शुभ्र भिंती विद्यालयाच्या भिंतींशी आता सुखाने संवाद करू शकत होत्या.

विद्यार्थी जात-येत होते. अध्यापक जात-येत होते. कुणालाच काही बदल झाल्याचे वाटत नव्हते. अवघ्या पंधरा दिवसांत सारे पालटले. एवढे मोठे आणि दुर्मिळ असे कदंबाचे झाड गेले. पानाफुलांनी डवरणारे. पण कुणाला काही जाणवले नाही. शहराची खुलावट साधायची तर झाडापाल्याची प्रतिष्ठा ती काय ? ती अडगळ करायची तरी काय ? मी मात्र वेड्यासारखी किती तरी दिवस तरफडत होते. पंधरा दिवसांपूर्वी असेच ते जादूचे तळे आकाशात जमून खाली तोंड करून वाकत होते. पावसाचे ते पहिले चिन्ह पाहून मला वाटले, माझा कदंब आता लवकरच वर्षेच्या मिठीत फुलेल. केशरी गेदांनी भरेल. पहिल्या मेघमालेच्या ओष्ठस्पर्शाने पुलकित झालेला असेल. पण तरातरा येऊन पाहते तो काय ? इमारतीच्याही वर वीस हात उंच गेलेला तो गगनस्पर्शी भव्य वृक्ष तिथे नव्हता. होते नुसते चार हात उंचीचे जखमी खोड. माझे मन मुकेपणीच हंबरू लागले. चार महिनेच माझी आणि या झाडाची ओळख झालेली. पण जिव्हाळा वाढीला लागला होता. किती वर्षे मी या विद्यालयात शिकले. कितीदा हे झाड पाहिले असेल. पण अनोळखी माणसाप्रमाणे अनोळखी झाडही कितीदा पाहिले तरी विसरायला होते. त्यात हे झाड बोळीत वाढलेले. त्याचा शेंडा इमारतीच्या वर जाऊन विस्तारला होता. पण कोण बघते इतकी मान उंचावून ? कोण उठाठेव करणार एवढ्या राठ आणि ताठ झाडाची ! सलगी करायला तो का बागेतला गुलाब होता की बटमोगरा ? जे फूल डोकीत माळता येणार नाही, ज्याच्या सुगंधाचा लेप केसांना लागणार नाही, त्याची विचारपूस कुठली विशीतली तरुणी करील ?

आणि आता किती वर्षांनी तरी मला झाडांची सोबत हवीहवीशी वाटू लागली होती. काश्मीरातले चिनारचे झाड पाहायचे होते. हिमालयातला देवदार पाहायचा होता. आणि रानावनात हिंडूनही दृष्टीस न पडलेला किंवा दिसूनही ओळख न आलेला कदंब. एकदा प्रवरेच्या काठी कुणी तरी एक बरीचशी पाने गळलेले, आठदहा फूट उंचीचे रोडकेहाडके झाड दाखवले आणि म्हटले, "हे कदंबाचं झाड." ...हे कदंबाचे झाड ? ना याला भरघोस पाने ना फुले. किती

खुरटे, उदास आहे हे! याच कदंबात का कृष्णाचा चेंडू अडकला आणि तो राहीला मिळाला? याच कदंबाखाली का गायी आणि गोपी सुखावल्या? याच कदंबाखाली उभे राहून का कृष्णाने मुरली वाजवली? याच कदंबाच्या झाडाखाली का यमुनेचे पाणी झुळझुळ वाहत होते? हाच का मराठ्यांचा कुलपालक वृक्ष? याचे लाकूड तोडायचे नाही. फुले खुडायची नाहीत. पाने तोडायची नाहीत. मात्र लग्नात वाजतगाजत जाऊन, हळद चर्चून गाणी म्हणत याची फांदी आणून तिचे देवक बसवायचे. हे सारे संस्कृतीचे ललितरम्य आविष्कार, स्वप्नसुंदर काव्य ज्याच्या भोवती शतकानुशतके प्रांतोप्रांती तरळले तोच का हा रडका नि रोडका वृक्ष? छे! असे कसे असेल? कालिदास का वेडा होता, याचे नि वर्षेचे एकत्र वर्णन करायला? उगीच का संस्कृत कवींनी प्रेयसीच्या प्रियकर दर्शनाने पुलकित झालेल्या किंचित आरक्त बालांची उपमा याच्या गोंडेबाज फुलांना दिली? मी फिरून निरखून पाहिले. असेल हा कदंब—पण मग याचा गौरव म्हणजे संस्कृतिपूजकांचे एक वेडच असेल. उरल्यासुरल्या पानांकडे पाहिले; पण त्यांचा आकार इतका आकृतिशून्य, कुबड्याच्या छातीसारखा आत ओढलेला, की या झाडाचे कुठलेच वैशिष्ट्य मला स्मृतीत धारण करता येईना. मुकाट्याने मी पुढे चालू लागले. कदंबाच्या शोधाचे आणि दर्शनाचे पहिले वेडे स्वप्न भंगले.

पण जे भंगले भंगले म्हणून वाटत होते ते अचानक आपण होऊन दोन्ही हात पसरून एक दिवस सामोरे आले. एक विख्यात विद्वान मला कदंबाबद्दल बोलताना एकदा म्हणाले होते की, ‘ कदंबाचं झाड महाराष्ट्रात आहे कुठे, तर तुम्ही पाहाल? ’ आणि ते रोड, एकाकी असे प्रवराकाठचे झाड पाहून मीही तसेच मानू लागून कदंबाचा विषय मनातून काढून टाकला होता. पण एक दिवस एक मित्र म्हणाले, “ शिरीषाचं झाड संस्कृत काव्यात वर्णन केलं आहे; पण ती केवळ कविकल्पनाच असेल. कुणीच ते पाहिलेलं दिसत नाही. ”

मी म्हटले, “ मी पाहिलं आहे ते झाड. दाखवीन तुम्हांला. समोरच आहे इथं. फुटलं की दाखवीन, म्हणजे लक्षात राहील. पण कदंबाचं झाड मात्र या महाराष्ट्रात तरी दिसत नाही. खरंच दुर्मिळ आहे ते. ”

“ कसलं दुर्मिळ? आपल्या विद्यालयातच आहे की, पावसाळ्याच्या तोंडी केशरी पिवळ्या फुलांनी भरतं. मोठा छान वास येतो. मी नेहमी देवाकरिता फुलं नेतो त्याची. तुम्ही उद्या या. मी दाखवीन. ”

मी घरी आले ती आनंदाने झिंगूनच. आता हा कदंब आपण रोज पाहू या कसा फुलतो, कसा फळतो ते. आमच्या काव्यमय संस्कृतीत अमर झालेल्या झाडाला मी प्रथमच जवळून भेटणार होते. ही बातमी कुणाला सांगू नि कुणाला नको, असे मला होऊन गेले. मी वडिलांना म्हटले, " आपल्या कॉलेजात कदंबाचं झाड आहे म्हणे. ते मी उद्या पाहणार आहे. "

ते म्हणाले, " मी कॉलेजात होतो, तेव्हापासून ते आहे. भिंतीच्या बाजूला एवढं मोठं झाड क्वचितच कुठे दिसतं. चेंडूंसारखी केशरी फुलं येतात त्याला. तुला कसं माहीत नाही एवढंसुद्धा ! "

खरेच, दोन पिढ्यांवर ज्याने सावली धरली ते झाड आपण अजून कसे नाही पाहिले ? आमच्या दोन पिढ्यांच्या विद्यार्थीदशेचा मुका साक्षी झालेला तो वृक्ष मी कसा जाणून घेतला नाही ? पण ही गेल्या पिढीची ओळख कळली आणि मग तर जणू आपण आपल्या घराण्याच्या एका जुन्या मित्राला भेटायला जातो असे वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी ( फेब्रुवारीची चौदावी तारीख होती ती ) मी घाईघाईने विद्यालयात गेले. त्या स्नेह्यांनी सज्जात उभे राहून जवळच्या फांदीला स्पर्श करीत म्हटले, " हेच ते झाड. "

तो प्रचंड वृक्ष पाहून माझे मन भरून गेले. वाटोळी, पण मधोमध टोकाला किंचित निमुळती, अशी सुंदर मोठाली पाने होती त्याची. पारिजातकासारखी जरा खरबरीत. वड आणि पळस यांच्या आकाराचा मिलाफ होऊन व्हाव्या तशा आकाराची. गर्द हिरवी. अजून लहान फिकी केशरी फुले इथे लटकली होती. पण ती दूर होती. भर ओसरल्यामुळे विरळ झाली होती. वास तर लांबून येतच नव्हता झाडभर. फुले गळल्यानंतर लागलेल्या फळांच्या काळया गुंड्या लटकत होत्या. माझा हातही आपोआप त्या डहाळयावरून, पानांवरून फिरला. आता कुठेही स्पर्शाने मी कदंबाची पाने ओळखू शकेन. कदंबाचे झाड मी प्रत्यक्ष पाहिले. आता कधी मी ते विसरणार नाही. या आमच्या कुटुंबमित्राला मी वारंवार भेटेन. जुनी पाने गळताना पाहीन. कळयांनी डवरलेले पाहीन. पक्षी घरकुले बांधताना पाहीन. याचा सारा प्रपंच पाहीन, असे विचार मी सारखी करू लागले. त्याचा छंदच लागला मला. मी नेहमी तिकडे जाऊ लागले. सकाळी, दुपारी, संध्याकाळी, केव्हाही. इतके की मी त्या रस्त्याला दिसले की

माझे मित्र म्हणायचे, " कदंबाला भेटायला चालला असाल ना ? "

आणि मी त्याची पानगळती पाहिली आणि लागोलाग कोक्यातून ते फिरून कसे पालवू लागले तेही पाहिले. पक्ष्यांच्या घरट्यांची सुरुवात हेरली. या पावसाळ्यात मी वर्षा-कदंबाची फुललेली मिठी पाहणारच या अपेक्षेने मी हुरळून गेले होते. जिकडेतिकडे फुलते कदंबच मला दिसू लागले. एकदा वाचले की काशी प्रांतातल्या स्त्रिया कदंबाच्या फुलांच्या आकृतीची सोन्याची कर्णफुले घालतात म्हणून; आणि मग एक दिवस उमगले की, आमच्या मराठ्यांच्या स्त्रिया गळ्यात जो मोठा, काटेरी जाळीचा मणी घालतात त्याचा आकारही कदंबाच्या रोमांचित फुलाचाच आहे. कदंबाचेच प्रतीक ते. नुसत्या राधाकृष्णांच्या प्रेमजीवनातच नव्हे, तर साध्यासुध्या स्त्रियांच्या जीवनातदेखील या सांस्कृतिक रूपाने तो स्थिर झालेला दिसला. कदंब आता केवळ पुराणकथांना चिकटलेला वाटेना. कलाकुसरीतही तो दिसू लागला.

आणि मग जलवंतीच्या त्या जादूच्या निळ्या तळ्याचे दर्शन झाले आणि तिथेच व तेव्हा कळले की हा वडीलधारा मित्र नव्या जगात अडगळ वाटल्यामुळे खंडला गेला. आणि मग त्याचा गोतावळा कुठे दिसतो का म्हणून मी भिरीभिरी हिंडू लागले. पळसाचे झाडही चुकून कदंबाचे नाही ना, म्हणून थबकून पाहू लागले. अखेर दिसली दोन चार झाडे जंगलात. एक तर पहिल्यासारखेच भव्य. पण पहिल्याची ती शहरातल्या बोळीतही उंच वाढून पसरण्याची जिद्द, ती ताठ उभे राहण्याची लकब याच्यात नव्हती. जंगलातल्या भव्य झाडांच्या गोतावळ्यातले ते एक झाड होते. मागच्या टेकाडांमुळे ठेंगणे झालेले. शांत आणि विनम्र वृत्तीचे. पहिल्याचा आकाशातच निळ्या तळ्यालाही तहानेले करणारा आकर्षक उद्दामपणा त्याच्यात नव्हता. तरी ते झाड आता मला जवळचे वाटले. आपल्या त्या भव्य, एकाकी आणि ताठर सोयऱ्याच्या सुतकात गढलेले दिसू लागले. महाराष्ट्राच्या फुलत्या कदंबकुलाचा एकमेव साक्षी वाटू लागले. पण ते पाहतानाही कुठे तरी आकाशात कुऱ्हाडीचे पाते लखलखून गेल्यासारखे वाटले. त्याच्या हिरव्या पानात एक ठिणगी वळवळू लागली. ती आशेची की अशाच अकस्मात मरणाची ? पण मी अजूनही कदंब पावसाळ्यात दारोदारी फुललेला पाहिला नाही. कधी पाहीन कुणास ठाऊक ? आणि पाहिला तरी पहिल्याच्या खंडनाने झालेला चिरदाह कसा शमेल ?

• • •

## ९. हे लोक....

'हे लोक!' चष्म्याच्या जाड भिंगांखाली नेस्तनाबूत झालेले आपले नाक उडवीत तो म्हणाला आणि सभोवारच्या बहुतेक लोकांनी संपूर्ण अनुमती दर्शविणारे चेहरे करून त्या लोकांकडे पाहिले. एखाद्या शृंगारलेल्या दिवाणखान्यामध्ये रात्रीच्या वेळी आपण संतुष्टतेने आकाशवाणी ऐकत पडलो असता, एकाएकी दिवाणखान्याची दारे उघडून एक गाईम्हशींचे खिल्लार आत शिरले, तर त्याच्याकडे आपण ज्या भावनेने आणि ज्या नजरेने पाहू, त्या भावनेने व नजरेने ते सर्वजण त्यांच्याकडे बघत होते. रौरवाचा रस्ता चुकलेल्या मूर्तिमंत पापांचा हा थवाच आगगाडीच्या डब्यात घुसत आहे असे त्या मंडळीच्या अंगविक्षेपांवरून सूचित होत होते. सर्वांच्या डोक्यात एक विचार होता, डोळ्यांत एक छटा होती. बाहेरच्या लोकांनी आत येऊ नये याबद्दल अगोदर आगगाडीत बसलेल्या लोकांचे जितके एकमत होते तितके ऐन युद्धाच्या काळात कोणत्याही राष्ट्राच्या विधिमंडळातसुद्धा होत नसेल! दूर महासागरामध्ये एखादे लहानसे जहाज वादळात सापडावे, त्याप्रमाणे परस्परांशी सहमत असलेल्या त्या उतारूंच्या जमावात, मी माझ्या वेगळ्या मतामुळे एकाकी सापडलो. ते त्या लोकांकडे तिरस्कारानेच पाहात होते आणि मी या लोकांकडे—होय, तिरस्कारानेच पाहात होतो.

तो जाड भिंगाचा चष्मा घालणारा आणि 'हे लोक' म्हणून नाक उडविणारा प्राणी—मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्ये किंवा एखाद्या फर्ममध्ये महागाईभत्त्यासह

वि. वा. शिरवाडकर

शे-दीडशे रुपये कमावणारा एखादा हिशेबनीस असावा. त्याच्या आयुष्याचा सगळा हिशेब त्याच्या तोंडावर लिहिलेला होता. एखाद्या विहिरीचा उपसा करावा त्याप्रमाणे त्याच्या डोळ्यांतील सारा जिवंतपणा, सारा स्वाभिमान कोणीतरी उपसून काढलेला होता. त्याच्या ऑफिसात दिवसा दिवे लावले जात होते हे सहज कळण्यासारखे होते. अंधेराच्या सतत सहवासामुळे आगगाडीतील गर्दीमध्ये शिरणारा माफक प्रकाशही त्याला असह्य झाला होता आणि आपल्या लगतची खिडकी पूर्णपणे बंद करून तो कोपऱ्यामध्ये उशीवर रेलून पडला होता. त्याची शरीरयष्टी लहानशी होती व तीमध्ये हाडांना प्राधान्य होते. थोडासा धक्का बसला तरी त्याच्या हाडांचे सांधे निखळून सर्वांची एक मोळी होईल कीं काय अशी शंका येण्यास अवसर होता. त्याच्या दोन्ही गालांचे कोनाडे झाले होते आणि दिवा ठेवण्याच्या कोनाड्यात काजळाची पुटे बसतात त्याप्रमाणे त्यात रोज खरडलेल्या दाढीचा काळसरपणाही कोंदटलेला होता. त्याच्या जाड ओठांवर एक बारीक सिगारेट जळत होती आणि बारीक मनगटावर एक जाड सोनेरी घड्याळ टिकटिकत होते. तो घड्याळाकडे ज्या गंभीरतेने आणि निष्ठेने वारंवार पाहात होता, ती ध्यानात घेता, घड्याळाची किल्ली म्हणजे त्याच्या जीवनाची व यशाची गुरुकिल्लीच होती असा अंदाज करणे कठीण नव्हते. त्याचे कपडे परीटघडीचे, स्वच्छ आणि मूल्यवान होते. घड्याळाप्रमाणे आपल्या कोट–विजारीकडेही तो पुनःपुन्हा पाही आणि त्यांच्यांवर जमा होणारे धुळीचे कण हळुवार टिचकीने उडवून लावी. घड्याळाखालोखाल त्याच्या आयुष्यात कपड्यांना महत्त्व असावे. या दोन खांबांवरती आपल्या जीवनाचा तंबू त्याने उभारला होता आणि त्यात तो आरामाने विश्रांती घेत पडला होता. पण त्याच्या विश्रांतीला ‘ हे लोक ’ बाधा आणीत होते !

हिशेबनिसाच्या उद्गारांना संमती देणाऱ्या आणि त्या लोकांच्या अमित दुर्गुणांची चिकित्सा आपापल्या बुद्धीनुसार चालू ठेवणाऱ्या मंडळीमध्ये आणखी एकदोन चेहरे लक्षात घेण्यासारखे होते. त्यातील एकजण उघडउघड व्यापारी होता. त्याचा लठ्ठ बँक अकाउंट त्याच्या तुंदिल तनूवरून जाहीर होत होता. त्याच्या ओठांची अधूनमधून सारखी उघडझाप होत होती. आपल्या दुकानातील मालाचे भाव किंवा सट्टेबाजारातील वायद्यांचे आकडे तो गाण्याप्रमाणे गुणगुणत असावा. व्यापार हे त्याच्या ऐहिक जीवनाचे सार आणि संगीत होते. आपल्या

लांबलचक रेशमी कोटाचे पाखे त्याने दोन्ही हातांनी अपत्याप्रमाणे पोटाशी कवळून धरले होते. आगगाडीत पाऊल टाकल्याबरोबर त्याला पहिली चिंता जागा मिळवायची नव्हे, तर खिसा सांभाळावयाची लागली असावी ! आपल्याला अंतःकरण आहे या जाणिवेपेक्षा आपल्याला खिसा आहे ही जाणीव ज्या लोकांत अधिक प्रभावी असते त्यांपैकी तो एक होता. त्या व्यापाऱ्याने दोन स्टेशनांवर काहीतरी खाण्याचा किंवा पिण्याचा मनोदय जाहीर केला होता. परंतु पैशाचा व्यवहार न जमल्याने त्याचा हेतू तडीस जात नव्हता. खरोखर असेच दिसत होते की, त्याला काही भूक किंवा तहान लागली नव्हती; प्रवास करता करता वेगवेगळ्या पदार्थांचे भाव काय आहेत आणि त्यांत कमीजास्त होऊ शकते काय या जिज्ञासेनेच तो प्रेरित झालेला होता, आणि ती भागण्यानेच तो आकंठ तृप्त होत होता. एका कवीने मृत्यूला असे विनविले आहे की, तू येणार असशील तर सुन्दर स्त्रीच्या रूपाने ये. या गृहस्थाने मृत्यूला चेकच्या किंवा रुपयाच्या रूपाने यावयास सांगितले असते. सर्वत्र भिरभिर फिरणारे त्याचे लहान, गोलसर व चकचकीत डोळे पाहून, दोन कोऱ्या करकरीत पावल्यांची आठवण होई; आणि ईश्वराने हे आठ आण्यांचे भांडवल घेऊन जगाच्या बाजारात त्याला व्यापार करण्यासाठी पाठविला आहे असे वाटे. त्याचा वर्ण गोरा होता, कपाळ मोठे होते आणि नाक बाकदार होते. नाकाच्या खालून दोन्ही दिशेला ओघळलेल्या मिशा कातरून बारीक व अणकुचीदार केलेल्या होत्या. कपाळावर पुसट झालेला चंदनी गंधाचा टिळा होता; तो त्याची धार्मिकता प्रकट करीत होता. लाखो रुपयांची कमाई केल्यावर वेळप्रसंगी एखाद्या अनाथ संस्थेला काही हजारांची देणगी आणि आपले किंवा आपल्या बापजाद्याचें नाव देण्यास त्याने कंबर बांधली असती हे त्या पुसट टिळ्यावरून स्पष्ट होत होते. पहिला चष्मेवाला साहेबापुढे, त्याप्रमाणे 'हा टिळेवाला देवाच्या मूर्तीपुढे नेहमी नम्र होत असावा. तो दुसऱ्याचे हिशेब ठेवीत होता, हा स्वतःचे हिशेब निर्माण करीत होता. फुलांकडे पाहून अत्तराचे आणि चंद्राकडे पाहून चांदीचे भाव त्याच्या मनात येत असावेत ! ‘ हे लोक ’ पाहिल्यावर त्याच्याही कपाळावर आठी उमटावी आणि त्याची व्यापारी जीभ लवलवू लागावी हे साहजिकच होते. कारण त्याच्या गिऱ्हाइकांच्या जगात या किंवा अशा लोकांचा कालत्रयी समावेश होण्यासारखा नव्हता.

त्या मंडळींतील तिसरी एक व्यक्ती, तिच्या लांब केसांमुळे, उंच टोपीमुळे आणि वेषभूषेतील एकंदर स्वस्त थाटमाटामुळे लक्षात येण्यासारखी होती. हा गृहस्थ कोणातरी श्रीमंताची मोटरगाडी चालवीत किंवा साफसूफ करीत असावा. श्रीमंत होण्याची त्याची महत्त्वाकांक्षा असावी. पण ती अशक्य असल्याने श्रीमंताचे बाह्य अनुकरण करण्याच्या प्राणांतिक प्रयत्न त्याने केलेला होता. आपल्या मर्यादित मिळकतीत जेवढा डामडौल साधता येईल तेवढा त्याने साधला होता. त्याच्या कोटाच्या वरच्या खिशात एक रंगीत रुमाल त्रिकोणी घडी करून बसविलेला होता. रुमालाच्या पार्श्वभूमीवर फाउंटनपेनची एक क्लिप आणि पेन्सिलीचे कळसासारखे उंच टोपण चकचकत होते. हातातल्या मोठ्या थोरल्या घड्याळाला सोनेरी रंगाची रुंद साखळी लावलेली होती. त्याचे ओठ व दात पान-तंबाखूने तांबडे-काळे झालेले दिसत होते. त्या लोकांना शिव्या देण्यात आणि त्यांचा प्रत्यक्ष प्रतिकार करण्यात या गृहस्थाने बराच पुढाकार घेतला होता. पहिले दोघे जागच्या जागी बसून तोंड चालवीत होते, हा हातही चालवण्यास तयार होता. पहिल्या दोघांच्या वर्गातील हा नव्हता हे उघड होते. कदाचित आत येणाऱ्या त्या लोकांच्या वर्गाशीच त्याचा सूत्र-संबंध लागू शकला असता. परंतु त्याचा जन्म त्या बाजूला असला तरी त्याची महत्त्वाकांक्षा या बाजूला होती. याच कारणामुळे त्याचा त्या आप्त लोकांवर बहुधा अधिक राग होता. तो त्यांच्यापासून दूर सरकत होता आणि ते त्याच्याजवळ येत होते. तो वृत्तीने आणि प्रकृतीने कणखर होता आणि प्रसंग पडल्यास त्या लोकांच्या अंगावर हात टाकण्यास, म्हणजे त्यांच्या फाटक्या आणि मळक्या कपड्यांना हात लावण्यास तो मागेपुढे पाहणारा नव्हता. पहिल्या दोघांच्या उत्तेजनाने त्याने भुसावळ एक्स्प्रेसच्या डब्याचे ते दार पावनखिंडीप्रमाणे लढविण्याचा जोराने प्रयत्न केला. परंतु त्या लोकांच्या लोंढ्यापुढे त्याचा इलाज न चालल्यामुळे शेवटी आपली उंच टोपी सावरीत तो परत आला.

हा सारा प्रकार सकाळी मुंबईहून निघालेल्या आमच्या गाडीने कल्याणच्या पुढे मजल गाठल्यावरती झाला. आमचा डबा अर्थातच तिसऱ्या वर्गाचा आणि उतारूंनी खचलेला होता. या गर्दीतही कित्येक पुंडांनी आणि प्रतिष्ठितांनी वाजवी-पेक्षा अधिक जागा अडवून ठेवली होती. नागाच्या रूपाने पूर्वज आपल्या धनावर बसून राहतात, त्याप्रमाणे जी. आय. पी. रेल्वेच्या लाकडी बाकावर ते

निष्ठेने आणि आव्हानाच्या पवित्र्यात बसून अथवा पडून राहिले होते. कल्याण-पर्यंत एकंदर परिस्थिती ठीक होती, पण पुढील प्रत्येक लहान स्टेशनवर ' हे लोक ' गाडीत चढू लागले आणि त्यामुळे डब्यातील पूर्व उतारूंचे स्वास्थ्य कमी होऊ लागले. अशाच एका स्टेशनावर आत शिरू पहाणारा लोंढा पाहूनच आमचा चष्मेवाला ' हे लोक ' म्हणून उद्गारला होता. ' हे लोक ' हे शब्द त्याने अशा रीतीने उच्चारले की, या लोकांचे अधिक वर्णन करण्याची आवश्य-कताच राहू नये.

शहरापासून आणि शहरी संस्कृतीपासून दूर राहणारे अडाणी खेडूत होते ते ! त्यांच्यांतील प्रत्येक माणूस म्हणजे दारिद्र्याची आणि उपासमारीची पताका होती. त्यात काही शेतकरी असावे, काही गुराखी असावेत, काही मोळ्या, गवत वगैरे विकणारे असावेत. त्यांच्याही श्रीमंतीत अथवा दारिद्र्यात काही भेद आणि प्रतवारी असावी. परंतु ते भेद पत्त्याच्या डावातील राजा-गुलामाच्या भेदाप्रमाणे होते. म्हणजे ते सर्वजण आपल्या भेदांसह एकत्र मिसळून, पिसून गेले होते. पत्त्यातील डावात राजाच्या जवळ राणीच सापडेल असे नाही. दुर्री किंवा छक्कीही तेथे असू शकेल- वरिष्ठ पाने कनिष्ठ पानांपासून वेगळी असत नाहीत. एक्क्याप्रमाणे दुर्रीलाही आपण पत्ता या संज्ञेनेच ओळखतो. त्याप्रमाणे ते सारे लोक ' दरिद्री ' या एका सर्वसामान्य संज्ञेला पात्र होते. त्यांच्यांत पुरुषां-प्रमाणेच स्त्रिया व मुलेही होती. मुले बहुतेक वेषाच्या विवंचनेपासून मुक्त होती. प्रौढांचे पोषाख छिन्नविच्छिन्न झालेले, आणि काळे कळकट होते. एखाद्या शहराच्या पूर्व वैभवाचे अवशेष म्हणून काही वाकडेतिकडे दगड मात्र शिल्लक राहावे आणि ते कल्पनेने एकत्र करून पूर्वीच्या वैभवाचे चित्रही मनासमोर उभे करणे अशक्य व्हावे त्याचप्रमाणे, त्यांच्या अंगावरील लक्तरांवरून त्यांचे मूळ स्वरूप समजणे फार दुष्कर होते. बायकांच्या अंगाचा बराचसा भाग उघडा पडलेला होता. त्याबद्दल त्यांना लाज किंवा चिंता वाटण्याची फारशी शक्यता दिसत नव्हती. त्यांच्याजवळ वेगवेगळ्या आकाराची गाठोडी आणि बोचकी होती. ते डब्यात शिरत किंवा शिरण्याचा प्रयत्न करीत ते जमावानेच. गर्दीत जीव गुद-मरण्याचे भय त्यांना नव्हते. ते लोक आत आले आणि दरवाजापाशी उभे राहिले. इच्छा आणि सामर्थ्य असते तर ते डब्यात आपली प्रगती करून घेऊ शकले असते. वाजवीपेक्षा अधिक जागा अडविणाऱ्या लोकांना उठवून ते बसूही

शकले असते. पण त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्नच केला नाही. ते आत आले आणि सुखाने एकमेकांच्या आधाराने उभे राहिले. आगगाडीच्या डब्यांत आपण उभेच राहिले पाहिजे अशी त्यांची भावना दिसली. केवळ आगगाडीचाच नव्हे तर एकंदर जीवनाचाच प्रवास उभ्याने करण्याचा संकल्प त्यांनी सोडल्यासारखे वाटत होते. ते इतक्या हौसेने आणि निष्ठेने उभे राहात होते की, स्वतःच्या घरामध्ये-सुद्धा बसण्याची मनीषा त्यानी कधी बाळगली नसेल असे मला वाटले. लोक त्यांना दूर ठेवीत होते आणि दूर राहणे हाच आपला हक्क आणि गौरव आहे अशा समजुतीने तेही दारापाशी उभे राहिले होते. पुढे येण्याची काही आमंत्रणे देखील त्यांनी साफ नाकारली. मला त्यांचा संताप आला.

मीही शेवटी उद्वेगाने उद्‌गारलो, ' हे लोक ! '

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १६५८५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ५७९५२ दि: ...
... ९९८८ नों. दि ...

## १०. आ रा म खु र्ची....

आज मला आरामखुर्चीची फार आवश्यकता आहे–

सकाळपासून मी ' आरामखुर्ची 'वरून माझे मन काढण्याचा–उठविण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु बालहट्ट, स्त्रीहट्ट आणि राजहट्ट या तीन नामांकित हट्टाहूनही मनाचा हट्ट फार तापदायक असतो. बालक, स्त्री आणि राजा यांच्याकडे अनुक्रमे रागाने, प्रेमाने आणि आदराने पाहिले की आपल्या हट्टाचा त्यांना विसर पडण्याची शक्यता असते. मुलाला भीतीने, स्त्रीला प्रेमाने आणि राजाला स्तुतीने सहज वश करता येते. परंतु मनावर यांपैकी कसलीही मात्रा चालत नाही. मनाच्या ठिकाणी मूल, स्त्री आणि राजा या तिघांचेही संमेलन झालेले असते. तिघांचेही हट्ट करण्याचे सामर्थ्य मनामध्ये संघटित झालेले असते. मुलाप्रमाणे ते आक्रोश करीत असते, स्त्रीप्रमाणे धुसफुसत असते आणि राजाप्रमाणे आदेश देत असते. मनाच्या हट्टावर मात्रा नाही.

मी माझ्या मनाची कितीतरी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. रामदास आणि केशवकुमार या कवींप्रमाणे मनाला समोर उभे करून त्यांच्याशी मीं निःसंकोचपणे पुढीलप्रमाणे संभाषणही केले.

मी :–मना सज्जना, तूं आज हे भलतेच काय धरून बसला आहेस ?

मन :–मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :–तुला आरामखुर्ची कशाला हवी ? ही नवी लाकडी खुर्ची आहे ही दुसरी वेताची खुर्ची आहे, आरामाने लोळायचे असेल तर ही गादी आहे,

वि. वा. शिरवाडकर

खाली बसायचे असेल तर गालिचा आहे.

मन :–मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :–मना सज्जना, रामदासांनी सांगितलंय, विवेक सोडू नकोस म्हणून ! आरामखुर्चीतच विशेष काय आहे ? आरामखुर्चीनं आमच्या राजकारणाचं किती नुकसान झालं होतं, आमचं स्वातंत्र्य किती दूर गेलं होतं हें तुला ठाऊक नाही काय ? शरीरशास्त्राच्या दृष्टीनंही आरामखुर्चीवर बसणं मोठं हानिकारक असतं. म्हणून म्हणतो बाबा, –

मन :–मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :–अरे वेड्या, आराखुर्चीचं कौतुक काय इतकं ? एका मित्राकडून आज हे सुंदर गोष्टींचं पुस्तक आणलं आहे. तें कवितांचं पुस्तक अजून चाळूनही पाहिलं नाही ! जागतिक साहित्यात अमर ठरलेल्या वाङ्मयासाठी –

मन :–मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :–तू चतुर आहेस, सुज्ञ आहेस. मी काय कल्पवृक्षाच्या खाली बसलो आहे की आरामखुर्ची म्हणताच समोर आरामखुर्ची उभी राहील ! आज संध्याकाळी आपण राणीच्या बागेत जाऊ; तेथल्या कासवाच्या पाठीवर, माकडांच्या लीलांवर, काळ्या वाघाच्या उडीवर, निद्रिस्त सिंहाच्या आयाळीवर तू किती दिवसांत नजर टाकलेली नाहीस हे तुला आठवते काय ? लोकांच्या उपद्रवामुळे तो झोपलेला केसरी जेव्हा जागा होऊन त्वेषाने गर्जना करू लागतो तेव्हा –

मन :–मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :–राणीचा बाग नको असेल तर आपण सिनेमाला जाऊ. मना, मेट्रोला लॉरेल-हार्डीचं पिक्चर लागलं आहे, दोन तास हास्यरसात न्हाऊन निघशील तू ! थिएटर एअरकन्डिशन्ड आहे, शिवाय तेथील खुर्च्याही फार आरामशीर आहेत.

मन :–मला आरामखुर्ची पाहिजे !

याप्रमाणे बराच वेळ मी मनाची मनधरणी करण्याचा उद्योग केला. परंतु तो यशस्वी झाला नाही ! आपल्या अत्यंत तर्कशुद्ध आणि मार्मिक सबबी न ऐकता सावकाराने सारखी पैशाची मागणी करीत राहावे त्याप्रमाणे मला आरामखुर्ची पाहिजे हे त्याचे पालुपद काही केल्या थांबेना ! किनाऱ्यावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटांचा एकच ध्वनी वातवरणात सारखा घुमत राहावा त्याप्रमाणे आरामखुर्चीची मागणी माझ्या मनात सारखी घुमत राहिली.

आणि यात मनाचा काही दोष आहे असे नाही. कारण आरामखुर्ची ही चीज मला अत्यंत प्रिय आहे. सोळा हजार बायका असूनही श्रीकृष्ण नेहमी रुक्मिणीच्याच महालात असायचा, त्याप्रमाणे माझ्या खोलीत जेव्हा आरामखुर्ची असते तेव्हा इतर खुर्च्यांकडे दुर्लक्ष करून मी आराखुर्चीचाच नेहमी आश्रय घेत असतो. आरामखुर्चीवरील या गाढ प्रेमामुळे आजवर दोनतीन आराखुर्च्यांचा बळी मी घेतला आहे. ती नसली म्हणजे मी तिच्यासाठी दुःख करतो; परंतु ती असली म्हणजे तिच्या सुखदुःखाची पर्वा न करता, तिचा इतका अतिरिक्त आणि अविरत उपयोग करतो की, तिचे कृश शरीर लौकरच गलितगात्र होते आणि तिच्या निखळलेल्या लाकडांची मोळी अडगळीच्या खोलीत टाकावी लागते, किंवा दारावर आलेल्या सौदागराच्या स्वाधीन करावी लागते. ज्या वस्तूवर आपण प्रेम करतो ती वस्तू वापरण्यास त्या प्रेमामुळेच आपण खरोखर अपात्र असतो हे सत्य नाही काय? ‘ केक खाणे आणि जवळ बाळगणे या दोन्ही गोष्टी एकदम होऊ शकत नाहीत ’ अशी इंग्रजीत म्हण आहे ती या दृष्टीने फार यथार्थ आहे. भुकेला मनुष्य केकवर प्रेम करतो आणि त्या प्रेमामुळे तिचे भक्षण म्हणजे तिचा नाशही करतो. लहान मुलाला एखादी वस्तू आवडली, तिच्यावर आपले प्रेम जडल्याचे त्याने अंगविक्षेप आणि मुद्राभिनय यांच्या द्वारा सिद्ध केले म्हणजे आपण ( त्या वस्तूविषयी आपल्यालाही काही प्रेम असेल तर ) ती चटकन बाजूला उचलून त्याच्या दृष्टीआड करतो. तसे न केल्यास त्या वस्तूची जीवितयात्रा समाप्त झाली असे आपण समजतो. उदाहरणार्थ, तुमच्या अंतःकरणातील वात्सल्यरस ओसंडू लागल्याने तुम्ही आपल्या अपत्याला टेबलावर बसविले. ( वात्सल्याच्या आवेगात नेहमी होणाऱ्या अपराधांपैकी एक अपराध ) आपल्या त्या कुलदीपकाची दृष्टी सहजच टेबलावर असलेल्या कांचेच्या रंगीत, नक्षीदार दौतीकडे जाते. दुष्यन्ताचे शकुंतलेवर प्रथमदर्शनी प्रेम जडते त्याप्रमाणे त्या दौतीच्या दर्शनाने तो चिमुकला दुष्यन्त घायाळ होऊन जातो. ‘ भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि ’ या श्लोकात म्हटल्याप्रमाणे त्याच्या अंतःकरणातील काही पूर्वजन्मीचे सुप्त स्नेहसंबंध जागृत होतात. त्याचे डोळे विस्फारतात, त्याच्या ओठावरती हास्यलहरी नाचू लागतात, त्याच्या तोंडातून काही अमानुष चीत्कार बाहेर पडतात, त्याचे बाहुपाश वरती जातात आणि ( तुम्ही झटपट केली नाही तर ) दुसऱ्या क्षणी ती दौत आतल्या

शाईसह त्याच्या हातात जाते ! होऊ नये ती गोष्ट होऊन गेली आहे, आता तिची पूर्तता पाहण्यावाचून तुम्हांला गत्यंतर नाही. दौतीच्या चारी बाजूंचे ते बालक कसोशीने कौतुक आणि निरीक्षण करते, तिच्यातील शाईचा शेवटचा थेंब बाहेर काढते आणि शेवटी तिचे सामर्थ्य अजमावून पाहण्यासाठीं खालच्या फर्शीवर जोराने भिरकावून देते. बालकाच्या प्रेमामुळे दौतीच्या काचा होतात. मोठी माणसे ही सुद्धा आकाराने वाढलेली मुलेच असतात. तीही आपल्या गाढ प्रेमाने कोणत्या तरी वस्तूचा, कोणत्या तरी व्यक्तीचा नाश करीत असतात ! पुष्कळसे प्रेमविवाह अयशस्वी होतात याचे कारण विवाहाइतकेच प्रेम हे सुद्धा असते यात संशय नाही.

परंतु या साऱ्या शहाणपणाचा काडीमात्र उपयोग नाही याची मला जाणीव आहे. माझ्या दारावर आरामखुर्च्या विकणारा तो मनुष्य आला आणि माझी सांपत्तिक परिस्थिती अनुकूल असली तर मी तिसरी आरामखुर्ची ताबडतोब खरेदी करीन यात मुळीच शंका नाही. त्यावेळेस मोगल बादशहाचे मयूरासन कोणी घेऊन आला तरी मला त्याचे कौतुक वाटणार नाही. किंबहुना मी प्रथम आरामखुर्ची खरेदी करीन, तिच्यात स्थानापन्न होईल आणि नंतरच त्या मयूरासनाकडे नजर टाकीन, त्याचे कौतुक करीन. आरामखुर्चीवर बसल्यावर कोणत्याही गोष्टीचे कौतुक करणे हा केवळ हातचा मळ होतो. साध्या खुर्चीवर बसून न आवडलेली पुस्तके आरामखुर्चीत बसून मी आनंदाने वाचली आहेत. एरव्ही ज्या माणसाशी पाच मिनिटेही संवाद करणे मला जड गेले असते त्यांच्याशी आरामखुर्चीत बसून मी तासन्‌तास गप्पा मारलेल्या आहेत. आरामखुर्चीवर बसल्यावर माणसाचे अंतःकरण उदार होते, स्नेहमय होते, सहानुभूतिपूर्ण होते. आरामखुर्चीतून कोणाला काही नाकारता येणे शक्य नाही. स्वतःसंबंधीचा आत्मविश्वासही आरामखुर्चीत बसल्यावर बलवत्तर होतो. आपण आरामखुर्चीत बसलो असताना चोर, शेजारी, पिशाच्च, घेणेदार कोणीही आले तरी आपण डगमगत नाही. सज्जन आले तर ती आपल्याला सौजन्याचा पुरवठा करते, दुर्जन आले तर आपल्या अहंकारात आणि प्रतिकारबुद्धीत ती भर घालते. मी नवीनच एखाद्या माणसाला भेटायला गेलो आणि तो आरामखुर्चीत बसलेला असला तर त्याच्याशी स्नेहसंबंध प्रस्थापित करणे मला कठीण जात नाही.

या ऐहिक जगात सर्वगुणसंपन्न असे काय आहे ? जगात आल्यावर देवाचा

देवसुद्धा एका पायाने लंगडा आणि मनाने ठकडा झाल्याचे आपल्या ऐकिवात आहे. सर्व चांगल्या गोष्टींप्रमाणे आरामखुर्चीच्या चांगुलपणालाही मर्यादा आहेत. आरामखुर्चीत बसल्यावर देवांनीही आपला हेवा करावा अशी परिस्थिती निर्माण होते ही गोष्ट खरी. परंतु म्हणून दिवसाचे चोवीस तास आरामखुर्चीत बसूनच आपण जीवन कंठू लागलो तर ते इष्ट होणार नाही. सकाळच्या वेळी आरामखुर्चीत सहसा बसू नये असे माझे अनुभवसिद्ध मत आहे. सकाळ ही काम करण्याची सर्वोत्कृष्ट वेळ आहे आणि आरामखुर्ची ही काही काम करण्याची जागा नव्हे. आरामखुर्चीत बसून कामाचा विचार करता येतो, काम करता येत नाही; मनोराज्य करता येते, व्यवहार करता येत नाही; वाचता येते लिहिता येत नाही. आरामखुर्ची ही कर्मभूमी नव्हे. सकाळी खुर्चीवर आणि रात्री किंवा संध्याकाळी आरामखुर्चीवर, ही माणसाच्या बसण्याची आदर्श व्यवस्था आहे असे मला वाटते. संयम ठेवला नाही तर आरामखुर्चीचे सुखातून व्यसनात रूपांतर व्हावयास उशीर लागत नाही. काही उमलते मोहरे जवळ आरामखुर्ची असल्यामुळे कामाला आल्याचे म्हणजे निकामी झाल्याचे मला माहीत आहे. आरामखुर्चीचे राजकारण हा निंदाव्यंजक शब्दप्रयोग अस्तित्वात आला त्याचे कारण हेच की, असले राजकारण करणाऱ्या लोकांना आरामखुर्ची हे राजकारण करण्याचे स्थळ किंवा साधन नव्हे हे समजले नाही. रणांगणावर तरवार किंवा व्यासपीठावर वक्तृत्व गाजवून परत आल्यावर आरामखुर्ची ही विश्रांती घेण्याची जागा आहे. परंतु हे लोक आरामखुर्चीतून लढाई करू लागल्यामुळे लोकनिंदेशिवाय दुसरे काहीच त्यांच्या पदरात पडले नाही. आराम-खुर्चीच्या बाजूने मी इतकेच म्हणेन की, हा दोष आरामखुर्चीचा नसून तिच्या योजनेचा आहे. आरामखुर्चीचा इतका काटेकोर सदुपयोग करणे मलाही कधी जमलेले नाही. हे सारे ध्यानात घेऊनही आरामखुर्ची ही सुसंस्कृत मानवाच्या जीवनातील एक श्रेष्ठ अशी संस्था आहे हे कोणालाही मान्य करावे लागेल. या संस्थेत मी लौकरच पुन्हा दाखल होण्याची आशा करतो.

● ● ●

# ११. तिरपी मान

माझ्या एका मित्राला माझं एक छायचित्र हवं होतं. "......मी एक अल्बम तयार करीत आहे. तुझाही एखादा फोटो त्यात असावा अशी माझी इच्छा आहे. तुला आवडलेला स्वतःचा एखादा फोटो पाठवून द्यावा......" त्याच्या या पत्राप्रमाणे माझा एक बऱ्यापैकी फोटो त्याला पाठविला.

त्या फोटोची पोच देताना लिहिलेल्या पत्रात त्याने मला आपल्या मार्मिक निरीक्षणाचा नमुना पाठविला. "...माझ्या पत्राला तू तातडीने सक्रिय उत्तर दिल्याबद्दल आभार. तू इतक्या उत्साहाने माझ्या पत्राला मान देशील अशी मात्र माझी कल्पना नव्हती. सिनेमानटी जशी आपल्या चाहत्याला फोटो पाठवून अधिक चाहते मिळवायला उत्सुक असते तसा तू नसावास असा अंदाज आहे. सिनेमानटीवरून आठवलं म्हणून लिहितों : माझ्या संग्रहात नटी, कलावंत, साहित्यिक, राजकारणी–वगैरे गुणी लोकांच्या फोटोंची संख्या आता बरीच झाली आहे. या सर्व फोटोंकडे पाहताच एक गोष्ट माझ्या चटकन ध्यानात आली. ती ही की या एवंगुणविशिष्ट व्यक्तींच्या आणि चारचौघांसारख्या साध्यासुध्या माणसांच्या फोटोत एक ठळक फरक असतो. हा भेद तर माझ्या इतका डोळ्यांत भरला आहे की, मी कोणताही फोटो पाहून सांगू शकेन तो फोटो कुणाचा आहे ! म्हणजे तो फोटो साध्यासुध्या माणसाचा आहे की गुणी माणसाचा आहे हे पटकन ओळखण्याची एक गुरुकिल्ली मला गवसली आहे. ती ही की ज्याची मान फोटोत तिरपी ठेवलेली आहे तो गुणी समजावा. याशिवायही इतर काही

शांताराम

लकबी आहेतच. उदाहरणार्थ, जबडा पसरवून ओठांच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत पसरविलेलं हास्य, काही कारण नसता रोखलेले डोळे, आश्चर्यावाचून चढविलेल्या भिवया, लटक्या व ओढून ताणून आणलेल्या चिंतेचे भाव, कुठलीही जखम न होता अंगाला पडलेली मुरड इत्यादी. पण या सर्वांपेक्षा हुकमी पत्ता म्हणजे तिरपी मान ! अर्थात तुला मी साहित्यिकांच्या दावणीत गोवलं, ते निवेदनाच्या सोयीसाठी. कोट अडकवायला जशी खुंटी तसं माझं म्हणणं स्पष्ट करायला मी तुझा उपयोग करून घेणार आहे. तुला एवढ्यापुरतंच मी साहित्यिकांत गोवलं याबद्दल तू माझं कौतुक करशील, अशी खात्री आहे.

तुम्हा सर्व लोकांची मान अशी तिरपी का असावी ? गुणाचा तोरा तुम्ही मानेच्या झटक्यात तर दर्शवीत नाही ना ? तसं असेल तर तुमची मनोवृत्ती बालिश नाही काय ? तुम्ही जर बालिश नसाल तर तिरप्या मानेचे बावळट लोक आहात असं धरून चालायला प्रत्यवाय नसावा. तुम्ही जर बावळट नसाल तर एक नंबरचे गर्विष्ठ असाल. आणि मी नम्रपणे तुम्हांला सुचवू इच्छितो की तुमचा हा गर्व व्यर्थ आहे. गुणभारानं मस्तक लवायला हवं. गुणामुळे मान तिरपी का असावी, हे मला समजत नाही. कलावंतांत किंवा कोणत्याही गुणी माणसांत आत्मविस्मृतीचा अंश असायला हवा. तुमची कृती सुंदर व्हायला आत्मविस्मृती आवश्यक नाही काय ? कुठवर तुम्ही अभिमानाचं व अहंकाराचं जोखड वाहून आपली मान तिरकस करून घेणार आहात ? बाबा रे, ऐटीत मान तिरपी राखून रुबाबदार दिसण्याचा प्रयत्न करता " पण नेमक्या त्याच कारणामुळे आमच्यासारख्या चारचौघांत तुमचं हसू होतं, हे तुम्हांला कळायला हवं. बोल, माझ्या साहित्यिक मित्रा, सर्व गुणी माणसांच्या वतीने बोल, तुमची तिरपी मान सरळ कधी होणार ?......"

गुणी माणसांची मान फोटोत तिरपी असते, हा माझ्या मित्राने लावलेला शोध मला मान्य आहे. पण त्याने केलेल्या अनुमानाशी—विशेषतः पत्राच्या शेवटी प्रगट केलेल्या विचारांशी मी बिलकूल सहमत नाही. मार्मिक निरीक्षण आणि चूक अनुमान असं त्याच्या पत्राचं वर्णन करिता येईल. डार्विनच्या सिद्धांताबद्दल असं सांगतात की, त्याने ज्या तपशिलाच्या जोरावर आपला क्रांतिकारक सिद्धांत मांडला, तो सगळा तपशील, ती सगळी निरीक्षणं चूक होती, तरीही त्याचा मुख्य सिद्धांत मात्र बरोबर होता. माझ्या मित्राच्या बाबतीत

काहीसा उलटा प्रकार झालेला आहे.

गुणी माणसाच्या तिरप्या मानेत गर्व भरला असतो, हे मला एकदम कबूल आहे. इतकंच नव्हे, तर आपली मान तिरकस ठेवण्याचा गुणी माणसाला जन्म-सिद्ध हक्क आहे असेही मला वाटते. पण तिरप्या मानेत साठलेला अभिमान गुणविषयक असतो, असं जे बहुतेक लोक माझ्या मित्राप्रमाणे समजतात, ते मला पटत नाही. माझ्या मते, त्यांची ही समजूत दिशाभूलकारक आहे.

माझ्या मित्राचा रोख असा की, गुणी लोकांना जे हस्तगत झालं, जे त्यांच्या हाताचा मळ बनून गेलं, त्याविषयी त्यांना अभिमान वाटतो. अगदी चूक आहे! एखाद्या लेखकाला आपण लिहितो म्हणजे शतकृत्य करतो असं वाटत असेल; एखाद्या गायकाला आपल्या तानांत काही तरी जगावेगळं अलौकिक आहे, असं वाटत असेल; एखादा चित्रकार आपल्या कुंचल्याचा तोरा मिरवीत असेल आणि जर एखादा 'मुत्सद्दी' आपले राजकीय डावपेच डोक्यावर घेऊन नाचत असेल, तर असं नक्की समजावं की हा लेखक कॉलेजातल्या होतकरू विद्यार्थ्यांपैकी एक आहे; हा गायक कॉलेजातल्या संगीतचक्राचा सभासद आहे; हा चित्रकार वार्षिक स्नेहसंमेलनात बक्षिसं आणि वाहवा मिळविण्यास धडपडणारा किशोर-कलावंत आहे आणि हा राजकारणी कॉलेज-युनिअनच्या अध्यक्षपदासाठी किंवा इतर जागेसाठी जिवाचं रान करणारा बाल राजकारणी आहे! उलट जसजसं एखाद्या गुणी माणसाचं मन, त्याचं आयुष्य, त्याचं अस्तित्व त्याच्या गुणानं संपृक्त होत जातं, त्याच्या गुणाला सार्वत्रिक मान्यता मिळत जाते, तो यशस्वी गुणी माणूस होत जातो, तसतसा त्याचा तद्विषयक अभिमान कमी कमी होत असतो. जितका माणूस जास्त गुणी, तितका त्याला आपल्या गुणाचा अभिमान कमी. जे जगन्मान्य झालं आहे, प्रत्येकाच्या डोळ्याला स्पष्ट दिसत आहे, ते मानेच्या झटक्याने सिद्ध करायची अर्थातच त्याला गरज नाही. अर्ध्या हळकुंडात पिवळं व्हायची अवस्था संपल्यावर गुणी माणसाला त्याच्या गुणाचा गर्व तर होत नाहीच, उलट अजून किती मार्ग काढायचा आहे, अशी त्याला तीव्रतर जाणीव होत जाते. त्यानं ठरविलेलं पट्टुत्वाचं क्षितिज दूर दूर पळत जातं व तो सारखा लीन होत असतो. कलावंतासारखे लाजाळू आणि लीन लोक इतरत्र क्वचितच सापडतील. त्यांच्या अदबीची, नम्रतेची आपण पुष्कळदा थट्टासुद्धा करतो. असं असता त्यांना आपल्या गुणाचा गर्व वाटतो, असं म्हणायचा दुतोंडीपणा आपण

का करावा ?

कलावंतांची किंवा इतर गुणी माणसांची मान तिरपी नसते असं मला कधीच म्हणायचं नाही. पण त्यांच्या अभिमानाचं कारण लोक बहुधा समजतात तसं नसतं. उदाहरणानं माझी बाजू स्पष्ट होईल. एखाद्या तरुणाच्या मनात एखादी तरुणी ठसली तर तो तिच्या दारावरून खेपा घालील; तिचा मागोवा घेईल, एखाद्या कोपऱ्यावर तिला वळताना बघून उद्‌गार काढील, "काय मोहक आहे हिची चाल !" तिचं वर्णन करकरून तो आपल्या मित्रांचं डोकं पिकवील. त्याला जर तिनं उत्तेजन दिलं, तर त्याचं अस्मान ठेंगणं होईल. पण तिच्याशी त्याचं पुढे लग्न झालं, ती एकमेकांशी कायमची बांधली गेली, तर मात्र तो मूर्ख असल्याशिवाय तिच्या सुंदरतेचा क्वचितच उहापोह करील. कुणी त्याच्या बायकोच्या सौंदर्याचा विषय काढला तर तो विषय टाळण्याचा त्याचा प्रयत्न राहील. त्याला जर चुकून तिची तारीफ करण्याची लहरच आली तर तो तिच्या पाकनैपुण्याबद्दल बोलेल, शिवणकामाची स्तुती करील, संसारदक्षतेबद्दल बोलू लागेल; आणि खरं म्हणायचं म्हणजे बिचाऱ्याच्या बायकोचे हे गुण जेमतेमच राहतील ! माझ्या म्हणण्याचा आशय असा की गुणी लोक जो अभिमान मिरवितात, तो त्यांच्या यशाचा नसतो. त्यांचं जे अंग यथातथाच आहे ते तसं तसं नाही. त्याही बाबतीत त्यांचं आसन मजबूत आहे, हे दाखविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालू असतो. पूर्णतेच्या प्रदर्शनापेक्षा अपूर्णतेवर आच्छादन टाकण्याचाच गुणी माणसांचा सतत यत्न असतो. एखाद्या कसलेल्या राजकारणी पुरुषाला भेटा, तो राजकारणावर विशेषसं बोलणार नाही. तो साहित्य किंवा तत्त्वज्ञान यांचाच जास्त ऊहापोह करील. सामाजिक प्रसंगांत चर्चिल राजकारणाची चर्चा नसेल करीत. त्याच्या गप्पांचा मुख्य रोख आपलं चित्रकलेचं ज्ञान किती खोल आहे, हे दाखविण्याकडेच राहील असा माझा अंदाज आहे. उघडच आहे; चर्चिल जेवढा ख्यातनाम राजकारणी आहे तेवढा थोर चित्रकार नाही. चंद्रशेखर रमन विज्ञानाबद्दल किंवा 'रमन-किरणा' बद्दल कामावाचून क्वचितच बोलतील. संगीताची आपली अभिज्ञता मात्र ते वेळोवेळी प्रगट करीत असावेत ! एखादी प्रथितयश नटी आपल्या अभिनयाबद्दल बोलताना लाजेल. तिचा आवडीचा विषय म्हणजे तिच्या साड्या किंवा कदाचित तिची साधी राहणी. दुसऱ्या एखाद्या नटीजवळ तिच्यापेक्षा अधिक साड्या असणं नेहमीच शक्य असतं. तिच्यापेक्षा साधे राहणारे

किती तरी लोक असू शकतात. म्हणूनच ती या बाबतीत आपण मागे नाही, हे दाखविण्याचा सतत प्रयत्न करील किंवा कदाचित ती ललित साहित्यातील आपली रसिकता पटवून देण्याची शिकस्त करील. थोडक्यात सांगायचं म्हणजे, यश मिळविण्यापेक्षा अपयश झाकण्याकडेच गुणी लोक तिरप्या मानेचा उपयोग करतात. गुणी माणसंच कशाला ? चार चौघांसारखी सामान्य माणसं नाहीत का नेहमी कुरकुरत " माझा हातच अपेशी ! मी सर्वांसाठी इतकं केलं, पण माझं कुणीच झालं नाही ! पण हरकत नाही ! " — असं म्हणणारी व्यक्ती सर्वत्र आहे. ती आपल्यात सुद्धा कुठं तरी अंतर्यामी खोल खोल बसली आहे. " पण हरकत नाही " – असं ज्या वृत्तीपायी सामान्य माणूस म्हणत असतो, त्याच वृत्तीमुळे गुणी माणसांची मान तिरकस होते. तिरपी मान जगाला नेहमी सुचवीत असते, " तुम्ही म्हणता माझ्या गुणापायी, या छंदापायी, या नादापायी माझं आयुष्य मी बरबाद केलं. पण तुमची कल्पना चूक आहे. माझं आयुष्य मुळीच बरबाद झालेलं नाही. मी ज्या तऱ्हेने वागत आलो; त्या वागण्यामुळे माझं काही एक नुकसान झालं नाही ! माझं जीवन सर्वतोपरी सुखी आहे. तुमच्या या अनावश्यक सहानुभूतीची मला बिलकूल गरज नाही ! " ज्या अपयशाने माणूस साधारणपणे चिडका बनतो, त्या अपयशाचें अस्तित्वच गुणी माणूस आपल्या तिरप्या मानेने अवलक्षितो, " With no regrets – ना खेद ना खंत "–असा गुणी माणसाच्या तिरप्या मानेचा अर्थ आहे ! त्यामुळेच त्यांच्या आयुष्याला रंग येतो. म्हणूनच गुणी माणसाची तिरपी मान हिरावून घेण्याचा कुणी प्रयत्न करू नये. स्त्रियांचं लाजणं त्यांच्यांपासून काढून घेतल्या-सारखं व्हायचं ते ! गुणी माणसांना त्यांच्या गुणांच्या खालोखाल काही प्रिय असेल, तर त्यांची तिरपी मान. ती हिसकावून घेणं किंवा तिचा भलताच अर्थ लावणं अरसिकतेचं होईल !

मला आठवतं, एका गाजलेल्या चित्रपटाचा दुसरा ' शो ' पाहून मी परत येत होतो. मध्यरात्रीचा सुमार होता. अंधार काळाकुट्ट आणि रस्त्याने ये-जा अगदीच कमी. माझ्याच रस्त्याने एक म्हाताराही चालला होता. बराच वेळ आम्ही बोललो नाही. पण शांतता आम्हांला असह्य होताच आम्ही बोलू लागलो. दोघांनाही सोबत मिळाली. तो म्हातारा नाट्य, अभिनय, कथाशास्त्र– इत्यादींचा चांगला जाणता असावा पण त्याचा प्रयत्न शक्यतोवर आपलं ज्ञान

लपविण्याचा होता. त्याचं आयुष्य कष्टी असावं; पण तेही तो झाकीत होता. या वयांत असं एकटं मन रमविण्यासाठी बाहेर पडायचं एरवी त्याच्या नशिबी का यावं ! पण गृहस्थ माझ्याशी बोलताना सारखा हसत होता. त्याच्या विनोदी खेळकर बोलण्यामुळे आमच्या दोघांच्या वयांतील अंतर मी विसरून गेलो. म्हातारा इतका गोड होता ! बरंचसं अंतर चालून गेल्यावर आमचे मार्ग फुटायला आले. अंधारात साथ दिल्याबद्दल गहिवरून माझे त्याने आभार मानले. गृहस्थाचे शेवटचे शब्द मोठे झकास होते, "काही विशेष बघायला मिळेलसं वाटलं होतं. म्हटलं, एवढा गाजला बोलपट–प्रेमपट. आपण आता म्हातारे झालो तेव्हा तरुणांचे प्रेमाचे काही नवीन प्रकार आजकाल अस्तित्वात आले असतील, ते बघावे. पण काही नाही ! आम्ही देखील आमच्या वयात असंच प्रेम करीत होतो. तरुण लोक आजकाल कद्धा थोडा अधिक करितात. नाही तर प्रेमाबद्दल काय शिकविणार आहेत म्हणा ते आम्हांला ?"

त्या म्हाताऱ्याचं सगळं स्वभावचित्र, जीवनचित्र त्याच्या त्या बोलण्याने माझ्या डोळ्यासमोर उभं केलं. त्याचं छायाचित्र पाह्यलं नसलं, तरी माझी खात्री होती की, त्यात त्याची मान तिरपीच असली पाहिजे !

● ● ●

# १२. पुस्तकांचं स्त्रीत्व

लॉर्ड बायरनचं ज्या दिवशी लग्न झालं, त्या दिवशी त्यानं आपल्या बायकोला विचित्र तडाखा दिला. "आता तू माझी पत्नी आहेस. बस, तुझा तिरस्कार करायला मला तेवढंच कारण पुरेसं आहे. तेच तू जर दुसऱ्या कुणाची बायको असतीस तर मी तुझ्यावर प्रेम केलं असतं."

बायरनच्या स्वभावाची कल्पना या एका प्रसंगानं येते. पुष्कळांना माणूस असा असू शकेल काय, असा संशय येतो. पण असा संशय घ्यायचं काही कारण नाही. खरं म्हटलं तर जे बायरनचं तेच तुम्हा आम्हा सगळ्यांचंच असतं. हे विधान करताना मी किती भयंकर धाडस करीत आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. सगळ्यांची प्रवृत्ती बायरनसारखी असावी, असं मी नाही म्हणणार. माझं म्हणणं अगदी साधं आहे. ज्या वस्तूसाठी आपली धडपड चालू असते, ती प्रत्यक्ष हस्तगत झाली की, तिच्याबद्दलची पूर्वीची आस्था व कुतूहल मन्दावतं. मग तिचा तुम्ही द्वेष करा किंवा करू नका; तो तुमच्या स्वभावाचा प्रश्न आहे, ती एक तपशीलाची बाब आहे.

गांधींसारख्यांच्या आयुष्यात स्वातंत्र्याला जे स्थान आहे, एखाद्या व्यापाऱ्याला पैसा जितका जवळचा आहे, तितकीच 'स्त्री' बायरनला प्रिय होती. बायरनची आवड चांगली किंवा वाईट हा प्रश्न निराळा. मला त्याच्या तळमळीचा, ओढीचा विचार करावयाचा आहे. बायरनची इतकी आठवण व्हायचं कारण म्हणजे पुस्तकांबद्दलची माझी वृत्ती; पुस्तकांबद्दल मला कमालीचं वेड आहे हे सांगण्यात

मला बिल्कुल संकोच वाटत नाही. जोपर्यंत एखादं पुस्तक मला मिळत नाही, तोपर्यंत ते मिळविण्याची माझी कितीतरी धडपड चालू असते; आणि काय होतं कोण जाणे, एकदा का ते पुस्तक मला मिळालं की माझी ओढ कमी होते. म्हणूनच माझ्या संग्रही असलेल्या पुस्तकांना म्हणावंसं वाटतं, "झालं, संपलं तुमचं आकर्षण. तुम्हाला मिळविण्यासाठी एवढा धडपडलो, हे खरं आहे. पण त्याचं आता काय ? तेच तुमच्यावर दुसऱ्या कुणाचा हक्क असता, तर माझं मन सारखं तुमच्याभोवती रेंगाळलं असतं."

या तऱ्हेवाईक प्रवृत्तीची जबाबदारी माझ्यावर येणं साहजिकच आहे. पण ही तऱ्हेवाईक वृत्ती मान्य करूनही मला पुस्तकांवर स्त्रीत्वाचा आरोप करावयाचा आहे. अर्थात पुस्तकं आणि स्त्रिया यांत दिसणारं साम्य हाच एक स्त्रियांचा गुण आहे, असं मी म्हणणार नाही; परंतु इतकं नक्कीच की, पुरुष आणि स्त्री ज्या प्रकारानं जवळ येतात, त्यांत व वाचक आणि पुस्तकं ह्यांची ज्या रीतीने गाठ पडते, तीत साम्य आहे.

शेलीच्या जीवनावरील आन्द्रे मार्वाच्या 'Aerial' या पुस्तकाचं मी नुसतं नाव ऐकलं. नुसत्या नावाच्या जादूनं मी भारून गेलो. नुसत्या नावानं मोहित होणं ही कदाचित दुर्बलता असेल. पण पुस्तकं मला नुसत्या नावानंसुद्धा भारू शकतात व मी ते टाळू शकत नाही. ते पुस्तक मिळेपर्यंत थेट प्रियकरासारखा मी मनातल्या मनात म्हणू लागलो, "कधी तरी, कुठे तरी, तुझे ऐकले मी नाव. नकळत तुझ्या ठायी जडला नि स्नेहभाव." आता ते पुस्तक कपाटात धूळ खात पडलं आहे ! मलपृष्ठ गळून गेल्यामुळे पंखविहीन वनदेवते-सारखी त्याची दशा झाली आहे ! प्रथमदर्शनी प्रेमाचा जो प्रकार आहे, त्याला तर पुस्तकांच्या बाबतीत मी अनेकदा बळी पडलो आहे. पुस्तकांच्या दुकाना-समोरून जावं; काचेच्या कपाटातून दिसणाऱ्या सुंदर मुखपृष्ठावर लक्ष जावं आणि खिशात पैसे असले की, सरळ ते पुस्तक घरी आणून पटकावं, असा प्रकार मी कितीदा तरी केला आहे. पण आताशा मी जरा सावध होत आहे. प्रथम-दर्शनी प्रेम जसं बहुधा फोल ठरतं त्याप्रमाणेच कित्येक पुस्तकांनी मला चांगलंच बनवलं आहे. या दगाखोरीचं खापर मी स्वतःवर फोडायला तयार नाही. पुस्तकाच्या बहिरंगावर अंतरंगापेक्षा जास्त पैसा उधळण्यापर्यंत प्रकाशकांची सौंदर्यदृष्टी येऊन थकल्यावर माझ्यासारखा मासा गळाला लागला, तर आश्चर्य

काय ? असली फसगत पुस्तकांच्याच बाबतीत झाली, हे आपले नशीब समजावं. कित्येकदा प्रेमाचा प्रादुर्भाव ' केला जरी पोत बळेची खाली ' या न्यायानं होतो. नाही तर, रेनॉल्ड्स्च्या कादंबऱ्या मी कशाला वाचल्या असत्या ? इंग्रजी चवथीत आम्हाला नारायण हरी आपट्यांची ' सुखाचा मूलमंत्र ' ही व्यायाम-प्रचारक कादंबरी होती. तीतील मुकुंदा, की कोणीतरी, रेनॉल्डस्च्या कादंबऱ्या लपून वाचतो, असा उल्लेख आहे. ते वाचताच माझं कुतूहल भडकलं व मी त्या वाचून काढल्या. त्यावेळी रेनॉल्डस्ची भाषा मला काय समजणार ? लगेच मी नाथमाधवांची पुस्तकं वाचून ही उणीव भरून काढली. यापेक्षा निराळा प्रकार मार्क्सच्या बाबतीत झाला. मार्क्सचे विचार समजण्याइतकी माझी तयारी नसूनही लहान तोंडी मोठा घास घ्यायचा मोह मी टाळू शकलो नाही. आपले परिचित किंवा मित्र एखाद्या व्यक्तीबद्दल फार चर्चा करू लागले की, ऐकीव स्तुतीचा मनावर असा जबरदस्त दाब बसतो, की, ती व्यक्ती मनातून काढता येत नाही. मार्क्सशी मी झोंब घेतली ती अशाच प्रकारे. जगात अशा व्यक्ती फारच थोड्या की, ज्या आपण होऊन अधःपतनाला तयार होतील; त्याचप्रमाणे, स्वतः होऊन माझ्याकडे किंवा कुणाकडे येणारी पुस्तकंही कमीच. तरीपण तशा प्रकारची उदाहरणं अगदीच नाहीत असं नाही. पुस्तकांच्या बाबतीत सनातनी लग्नासारखी भानगड घडते. घरच्या वडील मंडळींनी उपवधू मुलाला म्हणावं, " ही बघ तुझ्यासाठी पसंत केलेली मुलगी. हिच्याशी तुला संसार करायचा आहे. " व मुलानं निमुटपणं ते मान्य करावं, असला प्रकार विद्या-पीठानं नेमलेल्या पुष्कळशा पुस्तकांच्या बाबतीत होतो. असल्या लग्नाचा परिणाम व्हायचा तोच होतो. माणूस जसा बाहेर फटकतो, तसा विद्यार्थी क्रमिक पुस्तक शिकवीत असता आपलं एखादं आवडतं पुस्तक शेवटच्या बाकावर बसून रंगात वाचत असतो. 'संपूर्ण शॉ' किंवा 'संपूर्ण शेक्सपीअर' ही लाल किंवा निळ्या जाड पुठ्ठ्यांची सोनेरी अक्षरांत चमकणारी पुस्तकं आणि थोरामोठ्यांच्या बायका यांची अवस्था मोठी केविलवाणी असते. वर्षानुवर्षे एकमेकांचं तोंड न पाहता थोर पति-पत्नी आपले व्यवहार करीत असतात आणि एखाद्या दिवशी मित्रांचं सम्मेलन असलं किंवा एखादा बडा पाहुणा घरी आला असला की, एकमेकांच्या गुणांचं वर्णन एकमेकांच्या सहवासांत मिळालेल्या आनंदाचं रसभरित कथन, वगैरे गोष्टी त्या थोर पतिपत्नींना करणं भाग पडतं. मित्र किंवा बडा पाहुणा निरोप घेताना

त्यांना धन्यवाद देतो, " मोठी सुखी जोडी आहे बुवा तुमची." त्याच वेळी काय ती कित्येक वर्षांनंतर त्या थोर जोडप्यात खऱ्या प्रेमकटाक्षांची देवघेव होते. त्यानंतर पुन्हा शांतता व परस्परांचे व्यवहार एकमेकांकडे लक्ष न देता पूर्ववत चालू. समग्र ' क्ष ' आणि समग्र ' य ' पुस्तकं पुष्कळांच्या कपाटांत दिसतात, ती मित्रांच्या, " खरंच तुमची पुस्तकांची आवड वाखाणण्याजोगी आहे बुवा–" या स्तुतीसाठीच.

पुस्तकांना आपण जखडून ठेवायचा प्रयत्न केला, तरी त्यांची प्रवासाची सवय आपण नष्ट करू शकत नाही. पुस्तकं एकदा प्रवासाला निघाली की, ती कुठं जातील, कुठं थांबतील, मूळ ठिकाणावर परत येतीलच की नाही, वगैरे बाबतीत कसलीच हमी देता येत नाही. पूर्वी घरची मंडळी यात्रेला निघाली की, अश्रू व किंकाळ्या यांनी त्यांना निरोप दिला जाई. यात्रेला निघालेली व्यक्ती परत आली तरच नवल, हे रडणाऱ्याला ठाऊक असायचं. त्यामुळे त्या आरडाओरडीत भावनेपेक्षा रूढीचाच भाग अधिक असायचा. तसंच आपलं एखादं पुस्तक प्रवासाला निघालं व प्रवासालाच पचलं, तर आपण हळहळतो. पण ते केवळ कर्तव्यभावनेनंच. त्याचं विशेष कांही कुणी लावून घेत नाही. पण गेलेल्या प्रेसबंधाची उणीव भरून काढण्याचा मानवी प्रयत्न सदोदित चाललेला असतो. बाकी कधी कधी मोठी गंमत होते. दुसऱ्याची स्त्री जाळ्यात अडकणार या आनंदात असणाऱ्या फाल्गुनरावांना शेवटी मिळेते ती स्वतःचीच बायको कृत्तिका. पुस्तकांच्या बाबतीत हा अनुभव तर नेहमीच मिळतो.

ईश्वराच्या अगाध सृष्टीतील स्त्री व पुस्तक या दोन कलाकृती एकमेकांपासून निराळ्या असल्यामुळे त्यांच्यात भेद असणारच. स्त्री सजीव व पुस्तक निर्जीव हा भेद केवळ शाब्दिक आहे. पुस्तकांहून निर्जीव अशा काही व्यक्ती असतातच की ! माझ्या दृष्टीनं खरा भेद आहे, तो दुसरीकडेच. स्त्रियांच्या बाबतीत एकपत्नीव्रत जितकं चांगलं तितकंच एकपुस्तकव्रत वाईट असतं. जगातले बहुतेक अनर्थ एकपत्नीव्रताचा सपशेल भंग व एकपुस्तकव्रताचं कडक पालन यामुळेच घडून आले आहेत. पुस्तकाबाबत भ्रमरवृत्तीसारखी आल्हाददायक दुसरी कोणतीच वृत्ती नाही.

आपल्या मालकीच्या पुस्तकांवरून उडून दुसऱ्याच्या पुस्तकांवर आपलं प्रेम का जावं ? पुस्तक आपलं झालं म्हणजे त्याचं निकटदर्शन शक्य होतं. हे

निकटदर्शन टीकाकाराला आवश्यक असलं तरी सर्वसाधारण वाचकाला कंटाळवाणंच होतं. रसिकतेत थोडासा आंधळेपणा, थोडासा अपुरेपणा, थोडंसं अंतरामुळे निर्माण झालेलं आकर्षण, थोडीशी ओढ हवी. पुस्तक स्वतःचं झालं की, हे कसं जमणार? मग भूमिका रसिकाची राहत नाही. ती डोळस टीकाकाराची भूमिका असते. पती हा पत्नीचा आद्य टीकाकार असतो ते याचमुळे. बायरनचं वर्तन दुष्ट आहे, हे खरं; " पण तुझ्यामुळे माझ्या जीवनाचा सत्यानाश झाला, " असं म्हणणारे नवरे काही कमी नाहीत. ते खचित वाईट नाहीत. त्यांची चडफड म्हणजे 'तोचतोपणातून' सुटण्याची एक उलटी धडपड असते.

माझ्या या विचारांमुळे ग्रंथांच्या 'अक्षरत्वा' वर घाला पडेल, ही भीती मला नाही. कुणाचा तसा गैरसमज झाला तर माझं म्हणणं त्याला बिलकुल कळलं नाही. अशा लोकांसाठी हे लिहिलंच नाही मुळी. पुस्तकांचं अमरत्व व्यक्तिव्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्यावर अवलंबून नसतं. एकाच व्यक्तीच्या जीवनातील दोन क्षणांवर पुस्तकांचं अमरत्व विसंबून नसतं. व्यक्तिव्यक्तीच्या सामान्य क्षणांनी तयार झालेलं व सारखं वाढणारं असं जे पुस्तकांचं वय तेच त्यांचं अमरपण.

बायरनचं उदाहरण पटत नसलं, किंवा परकं वाटलं, तर श्रीकृष्णाचं उदाहरण घ्या. श्रीकृष्णाला सोळा सहस्र की कायशा बायका होत्या म्हणे. ज्या कवीनं श्रीकृष्णाचं सोळा सहस्र स्त्रियांशी लग्न लावून दिलं, त्याचीदेखील अपेक्षा नसेल की, त्यानं सर्वांवर प्रेम करावं. खास प्रीती मिळाली ती रुक्मिणी आणि भामेलाच. इतरांची गत बायरनच्या बायकांसारखीच असणार. माझ्या मालकीच्या पुस्तकांची संख्या श्रीकृष्णाच्या बायकांएवढी कधीच भरणार नाही. पुस्तकांचं दुकान काढलं, तरी सोळा हजार पुस्तकांची मालकी मला लाभायचा संभव नाही. संख्येचं काय? आहे त्या संख्येतच मी सांगितलेला प्रकार घडतो, ही साक्ष वाचक स्त्रीपुरुष देतील, स्त्रियांनी थोडं तारतम्य ठेवून माझी कैफियत वाचली व तिला 'पुस्तकांचं पुरुषत्व' हे नाव दिलं की त्यांचंही काम भागेल, अशी आशा आहे.

● ● ●

## १३. निसर्ग आणि आम्ही

कॉलेजमध्ये निघालो त्या वेळी आकाशात काळे ढग इतस्ततः फिरत होते. मधून मधून गर्जतही होते. पण तिकडे दुर्लक्षच केले. ' गर्जेल तो पडेल काय ? ' ही म्हण कदाचित त्यावेळी माझ्या मनात आली असावी. ते काहीही असो —छत्रीवर भिस्त ठेवून व ढगांच्या निष्क्रियतेवर भरवसा टाकीत मी मधल्या मार्गाने वाईने कॉलेजात निघालो. कॉलेजचा निम्मा मार्ग सुरक्षित रीतीने आक्रमला. आता फक्त अर्ध्या मैलाचे अंतर उरले होते — तेवढे अंतर कापले की...

आणि तेवढ्यातच निसर्गाने आपला पवित्रा बदलला. मी केलेली उपेक्षा त्यांना जाणवली की ' गर्जेल तो पडेल काय ? ' या म्हणीला खोटे पाडण्याचा त्यांनी चंग बांधला कुणास ठाऊक ? — एकाएकी चोहोबाजूंनी काळेकुट्ट ढग जमून आले आणि कोणत्याही रीतीची पूर्वसूचना न देता त्यांनी टपोऱ्या थेंबांचा वर्षाव सुरू केला. त्यांना साहाय्य देण्यासाठी प्रचंड वेगाने वाराही धावून आला.

मी मोठ्या गडबडीने छत्री उघडली — आणि ती वाऱ्याच्या प्रचंड झोताने एकदम उलटी झाली. वाऱ्याचा आणि पावसाचा जोर इतका विलक्षण वाढला की कोणत्याही दणकट छत्रीचे या पावसापुढे काही चालेल असे वाटेना. माझी मोठी विलक्षण परिस्थिती झाली. माझ्यापुढे अर्धा मैल सपाट मैदान पसरले होते, मागे अर्धा मैल सपाट मैदान पसरले होते, आजूबाजूला झाडच काय, पण झुडूपही नव्हते. वादळात सापडलेल्या सोमदत्तासारखी माझी असहाय स्थिती झाली होती.

म. ना. अदवंत

पण मला वाईट वाटत होते ते निराळेच. आमची सौभाग्यवती नको नको म्हणत असताना आज गरम वुलनचा चांगला कोट घालून मी बाहेर पडलो होतो. तो आता भिजून चिंब होणार होता. माझ्या पिशवीत घेतलेली माझी आवडती पुस्तके आता भिजून जाणार होती – आणि माझ्या पायांतील सुंदर बुटांवर दोन दोन इंच खानदेशी चिक्कणमातीच्या चिखलाचा थर चढणार होता. मनातल्या मनात मी स्वतःला, पावसाला आणि मला चुकवून अगदीं वेळेवर गेलेल्या बसला लाखोली वाहिली – पण आता स्वतःवर किंवा निसर्गावर चिडून काय फायदा होता? पुढच्या किंवा मागच्या दिशेने पावले वळविणे आणि पावसाचा मार सहन करीत कॉलेज किंवा घर जवळ करणे क्रमप्राप्तच होते. कॉलेजमध्ये या अवतारात जाऊन व्याख्यान देणे अशक्यच होते – मी मागे वळून घराकडेच पावले वळविली.

कोटांची – पुस्तकांची–बुटांची आशा मी आता सोडून दिली होती. छत्री मिटवून टाकली व अपरिहार्यतेला तोंड देण्याच्या दृष्टीने मी पावले टाकायला सुरुवात केली. पावसाचा जोर वाढतच होता. वाऱ्यानेही आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली होती. सप–सप–सप–माझ्या चेहऱ्यावर व अंगावर पावसाचा मारा होत होता. मी जात होतो ती पायवाट एका शेतातून जात होती. त्या ठिकाणचा चिवट चिखल इतका विलक्षण होता की, अनेक वेळा बूट चिखलातच रुतून राही आणि पाय फक्त बाहेर येई. पुन्हा पाय त्या बुटात घालून बुटासह तो पाय बाहेर काढणे म्हणजे एक प्रकारचे दिव्यच होते.

अर्धा फर्लांग गेल्यावर मी माझ्या चिडक्या मनोवृत्तीतून बाहेर आलो– या सर्व वादळी परिस्थितीतही मला अतिशय अननुभूत असा आनंद वाटायला लागला. आतापर्यंत मी जवळ जवळ चाळीस पावसाळे पाहिले होते – असे मुसळधार पावसाचे दृश्य तर शेकडो वेळा पाहिले असेल – पण अशा पावसात मनसोक्त भिजण्याचा आनंद मी पहिल्यानेच अनुभवीत होतो. पाऊस आला तर शक्य तो घरातून निघावयाचेच नाही – आणि मध्येच पावसाने गाठले तर शक्य तितक्या तातडीने आश्रयस्थान जवळ करायचे हा माझा आतापर्यंत शिरस्ता. पावसातून जाताना कपडे भिजू नयेत – अंगावर चिखल उडू नये म्हणून जास्तीत जास्त दक्षता घेण्याची काळजी. त्यामुळे निसर्गाच्या या आनंदाचे मी आतापर्यंत त्रयस्थपणाने व तटस्थपणानेच कौतुक करीत होतो. पण त्या निसर्गाच्या

भव्य व प्रचंड आंदोलनात समरस होण्याचा, त्याच्याशी एकरूप होण्याचा आनंद केवढा मोठा आहे याची मला त्या दिवशी कल्पना आली. पावसाचा माझ्या चेहेऱ्यावर सपासप होणारा मारा मला अतिशय सुखावह वाटायला लागला – चिखलात होणाऱ्या घसरगुंडीत आणि कसरतीतही मोठी मौज वाटू लागली. माझ्या प्रतिष्ठेचे व हिशेबी वृत्तीचे ओझे दूर फेकून देऊन मी जणू निसर्गाच्या या क्रीडेत सामील झालो. सर्व कपडे चिंब भिजून गेले – शरीराला त्याचा होणारा गार स्पर्श मोठा सुखद वाटू लागला. पाण्याचे मोठमोठे ओहोळ शेतांतून वाहत होते. त्यांतून अवखळपणाने पाणी उडवीत जाण्यात मोठ्या विलक्षण आनंदाचा अनुभव मी घेऊ लागलो. भोवताली मी पाहिले – आकाशातून जणू सहस्र धारांनी वर्षाव होत होता. सारी सृष्टी पाण्याने न्हाऊन निघाली होती. सृष्टीबरोबर मलाही अभ्यंगस्नान घडत होते. आणि त्या चिंब भिजून जाण्यात मला अननुभूत आनंद वाटत होता.

माणसाच्या मनावर असलेल्या प्रतिष्ठेच्या व व्यावहारिक गोष्टींच्या दडपणामुळे अशा प्रकारे किती आनंदाला तो मुकत असेल याची मला या वेळी जाणीव झाली. आपण आपले जीवन अनेक वेळा रुपये-आणे-पैसे यांच्या हिशेबात बसविण्याचा प्रयत्न करतो. प्रतिष्ठेची आपणाभोवती खरीखोटी वलये निर्माण करतो आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या चाकोरीला जीवन असे नाव देऊन त्या जीवनातच आनंद मानण्याचा आपण प्रयत्न करतो. त्या चाकोरीच्या बाहेर पडणारे थोडे जरी काही घडले, तरी आपण अस्वस्थ होतो. आणि काही तरी चुकल्याची, काही तरी अनिष्ट घडत असल्याची जाणीव आपण करून घेतो.

जीवनात किती वेळा आपण मनसोक्त पावसात भिजावयाचेच या कल्पनेने पावसात छत्री न घेता बाहेर पडलो आहोत ? ‘ आनंदी आनंद गडे ! जिकडे तिकडे चोहिकडे ! ’ असा बालकवी आपणाला संदेश देतात. पण निसर्गातील हा आनंद लुटण्यासाठी आपणापैकी कितीजण बाहेर पडतात ? संध्याकाळी घाईघाईने निघालेल्या एखाद्या गृहस्थास ‘ कुठे जातोस ? ’ असे आपण विचारले आणि ‘ –सूर्यास्त पाहावयास मी जातो आहे ’ असे त्याने उत्तर दिले तर आपण निश्चित ‘ आ ’ करून त्याच्याकडे पाहात राहू. अरुण, संध्यारजनी, कौमुदी वगैरे सृष्टिदेवीची बालके शेवटी बालकवींच्या कवितेत राहतात. आणि आम्ही चांदण्या रात्री विजेच्या दिव्याच्या कृत्रिम प्रकाशात ‘ रमी ’ खेळण्यात

रमून गेलेलो असतो. ‘ फुलराणी ’ शिकविताना मी साऱ्या विद्यार्थ्यांना गुंगवून सोडल्याचे मला आठवते. पण वेलीवरच्या कोमल कलिकेचे सौंदर्य पाहण्याला मी कधी थांबलो असल्याचे मला आठवत नाही. निर्झराच्या गोड गीतात बालकवींना दिसलेला अर्थ मी विद्यार्थ्यांना कितीदा समजावून सांगितला असेन. पण निर्झराच्या काठाशी त्याची अवखळ गीते ऐकत मी उभा राहिल्याचे मला आठवत नाही.

याचे कारण एकच—जीवनाची एक चाकोरी मी ठरविली आहे, प्रतिष्ठेचे एक कवच माझ्या अंगावर मी चढविले आहे. रुपये-आणे-पैचा आवाज माझ्या कानांत घुमतो आहे. अशा स्थितीत निसर्गाचा भव्य साक्षात्कार घ्यावयास मला सवड कुठून मिळणार ? परवाच मी मुंबईहून जनता एक्स्प्रेसने पुण्यास जात होतो. पावसाळ्याचे दिवस होते. गाडी खंडाळ्याच्या घाटातून जात असताना सृष्टीने मोठे भयानक रूप धारण केले होते. मुसळधार पाऊस पडत होता—पाण्याचे मोठमोठे प्रवाह पर्वतशिखरांवरून खाली कोसळताना अंधुक दिसत होते. गाडी जवळ जवळ ढगांतूनच जात होती. वर्षाऋतूचे चाललेले ते तांडवनृत्य खरोखर अलौकिक होते. पण मी मात्र खिडकी मिटून बसलो होतो—कारण काय तर खिडकी उघडी असती तर पावसाचे पाणी आत आले असते आणि माझा नवा सूट खराब झाला असता. शिवाय सर्वांनीच खिडक्या बंद केल्या होत्या—तेव्हा मीच माझी खिडकी उघडी ठेवून पावसाचा वर्षाव झेलला असता तर लोक माझ्याकडे कुतूहलाने, आश्चर्याने आणि उपहासाने बघू लागले असते. मला त्याचीच अधिक भीती वाटली आणि काचेच्या तावदानातून जेवढे निसर्गाचे सौंदर्य दिसत होते तेवढे पाहण्यात मी समाधान मानू लागलो. बाहेर टिपूर चांदणे पडले असतानाही काव्यातील किंवा कादंबरीतील चांदण्याची वर्णने विद्युद्दीपाच्या प्रकाशात मिटक्या मारीत वाचणारे रसिक आम्ही ! निसर्गाच्या भव्य सौंदर्याशी समरस होण्याची पात्रता आमच्या ठिकाणी नाही. आणि तशी इच्छाही नसते. आमची सर्व रसिकता कृत्रिम व नकली सौंदर्याचे कौतुक करण्यात गुंग होऊन गेलेली ! बोलपट-गृहाच्या काळोखात पडद्यावर दिसणाऱ्या प्रचंड वादळाचे, रम्य चांदण्याचे किंवा गर्द वृक्षराजीचे कौतुक आम्ही भरपूर करू—पण बोलपटगृहातून बाहेर पडल्याबरोबर पाऊस येत असेल तर आम्ही कपडे सावरून, पावसाचा एकही थेंब अंगावर येणार नाही अशा बेताने आणि

रस्त्यावरून वाहणारे नदीनाले चुकवीत लवकर घराच्या आडोशाला जाण्याचा प्रयत्न करू. आणि घरच्या उबेत पावसात भिजून चिंब होणाऱ्या वसंतसेना व चारुदत्ताची चित्रे नजरेसमोर आणू, अशी आमची रसिकता.

निसर्गाच्या भव्यतेचा आणि सौंदर्याचा आम्हांला प्रत्यय येत असेल तर तो केवळ अपघाताने. पंचपंच उषःकाली सृष्टीत जे नवचैतन्य निर्माण झालेले असते आणि निसर्गाने जो अपूर्व सौंदर्याचा साज चढविलेला असतो त्याची वर्णने काव्यांतून आणि कादंबऱ्यांतून मी अनेकदा वाचली असतील. ती त्या त्या वेळी मला फार आवडलीही होती. पण प्रत्यक्ष उषःकालची सृष्टिशोभा पाहण्याचा योग मात्र प्रवासात आला. तोही गाडीत गर्दी खूप होती आणि झोपायला जागा नव्हती म्हणून. आम्ही त्यावेळी मुंबईला चाललो होतो. कसेबसे दाटीदाटीने आम्ही दोघेही खिडकीजवळ बसलो होतो. झोप न मिळाल्याने डोळे जड झाले होते. आणि प्रवासातील गप्पांची शिदोरी केव्हाच सरून गेल्याने आम्ही दोघेही बाहेर पाहत होतो. कसारा घाटातून त्या वेळी गाडी चालली होती. अर्धवट काळोखात आणि अर्धवट धुक्यात पर्वताच्या एकामागून एक रांगा मोठ्या भव्य दिसत होत्या. इतक्यात पूर्वेच्या क्षितिजावर प्रकाशरेखा दिसू लागली—हळूहळू अरुणरंगाने तो सर्व भाग माखून निघाला—क्षितिजाच्या जवळपास रेंगाळणाऱ्या ढगांचे रंग पटापट बदलू लागले—जणू एखादा चित्रकार आपल्या चित्रासाठी निरनिराळ्या रंगांची मिश्रणेच तयार करीत होता. आणि हळूहळू क्षितिजाच्या आडून काही चोरटे किरण वर आले, अरुण रंगाचे रूपान्तर पटापट-पिवळसर रंगात होऊ लागले, आणि सूर्याची एक तांबडीलाल कडा क्षितिजावर दिसू लागली. हळूहळू आमच्या डोळ्यांदेखत सूर्य वरवर येऊ लागला. क्षणभर क्षितिजाच्या कडेवर ते लालभडक सूर्यबिंब टेकले आणि त्याने आपला प्रवास सुरू केला. जरा वर जाते न जाते तोच तेथे रेंगाळणाऱ्या एका ढगाचे पांघरूण त्याने घेतले. सारा मेघ तेजाने न्हाऊन निघाला—त्याला जणू चंदेरी झालर लावल्याचा भास होऊ लागला. हा सर्व देखावा आम्ही मुग्ध होऊन पाहत होतो. ‘ काय सुंदर देखावा आहे ! ’ असे उद्‌गार हा देखावा बघत असता कितीदा आमच्या तोंडून बाहेर पडत होते. असा देखावा दररोज दिसत असतो. या आनंदाला आपण आतापर्यंत मुकत होतो याची जाणीव आम्हांला झाली. पण याची फक्त जाणीवच झाली

त्यापलीकडे काही झाले नाही. त्यानंतर एकदाही सूर्योदयाचा किंवा सूर्यास्ताचा देखावा आम्ही रसिकतेने पाहिल्याचे आम्हांला स्मरत नाही.

चांदण्याचे सौंदर्यही अशाच अपरिहार्य रीतीने आमच्या नजरेला पडले होते. त्या दिवशी रात्री कॉलेजमध्ये नाटक होते. नाटक बारा वाजता संपले. बाहेर उभ्या असलेल्या बसेस अगोदर भरून गेल्या होत्या. आता दीड मैल चालत जाण्यावाचून गत्यंतर नव्हते. आम्ही सर्वजणांनी मनात कुरकुरत चालत जाण्याचा निश्चय केला. आणि त्या वेळी बाहेर पसरलेल्या सृष्टिसौंदर्याची आम्हांला कल्पना आली. चांदणे अगदी टिपूर पडले होते, जिकडे तिकडे शुभ्र दुधाचा वर्षाव होत असल्याचा भास होत होता. पांढऱ्या शुभ्र तेजात चराचर सृष्टी न्हाऊन निघाली होती. अपूर्व सृष्टिशोभेने आम्ही अगदी मुग्ध होऊन गेलो. एखाद्या स्वप्नसृष्टीत विहार करावा असे आम्हांला रस्त्यावरून जाताना वाटू लागले. कुणाच्या तोंडून शब्द उमटत नव्हता. जो तो निसर्गसौंदर्याच्या या अपूर्व विलासाचे निःशब्द कौतुक करीत होता. मला दत्तांच्या ' विश्वामित्रीच्या काठी ' या कवितेची त्या वेळी आठवण झाली.

पाऊस बर्फाचा जणु पडतो
रजताचा जणु मेघ वितळतो
किंवा चंद्रमणी पाझरतो
न कळे काही । जिव वेडावुन हा जाई ॥

अशी अक्षरशः आमची स्थिती झाली. या मनःस्थितीत घर केव्हा आले हे कळलेही नाही. घर आल्याबरोबर स्वप्नसृष्टीतून एकदम जागे झाल्याप्रमाणे जागे होऊन अगदी अनिच्छेने आम्ही घरात प्रवेश केला.

निसर्गाशी समरस होण्याचे—त्याच्या सौंदर्याचा व भव्यतेचा आस्वाद घेण्याचे प्रसंग आमच्या जीवनात असे अपघातानेच येतात. निसर्गाच्या भव्यतेचा साक्षात्कार त्या वेळी आम्हांला पटतो व त्याचा सतत आस्वाद घेण्याचा व त्याच्याशी समरस होताना—

" दिव्यरसी विरणे जीव
जीवित हे त्याचे नाव "

अशा वृत्तीचा अनुभव घेण्याचा पुन्हा पुन्हा आम्ही निश्चय करतो. पण व्यवहारी जीवनाच्या चाकोरीत सापडलो की ते सारे निश्चय विरून जातात

आणि रुपये-आणे-पै च्या नादावर मन धावू लागते.–

आणि अशा रीतीने धावताना ते थकले व धापा टाकू लागले की या अपघाताच्या स्मृतीचा जो आनंद तोच आमच्या मनाचा खरा दिलासा !

आणि म्हणूनच पावसात चिंब भिजून परत येत असताना पावसात भिजल्याचा जो आनंद मी मिळविला आणि जो पुढील जीवनात स्मृतिरूप होऊन मला सततचे सौख्य देणार आहे, त्या आनंदापुढे वुलनचा कोट भिजल्याचे किंवा पुस्तके भिजून अगदी खराब झाल्याचे दुःख मी का मानावे ? या पार्थिव गोष्टी मी गमावल्या पण आनंदाचा केवढा ठेवा मी मिळविला ?

पण असे असले तरी पावसात भिजण्याच्या या आनंदाचा उपभोग घेण्यासाठी मी पावसात छत्री न घेता पुन्हा बाहेर पडेन काय ? नाव नको ? गोविंदाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे

“ एकदाच अनुभव त्याचा
आरंभ अंत सौख्याचा ! एकदा ।। ”

हे याही बाबतीत खरे असावे की काय कुणास ठाऊक ? काहीही असो— पावसात भिजण्याचा आनंद कितीही मोठा असला तरी पुन्हा मी पावसात भिजण्यासाठी बाहेर पडणार नाही हे खास ! कारण माझी प्रतिष्ठा, माझी व्यावहारिक दृष्टी, लोक काय म्हणतील याबद्दल वाटणारी भीती या सगळ्या गोष्टी मला मागे खेचतील; पण आजची पावसात भिजल्याची स्मृती मात्र घरच्या उबेत राहूनही मला पुनःप्रत्ययाचा आनंद देईल.

त्यासाठी मला वुलनच्या कोटाचे मूल्य द्यावे लागले तर मी कुरकुर का करावी ?

• • •

## १४. पुराणांतली वांगी

एका पुराणिकाची अशी गोष्ट सांगतात की, चातुर्मासात तो पुराण सांगताना लोकांना कळकळीने उपदेश करी, " बाबांनो, कांदे, वांगी वगैरे शास्त्रनिषिद्ध पदार्थ चातुर्मासात खाऊ नका—तसे करणे पाप आहे. " वगैरे. एकदा घरी गेल्यावर त्याने आपल्या पत्नीला चमचमीत वांग्याचे काप करण्याची आज्ञा सोडली. पत्नी बिचारी होती भोळी ! तिने आपल्या नवऱ्याचे पुराण नुकतेच ऐकले होते. तेव्हा तिने विचारले, " अहो, तुम्हीच ना पुराणांत कांदे, वांगी खाऊ नका म्हणून लोकांना उपदेश करता ? " " मग ? त्यात काय ? " पुराणिकबुवांनी मोठ्या गंभीरपणाने म्हटले, " अग, पुराणांतली वांगी पुराणांत ! पुराण केव्हाच संपलं ! आता काय त्याचं ? "

मला त्या दिवशी ही गोष्ट आठविण्याचे कारण माझीही स्थिती काहीशी त्या पुराणिकासारखीच झाली होती. देवरूखच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मला व्याख्यान देण्यासाठी निमंत्रण आले होते. त्या वेळी मी विद्यार्थ्यांना, " मराठी भाषेचा अभिमान बाळगा, मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून तिचे पांग फेडा, दररोज मराठीतील उत्तम वाङ्मयापैकी थोडेफार वाचण्याची सवय ठेवा आणि मराठीमध्ये दररोज काहीना काही तरी लिहीत जा. " असा कितीतरी उपदेश मोठ्या आवेशाने केला. पण सभास्थानातून बाहेर पडल्यावर माझे मलाच हसू आले. मी विद्यार्थ्यांना मोठ्या आवेशपूर्ण रीतीने उपदेश केला होता खरा—पण त्यांपैकी मी स्वतः आचरणात किती आणत होतो ? मराठी भाषेचा मला अभिमान होता

म. ना. अदवंत

हे खरे असले तरी दररोज मराठीतील उत्कृष्ट वाङ्मय वाचण्याचे किंवा दररोज मराठीत काहीतरी लिहावयाचे काम मी कितपत पार पाडत् होतो ? आळसामुळे माझ्या हातून धड पत्रेसुद्धा वेळेवर लिहिली जात नव्हती—मग दररोज काहीतरी लिहिण्याची गोष्टच कशाला ? आणि त्या दृष्टीने माझे भाषण म्हणजे पुराणांतील वांगी पुराणांत ठेवणाऱ्या त्या पुराणिकाप्रमाणेच झाले नव्हते का ?

पण याचशा काय पण आणखी कितीतरी गोष्टींत आपणाला पुराणातील वांगी पुराणातच ठेवावी लागतात. मी स्वतः करीत नाही अशा कितीतरी गोष्टी करण्यासंबंधी उपदेश मी वेळप्रसंगी विद्यार्थ्यांना करीत असतो. परीक्षेसाठी अभ्यास कसा करावा हे सांगताना मी कितीतरी वेळा विद्यार्थ्यांना दररोज, थोडाथोडा एकतानतेने अभ्यास करण्याविषयी उपदेश केला असेल. पण तो उपदेश माझ्या विद्यार्थिदशेत मी कधीच आचरणात आणलेला मला आठवत नाही. परिक्षेच्या अगोदर दोन महिने आमचे रात्रीचे दिवे जाळणे सुरू व्हावयाचे. आणि पूर्वीच्या परीक्षेच्या वेळी शेवटी शेवटी झालेल्या त्रासाच्या व दगदगीच्या अनुभवाने आम्ही पुढील परीक्षेच्या वेळी कधीच शहाणे झालो नाही. पहाटे उठून दोन-दोन तीन-तीन मैल प्रभात-सहल करण्याचा उपदेश मी प्रत्येकाला करीत आलो आहे. पण तसा उपदेश करताना सूर्याच्या किरणांनी उठविल्याशिवाय मी मात्र कधीच जागा झालो नाही. अर्थात असा उपदेश करताना आमच्यांतील या दोषाची जाणीव आम्हांला नसते असे नाही—पण आमच्या अनुभवाचा फायदा निदान नवीन पिढीला तरी द्यावा हाच या उपदेशाचा थोडाफार उद्देश असतो. बाकी नवीन पिढी देखील त्यातली ‘ अंदरकी बात ’ जाणूनच असते हे निराळे सांगायला नकोच. जुन्या पिढीच्या अनुभवाचा फायदा आज जर प्रत्येक नवीन पिढीने घेतला असता तर जगाची आज किती तरी प्रगती झाली असती.

पण त्याहीपेक्षा पुराणांतील वांगी पुराणांत ठेवणाऱ्या लोकांची एक निराळी जात असते. अशा लोकांना समाजात आपले महत्त्व वाढवावयाचे असते आणि त्यामुळे वेळी अवेळी व्याख्यानांतून उच्च उदात्त तत्त्व लोकांच्या तोंडांवर ते फेकीत असतात. त्यांच्या खासगी जीवनात मात्र या तत्त्वांना पूर्णपणे हरताळ फासलेला असतो. माझ्या माहितीचे एक गृहस्थ एका शाळेत शिक्षकांना व्याख्यान द्यावयास आले. त्यांनी व्याख्यानात शिक्षकाचा दर्जा किती मोठा

आहे, हे सांगितले. नवीन पिढी तयार करण्याची केवढी मोठी जबाबदारी त्यांच्यावर आहे हे सांगितले, शिक्षकांनी स्वार्थत्याग केला पाहिजे—आणि समाजाने शिक्षकाला वंद्य मानले पाहिजे—अशा कितीतरी गोष्टी त्यांनी व्याख्यानात सांगितल्या. पण त्याच गृहस्थाकडे एक शिक्षक काही कामासाठी गेला असता त्यांनी अत्यंत उर्मटपणाचे व अपमानास्पद उत्तर देऊन त्याची संभावना केली होती. शिक्षकाला त्याच्या घरी त्याच्या मुलाला शिकविण्याचेच नव्हे तर भाजीपाला आणण्याचे काम देखील करावे लागत होते हेही पुष्कळांना माहीत होते. तेव्हा त्यांचे व्याख्यान म्हणजे हवेतील पोकळ फुगेच नव्हेत तर काय ?

कोणत्याही चळवळीच्या वेळी लोकांना स्वार्थत्याग करण्याचा, देशासाठी जीवनाचाही त्याग करण्याचा उपदेश काही काही नकली पुढारी मोठ्या आवेशाने करीत असतात. सामान्य लोक भावनेच्या भरात जास्तीत जास्त त्याग करतात, प्रसंगी स्वतःच्या जीवनाची आहुतीही देतात—पण उपदेश करणारे हे लोक मात्र मोटारींतून सुखेनैव हिंडत असतात व प्रसंगी एकाद्या पक्षाची लोकप्रियता कमी होत असल्याचा संभव दिसताच पगडी फिरवायलाही हे कमी करीत नाहीत.

'दारू पिऊ नका' असे हृदय पिळवटून दुसऱ्यास उपदेश करणारे किंवा व्याख्यानसमयी लोकांच्या डोळयांतून अश्रू काढणारे लोक रात्री मदिरादेवीच्या तारेत गुंग असतात हा अनुभव कुणाला नाही ? एक बायको जिवंत असताना दुसरे लग्न केल्याबद्दल एकाद्या व्यक्तीचा निषेध करणारा माणूस, त्या निषेधाचे पडसाद विरतात न विरतात तोच आपल्या गृहिणीला दुसरी सवत आणून मोकळा होतो व मानसिक भुकेच्या कोरड्या थापा सांगून आपल्या कृतीचे समर्थन करतो याचे तरी दुसरे कारण कोणते असणार ? समाजात जर आपण सूक्ष्म दृष्टीने पाहू लागलो तर असे पुराणांतील वांगी पुराणांत ठेवणारे लोक कितीतरी सापडतील !

त्याहीपेक्षा परवा एक मजा झाली. मी ऑम्लेट खातो असे माझ्या एका ओळखीच्या गृहस्थाला कळल्याबरोबर त्यांनी माझ्यावर चांगले तोंडसुख घ्यायला सुरुवात केली. मी धर्म बुडविला, लोकांतून मी पार उठलो—वगैरे वगैरे शब्दांत त्यांनी माझी बरीच संभावना केली. आणि गंमत म्हणजे चारच दिवसांनी मी लकीत ऑम्लेट खावयास गेलो असता ते गृहस्थ ऑम्लेटच काय—पण त्याही पुढील पायरीचे पदार्थ खात असताना दिसले. मला पाहिल्याबरोबर त्यांनी

' खर्रकन ' चेहेराच टाकला. मी ही सूडाची संधी वाया दवडणार थोडीच ? मी हसत हसत त्यांच्याजवळ गेलो व विचारले, " काय हो धर्ममार्तण्ड–अहो, आपला हिंदुधर्म आता कुठे गेला ? " तो इतका ओशाळला होता की, त्याचे तोंडून एक अक्षर बाहेर पडेना. पण शेवटी हळूच त्याने सांगितले, " डॉक्टरांनी प्रकृती सुधारण्यासाठी हे खाण्याचा सल्ला दिला–म्हणून तर ! " तीन दिवसांत ' हे ' खायला लागण्याइतकी त्यांची प्रकृती बिघडावी याचे मात्र मला कौतुक वाटले.

पुराणांतील वांगी पुराणांत ठेवणारे असे कितीतरी लोक आपल्या समाजात सापडतील, आणि अशा लोकांत मोठेपणाचा बुरखा घेतलेल्याच व्यक्ती आपणांला अधिक दिसतील. एका दृष्टीने हे सारे लोक म्हणजे वरील गोष्टींतील पुराणिका-प्रमाणेच नाहीत का ?–पण छे ! तो पुराणिक यांच्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ ! तो निदान आपल्या कृतीचे समर्थन न करण्याइतका प्रामाणिक तरी होता. ' पुराण संपलं–त्यातील उपदेश त्याबरोबर संपला ' असे स्पष्टपणे सांगण्याइतका निर्भीड-पणा तरी त्याने दाखविला–एरवी नाहीतर शास्त्रांतील दुसरे एक प्रतिवचन बनवून त्याने आपल्या बायकोला सांगितले असते तर तिला काय कळले असते ? पण ती प्रामाणिकता आमच्यांत नाही. आम्ही पुराणांतील वांगी पुराणांत ठेवतोच पण तसे केल्याबद्दल वर आणखी जोरजोराने समर्थन करतो. केवळ लोकांच्याच डोळ्यांत त्यामुळे धूळ फेकतो असे नाही तर स्वतःच्या मनाचीसुद्धा कित्येकदा वंचना करीत असतो.

मग आमच्यापेक्षा पुराणांतली वांगी पुराणांत ठेवून त्याबद्दल तशी प्रामाणिक कबुली देणारा पुराणिक श्रेष्ठ नाही का ठरणार ?

● ● ●

## १५. मांजराच्या मिशा

असं म्हणतात की, मांजराला जर एखाद्या अरुंद जागेतून, उदाहरणार्थ, खिडकीच्या उभ्या गजांमधून, जावयाचं असलं, तर अगोदर ते आपलं तोंड त्यांत घालून बघतं. जर मिशांना गजांचा स्पर्श न होता तोंड पलीकडे गेलं, तर त्याला कळतं की, येथून पलीकडे जाणे शक्य आहे. आणि जर मिशांना धक्का लागला, तर लागलीच ते माघारी फिरते. मांजराच्या बाबतीत ही गोष्ट खरी असेल, कदाचित नसेलही! पण माणसाला मात्र अशा एखाद्या साधनाची अत्यंत आवश्यकता असल्याची मला तीव्रतेने जाणीव होते. माणसाच्या मिशा समजा जरी वाढविल्या तरी, या दृष्टीने उपयुक्त ठरण्याची शक्यता नाही. कारण एक तर, त्या मांजराच्या मिशांप्रमाणे सरळ नि ताठ राहू शकत नाहीत. आणि जरी राहिल्या, तरी माणसासमोर काही केवळ, जवळ-जवळ असलेल्या दोन स्थिर गजांमधून जाण्याचा प्रश्न थोडाच असतो! अनेक ' वेगवेड्या ' वाहनांच्या वर्दळीनं गजबजून गेलेला रस्ता ओलांडून जाताना माझा जेव्हा गोंधळ उडतो, तेव्हा मांजराच्या मिशांची आठवण येते. क्षणभर मांजराचा एवढ्यापुरता हेवा वाटू लागतो व निसर्गानं माणसात निर्माण केलेली ही उणीव दूर करणारं एखादं यांत्रिक साधन तरी अवश्य निर्माण व्हायला हवं, असं वाटू लागतं. वस्तुतः रस्ता ओलांडताना असं कितीसं चालावं लागणार? अवघी दहा-वीस पावलं काय ती टाकावयाची असतात. बरं तीही मी अगदी शक्य तेवढ्या वेगानं टाकीत असतो, नि तरीही मला या कामी कितीतरी वेळ लागतो. दोन्ही

भगवंत देशमुख

बाजूंनी मोटारी, सायकली, रिक्षा इत्यादी वाहने सारखी धावत असतात, नि त्यामुळे रस्ता ओलांडण्याइतकी मोकळी वाटच मला मिळत नाही. वस्तुतः वाट मिळत नाही असं म्हणण्यापेक्षा, मिळेल असं मला वाटत नाही, हेच खरं. ही मोटार गेली, म्हणजे आपण पुढे सरकू, ती रिक्षा गेली म्हणजे पुढे पाऊल टाकू, अशा विचारातच मी ताटकळत उभा राहतो, नि एका मोटारीनंतर दुसरी मोटार व एका रिक्षानंतर दुसरी रिक्षा येताना दिसल्यामुळे पुन्हा पूर्ववत विचार करू लागतो. बराच वेळ रेंगाळल्यावर योगायोगाने जेव्हा दोन्ही बाजूला एकही वाहन दृष्टिपथात येत नाही, तेव्हा कुठे मी पलीकडे जातो. इतर अनेक लोक झपाट्यानं रस्ता ओलांडीत असताना आपल्यालाच का जमू नये, याचा जेव्हा मी विचार करू लागतो, तेव्हा मला कळतं की, आपल्याला वाहनांच्या गतीचा अंदाज घेऊन स्वतःच्या गतीशी मेळ घालता येत नाही. या कारणामुळेच मला वाटतं की, या कामी उपयुक्त ठरणारं एखादं यंत्र अवश्य निघावं. उडत्या पक्ष्याला गलोलीतून दगड मारताना, ज्याप्रमाणे पक्षाची गती, त्याची अपेक्षित दिशा व गलोलीतील दगडाचा वेग यांचा अंदाज घेऊन नेम धरावा लागतो; त्याप्रमाणे रस्ता ओलांडतानाही करावं लागतं; आणि हे काम वाटतं तितकं सोपं नाही, निदान मला तरी तसं वाटत नाही. अंदाज मीही बांधीत असतोच. ही रिक्षा जवळ येईपर्यंत मी पुढे जाईन, ती सायकल वळण्यापूर्वी मी पलीकडे जाईन, इत्यादी बेत ठरवून मी निघू लागतो. पण लगलीच वाटतं की, मधेच एखादी मोटार आली तर ? किंवा सायकलचा वेग वाढला तर ? नि या प्रश्नांनी गोंधळून जातो. मात्र मनातील हा गोंधळ बाहेर दिसू नये, याचा मी कसोशीने प्रयत्न करीत असतो; कारण ते शहरी शिष्टाचारात बसत नाही. साहजिकच रस्त्याच्या कडेने रेंगाळताना, मी असं दाखवीत असतो की, जणू आपण कुणाची तरी वाट बघत थांबलो आहोत. अर्ध्या रस्त्यातून परतायची पाळी आली, तरी हावभाव मात्र असे करीत असतो की, जणू एखादे विसरलेले काम आठवल्या-मुळेच आपण परत फिरत आहो. परंतु परवा गावाकडच्या एका मित्राबरोबर भटकण्याचा अनुभव आल्यापासून मात्र या बाबतीत अगदी निराळेच विचार माझ्या मनात येऊ लागले आहेत. या मित्राचा प्रकार माझ्यापेक्षा सवाई आढळला मला. बॉस्वेलनं जॉन्सनची एक आठवण आपल्या पुस्तकात दिली आहे. बॉस्वेल एकदा जॉन्सनला म्हणाला, ' मला कधी-कधी अगदी कंजूषपणा

दाखवावा असे वाटू लागते.' जॉन्सननं उत्तर दिलं, 'मलाही तसं वाटतं कधी कधी; पण मी ते बोलून दाखवीत नाही.' माझ्या मित्रात व माझ्यात नेमका हाच फरक मला दिसून आला, नि त्यामुळेच त्या दिवशीचा तो विचित्र प्रकार घडला. हे गृहस्थ प्रथमच हैदराबाद बघावयास येत होते. सकाळीच आम्ही बाहेर पडलो. वर्दळ अजून विशेष सुरू झाली नव्हती. एके ठिकाणी रस्ता ओलांडावयाचा होता. मी दबकत-दबकत वळण घेतले. पण आमच्या या मित्रांनी मात्र आपले धोतर वर खोवले, कोटाच्या बाह्या मागे सारल्या, नि इकडे-तिकडे बघून जोरात धूम ठोकली व फूटपाथवर येताच एखादा मोठा पराक्रम केल्याप्रमाणे माझ्याकडे बघितले. आपल्यापेक्षाही अधिक भित्रा माणूस भेटल्याने मला एकीकडे समाधान वाटले खरे, पण त्यापेक्षा अस्वस्थच अधिक वाटले. मी त्याला विचारले, 'अरे, असं काय करतोस तू?' तो म्हणाला, 'मग काय करायचं? एखाद्यानं मोटार अंगावर घातली तर?' अधिक चर्चा न वाढविता मी एक रिक्षा ठरविली, नि आम्ही रिक्षातून पुढे निघालो. वाटले, आता तरी हा स्वस्थ बसेल, पण झाले उलटेच! रिक्षात बसल्यापासून 'जरा आहेस्ता लेना भाई. रोक के. अर्र ऽऽऽ वो देख मोटर. ठैरो, ठैरो.' इत्यादी सूचना त्यानं ओरडून ओरडून द्यावयाला आरंभ केला. मी म्हटलं, 'अरे, रिक्षा तो चालवतोय, तू नव्हे. त्याला काय दिसत नाही?' 'ते खरं रे. पण आजूबाजूनं येणाऱ्या मोटारी तर हा माणूस चालवत नाही ना? त्यांनी आपल्या अंगावर घातली मोटार, तर घ्या काय? आपली काळजी घेतलेली बरी. होऽ!' आणि सारा दिवसभर हा प्रकार चालू होता. प्राणिसंग्रहालय बघावयास जावे, नि लोकांनी आपल्यालाच बघू लागावे, म्हणजे जसे वाटेल, तसे मला वाटले, पण उपाय नव्हता. त्याला आपल्या भावना लपविता येत नव्हत्या व त्याची भीती खरी होती. रस्ता ओलांडताना होणाऱ्या माझ्या मनातील गोंधळामागेही हीच भीती असेल काय? —असावी; कदाचित उघड नसली, तरी सुप्त रीतीने. तिची जाणीव मात्र आजवर झालेली नव्हती. किंबहुना, ही जाणीव करून घेण्याचे मी टाळले होते म्हणा हवे तर; मात्र त्या दिवशी जेव्हा या भीतीचे प्रकट रूप व तिचा विचित्र परिणाम पाहिला, तेव्हा मात्र आपली काही भूल होत आहे, याची खात्री पटली. तसंच पाहिलं, तर रस्त्यानं जाताना आपण प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यातच वावरत नसतो का? हे बसचे अजस्र धूड, ही फटफटी, ही ऑटो-

रिक्षा, ही सायकल, नि हा टांगा, म्हणजे मृत्यूच्या जबड्यातील लहानमोठे दातच होत. हा जबडा सारखा मिटतो आहे; उघडतो आहे. या दातांच्या सांदींतून, फटींतून, आपण जोवर वावरतो, मधल्या पोकळीत जोवर राहतो, तोवर ठीक आहे. पण जर थोडी चूक झाली तर? तर काय! मोठा आवाज ब्रेक लागल्याचा, धक्का बसल्याचा, माणसांचा गोंधळ, धावपळ, नि संपले!! दुसरे दिवशी वर्तमानपत्रांत बातमी भीषण अपघाताची. कमी का येतात अशा बातम्या? आणि तरीही आपण वाटेनं चालतच असतो. सारे लोक चालतच असतात. बुद्धजातककथांत, एके ठिकाणी मानवी जीवनावर एक रूपक केलेलं आहे. "एक माणूस, मागे वाघ लागल्यामुळे धावताना एका पडक्या विहिरीत घसरून पडला. पडता-पडता विहिरीच्या भिंतीतून बाहेर आलेल्या एका पिंपळाच्या मुळ्यांना धरून अधरच लटकला. खाली विहिरीच्या तळाशी एक कृष्ण-भुजंग सळसळतो आहे. वर तो वाघ उभा आहे, नि डोक्यावर एक मधमाश्यांचे मोहोळ लोंबलेले आहे. त्या मोहळातून थेंब थेंब मध ठिपकतो आहे व तो जिभेनं चाटण्यासाठी त्या माणसाची धडपड चालू आहे." असं आहे जीवन! रस्त्यावर उभं राहून या दृष्टीनं विचार करू लागलो, तर जातककथेचंच अधिक भीषण स्वरूप जाणवल्यावाचून राहत नाही; पण माझा प्रश्न आहे तो असा की, जीवनातील केवळ ही भीषणताच सत्य मानून कसे चालेल? ही भीषणता जेवढी खरी, तेवढीच 'तो मधाचा थेंब' चाखण्याची माणसाची दुर्दम्य इच्छाही खरीच नव्हे काय? म्हणून तर अपघाताच्या घटना प्रत्यही कानी पडत असता व डोळ्यांना दिसत असताही माणसं रस्त्यानं जाऊ शकतात! आणि माणसाची ही जीवनप्रवृत्ती काही या जातककथेत वर्णिल्याइतकी अनाठायी व निराधार नाही. तिला अधिक बळकट आधार आहे; भक्कम पाया आहे. तसं नसतं तर, माणसाचं जीवन, सामूहिक जीवनच शक्य झालं नसतं.

माझ्या मित्राला वाटत होती, त्याप्रमाणे वस्तुतः सर्वांनाच भीती वाटायला लागली, तर काय होईल बरं? मला त्याचाही अनुभव आलेला आहे, अनेकांना आलेला असेल. हैदराबादेत पोलीस ॲक्शन होण्याच्या थोडे दिवस आधीच्या काळात जे अस्थिर, भीतिग्रस्त व साशंकतेचं जीवन अनेकांप्रमाणे मीही अनुभवलं, त्याची आठवण झाली की अजून पायाखालची जमीन निसटू लागल्यासारखं

वाटतं. जेव्हा गाड्या लुटल्या गेल्या, घरं फोडली गेली, रस्ते शस्त्रधारी अरब पठाणांनी भरून गेले, तेव्हा बाहेर जाऊन घरी येईपर्यंत मनात काय म्हणून येऊन जात नसे ! मागून येणारा माणूस, कुणास ठाऊक कोण आहे ते ? समोरचा माणूस जवळ येताच, कुणास ठाऊक काय करील ते ? बाजूच्या माणसाची बंदुक कुणास ठाऊक केव्हा कुणीकडे वळेल ते ? ते जीवन नव्हतेच ! तो जगण्याचा आभास होता. विश्वास फक्त झाडांवर, जनावरांवर काय तो ठेवता येत होता; माणसावर नव्हे ! असं जेव्हा होतं, तेव्हा जीवन असह्य होतं, अशक्य होतं; कारण माणसांवरील विश्वास, माणसांच्या योग्यायोग्य निवडणाऱ्या बुद्धीवरील विश्वास, त्याच्या अंतःकरणावरील, माणुसकीवरील विश्वास, हाच जीवनाचा आधार आहे. वाईट, दुष्ट, क्रूर माणसं कुठं व कधी नव्हती नि नाहीत ? पण म्हणून काही प्रत्येक माणूस दुष्ट, वाईट नि क्रूर आहे, असं आपण मानीत नाही. चोऱ्या होतात, दरोडे पडतात, भांडणं होतात, खूनही पडतात, नि तरीही आपण प्रत्येक माणसाला घाबरत नाही. वस्तुतः, वाटेनं चाललेला कोणीही माणूस चोर, गुंड नसेल कशावरून ? पण असं मानून जग चालत नाही, चालू शकत नाही. मानवी व्यवहार खोटेपणावर, लबाडीवर चालतो, असं म्हणण्याची रूढी आहे; पण ते अल्पसत्य आहे, नि म्हणून एकंदर मानवी जीवनाचा विचार करताना असत्य आहे. माझ्या मित्राला जसं वाटत होतं की प्रत्येक मोटार, प्रत्येक सायकल ही त्याच्या अंगावर येण्यासाठीच जणू काय येत आहे, त्याप्रमाणे वस्तुतः वाटायला काय हरकत आहे ? तुम्ही म्हणाल, 'रस्त्यानं चालण्याचे कायदे आहेत, वाहनं चालविण्याचे कायदे आहेत, नि म्हणून ही भीती व्यर्थ आहे.' वस्तुतः कायद्याचं बंधन हे ते पाळणाराला असतं; मोडणाराला नव्हे ! नि म्हणून समोरून येणाऱ्या मोटारचा ड्रायव्हर एकदम उजवीकडून डावीकडे येऊन अनेकांच्या अंगावरून मोटार नेणार नाही, हे गृहीत धरण्याकरिता काय पुरावा आहे ? हात दाखविणाऱ्या पोलिसाच्या खुणेवर साऱ्या रस्त्याचा प्रवाह तुंबतो किंवा वाहतो; पण या पोलिसाचा बांधच फोडून हा प्रवाह धावू लागणार नाही, असं कशावरून ? हे सर्व शक्य आहे; अगदी सहज शक्य आहे, नि तरीही ते आपण मानीत नाही, तसं मानून चालत नाही, आपल्याला तसं मानतां येत नाही. कारण आपला माणसावर विश्वास असतो, माणसाच्या सत्प्रवृत्तीवर विश्वास असतो. सारी माणसं प्रतिभावान, मुत्सद्दी व अलौकिक बुद्धिमत्तेची

नसतात, तशी ती मूर्खही नसतात. सारी माणसं संत, महात्मे नसतात, तशी ती नीचही नसतात. जगात मूर्खही आहेत व नीचही; पण सर्वसामान्यतः माणसं चांगली असतात. रस्त्यावर अपघातही होतात, पण ते अपवाद म्हणून. अपघात व्हावेत, यासाठी काही रस्ता व वाहने थोडीच आहेत ? हे सत्य आपण जाणलेच पाहिजे. एखाद्याला पटत नसेल, तरीही ते मानलेच पाहिजे; कारण त्यावाचून रस्त्याने चालताच येणार नाही, जीवन जगताच येणार नाही. रस्त्याने सुरळीतपणे चालण्याकरिता असो, की जीवन सुरळीतपणे जगण्याकरिता असो; इतरांच्या गतीचा अंदाज घेणे जसे आवश्यक आहे, तसेच इतरांवर विश्वास टाकणेही आवश्यक आहे. माझ्या मित्राबरोबर भटकण्यात, हे एक महत्त्वाचे सत्य मला गवसले आहे, नि त्यामुळे माझ्या मनातील गोंधळ व त्यामागील सुप्त आशंका आता कमी होत आहे. मानवी जीवनाचे सूत्र हाती लागल्यासारखे मला तेव्हा-पासून वाटत आहे, नि म्हणूनच आता रस्त्याने चालताना मला मांजराचा हेवा वाटत नाही. मांजराच्या मिशा मांजरालाच लखलाभ असू देत ! माणसाला त्या मिशांचीही गरज नाही, की त्यांचे कार्य करू शकणाऱ्या एखाद्या यंत्राचीही गरज नाही. रस्त्याने चालताना असो, की जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात वावरताना असो, माणसाला हव्यात दोन गोष्टी : एक भोवतालच्या गतिमान परिस्थितीचा वेध घेऊ शकणारी बुद्धी व दुसरी म्हणजे इतरांवरील, माणसाच्या माणुसकीवरील विश्वास. हे असेल, तरच वाटचाल. हे असेल, तरच जीवन. हेच इष्ट आहे, कारण हेच सत्य आहे, नि नसले तरी स्वीकारणे अपरिहार्य आहे; कारण जगण्याचा तेवढा एकच मार्ग आहे.

• • •

## १६: बिचारा शेखमहंमद

संध्याकाळी घरी परत येताना, मी जितका उत्कंठित असतो तितकाच चिंताग्रस्तही असतो. उत्कंठा वाटते ती यासाठी की, माझी मुले माझ्याकडून नवीन गोष्ट ऐकण्यासाठी आतुर होऊन माझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेली असतात नि चिंता वाटत असते ती त्यांना नवी गोष्ट कोणती सांगावी याची. लहान मुलांना गोष्ट सांगणं हे महा कठीण कर्म आहे असं मला तरी आजकाल वाटू लागलं आहे. मुलांना गोष्ट सांगून माझ्याजवळील पाठांतरित गोष्टींचा साठा तर केव्हाच संपत आला आहे. बरेच दिवसपर्यंत, लहान मुलांसाठी लिहिलेल्या गोष्टींची पुस्तके वाचून काम भागत असे; पण आता स्वतः मुलांनाच वाचता येऊ लागल्याने, माझ्या आधी तीच पुस्तकांची पारायणे उरकून घेतात नि पुन्हा नवीन गोष्टीसाठी अडून बसतात. यावर तोडगा म्हणून राक्षस, पऱ्या, देव, वाघ, सिंह, कोल्हा, ससा, माकड, उंदीर इत्यादी पात्रांची अदलाबदल करून नवीन नवीन गोष्टी घडवायला मी आरंभ केला. पण या कारागिरीला काही मर्यादा असतेच की ! नि म्हणूनच घरी परतताना मी काळजीत असतो की, आज नवीन गोष्ट कोणती सांगावी. अर्थात दररोज कोणती तरी गोष्ट मला सांगावी लागतेच; आणि गोष्ट सांगताना देखील मोठी दुरवस्था होते. कित्येकदा मी मारे एखादी गोष्ट रचून ठेवतो व या आनंदात असतो की आजची आपली गोष्ट मुलांना खूप खूप आवडेल, पण दोन वाक्यं संपली नाहीत तोच धाकटे चिरंजीव शंका काढतात, “ का हो दादा, हा लाक्षस तल कालच्या गोष्टीत होता, मग या

**भगवंत देशमुख**

गोष्टीत कसा आला ? " माझा अर्धा आनंद या पहिल्या शंकेनेच विरघळतो. वाटतं, जोरात ओरडून सांगावं, ' गप्प बैस. वाटेल ते काय विचारतोस ? ' पण बाल-मानसशास्त्राच्या अज्ञानाचे माप पदरी पाडण्याची भीती तसे करू देत नाही नि मग उत्तर द्यावे लागते, ' अरे, राक्षसच तो, त्याला काय ? मारली उडी की आला कालच्या गोष्टीतून आजच्या गोष्टीत ! ' आणि नंतर अशाच अनेक शंकांना ठेचाळत ठेचाळत गोष्ट कशी तरी मुक्कामावर न्यावी लागते. बरं गोष्ट संपली तरी त्रास मात्र चुकत नाही. केवढीही गोष्ट सांगितली तरी माझ्या या बालश्रोत्यांना ती लहानच वाटते; किंबहुना गोष्ट संपते, हाच मुळी त्यांचा सर्वांत मोठा आक्षेप असतो. न संपणारी गोष्ट सांगण्याचाही मी एकदा प्रयत्न करून पाहिला. मोठी गोष्ट सांगा, मोठी गोष्ट सांगा, या मागणीला तोंड देण्यासाठी मी एक दिवस गोष्ट सांगायला आरंभ केला, ' एक श्रीमंत माणूस होता. त्याला प्रवासाचा भारी नाद. एकदा तो दिल्लीला जायला निघाला. स्टेशनवर जाऊन त्यानं तिकीट काढलं नि बसला जाऊन आगगाडीत. गाडीनं शिटी दिली. गाडी सुरू झाली. आता दिल्लीला पोचायला तीन दिवस हवेत. त्यानंतर पुढची गोष्ट. ' गोष्टीच्या या अनपेक्षित शेवटाने, मुले जरा बावरली. कुठे तरी, काही तरी, चुकल्याचं त्यांना लागलं; पण काय ते त्यांना कळेना, माझा मोठा मुलगा थोडा वेळ विचार करून म्हणाला, ' हं ! झाले आता तीन दिवस. पुढं सांगा. ' काळ, काम, वेगाचे माझे प्रमाण अशा रीतीने, या श्रोत्यांनी अमान्य केले व शेवटी पाच मिनिटांत दिल्लीला पोचेल या वेगाने आगगाडी चालविणे भाग पडले. आजकाल माझ्या या अडचणीत एक नवीनच भर पडली आहे. ही मुलं आता शाळेत जाऊ लागली आहेत नि आपल्या शिक्षकांकडूनही त्यांना आता गोष्टी ऐकायला मिळू लागल्या आहेत. तुम्ही म्हणाल माझा तेवढाच त्रास कमी झाला असेल ! वस्तुतः तसं व्हायला हरकत नव्हती; पण झालाय तो प्रकार मात्र उलटा. शाळेत मुलांना गोष्टी सांगणारे जे शिक्षक आहेत, त्यांच्या गोष्टीचा खाक्या असतो ' इसापनीती ' तील गोष्टींचा; म्हणजे असं की त्यांच्या प्रत्येक गोष्टीला, ' सारांशा'ची गाठ मारलेली असते. गोष्टीचा सारांश सांगणे मला मुळीच आवडत नाही- ' सारांश ' न सांगताच तो मुलांना कळावा असं मला वाटतं. पण मला वाटून काय उपयोग ? गोष्टीला सारांश नको, असं मुलांना सांगायची सोय नव्हती; कारण 'मास्तर कसे सांगतात ?'

या त्यांच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागणार होते नि ते तर कठीण होते. ' मास्तर चुकतात ' असं म्हटलं तर ही मंडळी वर्गात तसं सांगायला कमी करणार नाही; याचा मला विश्वास होता नि मग त्या शिक्षकांनी माझ्या मताची जी संभावना केली असती तीही मला ऐकावी लागलीच असती. तेव्हा मीच नमं घ्यायचं ठरवलं. गोष्ट सांगून संपली की मुले ओरडतात, ' आणि सारांश ? ' ' सारांश' नसलेली गोष्ट बिनशेपटीच्या पतंगासारखी त्यांना ओकी ओकी वाटू लागली आहे नि म्हणूनच गोष्टीबरोबर तिचा सारांशही मला सांगणे भाग पडते. यालाही माझी विशेष हरकत नव्हती; पण होतंय काय की, गोष्टीचा सारांश मी सांगितला तरी या मुलांना पटत नाही नि त्यावर निघणाऱ्या अनेक शंकांना उत्तरे द्यावी लागतात.

काल असंच झालं, सर्वश्रुत अशी ती, शेखमहंमदाची गोष्ट मी मुलांना सांगितली. सारं काही सांगून झाल्यावर, अपेक्षित प्रश्न आला. ' सारांश ? ' मी झटकन म्हणालो, ' सारांश, माणसाने मनोराज्ये करू नयेत.' मला वाटले आता तरी मुलांचे समाधान झाले असेल; पण क्षणभर थांबून एकाने प्रश्न केला, ' का करू नयेत पण ? ' ' अरे त्या शेखमहंमदासारखं व्हायचं ! बघ ना, त्याचं सर्व काचेचं सामान फुटलं ! ' इतक्यात दुसरे चिरंजीव उद्‌गारले, ' पण त्याने पितळेची भांडी का नाही ठेवली आपल्या दुकानात ? ' या अपेक्षित प्रश्नाने क्षणभर मीही अगदी गोंधळून गेलो. या शंकेला माझ्याजवळ काहीच उत्तर नव्हते. झोपेचं सोंग करून उत्तर देण्याचं मी टाळलं व मुलांना कसं तरी गप्प केलं; पण खरं म्हणजे, मुलं गप्प झाली तरी माझं मन गप्प झालेलं नाही. माझ्या मुलानं केलेला तो प्रश्न माझ्या मनात सारखा घोळत आहे. अगदी लहानपणापासून मी ती गोष्ट ऐकत होतो; पण आजवर असली शंका मला कधीच सुचली नव्हती. वाटलं, नवी पिढी अधिक चौकस नि हुषार निघू लागली आहे, याचा आणखी कसला पुरावा हवा ? मी विचार करू लागलो. काय बरं दाखवायचं असावं या कथेतून लेखकाला ? शेखमहंमदाच्या गोष्टीचा सारांश अगदीच फुसक्या दोऱ्यात ओवल्यासारखा मला वाटू लागला. बिचारा शेखमहंमद ! आपल्या भावी सुखांच्या कल्पनेत रंगून गेला, हाच ना त्याचा अपराध ! भविष्याच्या सुखस्वप्नांत रंगणे हा जर अपराध असेल तर कोण बरं सुटू शकेल या अपराधातून ? मनोराज्ये रचणे, कल्पनेच्या विश्वात रंगून जाणे, हा तर माणसाचा

स्वभावधर्म आहे. कोणत्याही वयातील नि अवस्थेतील व्यक्ती असू दे, भविष्यकालाच्या कल्पनात ती कधी ना कधी तरी रंगून जाणार नाही; असे सहसा घडत नाही. आपल्या या कल्पना कुणी बोलून दाखवितो नि कुणी दाखवीत नाही; एवढेच.

भविष्य अज्ञात आहे; पण म्हणूनच ते जाणण्याची मानवी आकांक्षा अदम्य आहे. या अज्ञात भविष्याचा संपूर्णपणे वेध घेण्याची शक्ती मानवात नसली, तरी कल्पनेच्या रंगरेखांनी आपल्या भविष्याचे हवे तसे चित्र मात्र त्याला रेखाटता येते नि रेखाटल्याशिवाय तो राहत नाही.

अशा केवळ कल्पना करण्यापासून लाभ कोणता ? प्रत्यक्षात उतरणाऱ्या कल्पना किती असतात ? मग व्यर्थ कल्पनाच करा कशाला ? असे प्रश्न, एखादा रुक्ष व्यवहारवादी नि उपयुक्ततावादी टाकील याची मला जाणीव आहे. मला स्वतःला मात्र हा रुक्ष व्यवहारवाद अगदी चूक वाटतो. कमलाच्या कोशात, सायंकाळच्या वेळी अडकून पडलेल्या भ्रमराचं एका संस्कृत कवीनं मोठं सुंदर वर्णन केलं आहे. भ्रमर मधुपानात दंग असतानाच ते कमळ मिटले नि तो त्यात अडकून पडला व कल्पना करू लागला, ‘ ही रात्र सरेल. पहाट होईल. सूर्य उगवेल नि मग हे कमळ उमलेल. माझे पाश तुटतील. मी मुक्त होईन. ’ पण तेवढ्यात ‘ हा हन्त ! हन्त ! नलिनी गजमुज्जहार । ’ माणसाच्या सुखस्वप्नांची देखील पुष्कळदा अशीच स्थिती होते, याचीही मला जाणीव आहे. परंतु ही वस्तुस्थिती मान्य करूनही, मला असं वाटतं की कल्पनारंजन हे केवळ साहजिकच नव्हे तर आवश्यकही आहे. वर वर्णिलेल्या भुंग्याचंच उदाहरण घ्या ना ! बिचाऱ्याची सुखस्वप्ने मूर्त होऊ शकली नाहीत हे खरं, पण त्याला आपल्या मुक्ततेची किती तळमळ लागली होती हे तर त्यावरून कळतं ना ? आहे ती स्थिती बदलावी नि दुसरी चांगली स्थिती यावी, असं त्याला वाटत होतं; हे तर स्पष्ट होतं. ना ? आपल्या सुखस्वप्नांनी, मनोराज्यांनी देखील नेमकी हीच गोष्ट घडत असते असं मला वाटतं.

मानवी जीवन परिपूर्ण असं कधीच नव्हतं. आजही नाही आणि पुढेही कधी काळ ते तसं होईलसं वाटत नाही; कारण पूर्णतेच्या कल्पनेला कसलीच मर्यादा नाही. अमकं मिळालं म्हणजे आपलं जीवन परिपूर्ण होईल, तमकं मिळालं म्हणजे ते परिपूर्ण होईल; या ज्या मर्यादा जाणवतात त्या समुद्रा-

वरील क्षितिजाप्रमाणे आहेत नि हा पूर्णतेचा सागर मात्र अक्षरशः अमर्याद आहे. पण म्हणून काही माणसानं पूर्णतेचा ध्यास सोडलेला नाही; आणि त्यानं तो सोडलेला नाही म्हणूनच बरं आहे; एरव्ही मनाचा विकास, त्याची प्रगती सारं काही केव्हाच थांबलं असतं. जे हवंसं वाटतं पण मिळत नाही, त्यासाठी तर मानवाची सारी धडपड चालू असते. 'काठोकाठ कटाह भरा' असे प्रत्येकाला आपापल्या जाणीवेनुसार वाटतच असते. ही अपूर्णत्वाची जाणीव, ही पूर्णत्वाची ओढ हीच तर मानवी विकासाची खरी प्रेरणा! प्राप्त परिस्थितीतील उणीवांचीच जर जाणीव नसेल तर ती बदलावी असं कुणाला बरं वाटेल? मला वाटतं, माणसाच्या या जाणीवेतूनच त्याची सुखस्वप्ने निर्माण होतात.

माणसानं केलेली स्वर्गाची कल्पना, हे मानवाचं अत्यंत प्राचीन स्वप्न आहे असं म्हणायला हरकत नाही आणि स्वर्गाच्या या कल्पनेत मानवी जीवनाची चिरंतन शल्येच प्रगट झालेली आपणांस पाहावयास सापडतील. वार्धक्य नि मृत्यू ही दोन मानवी जीवनाची महान दुःखे! ही दुःखे त्याला नको असतात नि म्हणून तर, स्वर्गातील देव अमर आहेत, निर्जर आहेत, तेथील अप्सरांचे तारुण्य कधीही न ओसरणारे आहे. या जीवनात माणसाला जे हवं ते पुष्कळदा मिळत नाही. शिवाय इच्छा गरुडाच्या पंखांनी भराऱ्या मारीत असते नि परिस्थिती साध्या पावलांनी चालत असते. दोघींची धाव बरोबर कधीच नसते. पण म्हणूनच माणसाने स्वर्गात कल्पवृक्षाची स्थापना केली. या कल्पवृक्षातळी बसून नुसती इच्छा करावयाचा अवकाश की इच्छिलेले उपलब्ध होते. एकूण काय, तर जे या जीवनात नाही अथवा दुर्लभ आहे ते सारं काही या स्वर्गाच्या कल्पनेत सहज प्राप्त करून ठेवलं गेलं आहे. हा स्वर्ग खोटा असेल, पण या उणीवा नि त्या नष्ट व्हाव्यात ही माणसाची उत्कंठा! त्या तर खोट्या नाहीत ना? आणि मग त्या बिचाऱ्या शेखमहंमदावरच एवढा गहजब का? त्यानं देखील हेच केलं होतं. मानवी सहजप्रवृत्तीविरुद्ध त्यात काहीच नव्हतं.

माझ्या मनात असाही विचार आला की शेखमहंमदानं केलेलं मनोराज्य कितीही साहजिक असलं तरी, त्यातच रंगून जाऊन त्यानं जी लाथ मारली, ती मात्र समर्थनीय ठरविता येणार नाही. वास्तवाचा एवढा विसर माणसाला न पडायला हवा, हे खरं. पण त्याबरोबरच हा विसर का पडला याचाही आपण विचार करायला हवा आणि या दृष्टीनं विचार करता, शेखमहंमदाच्या मूर्खपणाच्या

वाटणाऱ्या या कृत्याला आणखीही एक बाजू असल्याचं मला दिसून आलं. आपल्याला हव्याशा वाटणाऱ्या सुखी जीवनाची ओढ त्याला इतक्या उत्कटतेने, तीव्रतेने लागलेली होती की, कल्पनेच्या विश्वाचं असत्यत्व त्याला भासलंच नाही. भक्तीची उत्कटता पायरीपायरीने वाढत गेली की शेवटच्या सायुज्यतेच्या अवस्थेत भक्त ईश्वराशी एकरूप होऊन जातो म्हणतात. शेखमहंमदाच्या या कृतीतही, हीच सायुज्यता निराळ्या रूपात दिसून येते.

‘ बुडाला औरंग्या पापी—म्लेंच्छसंहार जाहला,
उदंड जाहले पाणी—स्नानसंध्या करावया. ’

असं जे आपल्या ‘ आनंदवन—भुवना ’च्या स्वप्नात श्रीसमर्थ रामदासांनी वर्णन केलं आहे, तेदेखील अशा एकरूपतेतूनच, तादात्म्यातूनच निर्माण झालेलं आहेसं मला वाटतं. रामदासांनी जेव्हा वरील वर्णन केलं, तेव्हा ते न घडलेलंच होतं. रामदासांना जे घडावं असं वाटत होतं, तेच त्यांनी आपल्या या ‘ मनोराज्या ’त घडल्याचं दाखविलं आहे; कारण ते घडावं असं त्यांना उत्कटतेनं वाटत होतं. रामदासांची ही उत्कटता म्हणजे एक प्रेरक शक्ती होती.

सारखेपणाच्या आधाराने आपण एका वस्तूची उपमा दुसरीस देतो आणि या सारखेपणाची जेव्हा परमावधी होते तेव्हा भ्रांतिमान नावाचा अलंकार निर्माण होतो. ‘ पोपटांच्या लाल चोचींना पळसाची फुले समजून भुंगे त्यांवर रुंजी घालू लागले व त्या भुंग्यांना पिकलेली जांभळे समजून त्यांना गिळण्यासाठी पोपटांनी आपल्या चोची उघडल्या. ’ असं एक मोठं सुंदर उदाहरण नेहमी दिलं जातं या भ्रांतिमान अलंकाराचं. वरील वर्णन ऐकताना आपण काय बरं करतो ? ‘ काय मूर्ख आहेत हे पोपट नि भुंगे ! ’ असंच का आपण म्हणतो ? मुळीच नाही. उलट त्यात वर्णिलेल्या वस्तूंच्या आत्यंतिक सारखेपणातील सौंदर्यावरच आपलं सारं लक्ष केंद्रित झालेलं असतं. अगदी याच न्यायानं, शेखमहंमदाने लाथ मारल्यामुळे काय घडले यापेक्षा त्याला आपल्या सुखी जीवनाची किती उत्कटतेने तळमळ लागली होती, याकडेच आपण लक्ष पुरविले पाहिजे. शेखमहंमदाची ही उत्कट ओढ, मला तरी दूषणीय वाटत नाही; कारण आपल्या जीवनाला कसं वळण द्यायचं, याचं दिग्दर्शन आपल्या मनोराज्यांच्या उत्कट ओढीतूनच लाभत असतं.

‘ आधी कळस मग पाया रे ! ’ असा एका आध्यात्मिक, गूढार्थाच्या कवनाचा

एक चरण मला इथे आठवतो. वाह्यतः विसंगत नि विपरीत वाटणारं, या चरणातील विधान, केवळ गूढार्थानेच नव्हे तर साध्या सरळ अर्थाने देखील सत्य आहे असं वाटतं मला. म्हणजे असं की, कळसाकडून पायाकडे, अशी मंदिराची बांधणी कधीच होत नाही हे खरं; पण त्याबरोबरच, पाया भरण्यापूर्वीच त्यावर उभारल्या जाणाऱ्या मंदिराची निश्चित कल्पना, ते बांधणाराला असते हेही खरं ! प्रत्यक्ष पाया भरण्यापूर्वीच आपल्या कल्पनेत त्यानं या मंदिरावर कळसही चढविलेला असतो नि म्हणून तर त्याचं विशिष्ट रूप आकारास येतं. प्रत्येकाच्या कल्पनेत बांधली जाणारी अशी कितीतरी मंदिरे असतात. " आपलं स्वतःचं एक घर असावं. अगदी विस्तीर्ण असावं. त्याच्या भोवताली एक सुंदर बाग असावी. अभ्यासाला, लिहीत बसायला एक स्वतंत्र, मोकळीचाकळी खोली असावी. या खोलीत, फिकट हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर श्रेष्ठ कलाकारांची चित्रे लावलेली असावीत. काचेच्या चमकदार शिसवी कपाटांतून सुंदर बांधणीची उत्तमोत्तम पुस्तके गच्च भरलेली असावीत. आपलं हे घर, म्हटलं तर गावात, म्हटलं तर गावाबाहेर, अशा सीमारेषेवर असावं. घरापासून जवळच, आपलं स्वतंत्रच असं एक शेत असावं. " असं माझं स्वतःचं एक मनोराज्य फार दिवसांपासून मी मनात घोळवीत आहे. अर्थात, यांपैकी घोड्याचा एक नालही मला अजून गवसलेला नाही; मग उरलेले तीन नाल, लगाम, खोगीर नि प्रत्यक्ष घोडा यांची गोष्ट दूरच ! तरी पण कल्पनेनं या वातावरणात मी अनेकदा विहार करीत असतो. या स्वप्नरंजनानं, अधिक काही साधलेलं नसलं तरी एवढं मात्र नक्की की, उद्या प्रसंग आलाच तर, काय करायचं, कसं करायचं हे माझ्या मनानं आधीच ठरवून ठेवल्यानं माझा गोंधळ उडणार नाही. नाही तर परमेश्वर प्रसन्न झाला नि भटजींनी मागितलं काय तर तंबाखूला लावायला चुना, या हरदासी गोष्टीप्रमाणं व्हायचं एखादे वेळी ! असं होऊ नये, आपलं इच्छित साधण्याला सतत प्रेरणा मिळावी म्हणून मला वाटतं, आपल्या भावी कालाच्या योजनांची मनोराज्ये आपण अवश्य रचावीत. योजना आखून मात्र हे काम होणार नाही. केवळ योजना कितीही तर्कशुद्ध असली तरी ती जोपर्यंत आपले मनोराज्य बनत नाही तोपर्यंत तिची तीव्रतेने ओढ लागणेच शक्य नाही. मला वाटतं, मनोराज्याच्या मानवी जीवनातील या महत्त्वाच्या स्थानाविषयी शेखमहंमदाची गोष्ट रचणारा अगदीच अज्ञानी असावा. एरव्ही त्यानं बिचाऱ्या शेख-

महंमदाची अशी विनाकारण बदनामी मुळीच केली नसती. ‘ मनोराज्य करणे वाईट ’ असं आधी गृहीत धरायचं नि मग ते सिद्ध करण्यासाठी शेखमहंमदाच्या दुकानात काचेच्या सामानाशिवाय दुसरं काहीही ठेवायचं नाही नि म्हणायचं काय तर, ‘ पाहा, मनोराज्य करणे कसे वाईट आहे ते ! ’ हा काय न्याय झाला ? शेखमहंमदावरील हा अन्याय मला तरी मुळीच मान्य करवत नाही. त्याने आपल्या कल्पनेचा स्वर्ग निर्माण केला, यात काही आक्षेपार्ह आहे, हेच मुळी मला पटत नाही. आक्षेप घ्यावयाचा झाला तर, त्यानं निर्मिलेला स्वर्ग फार लहान होता, संकुचित होता, असा मात्र घेता येईल. पण या गोष्टीला त्याचा उपाय नव्हता. त्याचं सामर्थ्यच तेवढं. त्याच्या मनाची धाव या कुंपणापर्यंतच ! ज्यांची जीवनदृष्टी विशाल, ज्यांच्या मनाची झेप मोठी, त्यांची मनोराज्येही तशीच असतात.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्‌दुःखमाप्नुयात् ॥

या महान मनोराज्याचा निर्माता, अर्थातच अत्यंत विशाल दृष्टीचा, व्यापक सहानुभूतीचा असला पाहिजे. ज्ञानेश्वरांसारख्या महात्म्यांनी जी मनोराज्ये रचिली ती देखील त्यांच्या विभूतिमत्त्वाला साजेशीच आहेत.

“ दुरितांचें तिमिर जावो, विश्वस्वधर्मसूर्यें पाहो ।
जें जें वांछील तें तें लाहो, प्राणिजात ॥ ”

हे ज्ञानेश्वराचं मनोराज्य याचीच साक्ष देत आहे आणि एवढा काळ लोटला असूनही ही मनोराज्ये अजून मनोराज्येच राहिली आहेत; प्रत्यक्ष जीवनात अजूनही त्यांचा आढळ झालेला नाही. पण म्हणून काय ती व्यर्थ मानायची ? मानवाला कुठं जायचं आहे, हे दाखवून देण्याचं केवढं तरी महान कार्य या मनोराज्यांनी करून ठेवलेलं आहे !

मनोराज्याचं मूल्य, अशा रीतीनं ते करणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असणार यात शंकाच नाही. पण मुळात मनोराज्य करण्याची प्रवृत्तीच घातुक ठरवायची, हे मला मुळीच पटत नाही. मग सामान्य माणसांनी काय आपली सामान्य मनोराज्ये करूच नयेत ?

‘ राजहंसाचें चालणें, जगती जालेया सिंहाणें,
आणिकें काय कोणें, चालोचि, नये ? ’

या उक्तीत ज्ञानेश्वरांनीच याचं उत्तर देऊन ठेवलंय. माझं सामर्थ्य कमी असेल, माझी दृष्टी संकुचित असेल नि म्हणून जर माझी मनोराज्ये दुबळी असतील, संकुचित असतील तर मी म्हणेन, माझं सामर्थ्य वाढायला हवं, माझी दृष्टी विशाल व्हायला हवी. मनोराज्यच करायचं नाही यात काय अर्थ ? याच कारणाने मला वाटते की, एका चुकीच्या तत्त्वाला शेखमहंमद बळी दिला गेला आहे नि म्हणून मी आता ठरवून टाकलंय की पुन्हा शेखमहंमदाची गोष्ट सांगायची संधी आली तर त्यावरील हा अन्याय साफ धुऊन काढायचा.

● ● ●

## १७. आ का शा चा अ र्थ

आकाशाचा अर्थ पाण्याला विचारावा. पण भलत्याच ठिकाणच्या पाण्याला तो सांगता येणार नाही. घाल्वलीतल्या ओझराच्या ओढ्यामधील धावत्या पाण्याला तो कसा समजणार ? हा ओढा अजूनही अल्लडपणाने वागडतो आहे; काठावरील उंबराची फळे चेंडूसारखी झेलतो आहे; सिताचौरीचा पदर ओढतो आहे; केगदीशी लगट करतो आहे; आणि म्हाराच्या धरणाजवळ आल्याबरोबर ब्रह्मदेवाच्या कोंडीत सूर मारून, प्रत्येक वळणाला ढुशी देत, मस्तीमध्ये धावतो आहे. अजून याला कसलीच समज आलेली नाही. वडीलधाऱ्या वृक्षांबद्दल याला अजूनही आदर नाही. मला वाटते हा जन्मभर असाच राहणार. नाहीतर स्थानेश्वराच्या वडाजवळून पुढे जाताना त्याने इतकी खळखळ केली नव्हती. तो थोडा तरी दबकला असता. त्या वडाच्या पारावर मध्यरात्री काय चालते हे त्याला अजूनही उमगलेले नाही. आजी सांगते त्या सर्व गोष्टी त्याला अजून अज्ञान आहेत; सोडमुंज होण्यापूर्वी वारलेला शिवरामकाकाचा नातू त्या पारावरच अजून केव्हा केव्हा संध्या करतो. कोंडीतल्या विहिरीत जीव दिलेली मोरभटाची सून केव्हा केव्हा त्याच पारावर अजून प्रदक्षिणा घालते. पण या ओझराच्या ओढ्यावर त्यांची सावली अजून पडलेली नाही. जीवनाच्या कपाळावरील मृत्यूची महामुद्रा अजून याने पाहिलेली नाही; झाडांनी आपल्या हिरव्या पदराखाली त्याला दडवून ठेवले आहे.

त्याच्या पाण्यात आकाशाला शिरताच आलेले नाही...त्याचा आवाज ऐकत

**गो. वि. करंदीकर**

आकाश दूर उभे आहे; कधी कौतुक करीत, कधी स्वतःच्या पोकळीने दाटलेल्या खिन्न व्यथेमध्ये निमग्न होऊन...पण हे आकाश तरी असे किती दिवस थांबणार आहे ? किती दिवस वाट पाहणार आहे ? खरे म्हणजे त्याला त्या ओढ्यात एक दिवस कोसळायचेच आहे...त्याला अजूनही आशा आहे...एक दिवस या ओढ्याचे पाणी निस्तब्ध होईल; मग स्थानेश्वराच्या वडाची सावली त्या पाण्यावर पडू लागेल; त्या सावलीच्या आधाराने हळूहळू आपणही आत घुसू. पण ही त्याची कल्पना खोटी आहे. ओझराच्या ओढ्यात त्याला कधीच शिरता येणार नाही. कोल्यांच्या शाळेत जाताना मी कितीदा तरी त्याच्या काठावर उतारासाठी असाच तिष्ठत थांबलेला आहे; मला त्याची कल्पना आहे ! त्याच्या प्रवाहात भिजलेले माझे पाटीदप्तर अजूनही ओले आहे.

आकाशाचा अर्थ पाण्याला कळतो; पण स्वतःच्याच गतीने बेहोष होऊन स्वच्छंदपणे खिदळत जाणाऱ्या या वाहत्या पाण्यात त्याचे प्रतिबिंब पडू शकत नाही. म्हणूनच, आकाशातून येऊनही गंगेला आकाशाचा अर्थ समजलेला नाही. तिला तो समजला असता तर ती हिमालयापासून, समुद्रापर्यंत वाहिलीच नसती. तिने वाहण्याचे नाकारले असते. आणि भगीरथाला आकाशाचा अर्थ कळता तर त्यानेही तिला पृथ्वीवर आणण्याचा तो पोरकट हट्ट धरला नसता. त्याच्या इच्छांचेच आकाश बनते. मग आपले पितर आणि आपले पौत्र हे समकालीन आहेत ही गोष्ट त्याला उमगली असती...आकाशाचा अर्थ कळला की आकांक्षांचे इंद्रधनुष्य हळूहळू विरघळून जाते...फक्त तो निळा बाण तेवढा शिल्लक उरतो...आणि प्रकाशवेगाने तो आपल्या भोवतीच प्रदक्षिणा घालू लागतो... त्यानंतरचा आपला प्रत्येक श्वासोच्छ्वास फक्त या विश्वप्रदक्षिणा मोजीत बसतो.

आणि तरीसुद्धा एकदा आकाशगंगेमध्ये वितळले होते ! पण ती गंगा बापूच्या दोन डोळ्यांतून वाहत होती. क्षयाने झिजत झिजत शेवटी तो आकाशाच्या काळ्या उंबरठ्यापर्यंत पोहोचला होता. त्याला चालवत नव्हते; विशेष बोलवतही नव्हते. पण त्याचे ओठ हालले म्हणून मी कान जवळ नेला. तो म्हणाला, ‘ भाऊ, मला अंगणात ने; मला आकाश पाहायचं आहे. ’ मी म्हटले, ‘ तुला त्रास होईल. ’ तो म्हणाला, ‘ मला उचलून ने. ’ मी त्याला उचलून बाहेर नेला. त्याने फक्त एकदाच आकाशाकडे पाहिले; फक्त एकदा आणि नंतर ‘ आत ने ’ अशी खूण केली...त्याला दिसलेले ते आकाश कसे असेल याचा विचार मी

पुष्कळदा करतो; पण मला त्याची कल्पनाच करता येत नाही. मला वाटते, वाहत्या माणसाला आकाश कधीच दिसत नाही. आकाशाचा अर्थ समजण्यासाठी ते फक्त 'एकदा' आणि 'असे' पाहावे लागते...रोज रोज आकाश पाहणाऱ्या माणसाला आकाश मुळी दिसतच नाही. त्याला दिसते ते स्वतःच्या डोळ्यातले काजळ...ते आईने घातलेले काजळच आपणाला दिसत असते; आणि आपण त्याला आकाश म्हणतो...ते काजळ संपल्याशिवाय आपणाला खरे आकाश दिसू शकत नाही.

आकाशाचा अर्थ पाण्याला विचारावा; पण तरीसुद्धा तो समुद्राला विचारू नये! तो खूप अकांडतांडव करील; भीमरूपी महारुद्राचा अवतार घेईल; आपल्या लाटा प्रत्यक्ष आकाशाला भिडल्याचे सोंग आणील. पण तरीसुद्धा तो मला फसवू शकणार नाही. ज्याला भरती आणि ओहोटी आहे अशा कोणत्याही पाण्यात आकाशाचे प्रतिबिंब सापडणार नाही. म्हणूनच समुद्राला आकाशाचा आरसा म्हणणे चुकीचे आहे. ही चूक मी सुद्धा पूर्वी केलेली आहे. पण त्या वेळेपर्यंत मी आरसाच पाहिला नव्हता...आरसा पाहायचा असला तर शहाण्या माणसाने निदान त्यात दिसणाऱ्या आपल्या डोळ्यांकडे तरी पाहू नये; आणि डोळे दिसलेच तर निदान त्यातली बाहुली उमगण्यापूर्वीच आपण आपल्या पापण्या मिटून घ्याव्यात...जवळच्या खिडकीच्या गजाला घट्ट धरावे...आणि पाच मिनिटांनी पृथ्वी स्थिर झाली की मग...पावडर लावावी. आकाशाचा आरसा बनणे किती कठीण आहे, हे आता मला समजले आहे. समुद्राला आकाशाच्या आरशाची उपमा मी आता कधीच देणार नाही...आकाशाला आरसा नसतो. सगळ्या वस्तूंना आरसे असतात; फक्त आकाशाला आरसा नसतो; म्हणूनच आकाशाचा विचार केला म्हणजे समुद्र हा 'बापुडा' वाटू लागतो. त्याच्या गर्जना कानाच्या पलीकडे पोचू शकत नाहीत. त्याचे सामर्थ्य सुद्धा पोरकट वाटते. त्याने द्वारका गिळली हे वाचून एखाद्या पोराने पावली गिळावी तसे वाटते. त्याने उभारलेले नवे भूप्रदेश हे मुलांनी बांधलेल्या पत्त्यांच्या बंगल्यासारखे डळमळीत वाटतात...आकाश काही निर्माण करीत नाही आणि कशाचा नाशही करीत नाही. ते फक्त असते...ते कसे असते ते पाण्याला विचारा...

ध्यानेश्वराच्या डोंगरापुढील काळकोण्डीतील पाण्याला. निस्तब्धात निमग्न

झालेल्या त्या पाण्यालाच आकाशाचा अर्थ कळलेला आहे; आणि ही गोष्ट आमच्या गावकऱ्यांना केव्हा तरी उमगलेली असावी. नाहीतर एवढ्या लहान कोण्डीला त्यांनी कालकोण्ड हे विलक्षण नाव दिले नसते. आजी म्हणते, " पाण्डवांना तहान लागली तेव्हा त्यांनी ही कोण्ड खणली. " धकल्या घाडी तर " ही कोण्ड भीमान् कोपरान् खणलान् " म्हणून सांगतो. पण ही कोण्ड पाहिली म्हणजे ती पाण्डवांच्याही अगोदरची असली पाहिजे याची खात्री होते ! जसजसे पाण्याकडे पाहत बसावे तसतसे ते खरे वाटू लागते. मग बाजूच्या कातळावर आडवे पडून कोण्डीत पाहण्याचा मोह होतो. किती वेळ असे पाहत बसले तरी त्या पाण्याची हालचाल होत नाही; कोण्डीचा तळ दिसत नाही. अजून तो कोणालाच दिसलेला नाही. प्रथम आपले अंधुकसे प्रतिबिंब दिसते; पण हळूहळू पलीकडील आकाशाच्या प्रतिबिंबात ते सुद्धा विरून जाते. मग कोण्डीचा तळ त्या आतल्या आकाशाइतका खोल जातो; आपले डोळे भरू लागतात आणि कोण्डीतले पाणी दिसेनासे होते...सगळ्या डोहाचाच एक डोळा होतो. त्यात आकाशाचा अर्थ सांगण्याची शक्ती असते. आपला देह आपल्याला न कळत अर्थाकडे सरकू लागतो; हळू हळू सरकू लागतो...

पण मग बाहेरचे आकाश आपल्या पाठीवरून हात फिरवते. म्हणते, " ऊठ. घरी जा. आईने घातलेले ते काजळ तुझ्या डोळ्यात अजूनही शिल्लक आहे. "

• • •

## १८. या जन्मातले पुनर्जन्म

भित्रा माणूस याच जन्मात पुनःपुन्हा मरत असतो असे म्हणतात. पण ते खोटे आहे. पुनःपुन्हा मरणे आणि पुनःपुन्हा मरण्यासाठी पुनःपुन्हा जिवंत होणे ही फार कठीण गोष्ट आहे. ज्याना पुन्हा जिवंत होता येत नाही तो पुनः-पुन्हा मरू शकत नाही. भित्र्या माणसाला हे कधीच जमू शकणार नाही. निसर्गाने भित्र्या माणसाला दिलेला शाप अगदी निराळा आहे. निसर्ग म्हणतो : " बाबारे, मी तुला एकदाच मारीन. तू स्वतःला मारू शकणार नाहीस; आणि म्हणून तुला नवा जन्मही घेता येणार नाही. या जन्मातच अनेक पुनर्जन्म भोगण्याचे भाग्य तुला कधीही मिळणार नाही. तू फक्त एकदाच मरशील ! " ज्याला चैतन्यपूर्ण व गतिशील जीवन जगायचे असते त्याला एकाच जन्मात पुनःपुन्हा मरावे लागते. आपले मरण आपण स्वतःच बोलवावे लागते. उत्कट अनुभवाच्या ओठावर असलेला तो परवलीचा शब्द त्याला पुनःपुन्हा ऐकावा लागतो. आपल्या दिशेने पडणाऱ्या त्या धिम्या पावलांचा आवाज प्राणांचे कान करून झेलावा लागतो. आपले संचित कालौघाच्या स्वाधीन करावे लागते. मावळत्या जन्माला उरल्या सुरल्या चिंध्यांनी लाज राखीत राखीत एका नव्या जन्माला अटळपणे सामोरे जावे लागते. प्रत्येक तत्त्वज्ञ आणि कलावन्त एकाच जन्मात भोगावे लागणारे हे पुनर्जन्म पुनःपुन्हा अनुभवीत असतो.

खऱ्या अर्थाने पुन्हा जन्म घेणे हे फक्त असामान्य माणसांनाच शक्य असते; पण सामान्य माणसालाही ती ओढ जाणवल्यावाचून राहत नाही. मानवाची ती

**गो. वि. करंदीकर**

एक शाश्वत प्रेरणा आहे. मनुष्याच्या मूळ प्रेरणा समजून घेताना काही वेळा मानसशास्त्रापेक्षा विधिशास्त्र अधिक उपयोगी पडते; आणि काही बाबतीत तर या विधिशास्त्रापेक्षाही, त्याहून अधिक पुरातन असलेल्या बीजकथाच अधिक अर्थपूर्ण वाटू लागतात. बऱ्याच धर्मांत या नाही त्या स्वरूपात पुनरुत्थानाची कल्पना वावरत असते; आणि काही बीजकथांची उभारणीसुद्धा कायाकल्पाच्या तत्त्वावरच झालेली दिसते. पुनर्जन्म घेण्याच्या मूळ प्रवृत्तीचेच हे दोन आविष्कार असतात. माणसाला पुनर्जन्म हवा असतो आणि तो मिळावा म्हणून मृत्यू स्वीकारण्याचीही त्याची तयारी असते. हे शक्य व्हावे म्हणूनच वाटेल त्या क्रांतिकारक स्थित्यंतरातून जायची तो तयारी दाखवतो. डार्विनने गृहीत धरलेली जगण्याची ओढ आणि फ्रॉइडने सुचविलेली मृत्यूची ओढ किंवा विलय-वासना या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पुनर्जन्म घेण्याची मूळ प्रवृत्ती किती जोरदार असते याची कल्पना आपल्या पूर्वजांना निश्चित असली पाहिजे. नाहीतर त्यांनी पुनर्जन्म टाळण्यासाठी इतके अकांडतांडव केले नसते ! ज्या वेळी एखादे कर्मठ धर्ममत एखाद्या विशिष्ट कल्पनेचा पापाशी संबंध जोडते त्या वेळी ती कल्पना कोणत्या तरी मूलभूत मानवी प्रेरणेशी संबद्ध आहे असे खुशाल समजावे ! पापी माणसाला पुनर्जन्म मिळतो किंवा पुनर्जन्म मिळणे हे पापाचे लक्षण आहे असे सांगताना त्यांनी या गोष्टीची अप्रत्यक्ष कबुली दिली आहे. कारण आपले बहुतेक विधिनिषेध हे माणसाच्या मूळ प्रवृत्तीचे दमन करण्या-साठीच सुचविलेले असतात. धर्माने ते पापाचे लक्षण मानले हाच, माणसाला पुनर्जन्म हवा असतो याचा निकाली पुरावा होय.

पाप केल्यामुळे पुनर्जन्म मिळतो म्हणूनच माणसाला पापाचे एवढे विलक्षण आकर्षण वाटत नसेल ना ? वस्तुतः, पाप करणाऱ्या माणसाला मोक्षाची भीती घालणे हेच अधिक धूर्तपणाचे झाले असते ! पुनर्जन्माची ही ओढ गृहीत धरली म्हणजे सामान्य आणि असामान्य अशा दोन्ही अवस्थांतील अनुभवांमध्ये एक निराळीच सुसंगती दिसू लागते.

आता एखाद्या जोडप्याने अचानक घटस्फोट घेतला असे कळले तर मला आश्चर्याचा धक्का बसत नाही. सामान्य माणसातसुद्धा पुनर्जन्म घेण्याची ही आदिम ओढ काही वेळा प्रभावी ठरत असावी. ज्या अर्थाने एखादा विकास-शील तत्त्वज्ञ आपले जुने तत्त्वज्ञान आपल्या हाताने मोडून टाकतो व पुन्हा एका

नव्या जन्मात प्रवेश करतो त्या अर्थाने सामान्य माणसाला पुन्हा नवे होणे शक्य नसते. तो बिचारा आपल्याला झेपेल अशी काहीतरी मोडतोड करून पुन्हा नवा अवतार घेण्याचा प्रयत्न करीत असतो ! असे काहीतरी करून पुन्हा आपणाला नवे होता येईल ही सोयीस्कर समजूत उराशी बाळगल्यामुळेच त्याला आपले दैनंदिन जीवन सुसह्य होत असते. खरे म्हणजे चांगला कागद वापरला असता तर आपले पुस्तक अधिक खपले असते असे समजणारा कवी आणि जोडीदार बदलला तर आपला संसार सुखाचा होईल असे मानणारा विवाहित मनुष्य हे दोघेही सारखेच स्वप्नाळू असतात ! दोन लग्ने करणारा पुरुष हा आपल्या मूर्खपणाला एकाऐवजी दोन साक्षीदार निर्माण करीत असतो ! मग हा धोका तो का स्वीकारतो ? अनिवार्यपणे घटस्फोटाच्या आत्मघातकी निर्णयाकडे तो कसा खेचला जातो ? आपल्या अक्कलहुशारीने आईबापांमध्ये तडजोड घडवून आणतील एवढी मोठी मुले असलेले जोडपेसुद्धा घटस्फोट मागण्यासाठी कोर्टात का घुसते ? अशा ठिकाणी ' अ ' चे प्रेमप्रकरण किंवा ' ब ' चा स्वभावदोष ही कारणे वरवरची असतात. मनात कुठेतरी याच जन्मात पुनर्जन्म अनुभवण्याची गूढ तहान लपलेली असते; आणि ती प्रभावी ठरली की सामान्य मनुष्य अशी काहीतरी मोडतोड करायला सुरुवात करतो.

या दृष्टीने विचार केला म्हणजे दिवाळे काढणाऱ्या व्यापाऱ्याबद्दल आपल्याला एक निराळीच सहानुभूती वाटू लागते. दिवाळे काढणाऱ्या व्यापाऱ्याकडे आपल्याकडे फक्त टिंगलीचे शब्दच ऐकू येतात. बुडणाऱ्या सावकारांना तर त्याच्याविषयी सहानुभूती नसतेच, पण तरलेले इष्ट-मित्रही स्थळकाळ पाहून नाक मुरडू लागतात. सज्जन माणसांच्या दृष्टीने तर दिवाळे काढणे म्हणजे नैतिक अधोगतीची परिसीमा असते. पण वस्तुतः, माणूस दिवाळे काढतो म्हणजे काय करतो ? एका अर्थाने तो पुनर्जन्म घेण्याचाच प्रयत्न करीत असतो. आडव्या-उभ्या रेषा मारून आपली गिचमीड झालेली पाटी त्याला पुन्हा एकदा स्वच्छ करायची असते. त्या लांब वहीचे पाठीमागून फरफरटत येणारे शेपूट त्याला एकदा कायमचे कापून टाकायचे असते ! पुनर्जन्माची तहान ही त्याच्या कृती-मागील आद्य प्रेरणा असते. दिवाळे काढणारा मनुष्य हा भित्रा असलेला तुम्हांला बहुधा आढळणार नाही. त्याच्यामध्ये भविष्याकडे झेप घेण्याची उमेद असते, नवे नवे प्रयोग करण्याचे धाडस असते, आणि सगळ्यांत मोठी गोष्ट

म्हणजे अयशस्वी होण्याइतकी उंच उडी मारण्याची जिद्द असते ! भित्रा माणूस भांडवल जमवतो; पण कलंदर माणूसच दिवाळे काढू शकतो ! दिवाळे काढलेल्या व्यापाऱ्याला आपण बहिष्कृत मानतो. पण गुजराती लोक त्याला सन्मानाने वावरू देतात. त्यांची जीवनाची समज आपल्यापेक्षा अधिक सखोल असल्याचा हा एक मोठा पुरावा आहे. दिवाळखोरांचा सन्मान राखण्यात ते अप्रत्यक्षपणे व्यापारातील कलंदर वृत्तीचाच सत्कार करीत असतात. प्रत्येक क्षेत्रातील नवा उन्मेष हा या कलंदर वृत्तीतून जन्माला येत असतो.

मात्र या एका जन्मातच अनेक पुनर्जन्म भोगण्याची खरीखुरी शक्ती थोर तत्त्वचिंतक आणि असामान्य कलावंत यांनाच लाभलेली असते. रसेलसारख्या विकासशील तत्त्वज्ञाचे वैचारिक जीवन म्हणजे मृत्यू आणि पुनर्जन्म यांचा एक न संपणारा लपंडाव आहे. आपल्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर त्याने स्वतःला अनेकदा मारलेले आहे. पुनःपुन्हा अग्निप्रवेश केला आहे; आपला मृत्यू आपल्या नव्या डोळ्यांनी पाहिला आहे; आणि तो सर्व ‘ सोहळा ’ स्वतःच्या शब्दांत जगापुढे मांडला आहे. कारण आत्मटीकेचा अग्निप्रवेश केल्याशिवाय तत्त्वज्ञान्याला पुनर्जन्म घेता येत नाही. मूर आणि विटगेन्स्टाइनसारखे साथी थोडीफार मदत करू शकतात. पण शेवटी अंतिम अग्निदिव्य हे ज्याचे त्यालाच करावे लागते. तुकारामाला दिसलेला सोहळा याहून अधिक अद्‌भुत असेल असे समजण्याचे कारण नाही. थोर तत्त्वज्ञ हा आपले पूर्वसंचित आपल्या हातांनीच चितेवर चढवीत असतो आणि हा विनाश अनुभवीत असतानाच त्याचे नवसृजनाचे स्वप्न साकार होत असते. ज्या वेळी एकच मनुष्य आपल्या जुन्या डोळ्यांशी आपली नवी नजर भिडवू लागतो त्या वेळी दोन जन्मांची दृष्टादृष्ट होते. तो सोहळा नेहमीच ‘ अनुपम ’ असतो.

कलावंतालासुद्धा पुनःपुन्हा भेटणारा हा पुनर्जन्म आनंदाने स्वीकारावा लागतो. ग्रीक बीजकथेतील फिनिक्स पक्षी हेच कलावंताच्या जीवनाचे चिरंतन प्रतीक आहे. हा पक्षी वृद्ध झाला की स्वतःच स्वतःला जाळून घेतो आणि मग त्या राखेमधून त्याचा पुनर्जन्म होतो. प्रत्येक नव्या व उत्कट कल्पनानुभवाबरोबर एका अर्थाने कलावंताचाही पुनर्जन्म होत असतो. कलात्मक सृजनामध्ये अनुभव भोगणारा माणूस आणि त्या अनुभवाकडे तटस्थतेने पाहणारा द्रष्टा हे दोघेही सहभागी होत असतात. ‘ भोगणारा ’ माणूस जिथे संपतो तिथेच ‘ भागणाऱ्या ’

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

माणसाची सुरुवात होते. त्या दोहोंतील सीमारेषा अनाकलनीय असते. ती शोधण्याचा प्रयत्न करणे हे दोन क्षणांतील अंतर शोधण्याचा प्रयत्न करण्याइतकेच हास्यास्पद असते ! पण त्यामुळे ते दोन्ही एकच असतात, असे समजणेही चुकीचे होईल. म्हणूनच श्रेष्ठ कलावंत हा ' स्वतः 'चा अनुभव सांगूच शकत नाही. तो सांगतो ते सर्व कुणा एका दुसऱ्याच्या पुनर्जन्माविषयी सांगतो ! जातककथांमध्ये गौतमबुद्ध आपल्या पुनर्जन्मातील अनुभवांचे संचित आपल्या अनुयायांच्या हवाली करीत असतो. प्रत्येक कलाकृती हे कलावंतांच्या जीवनातील एक ' जातक 'च असते. या जन्मात अनुभवलेल्या एका पुनर्जन्माचा तो एक अंधुक आलेख असतो. ' काव्याची भाषा ' म्हणजे काय असा प्रश्न पुष्कळ लोक मला विचारतात : काव्याची भाषा म्हणजे या पुनर्जन्मांना फुटणारा पहिला आणि अटळ शब्द.

● ● ●

# १९. न चुकणारी माणसे

माझे बोलणे हे हरदासाच्या झग्यासारखे थोडे घळमळीत असते. भाषेच्या काठावर उभे राहून स्वतःचा तोल तासन्तास सावरीत नसणे हे मला सहसा साधत नाही. बोटांना माती न लावता दोन शब्दांच्या चिमटीने अर्थाचे सुवर्ण-कण तेवढे नेमके उचलणारांविषयी मला आदर वाटतो, पण तसाच प्रयत्न मी करू लागलो की हातात फक्त माती राहते आणि सुवर्णकण कुठे जातात ते कळत नाही. अर्थात घळमळीत भाषा वापरण्यात मी कुणालाच हार जाणार नाही. शिवाय ज्याची बुद्धी कृश आहे त्याला हा हरदासाचा झगा मोठा सोयिस्कर असतो ! माझ्या शब्दांची उडी बहुधा वावभर इकडे किंवा वावभर तिकडे पडते. सामान्य माणसांची कल्पनाशक्ती लहान मुलांप्रमाणेच फार मोठी असल्यामुळे माझे शब्द त्यांच्या मनांत मावू शकतात; त्यांना अवघडल्यासारखे वाटत नाही; आणि मलाही ऐसपैस बसता येते. पण विद्वानांच्या समोर मला गोंधळल्यासारखे होते आणि आपल्याला भुतासारखे अदृश्य होता येत नाही याचे वाईट वाटते.

विशेषतः माझे विद्वान मित्र प्राध्यापक ' बिनचूक ' ( हे त्यांचे टोपणनाव आहे ) धिमेपणाने आणि योजनापूर्वक आमच्या जिन्याची एक एक पायरी चढू लागले की माझे मनही त्या अलगर्जू जिन्याप्रमाणे डळमळू लागते. मी प्राध्यापकी ऐटीने मान ताठ करून बसतो खरा, पण आतून अगदी घाबरलेला असतो. बहुधा " शेवटी मी म्हणत होतो तेच झाले " किंवा " मी काल

**गो. वि. करंदीकर**

सांगितले तेच खरे" अशी ठराविक नांदी म्हणत ते एखाद्या रविवारी उपस्थित होतात. त्यांच्या मुद्रेवर तोवातोबा गांभीर्य असते; आणि डोळ्यांमध्ये विजयाची झाक असते. "अहो, मी सांगितले तेच खरे" असे म्हणत ते सार्थ दृष्टीने व हनुवटी मागे खेचीत माझ्याकडे पाहतात. मी थोडासा भांबावून त्यांनी पूर्वी काय सांगितले असावे याचा विचार करण्यात गुंतलेला असतो; पण त्या विपरीत मनःस्थितीत फार वेळ काढावा लागतो असे नाही. "अहो, त्या काव्याच्या प्रकाशनाचा दिनांक ७ जून १९१८; १९१९ नव्हे!" आम्ही केलेली चर्चा मला पुसटशी आठवते, तरी पण काव्याचे नाव झटकन लक्षात न आल्याने मी विषय बदलण्याचा प्रयत्न करतो. "हां, त्या काव्याची तारीख ना? बरोबर...पावसानं अगदी कहर केला बाबा. एका दिवसात काल दहा इंच पाऊस झाला!", "अहो, दहा इंच कसला, अकरा इंच...वेधशाळेचा रिपोर्ट अकरा इंच आणि सात सेंट आहे." आवंढा गिळून मी सर्द मनाने ही आघाडी सोडून दुसऱ्या आघाडीवर पळ काढतो. "सौभाग्यवतींना नाही आणलंत...आता साडेतीनच्या लोकलनं आलात वाटतं?" "अहो, ती दोन तारखेपासुन बंद झाली...मी आलो ही 'तीन सत्तेचाळीस'...हो, 'तीन सत्तेचाळीस.'" पण ते नुसते बोलून थांबत नाहीत. आपले म्हणणे बरोबर आहे हे पुराव्यानिशी शाबीत करण्यासाठी प्राध्यापकमहाशय आपल्या खिशातील वेळापत्रक शोधू लागतात; आणि या हवाबंद संभाषणातून बाहेर पडण्यासाठी सौभाग्यवतीला चहा टाकायला सांगून सुपारी आणण्याच्या निमित्ताने मी अदृश्य होतो. मी दहा मिनिटांनी उगवतो त्या वेळी चहा झालेला असतो. प्राध्यापक-मजकुरांच्या हातांवर सुपारी ठेवल्याबरोबर कधीही न होणाऱ्या व्याख्यानाच्या निमित्ताने मी बाहेर पडतो. अशा वेळी पत्नी डोळ्यांत प्राण आणून माझ्याकडे बघते; पण प्रत्येक माणसाला आत्मसंरक्षणाचा अधिकार आहे असे पुटपुटत मी निघून जातो—पार निघून जातो आणि पुन्हा चार तास घराचे तोंड पाहत नाही!

खरोखर या न चुकणाऱ्या माणसाइतका भयंकर मनुष्य उभ्या दुनियेत सापडणार नाही. मी स्वतः नरमांसभक्षक आदिमानवाला फारसा दुष्ट मानीत नाही. निरुपद्रवी व असहाय अशा अन्य प्राण्यांवर ताव मारणारा सुसंस्कृत मनुष्य आणि उपद्रवी व संरक्षणक्षम अशा स्वजातींवर निर्वाह करणारा आदि-

मानव यांमध्ये विशेष फरक करणे म्हणजे स्वार्थी स्वयंकेंद्रित तत्त्वज्ञानाची परिसीमा आहे. आपल्याला ते मान्य नाही. पण या न चुकणाऱ्या माणसांची हिंसक वृत्ती काही अपूर्व असते. आपण बिनचूक आहोत याची जाणीव त्यांच्या प्रत्येक उच्चारातून व आचारातून प्रकट होत असते. त्यांच्या स्वभावाची यथार्थ कल्पना करूनच त्यांच्याशी वागावे लागते. भोंगळ शब्दांनी त्यांचे मस्तक भडकते. अस्ताव्यस्त भाषेने त्यांचा अपमान होतो. प्रत्येक शब्दाची व्याख्या केल्याशिवाय ते आपल्याला पुढे पाऊल टाकू देणार नाहीत. आपण सर्व क्षेत्रांत बिनचूक विचार करणारे आहोत याची त्यांना खात्री असते. 'मी चुकत नाही' हे बिरुद मिरवीतच ते जगात प्रवेश करतात.

महाविद्यालये किंवा आश्रम यांची हवा त्यांना विशेष मानवते. पण नेहमीच ते सुशिक्षित असतात असेही नाही. ते जेव्हा बाजारात जातात तेव्हा बिनचूकपणे योग्य दुकानातच खरेदी करतात. ते खरेदी करतात तो माल नेहमीच दर्जेदार असतो. त्यांचा न्हावीसुद्धा सगळ्यांहून जास्त कसबी असतो; आणि तो हुडकून काढण्यासाठी त्यांनी पद्धतशीर संशोधन केलेले असते. त्यांचा शिंपी सगळ्यांहून कापड कमी घेतो आणि सगळ्यांहून अधिक वक्तशीर असतो. त्यांचा गवळी आधी दुधात पाणीच घालीत नाही; घातलेच तर ते गाळून घालतो. त्यांची मुले शेजारच्या मुलांहून 'काही विशेष' असतात; आणि त्यांची शिस्त तर अन्यत्र कुठेच दिसण्यासारखी नसते. दुसऱ्या महायुद्धाचा शेवट त्यांनी पूर्वी सांगितल्याप्रमाणेच घडलेला असतो; आणि त्यावेळी पहिल्या महायुद्धाच्या वेळी बरोबर ठरलेल्या त्यांच्या जुन्या अंदाजाची त्यांना आठवण होते. कोरियातील शस्त्रसंधीचे भविष्य त्यांनी पूर्वीच वर्तविलेले असते, बेरियाच्या अधःपतनाचे त्यांना आश्चर्य वाटत नाही, आणि अब्दुल्लाचेही शेवटी व्हायचे तेच झालेले असते! विनोबांच्या भूदानाला अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाले असे कोणी म्हटल्यास ते फक्त गालातल्या गालात हसतात. न चुकणारा मनुष्य हा सगळीकडेच 'बिनचूक' असतो. शेजारच्या बाळूकाकांना त्याने पूर्वी 'स्पष्ट' सांगितल्याप्रमाणे शेवटी हायकोर्टात अपयश येते; वामनरावांचा खोकला अखेरीला भडभडे वैद्यांच्या औषधानेच साफ बरा होतो. एवढेच काय, पण सावित्रीबाईंची धडधडीत मंगळावर दिलेली मुलगी आपला अंदाज खरा करते की नाही याबद्दल त्यांना उत्कंठा लागलेली असते!

त्यांच्या बहुतेक वाक्यांचे अर्थदृष्ट्या दोन भाग पडतात, पहिल्या कर्तृपदाचा अर्थ ‘ माझे बरोबर आहे ’ असा असतो आणि कर्मपदामध्ये ‘ तुम्ही मूर्ख आहात ’ असा ध्वनी असतो. कर्मपदामध्ये समोर असलेल्या व्यक्तीच्या सामाजिक प्रतिष्ठेप्रमाणे थोडाफार फरक पडण्याची शक्यता नेहमीच असते; पण कर्तृपदाचा अर्थ मात्र निरंतर एकच असतो; त्यामुळे सत्य आणि असत्य यांच्या मध्यावरील धुक्याच्या प्रदेशात वाट चुकण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधीच येत नाही. त्यांच्या मनात अस्पष्ट असे काहीच नसते. त्यांची भूमिती सरळ रेषेची असते. त्यांच्या सर्व आकृत्या एकाच पातळीत काढलेल्या असतात; आणि या बौद्धिक पातळीवर त्यांची नितांत श्रद्धा असते. आपल्याला पाय ठेवण्यासाठीच सबंध पृथ्वी परमेश्वराने आपल्या पायाखाली सरकवली असावी याबद्दल त्यांना संदेह नसतो आणि त्यामुळे त्यांची श्रद्धास्थाने अगदी अढळ राहतात.

न चुकणाऱ्या माणसाचे हे असे असते. आपल्या बुद्धीची झेप त्यांच्या पायथ्याशीसुद्धा पोचणारी नाही ही खात्री असल्यामुळे मी त्यांना टाळणेच पसंत करतो. त्यांच्या गाढ सान्निध्यात फक्त विदग्ध माणसेच जिवंत राहू शकतात. या भयंकर हिममानवापेक्षा हरघडी चुकणारी, चुकत चुकत उठणारी, पुन्हा पुन्हा धडपडणारी, आणि शेवटी एक दिवस चुकता चुकता कोलमडणारी दुबळी माणसे मला अधिक सत्य वाटतात. या सामान्य माणसांविषयी असा विलक्षण ओढा मला का वाटावा ? त्या माणसांचे हेवेदावे, त्यांचे मानापमान, त्यांचे तंटेबखेडे हे तेवढे मला खरे का वाटावे ? त्यांच्या माणुसकीवर चुकांचे शिक्कामोर्तब झालेले असते, त्यांचा खोटेपणा आणि त्यांचा क्षुद्रपणा, त्यांच्या पदोपदी घडणाऱ्या चुका आणि त्या लपविण्याकरिता चाललेली केविलवाणी धडपड, त्या स्वतःला सुसह्य व्हाव्या म्हणून इतरांवर केलेले मिथ्यारोप आणि सर्वांच्या मुळाशी आणि शेवटी असलेले असमाधान—या सर्व गोष्टींमुळे ती माणसे मला माझी वाटतात. त्यांचे शब्द उर्मट असतात, पण नकली नसतात; त्यांचे वागणे गैरशिस्त असते, पण पोकळ नसते. ती रडतात त्यावेळी कळवळून रडतात आणि हसतात त्यावेळी त्यांचे शरीर खिदळल्यावाचून राहत नाही. ती दात दिसतील म्हणून तोंड उघडायचे टाळीत नाहीत. त्यांची संगत नेहमी सुखाची असते असे नाही; केव्हा केव्हा ती त्रासदायक ठरते—पण तेव्हाही ती जिवंत असते.

ही माणसे मला सह्य वाटतात याची कारणे नेहमी निर्मळ असतील असे मी म्हणत नाही. कदाचित माझे प्रतिबिंब पाहण्यातच मला आनंद वाटत असेल! मला स्वतःचा फोटो काढण्याची आणि तो टांगून ठेवण्याची विशेष आवड नाही; पण त्याच प्रवृत्तीचा हा छुपा प्रकार असणे असंभवनीय नाही. कदाचित त्या माणसांच्या डोळ्यांत पडणारे स्वतःचे प्रतिबिंब मला आवडत असेल. कदाचित त्यांच्या अपूर्णतेने माझी अपूर्णता मला अधिक सुसह्य होत असेल किंवा त्यांच्या अपयशाच्या आधाराने माझी आशा तोल सावरीत असेल. काय खरे असेल कुणाला ठाऊक; इथे तरी आपण ' बिनचूक ' होण्याचा प्रयत्न काय म्हणून करावा ?

याचा अर्थ असा नव्हे की मला असल्या भोंगळ मंडळींविषयी आदर वाटतो! आदर, पूज्यता, कृतज्ञता वगैरे तमाम मांगल्यसंवर्धक भावनांचे गाठोडे ' बिनचूक ' माणसांच्या पायाशी ठेवायला मी नेहमी तयार असतो. त्यांच्या जुलमातून सुटण्यासाठी ही खंडणी भरीत राहणे आवश्यकच असते. आणि सामान्य माणसे आपल्या वाटेला जात नाहीत या गोष्टीचा त्यांनाही अभिमान असतो. या माणसांच्या तोंडात व्याख्या, डोक्यात ज्ञानकोश, आणि हातात फूटपट्टी असते. त्यांचे शब्द अर्थांचे बंद असतात. त्यांचा विचार सर्व संबंधित परिवार बरोबर घेऊन लवाजम्यासह मोठ्या समारंभाने प्रवेश करतो. त्यांनी प्रत्येक माणसाची लांबीरुंदी दशमान पद्धतीने मोजलेली असते. प्रत्येक विचाराचे स्वरूप निश्चित केलेले असते. त्यातील सर्व अंतर्विरोध नष्ट केलेला असतो. त्यांच्या सान्निध्यात माझ्या वैचारिक दुबळेपणाची मला पुरेपूर कल्पना येते.

माझा आजचा विचार उद्या कायम राहत नाही. कालच्या माणसाची ओळख आज पुन्हा करून घ्यावी लागते. आजचा ' मी ' हा कालच्या ' मी ' ला मानीत नाही. त्यामुळे सगळीकडेच ढिलेपणा येतो; अस्थिरता दिसते; फूटपट्टी घेऊन मापे काढीत फिरणाऱ्या पंडितांच्या कसबाचे मला कौतुक वाटते; त्यांच्या धैर्याचे आश्चर्य वाटते. जिवंत प्रवृत्तींची अगर माणसांची मापे कशी घेतात हे मला अजूनपर्यंत उमजलेले नाही. फूटपट्टी खाली ठेवून आकडा मांडीपर्यंत ती बदललेली असतात. एवढेच काय, पण पूर्वी काढलेली मापे पुन्हा तपासून पाहावयाचे ठरविले तर मध्यंतरीच्या काळात ती फूटपट्टीही थोडीफार झिजलेली असणे शक्य असते! पण ' बिनचूक ' माणसांना असल्या पोरकट संशयांची बाधा कधीही

होत नाही. त्यांच्यापुढे असे काही बडबडण्याचे धैर्य न केलेले बरे. त्यांना खूष करावयाचे असेल तर प्रबंधासारखे काही तरी विराट कर्मच करावे लागेल ! आणि त्यातही चुका झाल्या म्हणजे सगळेच मुसळ केरात ! प्रबंधलेखन हे प्रत्येक प्राध्यापकाचे सुखस्वप्न असते. माझेही मन पुष्कळदा मोहात पडून या विचाराभोवती रुंजी घालते. पण माझ्या आसपासच्या ' न चुकणाऱ्या माणसां'ची आठवण झाली की मी लगेच शुद्धीवर येतो; आणि प्रबंधाकरिता घेतलेल्या कागदावर एखादी बोटभर कविता किंवा एखादा पोरकट लघुनिबंध लिहून आणखी एक आवंढा गिळतो.

● ● ●

## २८. तीन माकडे

दरवाजाची कडी वाजली म्हणून मी उठून बाहेर आलो. मला भेटण्यासाठी आलेले गृहस्थ अगदीच अनोळखी दिसल्यामुळे मला जरा आश्चर्यच वाटले. मी खूप प्रयत्न केला.... पण काहीच आठवेना. जरा गोंधळलेल्या स्वरातच मी विचारले, " आपलं नाव काय ? "

" आज तुमचा वाढदिवस आहे ना ? " प्रवेशाबरोबरच हा प्रश्न करीत त्यांनी मला अधिकच गोंधळात टाकले. ज्या माणसाला मी कधी पाहिल्याचेही स्मरत नाही त्याला माझा वाढदिवस केव्हा येतो हे ठाऊक असल्याचे पाहून मी अगदी खजील झालो.

अधिक कसोटी पाहण्यात अर्थ नाही असा विचार करून त्या गृहस्थांनी माझ्या हातात गुळगुळीत कागदांत बांधलेली छोटीशी वस्तू आणि एक पत्र दिले. पत्राने माझ्या शंकेचे निरसन केले. आजच हे गृहस्थ नागपूरहून आले होते. त्यांच्याबरोबर नागपूरला राहणाऱ्या माझ्या एका जीवश्चकंठश्च स्नेह्याने माझ्या वाढदिवसानिमित्त मला भेट पाठविली होती. गुळगुळीत कागदाचे आवरण मी दूर केले. तीन माकडांची ती मूर्ती होती. मी डोळे उघडून पाहिले. होय, ती तीन माकडांची मूर्ती होती. ब्रह्मा, विष्णू, महेश यांची ती त्रिमूर्ती असेल ही माझी कल्पना सर्वस्वी निराधार ठरली होती.

पत्र पुढे वाचल्याशिवाय हे कोडे सुटणार नाही हे मला कळून चुकले. माझ्या मित्राने लिहीले होते :

**मंगेश पाडगावकर**

" आज तुझा वाढदिवस आहे याची आठवण झाली. दरवर्षी मी कसले तरी पुस्तक तुला भेट पाठवीत आलो आहे. का कुणाला ठाऊक, या वेळी असे वाटले की, नेहमीचा हा संकेत मोडावा. काही तरी नावीन्याचा धक्का देईल अशी वस्तू पाठवावी असे मी ठरविले. खूप विचार केला. निरनिराळ्या वस्तू डोळ्यांसमोर आणून पाहिल्या, पण समाधान होईना. पण योग चांगला होता म्हण किंवा काही म्हण, सहसा दगा देणारी कल्पनाशक्ती या वेळी माझ्या साहाय्याला धावून आली ! तीन माकडांची ही मूर्ती मला आठवली. तीच तुला भेट म्हणून पाठविण्याचे मी ठरविले. गांधीजींना सुद्धा ही मूर्ती कुणी तरी भेट दिली होती. ती ते आपल्या टेबलावर पेपरवेट म्हणून ठेवीत. मूर्तीच्या घडणीत कसलीही कारागिरी नाही. त्यापेक्षाही किती तरी महत्त्वाचा आशय या मूर्तीत भरून राहिला आहे. दिवाणखान्याला शोभा देणारी ती शोभेची नकली वस्तू नाही. तिच्यापासून स्फूर्ती मिळावी हा हेतू आहे. तीन माकडांतल्या एका माकडाने आपल्या कानांवर हात ठेवला आहे. जणू काही जे वाईट आहे ते ऐकणार नाही अशीच त्याची प्रतिज्ञा असावी. दुसऱ्या माकडाने आपले हात डोळ्यांवर ठेवले आहेत. वाईट गोष्ट पाहण्याचीसुद्धा त्याची इच्छा नाही. तिसऱ्या माकडाचे हात तोंडावर आहेत. वाईट गोष्टी तोंडातून बाहेर येऊ नयेत यासाठीच ही खबरदारी आहे.

" या तीनही गोष्टी ततोतंत जर जीवनात पाळल्या तर जीवन सुखी होईल. तीन माकडांची ही मूर्ती तुला सदैव स्फूर्ती देवो...."

अनपेक्षित भेट पाठवून माझ्या मित्राने मला आश्चर्याचा आणि नावीन्याचा धक्का दिला होता यांत शंकाच नाही. कौतुकाने आणि आदराने मी त्या माकडांच्या मूर्तीकडे पाहू लागलो. माकड हा माणसाचा पूर्वज होता, या सिद्धान्ताच्यां स्मृतीने माझा आदर क्षणभर अधिकच बळावला. आध्यात्मिक जीवनातल्या यशाची गुरुकिल्लीच जणू काही या 'त्रिमूर्ती'च्या रूपाने माझ्या मित्राने पाठविली होती. खरेच, वाईट गोष्टी ऐकल्या नाहीत, बोलल्या नाहीत, की सारे जीवन किती सुंदर होईल, नाही ? क्षणभर माझ्या मित्राच्या कल्पनाशक्तीला मी मनःपूर्वक धन्यवाद दिले. तसे पाहिले तर आश्चर्याने मुग्ध होऊन जाण्याचे काही कारण नव्हते. लहानपणापासून हेच शिक्षण देण्याचा प्रयत्न साऱ्या गुरुजनांनी नव्हता का केला ! अगदी प्रथम मी शाळेत गेलो तेव्हाची गोष्ट मला आठवली.

" खोटे कधी बोलू नये, चोरी कधी करू नये, शिवी कोणा देऊ नये " वगैरे नन्नाच्या बाराखडीनेच सुरुवात झाली होती ! शिवी कोणा देऊ नये हे बोधवाक्य शिव्या देऊनच आमच्या मास्तरांनी शिकविले होते !

'नको' चे शिक्षण देणाऱ्या त्या उग्रमूर्ती शिक्षकांच्या आठवणीने माझ्या आनंदात मिठाचा खडा पडल्यासारखे झाले. या शिक्षकांचा चेहरा नेहमी गंभीर असे. आनंदाचा पक्षी शीळ वाजवीत त्यांच्या मनात जणू कधीच उडाला नव्हता. बाहेरची सृष्टी पाहून ते कधीच धुंद होत नसत. शाळेच्या खिडकीतून आंब्याचे झाड दिसे. पिकलेला आंबा एकदा एक खार पोखरीत होती. तिच्या शेपटीच्या डौलदार झुबक्याकडे मी बघत होतो. इतक्यात अकस्मात हातांतील छडीचा प्रसाद या गुरुवर्यांनी माझ्या पाठीवर दिल्याचे मला स्मरले. जणू काही त्यांनी आपले डोळे बंदच करून घेतले होते. 'नये' हा शब्द वापरल्याशिवाय ते एकही वाक्य बोलत नसत : " वाईट ते पाहू नये...ऐकू नये..." का कुणाला ठाऊक, या तीन माकडांच्या मूर्तीकडे बघत असताना या शिक्षकांची मला अपरिहार्यपणे आठवण झाली.

अंतःकरणांत खोल कुठे तरी साचलेला विषाद वर उफाळून आला. माणसाचे मन मोठे विचित्र आहे. अंतर्मनात दडून बसलेल्या गोष्टी केव्हा उफाळून येतील आणि कशाशी आपला संबंध जोडतील हे काही सांगता यायचे नाही. तीन माकडांची ही मूर्ती पहात असताना असेच झाले. एका क्षणात त्यातल्या नावीन्याचा सारा स्पर्श ओसरला. शालेय जीवनातल्या कटू आठवणींनी माझा नवा अनुभव क्षणात झाकळला गेला. माकडांच्या प्रतीकातून व्यक्त केलेले जीवनाचे तत्त्वज्ञान मला पटणारे नाही, रुचणारे नाही, याची सुस्पष्ट जाणीव मला झाली.

मला कळले की, लहानपणापासून या तत्त्वज्ञानाचा मी स्वयंस्फूर्त इन्कार करीत आलो आहे. अमुकच गोष्टी पहायच्या, ऐकायच्या, असे बंधन काय म्हणून ? सारे जीवन डोळे उघडून का म्हणून पाहू नये ?

जीवनात बरे आणि वाईट, खरे आणि खोटे यांची इतकी बिकट आणि चमत्कारिक गुंफण झालेली असते की, सत्यावर ढोबळपणे बोट ठेवणे कठीण व्हावे. का कुणाला ठाऊक, पण वाइटाविषयीचे हे भय बालपणापासूनच निर्माण केले जाते, सत्यावर आपले प्रेम नसते; पण असत्याला मात्र आपण भीत असतो. असत्याच्या भयामुळे सत्याचे दर्शन तर होत नाहीच, पण असत्याचा फासही

चुकत नाही. संपूर्ण सत्य कुणाला आकळले आहे ? लहानपणापासून मनावर झालेल्या संस्कारांच्या चाकोरीतून आपण चालत असतो. सत्याविषयीच्या विशिष्ट कल्पनांना आपण उराशी कवटाळून बसतो. आणि असत्याला, अशिवाला भिऊन पळत असतो. असत्याचे दर्शन आपल्याला झालेले नसते. होईल तरी कसे ? लहानपणापासून डोळ्यांवर आणि कानांवर हात ठेवण्याची शिकवण दिली गेलेली असते. जिथे भीती आहे तिथे सहानुभूती कोठून असणार ? आणि सहानुभूती-शिवाय सत्याचे दर्शन कसे होणार ?

असत्य म्हणजे काय हे जर कळले तर सत्याचा उदय झाल्याशिवाय कसा राहील ? सत्याचे आणि असत्याचे असे ढोबळ वर्गीकरण करून कसे चालेल ? अर्धवट कळलेल्या जीवनाचा कुणी तरी प्रभावी आवाजात पुकारा करतो आणि आपण मनाच्या पोकळींत तो साठवून ठेवतो. एका आंधळ्याने दुसऱ्या आंधळ्याला खांद्यावर घ्यावे आणि वाट दाखवावी त्यातलाच हा सारा प्रकार. गांधारीप्रमाणे डोळ्यांना पट्ट्या बांधूनच जणू आपण जगत असतो. बाहेरचे असत्य बघायचे आपण टाळतो आणि अंतरीच्या असत्याकडेही भिऊन आपण डोळेझाक करतो. सारखे आपण भीत असतो...आणि भिऊन पळत असतो.

कानांवर आणि डोळ्यांवर हात ठेवून जीवन कसे दिसेल ? कसे कळेल ? मला तर सारे जीवन पहायचे होते. बरे-वाईट, खरे-खोटे, सुंदर-असुंदर साऱ्या जीवनाचे मला मोकळे दर्शन हवे होते. जीवनदर्शनाच्या आड सत्यासत्याच्या काल्पनिक भिंती उभ्या राहिलेल्या मला नको होत्या. सूर्याचे दर्शन झाले की सूर्यफूल जसे पूर्ण उमलते, तसे जीवनाच्या दर्शनाने मला पूर्ण उमलायचे होते.

ख्रिस्ताच्या जीवनातल्या एका प्रसंगाची मला आठवण झाली. व्यभिचार केलेल्या एका स्त्रीला लोकांनी ख्रिस्तासमोर आणून ठेवले. दगडांनी ठेचून काढण्याची शिक्षा तिला द्यायची होती. ख्रिस्ताच्या न्यायबुद्धीची जणू त्यांना कसोटीच पहायची होती. पण ख्रिस्ताचे मत नीतिग्रस्त नव्हते. ज्याचे मन कधी सुद्धा विषयवासनेने शबलित झाले नसेल त्याने तिच्यावर पहिला दगड मारावा असे त्याने निक्षून सांगितले. डोळ्यांवर आणि कानांवर हात ठेवणाऱ्या एकाही नीतिवंताची दगड उचलण्याची छाती झाली नाही. ही क्षमावृत्ती ख्रिस्तांत कुठून आली ? असीम कारुण्याचा हा झरा त्याच्या मनात कुठून उगवला ? याचे एकच उत्तर आहे. डोळे पूर्ण उघडून ख्रिस्त जीवन बघत होता. माणसाच्या

दुर्बलतेची त्याला जाणीव होती; आणि त्याच्या सामर्थ्याचीही योग्य कल्पना होती. सत्यासत्याच्या तटभिंती निर्मून आपल्या संवेदनेला त्याने कोंडले नव्हते.

लहानपणीच्या माझ्या शिक्षकांची आठवण होताच तीन माकडांच्या मूर्तीतून व्यक्त झालेले तत्त्वज्ञान मला शिळे आणि व्यर्थ का वाटले याचे रहस्य मला उलगडले. त्या माकडांप्रमाणेच माझे शिक्षक मला कानांवर हात ठेवायला शिकवीत होते. तेच मला नको होते. गांधारीचे हे अंध पातिव्रत्य स्वीकारण्याची माझी इच्छा नव्हती. डोळे उघडून मला जीवन बघायचे होते. पूर्णपणे—जसे असेल तसे बघायचे होते.

माझ्या मित्राने मोठ्या प्रेमाने पाठविलेली वाढदिवसाची भेट मी माझ्या टेबलावर ठेवून दिली आहे. जे जे लोक माझ्या घरी येतात त्यांना ती सांगत असते की, " कानांवर हात ठेवा, वाईट असेल ते ऐकू नका. डोळ्यांवर हात ठेवा. जे वाईट असेल ते पाहू नका. " पण मला मात्र वेगळाच संदेश मिळतो. जणू ती मूर्ती मला सांगत असते की, " डोळे पूर्ण उघडून जीवन बघ. कान पूर्ण उघडून ऐक. सत्य कळले, तर असत्याच्या भीतीने तोंडावर हात ठेवण्याची जरूरी पडणार नाही. जीवनसमृद्धीच शब्दांतून व्यक्त होईल. Out of the abundance of the heart the mouth speaketh. "

● ● ●

# २१. वॉशिंग्टनची कुऱ्हाड

तो शोध मला लागला तेव्हा धक्काच बसला. माझे डोळे खाडकन उघडले. सकाळी झोपेतून उठल्यावर सहज डोक्यावरून हात फिरवावा, आणि तिथे दोन शिंगे उगवलेली दिसावीत, तसा धक्का मला बसला. तोंड लपवून पळून जाणाऱ्या एखाद्या माणसाला अनपेक्षितपणे पकडावे तसे मीच मला जणू काय पकडले होते ! माझीच मानगूट पकडून मी जोरात खडसावले होते :

" मिस्टर, मी ओळखतो सगळं ! असं पळून जाऊन नाही भागायचं. " या अनपेक्षित दरडावण्याने मला धक्काच बसला होता.

गोष्ट साधीच होती. नेहमीपेक्षा काही फारसे वेगळे घडले होते, अशातला भाग नाही. घाईच्या वेळी गाडी चुकू नये म्हणून मी तिकीट न काढताच गाडीत चढलो. माझे स्टेशन आले तेव्हा खिशातली फणी काढून केसांवरून फिरवावी तितक्याच सहजपणे मी गर्दीचा फायदा घेऊन बाहेर निसटण्याचा विचार केला.

...हूं ! त्यात काय मोठेसे ?

——अरे हो ! पण विचारले कोणी ?

कोणी विचारले म्हणजे ! विचार येऊ नये ?

——त्यात विशेष काही नाही हे स्वतःला पटवून देण्याचा इतका खटाटोप कशासाठी पण ?

...नॉन्सेन्स ! खटाटोप बिटाटोप कुछ नही ! ! आय् ॲम् शुअर

**मंगेश पाडगावकर**

अबाउट् इट् !

'शुअर' या शब्दाचा मी बेफिकिरीने सिगारेटसारखा झुरका घेतला. घाम आला नसतानाही खिशातून रुमाल काढून तोंड पुसले ! शर्टची कॉलर व्यवस्थित होती; पण मी उगीचच ती आणखी व्यवस्थित करण्याचा प्रयत्न केला.

नकळतच माझ्या चालण्याचा मी नेहमीपेक्षा अधिक रुबाब आणला. काही तरी विशेष साधावयाचे असले की मी उगीचच अधिक ऐटीने चालण्याचा प्रयत्न करतो !

तिकिटे घेणाऱ्याचा पांढरा डगला पाहिला तेव्हा माझ्या आत्मविश्वासाचे चाक भूमीने गिळल्याची मला जाणीव झाली ! 'शुअर' या शब्दाचा झुरका वाजवी-पेक्षा जोरात घेतल्यामुळे मनाला ठसका लागलेला मी स्पष्टपणे पाहिला.

——म्हटलं नव्हतं मी, हे झेपणार नाही म्हणून ?

...जाऊ दे ! असत्याची वाट आपली नव्हेच !

——आलं लक्षात ! आलं लक्षात !

...सत्य तेचि परब्रह्म ! भरा आता पैसे ! !

तिकीट नसल्याचे मी स्वतः होऊन कबूल केले. त्यानंतर पुढील शास्त्रोक्त विधी पार पाडला. तो पार पाडल्याची पावती घेतली आणि रस्त्यावर आलो.

रस्त्यावर येऊन चालू लागलो तेव्हा मी कोणी तरी वेगळाच—उदात्त पातळी-वरचा जीव आहे याची मला जाणीव झाली होती. कर्णासारखे माझ्या रथाचे चाक भूमीने गिळले नव्हते. धर्मराजाच्या रथासारखे जमिनीच्या वर एक वीत ते चालत होते—नव्हे दौडत होते ! !

माझ्या सत्यप्रियतेच्या अभिमानाने माझे मन भरून आले. गोष्ट साधीच. छे ! पण साधीच कशी ? साधी, मोठी, लहान, थोर अशा पायऱ्याच पाडणे मुळी चुकीचे आहे. जीवन म्हणजे काय फक्त मोठ्याच घटना ? मुळीच नाही. उलट अशा लहान लहान प्रसंगांचेच जीवन बनलेले असते, या सुंदर वाक्याने माझ्या मनात स्वतःभोवतीच गिरकी घेतली आणि त्या वाक्याभोवती टाळ्यांची अनेक गोंडस कबुतरे फडफडली.

खरेच, मी मोठ्या तत्त्वनिष्ठेने वागलो. सत्यप्रियतेची कसोटी अशा बारीक-सारीक प्रसंगांनीच होत असते. इतक्या गर्दीतून निसटून जाणे कठीण थोडेच होते ? मला ते सहज करता आले असते. अनेक लोक तसे करतात. पण

लोक काय वाटेल ते करीत असतील. त्या अनेकांतला एक मी थोडाच होतो! मला सत्याची चाड होती. माझी पातळी वरची...!

...पण अचानक माझ्यातल्या 'कोणी तरी' ने मला दरडावले. 'मला सत्याची चाड होती' हे माझ्या मनातले वाक्य, मांजराच्या पोराची मान चिमटीत धरून ते भिरकावून द्यावे, तसे त्याने माझ्या डोळ्यांदेखत भिरकावून दिले! अभिमानाच्या शिडातला वाराच त्याने काढून घेतला. मला माझ्याकडे डोळसपणे बघणे भाग पडले!

तिकीट न काढता बाहेर निसटणे सोपे होते हे खरे! अनेक लोक तसे करतात हेही खरे!! पण मला मात्र तसे करण्याची हिंमत नव्हती! असत्याने वागायलासुद्धा हिंमत लागते! जगातली बरीचशी माणसे सत्याने का वागतात याचा मला त्या क्षणी उलगडा झाला. सत्याविषयी त्यांच्या मनात मुळीच प्रेम नसते! अनीतीने, असत्याने वागण्याचे धैर्य त्यांच्याजवळ नसते. यदाकदाचित जर प्रकरण अंगावर उलटलेच; तर त्याचे परिणाम भोगण्याची त्यांची तयारी नसते. मग रडत-मरत का होईना, सत्यनीतीने वागण्याखेरीज दुसरा मार्गच त्यांना उरत नाही. असत्याचे भय आणि सत्याचे प्रेम या दोन गोष्टी साफ वेगळ्या आहेत!

दैनंदिन व्यवहारात सत्यप्रियतेचे सोंग आणणे मोठे सोयीचे असते. असत्याच्या मार्गाने जाणारे जे लोक आहेत, त्यांच्यापेक्षा नैतिक दृष्ट्या आपण श्रेष्ठ आहोत. ही भावना मोठी सुखद असते यात शंका नाही, आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत, असे वाटावे यासाठीच आपली जगण्यातली बरीचशी धडपड खर्च होत असते. ही धडपड यशस्वी होण्याचे सत्याचरणासारखे दुसरे सोपे, सोयीचे साधन नाही! इस्त्रीच्या कपड्याप्रमाणे नैतिक श्रेष्ठतेची ही भावना नेसून चारचौघांत मिरविता येते. तत्त्वज्ञानाचा आधार सापडतो.

डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराची शोकान्तिका अशी असते की, इतरांचे डोळे उघडे असल्यामुळे मांजर दूध पीत आहे हे त्यांना कळत असते. पण या सत्याचरणाची गोष्ट मात्र अगदी निराळी. इथे डोळे उघडे ठेवून खुशाल दूध प्यावे. डोळे मिटलेले असतात इतरांचे! सोयीसाठी एक गोष्ट करणे मात्र आवश्यक आहे! इतर लोक दूध पिऊ लागले की आपण आपले डोळे मिटून घ्यायचे. समाजव्यवस्था नीट, सुरळीतपणे चालावी, या दृष्टीने शिष्टाचाराचा हा

साधासोपा नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे.

मी अनपेक्षित रीत्या मला पकडले होते. असे पकडले की, पळून जाणे शक्यच नव्हते. विवेकानंदांची एक गोष्ट मला आठवली. संसाराला कंटाळलेला एक माणूस मोक्षप्राप्तीच्या आशेने विवेकानंदांकडे गेला. माणूस मोठा सज्जन होता. अंगांतल्या कोटासारखेच त्याचे सौजन्य, अगदी नीटनेटके, त्याच्या मापाचे होते. थोडेसे वाढत्या अंगाचेच ते शिवून घेतले होते असे म्हटले तरी चालेल.

विवेकानंदांकडे येऊन त्या माणसाने आपला मनोदय व्यक्त केला; परंतु विवेकानंदांनी त्याला मोठा तऱ्हेवाईक प्रश्न केला :

"तू कधी खोटं बोलला आहेस? चोरी केली आहेस?"

"छे! छे! मी तसं कधीच केलं नाही."

"मग तू घरी परत जा. खोटं बोल, चोरी कर...हे सारं जमलं की मग मला येऊन भेट. तोपर्यंत तुला मोक्ष अशक्य आहे."

त्या माणसाने पुढे काय केले हे मला माहीत नाही. आपल्या तोंडावरचा सत्याचा मुखवटा असा फाटल्यानंतर स्वतःकडे उघड्या डोळ्यांनी पाहणे त्याला शक्य झाले की नाही कुणाला ठाऊक! तिकिटाच्या बाबतीत प्रामाणिकपणा दाखवून मी सत्याचे श्रेय खिशात टाकले होते. अशाच तऱ्हेने मोक्ष खिशात घालण्याचा त्या सज्जन माणसाचा बेत होता.

सत्य पचविण्यासाठी आतड्यात त्राण हे हवेच! छडीच्या धाकाने गुपचूप अभ्यास करणाऱ्या पोराला ज्ञानाची भक्ती आहे असे कोण म्हणेल?

माझ्या सत्यप्रियतेच्या वास्तव स्वरूपाचा असा अचानक शोध मला लागला होता. हा शोध लागला तेव्हा मी क्षणभर हादरूनच गेलो. लहान मूल खेळताना आपल्या मनासारखे काही झाले नाही की कांगावा करून सगळाच खेळ ते उधळून टाकते. मीही प्रथम कांगावा करून ही नवीन जाणीव उधळून टाकण्याचा प्रयत्न केला.

छे! हा शोध फारच गंभीर होता! या द्वाड शोधाने माझ्या प्रतिष्ठेची परीटघडी साफ चुरगाळून टाकली होती. माझ्या अहंकाराला भर रस्त्यात टपली मारली होती!! मी ऐन रुबाबात असताना हा शोध केळयाची साल होऊन माझ्या पायाखाली आला होता.

आता मला माझ्याकडेच खोडकरपणे, मिष्किलपणे पहाणे भाग पडणार होते. नेमके हेच मी टाळीत होतो. हे टाळण्यासाठीच प्रतिष्ठेची मला आवश्यकता वाटत होती. मीच माझ्याकडे खोडकरपणे पाहू लागलो, तर मला माझ्याविषयी आदर कसा वाटणार? आपण मूर्ख असलो—आणि बहुधा असतोच—तरी आपण शहाणे आहोत असा आत्मविश्वास वाटणे यातच आपले यश असते. जगातल्या बहुतेक यशस्वी माणसांत असाच आत्मविश्वास असतो! पण या शोधाने धक्का देऊन माझा आत्मविश्वास पार उडवून लावला होता. सत्याचा स्वीकार करणे मला भाग पडले होते. स्वीकाराच्या आरशात मी स्वच्छपणे माझे प्रतिबिंब पाहिले!

जॉर्ज वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीची गोष्ट वाचून मी लहानपणी भारावून जात असे. असाच काही तरी प्रसंग आपल्या आयुष्यात घडावा आणि आपल्याही सत्यभक्तीची कसोटी व्हावी असे मला सारखे वाटे! हे भाबडे स्वप्नरंजन मी अनेक वेळा माझ्या मनात घोळवीत असे. प्रसंग घडो न घडो, विजय माझा होणार हे मी आधीच ठरवून टाकले होते! माझ्या वडिलांनी मला कुऱ्हाड कधीच आणून दिली नाही. कारण ती झाडावर चालविण्याआधी मी माझ्याच पायांवर चालवणार याची त्यांना खात्री असावी!!

या प्रसंगाच्या निमित्ताने ती जुनी आठवण जागी झाली, तेव्हा मनात घोळविलेले ते स्वप्न असे अचानकपणे खरे झाले होते. जॉर्ज वॉशिंग्टनप्रमाणेच मी माझी चूक मोठ्या धैर्याने कबूल केली होती. कुऱ्हाड आणि आगगाडीचे तिकीट हा तपशिलाचा फरक; पण तत्त्व मात्र एकच!

पण छे! जगाकडून तर सोडाच, परंतु स्वतःचे स्वतःकडूनही कौतुक करून घेणे माझ्या नशिबी नव्हते! माझ्या सत्यप्रेमाच्या मुखवट्याची जाळी झाली होती. वॉशिंग्टनची कुऱ्हाड माझ्या अहंकाराच्या मुळावरच बसली होती!!

मार्क ट्वेनचे एक मिष्किल वाक्य मला आठवले. एके ठिकाणी त्याने लिहिले आहे, "जॉर्ज वॉशिंग्टनपेक्षा मी श्रेष्ठ आहे. कारण त्याला असत्य बोलताच येत नव्हते. मला येते, पण मी बोलत नाही."

मार्क ट्वेनप्रमाणे मलाही शोध लागला होता. तसा नव्हे, थोडा वेगळा : मार्क ट्वेनला असत्य बोलता येत होते, पण तो बोलत नव्हता. मला असत्य

बोलता येते; पण बोलण्याची हिंमत नसते म्हणून मी सत्य बोलतो.

——आम्हा दोघांत श्रेष्ठ कोण हे मला अजून ठरवायचे आहे !

● ● ●

## २२. अवकाश

'सर्व वस्तुमात्रांना पोटात घेणारी, अनादिअनंत अशी जी अवकाशाची पोकळी ती म्हणजे अवकाश. दृष्टीच्या मर्यादांपलीकडे अफाट पसरलेली, पृथ्वी-चंद्र-तारे इत्यादी ग्रहच नव्हे तर अशा आपापल्या सूर्याभोवती फिरणाऱ्या असंख्य ग्रहमाला जीत सामावलेल्या आहेत, ती विस्तीर्णता म्हणजे अवकाश. आइन्स्टाइनने मांडलेल्या कल्पनेप्रमाणे अवकाश म्हणजे......'

"—काय गडबड आहे रे! जरा हळू—नाहीतर दुसरीकडे जा बघू खेळायला......"

—मी अवकाशावरचा एक लेख वाचत होतो. पण पोरींच्या आवाजांत लक्ष लागेना. फारच कटकट व्हायला लागली तशी रागाने मी पुस्तक मिटले आणि त्यांना खोलीतून हाकलून देण्यासाठी वर बघितले. खुसूखुसू आवाज येत राहिला, पण मुली दिसेनात; आणि मग लक्षात आले की आवाज पलंगाच्या खालून येत आहे. मी वाकून खाली बघितलं. छोट्या छायाने आपल्या मैत्रिणींना जमवून पलंगाखाली भातुकली मांडली होती. एका बाजूला खेळातल्या चुली ठेवल्या होत्या. छोट्या पोळपाटावर लाह्या लाटून त्याच्या चापटपोळ्या तव्यावर भाजल्या जात होत्या आणि बाजूला लहानशा सतरंजीवर छायाच्या मैत्रिणी मिटक्या मारीत त्या खात होत्या. जेवण मोठे रंगात आले होते. त्यांच्या त्या खेळाकडे बघताना मला वाटले, आइन्स्टाइनच्या कल्पनेतल्या अवकाशाचा अर्थ मला कळला नसला तरी त्या मुलींना तो समजला आहे. त्यांनी तो सहजगत्या

माधव आचवल

जाणला आहे. अवकाशाचे आणि स्वतःचे नाते त्यांनी ओळखले आहे. हा छोटासा संसार घर शोधीत पलंगाखाली का गेला? इवली इवली स्वयंपाकाची भांडी, लाह्यांच्या पोळ्या आणि दोन फूट उंचीची —काहीतरी कारणाने रडणारी—आणि रडताना 'डोळ्यातनं पाणी आलं' म्हणून पुनः रडणारी गृहिणी आणि तिच्या सख्या यांना माझी बसायची खोली अगदीच निरुपयोगी होती. तिची दहा फुटाची प्रचंड उंची—आणि त्याच प्रमाणातली लांबी रुंदी—हे काही जमत नव्हते. एखाद्या मोकळ्या थिएटरमध्ये एकटेच फिरताना आपणाला त्या भयाण विस्ताराची जी दबकून टाकणारी जाणीव होते—तशी त्यांना माझ्या खोलीत होत असावी. चिमण्यांनी घरटे बांधावे तितक्या सहजतेने त्यांनी पलंगाखाली घर मांडले. तिथे उंची मापात होती. लांबी-रुंदी कशी नेमकी होती. थोडासा अंधार होता. मुख्य म्हणजे बाहेरच्या कोणाची दृष्टी जाऊन विरस होणार नव्हता. तेथे त्यांची तान जुळत होती. त्या छोट्या अवकाशात एक छोटे विश्व घडवता येत होते.

"...ए छायाताई. मला पण भूक लागली. मला दे ना एक पोळी..."

"—तू जा. बाहेर जा. आमच्यांत नको येऊ. जा बघू आधी!" ती तणतणत म्हणाली.

मी त्यांच्यांत बसत नव्हतो. ते विश्व निराळे होते आणि त्या विश्वाच्या प्रमाणात मला काही स्थान नव्हते. ज्या वेळी माझ्या साऱ्या कृतींना अवकाशाशी नाते जोडणें इतके जरुरीचे वाटत होते, तो काळ फार मागे राहिला होता. आज अवकाश म्हणजे काय हे मी पुस्तकातून वाचीत होतो. आज नाते दुरावले होते. अवकाशाची आज जाणीवही होत नव्हती.

——पण महुव्याच्या समुद्रकिनारी एकदम अवकाश असा जाणवला होता. वृक्षहीन खडकाळ टेकडी एकदम तुटून समुद्राला मिळाली होती. तुटक्या कपारीच्या तळाशी वाळूचा पट्टा होता—आणि क्षितिजापर्यंत पसरलेले पाणी हळूहळू पुढे सरकत होते. मागच्या कपारीत, लाटांच्या सतत आघाताने एक प्रचंड गुहाकार निर्माण झाला होता. वरचा संबंध कडा गोलाकार घेत बाहेर झुकला होता. संध्याकाळच्या सूर्यप्रकाशात या झुकलेल्या भागाची काळी छाया त्या गुहाकार कपारीवर पडली होती. समोरच्या विस्तीर्ण मोकळ्या निळ्या पाण्याकडे आणि त्यावर टेकलेल्या बहुरंगी अर्धगोलाकडे बघितले आणि मागच्या बाजूची

काळी-करडी, झाकलेली, आणि पोटात ओढते आहे असे वाटून अंगावर भीतीचा शहारा आणणारी कपार बघितली...सभोवतालचा सर्व अवकाश जिवंत झाला... सिद्ध आकाराने जाणवू लागला. या कपारीवर भरतीच्या वादळात प्रचंड आघाताने लाटा फुटल्या असतील. त्या लाटांचा फेस अंगावर पडताच चमकून एखादा धीटपणे पुढे डोकावणारा खेकडा गुपचुप मागे सरकत आपल्या कपारीतल्या बिळात गेला असेल...

माणसाला ही अवकाशाच्या अशा प्रचंडतेची भीती वाटत असावी; नाहीतर त्याने घरे का बांधली ? अन्न-वस्त्र-निवारा या गोष्टी स्पष्ट आहेत. पण कुठे तरी, या अथांग विस्तीर्णतेत, आपल्या स्वतःला अनुरूप असा अवकाशाचा आकार घडवण्याची इच्छाही त्याच्या मनात असली पाहिजे. ती तितकीशी स्पष्ट नसेल; पण माणसाचे अतर्जीवन कुठे स्पष्ट असते ? कुठे सांगता येते ? कुठे धरता-पकडता येते ? शरद्बाबूंचे सारे आयुष्य याच गोष्टीमागे धावण्यात गेले. त्यांच्या कादंबऱ्यांतली सारी माणसे व्यथित आहेत, दुःखी आहेत. पण ही दुःखेच निराळी आहेत. ती पैसे नसल्याची, अन्न न मिळण्याची, काही लागल्या-दुखल्याची दुःखे नाहीत. ती दुःखे आहेत मनातल्या भावनांचे तंतू एकमेकांना छेदतात तेव्हा उठणाऱ्या झंकाराची; या अथांग विश्वातल्या भयाण एकलेपणाची; जे हरवले आहे ते कधी मिळणार नाही हे माहीत असूनही चालणाऱ्या उरस्फोडीची. अवकाशाशी नाते जुळवण्याची, अवकाश घडवण्याची—सुप्त इच्छा हीही कदाचित अशीच जाणीव असेल. माणसाच्या हरघडीच्या जीवनात ती नसेल दिसत. पण त्याच्या कलाकृतीत मात्र ते सतत दिसते...संगीतात दिसते—आणि वास्तुकला ही तर सर्वस्वी याच जाणिवेवर आधारलेली.

लाओत्झने म्हटले होते, "कपाचे 'कप-पण' कशात आहे ? त्याने आकारलेल्या पोकळीत. विस्तीर्ण पसरलेल्या या अवकाशातून, त्याच अवकाशाचा थोडा भाग त्याने ज्या तऱ्हेने निराळा करून आरेखिला, त्यात." आणि ते खरे नाही का ? जरा का हे नाते बिघडले, निराळ्या तऱ्हेने, खालच्या बाजूने जुळू लागले की कप कामातून गेला. मग तो अंड्याच्या कवचाइतका पातळ, सुरेख चिनी कप असो की जाड थबथबीत मातीचा वाडगा असो. धूर म्हणजे तरी काय ? समुद्रात बुडवली एक बालदी...बालदीत पाणी...बाहेर पाणी. पाणी एकच, आणि तरीही निराळे. अवकाशात रचलेल्या वस्तूच्या मध्येही पुनः अवकाशच

असते. ज्या तऱ्हेने हे आतले अवकाश वास्तूने घडवलेले असते; ज्या तऱ्हेने या आतल्या अवकाशाचे आतल्या जीवनाशी तसेच बाहेरच्या अवकाशाशी व त्यातल्या वाहत्या जीवनाशी वास्तूने संबंध रेखलेले असतात त्याच वास्तूचे वास्तुपण. वास्तूचे जीवन तत्त्व खरे ते—बाहेरची वेलबुट्टी नव्हे की रंगरंगोटी नव्हे. ती सारी साधने—दुय्यम. लिपस्टिक चेहऱ्याची शोभा वाढवील, पण सौंदर्य जाणवायला हवे ते आतल्या देहाचे. झाडाची साल आधी तयार करून मग काही तीत झाड ठासून भरीत नाहीत. आपल्या लाकडाचे आणि सालीचे जे नाते तेच घरांतल्या अवकाशाचे आणि अवकाशाभोवती असलेल्या आवरणाचे. केवळ साल म्हणजे जसे झाड नव्हे, तसे नुसते आवरण म्हणजेही घर नव्हे. वास्तूमधल्या अवकाशाचे व बाहेरच्या अवकाशाचे सचेतन संबंध जुळले की वास्तू जिवंत होते. हे संबंध एका पद्धतीने जोडले की शिशु-कुंज ( Kinder-garten ) तयार होतो आणि दुसऱ्या पद्धतीने जोडले की तुरुंग. पहिल्यात जरुरी असते ती, बाह्य व आंतर आवकाशाची अखंडता शक्यतो टिकवण्याची; आतल्या अवकाशाशी निसर्ग एकरूप करण्याची; आपल्या अवकाशाला, आत वागडणाऱ्या बालकांच्या प्रमाणात आणणे आणि मग ते, प्रकाश, रंग, पोत, उभ्या-आडव्या पातळ्या, वास्तूची घनता आणि घडवणुकीची साधने यांच्या उपयोगातून उत्फुल्ल खेळकरपणाने ते भारणे, याची. दुसऱ्यात याच घटकाचे संघटण अगदी वेगळ्या पद्धतीने होते. तेथे आतले आणि बाहेरचे विश्व शक्यतो एकमेकांपासून अलग, विभक्त करण्याची आणि पुनः आतले वातावरणही करड्या शिस्तीचे; आत राहणाऱ्या व्यक्ती समाजापासून आपल्या कर्मानेच अलग पडल्या आहेत याची सतत जाणीव देणारे असे करण्याची जरुरी असते. येथे सर्व घटकच निराळे होतात, निराळ्या तऱ्हेने उपयोगात आणले जातात. त्यांना खऱ्या अर्थाने वास्तुरूप देण्यासाठी आणखीही पुष्कळ करावे लागते. पण विशिष्ट भावपरिपोषाच्या दृष्टीने केलेली काल आणि अवकाशाची बंदीश हा जसा संगीतकलेचा तसाच वास्तुकलेचाही प्राण आहे.

घर वाढते तेही त्याच्याच आधाराने. घरातला अवकाश—त्यातले घटक जेव्हा एकमेकांशी सचेतनपणे एकरूप होतात, त्याचवेळी ते खऱ्या अर्थाने घडले जाते. घरातले निरनिराळे भाग कौटुंबिक जीवनाच्या निरनिराळ्या उपयोगासाठी असतात—आणि म्हणून त्या त्या जीवनभागाशी निगडित असणाऱ्या भाववृत्तीशी संबंधित असतात—इतके की त्या भाववृत्ती जागृत करण्याची कुवतही

त्यांच्यात असते. पण त्यासाठी या घटकांना प्रथम स्वतःचे अस्तित्व असावे लागते. हे आतले अवकाशाचे भाग आकार कसे घेतात ? कागदावर एक रेघ मारली. आता ही रेघ लहान की मोठी ? काहीच नाही. ती नुसतीच रेघ आहे. पण याच रेघेच्या शेजारी ही दुसरी लहान रेघ आल्याबरोबर ती मोठी झाली. एकमेकांच्या सान्निध्यातून–नात्यातून या अवकाशाच्या जागा अस्तित्व घेतात. घराचा घरपणा आपणाला जाणवतो तो आपल्या संवेदनानुभवांतून. म्हणून अवकाशाच्या जागा भरण्यासाठी मग आपल्या विशिष्ट भाववृत्तीशी निगडित असलेले, स्पर्श-रूप-रस-गंध आणि नाद यांच्या संवेदनांतील विशिष्ट घटक शोधून त्यांचा योजनाबद्ध उपयोग करावा लागतो. संवेदनांनी घडविलेली वास्तुकलेची ही भाषा खरेच किती समृद्ध आहे ! पाय टेकलेले असतात जमिनीवर. तिचा फरशीचा–गारपणा किंवा गालिचाचा मऊ–रुतलेपणा. पहिला अनुभवच मुळी स्पर्शाचा. पायऱ्या चढताना बाजूच्या लोखंडी कठड्याच्या करड्या गुळगुळीतपणावरून हात घसरतो तो समोरच्या लाकडी दरवाजाच्या खिप्रगी-खरबरीतपणावर स्थिरावेपर्यंत. डोळे दाखवीत असतात. भिंतीचा दगडी हिरवटपणा, विटांचा मऊ आपलेपणा किंवा गिलाव्याचा सफेद दूरपणा. बूड जर नीट ऐसपैस कोचात मजेत बसले असले तर गप्पांत रात्र निघून जायला हरकत नाही. पण घरपट्टी वसूल करायला आला असला तर त्या सरळ, उंच पाठीच्या लाकडी खुर्चीवर बसा. काम होताच निघून जाल. समोरच्या खिडक्यांवरील पडद्याचा गर्द भरीवपणा, काचेचा पारदर्शक नितळपणा, कपाटांतल्या पुस्तकांचा जुना शहाणपणा, आणि घरांतल्या साऱ्या वस्तूंतून जाणवणारा गृहिणीच्या हाताचा मृदू...अरे–पण तो पहा बाळ रांगत रांगत चपलांच्या कोपऱ्यापर्यंत गेला. मुला, काढ ती चप्पल तोंडातून ! ही मोठी वाढलेली शहाणी-सुर्ती माणसे ! त्यांना तुझी गंधाची चव नाही. घराला लावलेल्या नवीन रंगाच्या, स्वयंपाकघरातून येणाऱ्या फोडणीच्या किंवा या मोठ्या माणसांच्या घामाच्या वासापेक्षाही वापरलेल्या जुन्या कातड्याचा गंध खोलीत सर्वांत तीव्र होता बाळाला तो जाणवला.

खोलीतल्या प्रकाशाचा आणि त्यामुळे दिसणाऱ्या रंगांचा आपल्या भाववृत्तीशी किती निकटचा संबंध असतो ! या झगझगाट प्रकाशांत नेहरूंचे परराष्ट्रीय राजकारण कसे मुळापासून चुकले आहे हे कदाचित ओरडून पटवून देता येईल, पण त्या लाज-लाज-लाजणाऱ्या घरातल्या षोडशवर्षा मुग्धेला या ‘ पाहुण्यां ’शी कसे

बोलता येईल बरे? अरे त्यांच्यासाठी खोलीच्या कडेस, जिथे जागा थोडी अवघड आहे, प्रकाश थोडा कमी आहे, रंग कसा मंद आहे आणि कुजबुजले तर कर्ण्यांतल्यासारखा आवाज घुमत नाही, अशी एक कोपरी असू द्या. सत्य-नारायणाची कथा दिवाणखान्यात कराल—पण कलावतीची कहाणी कुठे घडेल? आवाजाने तर साऱ्या अवकाशालाच अस्तित्व येते. समोरच्या भिंतीवर आपटून परतणारी नादाची लाट खोली भरून टाकते. लहान मूल रडत असले तर स्वयं. पाकघरातून दिवाणखान्यात येताच क्षणभर तरी रडायचे थांबते, आपल्या आवा-जाच्या बदललेल्या प्रतिध्वनीचा कानोसा घेते. (आणि पुनः भोकाड पसरते!)

संवेदनांच्या—आणि संवेदनांच्या आपल्या भाववृत्तीशी असलेल्या विशिष्ट संबंधांच्या—तरल जाणिवेतून घरातल्या अवकाशाच्या जागा भरणे शक्य होते. यांत आकाराची जाणीव ही सर्वांत महत्त्वाची. आमचे शहर ही एका जुन्या संस्थानची राजधानी. पाहुणे आले, की त्यांना राजवाडा दाखवायला घेऊन जावे लागते. राजमहालातल्या शयनगृहात गेलो की मला नेहमी एक प्रश्न पडतो. या चाळीस बाय पन्नास फूट, आणि चांगल्या सतरा अठरा फूट उंचीच्या हॉलमध्ये राजाराणीचे कसे होत असेल? ही प्रचंड पेटी, आणि तिच्यात ५–५॥ फूट उंचीची राजाराणी आणि मोठा म्हटला तरी ७–८ फुटाचा पलंग!—एकंदरीत कठीणच. या दोघांत अवकाश हाच मुळी तिसरा भिडू नेहमी असायचा! राजा झाला म्हणून त्याचे वैभव वाढेल. उंची, आकार काही सामान्य माणसापेक्षा मोठा होत नाही. माणसा-माणसांतली नाती या आकाराशी बांधलेली, आणि हे आकार बाजूच्या अवकाशाशी. येथे सारेच गणित चुकलेले. हा राजवाडा विकत घेतल्यावर हे शयनगृह बदलून टाकायचा निर्णय पक्का करून मी दरवेळी परत यायचा आणि तूर्त, माझी अगदीच आगपेटीच्या आकाराची खोली थोडी मोठी कशी भासविता येईल याचा विचार करायचा!

अवकाशाचे आकार त्यातील वस्तूंच्या योजनेतून किंवा एकमेकांमधील संबंधांतून, आहेत त्यापेक्षा निराळे दाखवता येतात. प्रवेशद्वाराजवळची लॉबी जर आकाराने लहान आणि उंचीने कमी असेल, तर तीतून दिवाणखान्यात जाताच तो खूप 'मोठा' वाटतो. घरातल्या अवकाशाच्या जागांना विभागणाऱ्या उभ्या पातळ्या—भिंती—विभागतानाही या सर्व जागा एकाच अवकाशाचे भाग आहेत असे दाखवू शकल्या; सामान्यतः जाणवणारे घराचे 'पेटीत पेटी-तिच्यात पेटी'

असले स्वरूप मोडू शकल्या तर आतली अवकाशाची जाणीव एकदम निराळी होते. येथे दरवाजे हे फक्त जाण्यायेण्याचे मार्ग न होता अवकाशाची गतिमानताही दाखवू शकतात. ( अर्थात अभ्यासिकेच्या दाराजवळ ही गतिमानता, तसेच आईविरुद्ध तक्रार घेऊन रडत आलेले चिरंजीव ह्या दोघांनाही रोखून धरता येते. ) रंगाच्या उपयोगातून वस्तूंच्या जवळ दूरपणात हवा तो आभास उत्पन्न करता येतो. वस्तूसुद्धा ठेवताना हव्या तेथे 'अंडरलाईन' करता येतात. खोलीच्या दोन्ही भिंतींना ज्याच्या कडा समांतर आहेत अशा टेबलपेक्षा, कोन करून बसलेले टेबल हे थोडे तरी 'जास्त' टेबल, असते—आणि त्याच प्रमाणात त्यामागे बसलेली व्यक्तीही. एखाद्या 'पार्टी'बरोबर पांच—सात लाखांचा सौदा करायचा असला तर शहाणा व्यापारी हा सौदा शक्य तो पार्टीच्या ऑफिसमध्ये करणार नाही, स्वतःच्या ऑफिसमध्ये करील. टेबलाच्या कुठल्या बाजूला आपण बसलो आहो हे ( बंदुकीच्या कुठल्या कुठल्या बाजूला आहोत या इतके नसले तरी सुद्धा ) काही कमी महत्त्वाचे नसते. स्वतःच्या ऑफिसमध्ये, आपल्या खुर्चीवर मागच्या भिंतींनी ठामपणे आकारलेल्या अवकाशात तो राजा असतो. टेबलाच्या पलिकडल्या माणसाला, आपल्या पाठीमागे खूप मोठी, नुसती जागाच आहे ही जाणीव उगाचच त्रास देत राहते. परिणामी एखाद टक्का जास्त कमिशन मिळणे सुलभ होते. ( अर्थात् पार्टीही तशी निब्बर आणि खमकी मिळाली तर गोष्ट निराळी ! )

वास्तूने आकारलेले अवकाश ही एक स्वतंत्र, स्वतःचे जीवन असलेली वस्तू आहे याची जाणीव झाली की मग घर बांधणे म्हणजे संडासाच्या फरशा आणि न गळणारी स्लॅब एवढेच नसून एक फार मोठी मौजेची आणि मन व्यापून टाकणारी गोष्ट आहे असा अनुभव येतो. वास्तूतल्या साकारलेल्या आणि भरलेल्या अवकाशाला बाहेरच्या अवकाशाच्या अफाट विस्ताराशी जोडताना मध्ये एक दुवा लागतो. म्हणजे वास्तूच्या बाजूच्या मोकळ्या जागेची, तीमधल्या बागेची योजना. तिचे खरे यश, ती असा जोडणारा दुवा किती चांगल्या रीतीने होऊ शकते, यावर आहे. येथे घराच्या खिडक्या या भिंतीतली भोके असत नाहीत तर, आतले—बाहेरचे अवकाश त्यांच्यामधून हातमिळवणी करते. त्या कुठे असाव्यात हे, आतून कोणचे दृश्य दिसायला हवे—कोणचे झाकायला हवे, बाहेरच्या मानाने आत प्रकाश कुठे, किती व कोणच्या तऱ्हेचा यायला हवा;

आतल्या जीवनाचे बाहेरच्याशी संबंध कसे योजिले आहेत, यावर अवलंबून असते. घरातल्या भिंतींच्या रंगांना खोलीच्या खिडकीतून बाहेर बघताना दिसणाऱ्या निसर्गरूपातील रंगांनी साद घातली पाहिजे; बाहेरच्या पारिजातकाच्या सुवासाने रात्री शयनगृह सुरक्षित झाले पाहिजे. मोठ्या वृक्षांच्या पंखांखाली घराने निश्चित राहिले पाहिजे. त्यांच्या आकारांनी, घराच्या अवकाशात रेखलेल्या घनतेला उठाव दिला पाहिजे आणि बाहेरून—रस्त्यावरून येताना त्या वृक्षांच्या पर्णराजीने अवगुंठित असे घराचे जे पहिले रूप दिसेल ते स्मृतीतून जाता कामा नये !

दोन हाताचे तळवे एकमेकापासून थोड्या अंतरावर समोरासमोर धरले, की अवकाश आकारित व्हायला सुरवात झाली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या कमीअधिक उंचीच्या इमारती, त्यांच्यांवर पडलेला प्रकाश आणि त्यांनी एकमेकांवर आणि मधल्या रस्त्यावर पाडलेल्या छाया यांनी त्यांच्यामधला अवकाश आकारित होत जातो. अशा प्रत्येक आकाराला स्वतःचे अस्तित्व असते. नगरयोजना म्हणजे उपयोगाच्या दृष्टीने केलेली इमारती आणि रस्ते यांची मांडणी हे तर खरेच. पण नगरयोजना म्हणजे निळ्या आकाशाखाली सूर्याच्या प्रकाशात विस्तीर्ण भू-भागावर केलेली विशिष्ट घनाकार आणि त्यांच्यामधले अवकाश यांची मांडणी हेही तितकेच महत्त्वाचे. नादातल्या चढउतारावर, साद-पडसादावर, गर्द आणि रिकाम्या—वाट पाहणाऱ्या जागांवर आणि त्यांच्या कालांतून होणाऱ्या जाणिवेवर असे संगीत आधारलेले तसेच अवकाशाच्या तितक्याच तरल जाणिवेवर नगररचना आधारलेली. अवकाशाचेही सवाल-जबाब असतात. त्यातही सादाचे पडसाद उठावे लागतात. प्रत्यक्ष आतून फिरताना त्यांच्या, मनावर क्रमशः होणाऱ्या परिणामातूनच या दगड-विटांनी रचलेल्या नगराला ‘ सा रम्या नगरी ’ म्हणवून घेता येते. एखादा रस्ता समोर किंचित उंच चढत जाणारा असला की तेवढ्यामुळे दृष्टीला दिशा मिळते—आणि तिच्या टोकाला असलेल्या वास्तूला लगेच जास्त महत्त्व येते. साधे जिन्यावरून चढायचे झाले तरी अर्ध्या उंचीवर एक रुंद टप्पा असावा लागतो. शहरातल्या रस्त्यांमधून सांचलेल्या चिंचोळ्या अवकाशाच्या भागांनाही नीट भरपूर श्वास घ्यायला मधूनमधून असे टप्पे लागतात. या मोकळ्या जागांही आतल्या जीवनाच्या प्रवाहाने कशा भरल्या जातात हे गावातून फिरताना समजते. आठवडेबाजाराचा चौक आला की आजूबाजूच्या इमारतींनी आकारलेला अवकाश उडालेल्या धुळीने, मालाच्या तऱ्हेतऱ्हेच्या वासांनी आणि गजबजीने कुंद होऊन

जातो; तोच बाजार उठून गेला की सुन्न होऊन मधल्या वडाच्या पाराभोवती रिकामेपणाने गुंगत निपचित पडतो.

गावाच्या कडेला असलेल्या स्टेशनरस्त्याला लागले की हळूहळू सर्वच वातावरण थोडे बदलताना जाणवू लागते. घरे विलग होतात——अवकाश विरळ होते. मोठे घनाकार जाऊन छोटे त्याची जागा घेऊ लागतात. वस्तूंचा मजबूत कठीणपणा जाऊन अडपट स्वैरता दिसू लागते. मग नुकतीच बेवारशी मोकळी जागा लागते. खरे म्हणजे येथे आल्यावरच गाव दुरावते. आणि मग पुनः गर्दी होते. बकाल हॉटेले, त्यातले किरट्या आवाजात कर्कशपणे आणि घाईने गाणी ओकणारे फोनो, टांगे–घोडे, फळांच्या गाड्या, मोडकी दुकाने. ही गर्दी निराळी. हिचे नाते त्या पलीकडच्या, दोन दूरच्या गावांना जोडणाऱ्या रेषेशी. त्या तिऱ्हाइती जीवनप्रवाहाचा हा काठ असतो.

आणि प्रत्यक्ष प्लॅटफॉर्मवर सारे अवकाशच तिऱ्हाईत बनून गेलेले असते. येथले आवाज निराळे——जीवन निराळे. कुत्री लंगडी आणि कावळे गिधाडासारखे टपलेले——मुलाच्या हातांतले भजे लगोलग उडवणारे. गाडी येते; आतले लोक बाहेर बघतात. हे बाहेरचे प्राणी त्यांचे कोण होत ? शिटी वाजते आणि धूर सोडीत गाडी चालू लागते.

तिच्याकडे बघताना धुळीचा कण मात्र डोळ्यात गेला. काढता काढता डोळे लाल झाले. रिकामा त्रास. हा एवढासा कण. अगदीच चिमुकला. अणुपरिमाणूंनी घडवलेला. पण हायड्रोजनच्या एका अणूत——शास्त्रज्ञ सांगतात——एकच प्रोटॉनमध्ये असतो आणि याच्याभोवती एक इलेक्ट्रॉन विलक्षण वेगाने गिरक्या घालीत असतो. हे दोन्ही इतके लहान असतात, इतके लहान असतात, की त्यांच्या आकाराच्या प्रमाणात बघितले तर या दोघांच्या मध्ये अवकाशाची एक प्रचंड पोकळी असते असे म्हणावे लागते. दृष्टीच्या अलीकडे असलेला हा अवकाश, आणि पलीकडे अफाट पसरलेला, पृथ्वी-चंद्र-तारे इत्यादी ग्रहच नव्हे तर अशा असंख्य आपापल्या सूर्याभोवती फिरणाऱ्या ग्रहमाला ज्यात सामावलेल्या आहेत तो अवकाश ! ही दोन्ही निर्माण करणारा विधाता कोणी असो—पण अवकाशाचा स्वामी आहे खरा.

—स्वामींचा खेळ झाला, आणि गर्भातल्या बंदिस्त आणि मायेच्या

ल्हानशा अवकाशापासून, या अथांग, आणि तितक्याच अथांगतेने दुरावलेल्या अशा अवकाशापर्यंतचा प्रवास आमच्या माथी लागला !

● ● ●

## २३. हु गा व या ह वे खो ल....

...उगाचच घाई केली इतकी. सिनेमा सुरू व्हायला तर अजून वेळ आहे. चला सिगारेट ओढू, कोणकोण आलेय?...कोणी ओळखीचे दिसत नाही. चेहरे–? हं...! चला, सिगारेटच ओढावी. स्...स्...छे! पहिला झुरका आत ओढताना जो असा वर खेचलेला आवाज येतो, तो लिहायचा असला तर कसा लिहिणार? काय पण भाषा आहे! खरे म्हणजे आपण सरळ ओळीत का लिहितो? ओळी सुद्धा शब्दांच्या नादाबरोबर वरखाली व्हायला हव्या. पण नुसत्या वर-खाली करून काय होणार? आरोह–अवरोह दाखवता आला पाहिजे. अक्षरे लहान-मोठी करावी का? झालं! उगीच नसते प्रश्न लिहायला सांगितलेय कोणी? शांतपणे सिगारेट ओढ ना! आवाज आला. घंटांचा. सूरसागरापलीकडच्या मंदिराच्या घंटांचा असावा. तोच. पलीकडच्या रस्त्यावरून एक टांगा येतो आहे. नुसती गती. घोड्यांच्या टापांचा आवाजही इतक्या दुरून ऐकायला येत नाही. पाय हलतात. टांगा पुढे सरकतोय. नादाशिवाय गती. नादाशिवाय...एक सोनेरी मासळी सुळकन वर येत येत पाण्याबाहेर निघाली आणि डुबक्न आवाज करीत पुनः पाण्यात शिरली. तिच्या अंगावरच्या लकाकीचा एक किरण आत कोठे थरथरला. कुठे...कुठे गेला तो?

तेव्हाही असाच उभा होतो. याच कट्ट्यावर कोपर टेकून समोर पाहत. पण त्या दिवशी या गावातला माझा पहिला दिवस होता. सकाळी एकटाच बाहेर पडलो होतो. काम दुपारी होणार होते–आणि तोपर्यंत दुसरे काहीच नव्हते.

**माधव आचवल**

आता टांगा आला त्याच रस्त्याने या बाजूला आलो. अचानक समोर विस्तीर्ण तलाव पसरलेला दिसला आणि त्याच्या हलत्या पाण्यावरून मनही एकदम पुढे घसरले. तलावाच्या कडेने रस्ता आणि पलीकडची तांबट जुनी विटांची लांबच लांब इमारत. मध्येच तुटलेल्या छपरांची तिरकी रेषा आणि त्यातून वर चढलेला एक मनोरा. वेलीने वृक्षाला वेढावे तसे मनोऱ्याच्या वरच्या भागात एका गॅलरीचे छप्पर वेटोळे घालून लोंबले होते. उभ्या मनोऱ्याची सरळ रेषा खालच्या साऱ्या आडव्या, तिरक्या रेषांना पकडून धरीत होती. कशी तरी बांधलेली, कालाबरोबर वाढलेली इमारत. पण बाजूच्या पर्णराजीत, फुलांच्या झुपक्यांत, आणि माडाच्या उंच रेषेवर तोललेल्या झावळ्यांत कशी जेथल्या तेथे दिसत होती. इमारत आपल्या स्वतःच्या छोट्याशा टेकाडावर बसलेली–रस्त्यापासून त्यामुळे उंच उचललेली. अशा खालून वरच्या दृश्यात ती अगदी मांडून ठेवल्यासारखी आटोपशीर आणि स्वच्छ निरीदा धोतरावर बंद बटणांचा कोट घातलेल्या माणसासारखी दिसत होती. भिंतीच्या तांबट-लाल रंगांत मधूनमधून काळसर लालपासून तो सोनेरी रंगापर्यंतच्या अनेक तुटक्या रेषा दिसत होत्या. त्यांत मध्येच लाकडी खांब, त्यावरची कोरीव ब्रॅकेट्स्, गॅलरीचे नाजुक रेलिंग आणि वर चढवलेल्या वेलींच्या रेषा गुंतून गेल्या होत्या. पायऱ्यांच्या बाजूंना रंगीत फुलांचे ताटवे होते आणि समोरच्या पोर्चच्या छपरांवरून मधुमालतीचे घोसच्या घोस गर्दी करीत होते. रस्त्यालगतच्या बुटक्या भिंतींवरून बोगनवेलींचे गुच्छ फुलले होते. साऱ्या रंगांची शिंपण झाली होती—आणि त्या रंगांनी मी हरखून गेलो होतो. हे गाव मला आवडले होते. तेथे राहण्याच्या कल्पनेने मी सुखावलो होतो. फार दिवसांनी डोळ्यांचे पारणे फिटत होते.

इमारतीच्या रुंद काळसर पायऱ्या चढून जावे आणि उगीचच वरच्या पोर्चच्या खांबाला टेकून उभे राहावे असा मोह होत होता. पण गेलो नाही. विचार आला, तलावापलीकडून या छपर-मनोरा आणि माडांत गुंतलेल्या इमारतीचे पाण्यातले प्रतिबिंब पाहावे, आकाशावर रेखलेली बाह्यरेषा पाहावी. तलावाच्या काठाने चालू लागलो. कडेच्या हिरव्या पाण्यात वाळलेली पाने साचून-साठून राहिली होती. ही बाजूची उंच भिंत कशाची ? कशाची का असेना, पण तीवर पलीकडच्या वडाच्या पारंब्यांच्या हलक्या पुसट छायारेषा पडल्या होत्या, आणि जणू त्यांनाच वरच्या बहुरंगी बोगनवेलींच्या फुलांची पहाटस्वप्ने पडत होती.

पण हे दृश्य जरा वरून पाहायला हवे. कुठून पाहावे ? आणि या सिनेमाची गॅलरी दिसली. वर येऊन असाच टेकून उभा राहिलो होतो. तलावाच्या बाजूचे पुरातन वृक्ष, त्यांतून वर आलेली मंदिराची शिखरे, त्यांच्या पाण्यात गेलेल्या पायऱ्यांवर उभे राहून अर्घ्यदान करणारा साधू, पलीकडची ती लांबच लांब इमारत, तिची मनोऱ्याने उचललेली तिरकी रेषा आणि तिचे पाण्यातले प्रतिबिंब यांकडे पाहता पाहता सकाळच्या त्या वस्त्रगाळ, फिक्या खरवसासारख्या पिवळट प्रकाशात हे दृश्य एकदम स्थिर झाले. त्याचे चित्र झाले. आणि या चित्रातून अशीच त्या वेळीही एक नादाशिवायच्या गतीची रेषा हळूहळू पुढे गेली. त्या रेषेने हे दृश्य मनात कोरून ठेवले. पण ही सोनेरी मासळी अशी एखाद्या वेळीच का सुळकन वर येते ? इतक्या वर्षांनी आज पुन्हा दिसली. कुठे गेली होती ती ?

...ती गेली, कारण मी या गावात राहिलो, येथला रहिवासी झालो. आता मला माहीत झालेली की ती समोरची इमारत म्यूझिक कॉलेजची आहे. तिथे माझे काही मित्र शिकवतात, आणि काही विद्यार्थी संध्याकाळच्या क्लासला जातात. या तलावाचे नाव सूरसागर. तो महाराजांनी बांधला आणि त्याला पाण्याचा पुरवठा आजव्याच्या तलावातून होतो. ती उंच भिंत मुलींच्या शाळेची. युनिव्हर्सिटीचा स्टाफ मेंबर म्हणून मला हवे तर तलावात बोटिंग करता येईल. बोटिंगचा व्यायाम फार चांगला म्हणतात. पलीकडच्या बाजूला लहरीपुरा आहे. (या नावाने मला पहिल्या दिवशी हसू आले होते.) पण तो बाजार आहे हे मनाने नमूद ठेवले आहे. आणि हेही नमूद केले आहे की समोरचा रस्ता म्हणजे माझ्या घरून बाजारात जाण्याचा शॉर्टकट आहे. म्हणून मी याच रस्त्याने जातो. समोरच्या वाहनांतून वाट काढीत, सायकलच्या ब्रेकवर बोटे ठेवीत जाताना क्वचित तलावाकडे लक्ष गेले की कडेचे भिकारी दिसतात. त्या दिवशी ते कोठे गेले होते ? तिथेच असतील. पण मला दिसलेही नव्हते. आता ते दिसतात हे खरे. त्यांच्या फार जवळून न जाण्याची मी खबरदारी घेतो. आता या दृश्यातल्या प्रत्येक घटकांची मला ओळख पटली आहे. मनाने या सगळ्या बाटल्यांवर लेबले लावली आहेत आणि नीट योग्य त्या कप्प्यांवर त्या ठेवून दिल्या आहेत. हात घालताच मिळायला हव्यात. सकाळी जरा उशीर झाला की वाटते, ऊन फार झाले. कॉलेजात जायला उशीर होईल आणि पॅडलवर पाऊल जोराने पडते.

संध्याकाळी फिरायला म्हणून मी येथे येतो आणि बरोबर आणलेला गुंतवळा सोडवत बसतो. नलू मोठी झाली. तिला आता गायनाच्या क्लासला घालायला हवे. मुलांना लहानपणापासूनच थोडी कलेची संगत हवी. तो गोडबोले वर्गात फारच शहाणपणा करायला लागला आहे अलीकडे. एकदा फैलावर घ्यायला हवा. पेंडसे रिटायर झाल्यावर मग...एकदा डीनकडे हळू चाचपले पाहिजे. पाळणा कोठून आणावा ?...चला, उशीर झाला, सिगारेटचा शेवटचा झुरका मारून ती टिचकीने रेलिंगच्या पलीकडे उडवतो. तो लाल जळता ठिपका विझायची वाट पाहतो. पण तो विझतच नाही. कडेच्या गर्द हिरव्या पाण्यावरच्या वाळक्या पानावर तसाच पडून राहतो आणि मग आग तर लागणार नाही ना, असा खुळा विचार मनात येतो.

ओळख झाली. ओळख झाली आणि नवाई गेली. तिने ते डोळेही बरोबर नेले. त्यांच्या जागी हे कोणते आले आहेत ! स्वतः म्हातारे झालेले—विटलेले. स्पर्शानेच साऱ्या वस्तूंना वासे करून टाकणारे. कार्यतत्पर आणि मूर्ख डोळे. घर पाहण्याऐवजी ' २९० कसबा, ' एवढेच टिपणारे. आता हे डोळे काही अगदी नवीन, निराळे पाहिले तरच जरासे बिचकतात, गोंधळतात. एखाद्या सोनेरी मासळीची तिरीप अशी अचानक अंगावर आली तरच शहारतात, आणि त्या क्षणात फक्त डोळे होतात. नुसते रेषा, रंग, आकृती पाहू लागतात. क्वचित बोगनवेलीच्या झुकत्या फुलांत डुबून जातात. पुन्हा मावळतीच्या प्रकाशातली एखाद्या वस्तूची काजळ-रेषा भरून घेतात, आणि मिटतात...पण क्षणभरच. उघडतात आणि चोरी करताना पकडल्या गेलेल्या मुलासारखे ओशाळतात. भिरभिर इकडेतिकडे फिरतात आणि एखादी ओळखीची वस्तू चटकन पकडतात. घट्ट धरतात, आणि कपाटातल्या कप्प्याकडचा प्रवास पुन्हा सुरू होतो.

पण हे डोळे एकदा अगदी खुळे होते. त्यांना नोकरी लागण्यापूर्वीची गोष्ट आहे. त्यांच्या अर्ध्या चड्डीत खोचलेला शर्ट त्या वेळी मागच्या बाजूने बाहेरच लोंबत होता. टेनिसचा बॉल हातात धरला की त्याच्या गोलाईभोवती बोटे पकड घेत. आतल्या बाजूला चेंडूची लव दाबलेला मऊ स्पर्श करी. ब्रेकसाठी वळवलेल्या बोटांच्या पेरांना तिरका ताण लागे. आणि तो सोसताना ती हट्ट करीत. चेंडू सोडायलाच कबूल नसत. समोरचा बॅट्समन मग घायकुतीला येई. आणि वाकून कंबरेत कळ आलेला विकेटकीपर ताठ होऊन आरोळी ठोकी.

लिमलेटची गोळी गालात ठेवून दातांतून स्...करीत हवा ओढली की ती पण गोड ओली होई. साबणाच्या फेसाचे फुगे उडवताना त्यांच्या निळ्या-जांभळ्या कवचांवर सारी बाग उलटीसुलटी होत हेलकावे खाई आणि वर जाई. झुडपा-मागे दबून बसल्यावर, आता या फुलावर टेकलेलें फुलपाखरू नंतर कुठल्या फुलावर बसेल याचा अंदाज येण्यासाठी फुलपाखराचे मन ओळखावे लागे; आणि अचानक पाकळ्यांमधल्या रंग-डोहावर झाडाच्या पानांमधून झिरपून आलेल्या प्रकाशाच्या चाळणीत ते दिसेनासे झाले, की गळ्यात आवंढा येई. साऱ्या अंगाच्या टोकांतून तेव्हा संवेदनांचा चाफा फुलत होता. असेच एक दिवस ओठांवरून जिभेचा शेंडा फिरवताना काही निराळा स्पर्श झाला. आडव्या बोटाने ती लव कुरवाळली, आणि एका अनामिक भीतीने आणि आशेने मन व्यापून गेले. त्या दिवशी सकाळी मंडळीत गप्पा मारताना, मुकाट एका बाजूला बसलेल्या माझ्याकडे अचानक थांबून दादाने बघितले होते, आणि माझी नजर वशीतल्या चहाकडे वळली होती. तोंड चुकवावेसे वाटे, आणि कोणाला न कळेल अशा रीतीने माजघरातल्या आरशासमोरून चकरा माराव्या लागत. मग एका खिशात राहील एवढा शेंदरी पाठीचा आरशाचा तुकडा आणला होता.

...तो केव्हां आणि कुठे गेला ते कळले नाही. फुटून गेला असावा. पण तो फुटला तेव्हाच ते केवळ स्पर्श–रूप–गंधाचे विश्वही फुटून गेले. जगण्याच्या प्रत्येक क्रियेला अस्तित्वाच्या संदर्भातला हेतू आला. कधी तरी टाचणीच्या टोकाएवढ्या भोकातून अवघ्या व्यक्तिमत्वात शिरलेला हा कली सिंदबादच्या म्हाताऱ्यासारखा आज मानगुटीवर बसला आहे. प्रथम तो आपली जाणीवही होऊ देत नसे. कुठे तरी मागे लपून राही. शाळेतून परत येताना फुगे विकणाऱ्याच्या पेटीला आणि काठीला बांधलेले, काही टम्म पोट फुगलेले तर काही पिवळ्या काकडीसारखे; काही वेटोळ्यांचा गडबडगुंडा झालेले तर काही नाक-डोळे, आणि वर कागदी झिरमिळ्यांची टोपी घातल्यामुळे विदूषक बनलेले ते फुगे पाहू देई. पण मन त्या फुग्यांबरोबर उंच नाचू लागले की पटकन एखाद्या फुग्यात शिरून तो फोडून टाकी. त्याचा केविलवाणा लुळा आकार बघताच मनही जाग्यावर येई आणि नाकासमोरची वाट चालू लागे. तू काही आता लहान नाहीस ही आठवण देऊन लाजवी. उशीर झाला तर नळ जाईल ही टोचणी लावी. वेळच्या उपयोगाचे बी त्याने मनात पेरले. पृथ्वीच्या नकाशा-

वरील अनेक रंगांमधला निळया रंगाचा विस्तार पाहता पाहता, त्या जागी क्षितिजापर्यंत पसरलेल्या हलक्या लाटा, आणि त्यावर एकच पांढरे शीड दिसू लागले, की ते चित्र पुसून टाकताना सांगे की पृथ्वीतलावर तीन चतुर्थांश पाणी आणि एक चतुर्थांश जमीन आहे. कोकिळेचा सुतार पक्षी व्हायला तेव्हाच सुरुवात झाली असावी...

त्याने सगळ्यांत हुशारीने गळ टाकला तो शब्दांचा. ‘जांभळा’ हा शब्द प्रथम सापडला तेव्हा जांभुळ जास्त जांभळे झाले होते. गुलकंदातल्या खडीसाखरेसारखा तो शब्द अनुभवाच्या रंगात, वासात, चवीत मिसळून गेला होता. शब्दांच्या चिमटीत अनुभव उचलून तो उन्हाच्या कवडश्यांत फिरवण्याचा खेळ त्याने शिकवला, आणि एकदा असे नादी लावल्यावर एनिमा पॉट आणायलाही शब्दच उपयोगी पडतो हे कसे मनावर बिंबवलेन ते कळलेच नाही. हळूहळू त्याने, भूमितीतल्या रेषेप्रमाणे शब्दांची रुंदीच काढून घेतलीन आणि अशा पालीसारख्या पांढुरक्या शब्दांचा अडसर अनुभवांच्या दाराला लावला गेला. ‘पृथ्वीच्या पाठीवर’ असे वाचताना ‘मग पृथ्वीचे पोट कुठले?’ अशी शंका मनात येईनाशी झाली. कारण ‘पाठीवर’ या शब्दाने मनावर कोणतीच लहर उमटली नव्हती. लघुतम साधारण विभाजकाच्या रिंगणात त्याने अनुभवाचे विश्व जखडून टाकले. “झिमझिमले डोळयांतुन लाल चांदणे” ही ओळ वाचता वाचताच “डोळयांतुन लाल चांदणे झिमझिमले” अशी सरळ होऊ लागली आणि लगेच “चांदणे लाल कसे?” आणि ते “डोळयांत कसे झिमझिमले?” असे प्रश्न उपस्थित होऊन तो अनुभवच संशयास्पद वाटू लागला. या कलुषा कब्जीने साऱ्या शक्ती डोक्याकडे सुपूर्द केल्या.

डोक्याने ताबा घेतला, आणि हाताची बोटे त्या गोल, मऊ आणि लुसलुशीत स्पर्शाला विसरून डायमीटर मोजू लागली. डोळे पोस्टमन झाले. जिभेला ‘जाणिजे यज्ञकर्म’चे हाड उगवले; नाक चष्मा ठेवण्यासाठीच आहे अशी खात्री पटली आणि पुढाऱ्यांची तेलकट भाषणे कानाच्या फनेलमधून आत ओतली जाऊ लागली. प्रकाशात न्हालेली ईश्वराची दुनिया दारावर टिचक्या मारी. पण आत बैठक बसली होती. या सगळयाचा ‘अर्थ’ काय याचा काथ्या गोळा होत होता. मध्येच ‘कोण आहे?’ असे विचारीत मन खिडकीपाशी जाई. पण बाहेर बघण्याची हिम्मतच गेली होती. थोडे चुकल्याचुकल्या-

सारखे वाटले तर चष्मा कानांवर नीट अडकवीत एखाद्या आर्ट क्रिटिकचा हात धरून चित्रप्रदर्शन पाहायला जावे, आणि बरेचसे शब्द घेऊन परतावे. चित्र फ्रेममध्येच राही. ते काही आत पोचत नसे. आठवड्यातून कलानुभवाचा असा दोन छटाक रतीब संवेदनांना घातला, की मग काळ-काम-वेगाची गणिते निश्चितपणे सोडवायला हरकत नसे.

...कोठल्या संवेदनानुभवाबद्दल बोलता तुम्ही? दोन दिवस गुर्र्र्र म्यांऊचा धुमाकूळ घालून दोन मिनिटांचे सुरत अनुभवल्यावर मांजरी जी बेहोषीत जमिनी-वर गडबडा लोळते, पाय वर करून नाचवते, सारे अंग घुसळत घशातून दबलेले आवाज काढते आणि वातारल्यासारखी धावत सुटते त्या पातळीवरच्या? पण ते जगणे नुसते. भोग तो. तेवढाच अनुभवला तर माणूस आणि प्राणी यांत फरक काय राहिला? आनंद–सुख याच मुळी आधी मानवी कल्पना आहेत. त्यांचा थोडा जरी अभ्यास केला तरी हे पटावे की सुख हे संवेदनांत नाही. संवेदनांची मन जी रचना करते त्यांत आहे. अनुभवापासून दूर जाऊन त्याकडे बघण्यात आहे. ती स्वभावतःच एक मानसिक प्रक्रिया आहे. त्यामुळे हे स्पष्ट आहे की मन हे जितके तरल व तीक्ष्ण, आठवणी साठवण्याची शक्ती आणि कल्पनेची झेप जेवढी मोठी तितके सुख मोठे. नुसते मोठे नव्हे–त्या तुमच्या मांजरीपेक्षा पुष्कळ वरच्या दर्जाचे–आणि मानवाने सुखाची इच्छाच करायची तर या पातळीवरची करायला नको काय?

हवी. हवी. जरा हळू. तुमचे सगळे बरोबर आहे. अंडे फोडून बाहेर आलेल्या पक्ष्याने पुन्हा अंड्यात जाण्याची इच्छा धरणे हे मूर्खपणाचे आहे. हे मला नीट पटलेले आहे. तुम्ही सांगता ते सर्व खरे आहे आणि त्यातून सुटका नाही हेही खरे आहे. पण एक सांगू? काल संध्याकाळी घरी आलो. पुस्तके ठेवली. सदरा काढून खुर्चीवर टाकला आणि पलंगावर आडवा झालो. पाय वर करून भिंतीला लावले. कसली तरी लाट सळसळत खाली आली आणि डोळे तिने गार केले. पिसासारखे या लाटेवर तरंगावे असे वाटू लागले. तेवढ्यात आत एक भोवरा उठला, आणि तो वर येता येता त्याच्या बुडबुड्यांचे शब्द झाले. स्वस्थ बसलास. काम नाही काही? किती वाजले? सदरा टाकण्याची ही रीत झाली? ऊठ. खुंटीवर लाव, आणि काय झाले? पाय नकळत खाली आले. आणि ते नकळत खाली आले हे कळताच सारे शरीर बंड करून उठले.

नाही उठणार. नाही करणार काम. तू कोण सांगणार ? मी वाटेल तसा वागेन. वाटेल तर पाय भिंतीला लावून तासन् तास पडेन. हा काय जुलूम आहे ! नाही उठणार. आणि पुन्हा अट्टाहासाने पाय भिंतीला लावून पडलो. पण लाट ओसरून गेली होती. फक्त हट्ट उरला होता. रस निघून गेला होता; फक्त चोथा उरला होता.

आणि उरले होते फक्त गुलामांचे सगळ्यांत मोठे सुख. मालकाने मारलेल्या फटक्यांपेक्षा तीक्ष्ण आणि रुतणारे फटके स्वतःवर मारीत बसण्याचे. जास्त व आणखी जास्त वेदना लादून त्यातलाच उफराटा आनंद घेण्याचे. वा : ! करा काम. काम करा. केवढे महत्त्वाचे काम ! शिका. नोकरी करा. पैसे मिळवा. कुलवर्धन करा. यच्चयावत सदरे खुंटीला लावा. आणि या साऱ्या काळज्या करता करता एक दिवस काळजी करायलाही उरू नका. उज्ज्वल संस्कृतीच्या सातत्याचा ओघ टिकवला पाहिजे. टिकवा. मग पणज्याचे नाव माहीत नसले तरी हरकत नाही. ही ज्वलंत ज्योत पुढल्या पिढीकडे पोचवली पाहिजे. पोचवा. स्वतःच्या चितेतून. क्षणाला अर्थ येतो तो मागच्या आणि पुढच्या क्षणांनी. ठीक. जुंपा मान रथाला. मग हे कचकडी खेळणे एक दिवस गोल फिरता फिरता अंतराळात पडून त्याचा मागमूसही राहायचा नसला तरी. या खेळण्याला क्षणभर आधार देणारा हा गोल कुठे तरीच भिरकावला जायचा असला तरी. भयाण शांततेवर क्षणभर आलेला हा नादाचा बुडबुडा फुटून पुन्हा सारे भयाण शांततेत जायचे असले तरी. पाच फूट उंचीच्या या जिवाणूच्या साऱ्या उच्च आणि उदात्त भावना कधी नव्हत्याच असे व्हायचे असले तरी. त्याच्या संवेदना...संवेदना...त्या सुद्धा...

ही मात्र सिनेमाचीच घंटा. पिक्चर चुकता कामा नये. एक झुरका होईल अजून. बोटांतल्या चिमटीत थोटूक धरून त्याच्या जळत्या लाल टोकाकडे क्षणभर बघितले आणि टिचकीने दूर उडवून दिले. विझले का पाण्यात ? जाऊ द्या. उशीर झाला.

• • •

## २४. म र ण

अगदी पाहिले मरण मी माझ्या आजोबांचे पहिले. मी त्यावेळी फारच लहान होतो. नेहमी हिंडणारे फिरणारे व गावभर दरारा ठेवणारे आजोबा एक दिवस, रात्री निजत असत तसेच गादीवर निजले. ते पुष्कळच दिवसपर्यंत तसेच निजून होते. माझ्या दृष्टीने हा फरक विशेष नव्हता. ते ओसरीवर नेमाने तिसऱ्या खांबाशी बसून जेवत व माझ्याकडे गुळपोळीच्या चुरम्याचा बोराएवढा लाडू फेकीत आणि बत्या महारास अधूनमधून दुरून चपला फेकून मारीत. एवढीच दोन चित्रे आजोबांबद्दलची माझ्या मनात होती. त्यांनी सतत निजणे सुरू केल्यापासून ती दृश्ये दिसेनाशी झाली. एकदोनदा त्यांच्या निजलेपणात थोडीफार धावपळ झाली. गंध उगाळण्याच्या पारिसावर काही तरी उगाळले गेले. एकदोनदा रात्री नेहमीपेक्षा आधी जेवणे उरकण्याची घाई झाली. हे सर्व का होत होते. त्याचा मला समज पडेना. असाच एकदा रात्री मी झोपलो होतो तेव्हा कसल्याशा गडबडीने जागा झालो. पारिसावर काहीतरी उगाळले जात होते. माणसे जमा झाली होती. मला यापार कळू शकले नाही. कारण गर्दीत सामील झालेल्या मायने एकदम माझ्याजवळ येऊन मला थोपटून झोपवून दिले.

त्या सकाळी रात्रीचीच गर्दी कायम होती. मला कोणी तरी आजोबाजवळ नेले. ते निजूनच होते; पण बिछान्याला भयंकर घाण येत होती. आजोबा घेंगाणे घेंगाणे बोलत व डोळे गरगर फिरवीत पडून होते. मला तेथे उभे राहवेना. आजोबा असे रोज दिवसाढवळ्या निजतात याचा मात्र हेवा वाटला. इतक्यात

मधुकर केचे

दादाजींनी मला आजोबांच्या पायांवर मस्तक ठेवायला लावले. आजोबांचा थरथरता हात माझ्या डोक्यावर ठेवण्याचा एक प्रयत्न कोणी तरी केला. मग दादाजींच्या सांगण्यावरून बंड्यातात्याने मला कडेवर उचलून बाहेर आणून ठेवले. मोठ्याच कुतूहलाने मी बसल्या जागेवरून आजोबांच्या खोलीकडे पाहू लागलो. त्यांना आता घोंगडीवर निजवण्यात आले होते. कोणी तरी भल्या मोठ्याने पोथी वाचायला आरंभ केला. उदबत्त्यांचा भपकाच्या भपका माझ्या नाकात शिरला. त्या योगाने आजोबांच्या आसपासच्या घाणीची आठवण नाहीशी झाली. तेवढ्यातच डोमापाटील, रामभरोसा, इत्यादी मंडळी भजनाचा पखवाज, टाळ, वीणा वगैरे घेऊन आली. न राहवून मी मायला विचारले, " हे आज काय चाललं वो ? " मायने दबल्या आवाजात म्हटले, " आपले आण्याजी देवाच्या घरी चालले."

माय असे म्हणते न म्हणते तोच त्या खोलीतून सर्वांच्या हंबरड्याचा गलोला आला. पण त्या भल्या मोठ्या आवाजावर ताण करणारा दादाजींचा आवाज आला. " कोणीही रडू नका, एकादशीच्या दिवशी ते गेले. त्या पुण्यात्म्याला दुःख होईल असे काही करू नका. "

मग एकदम भजन सुरू झाले. बरेच दिवसांत आजोबांनी आंघोळ केली नव्हती. पण त्या दिवशी त्यांना भर अंगणात चौरंगावर बसवून कढत पाण्याने न्हाऊ घालण्यात आले. दोन लोकांनी त्यावेळी धरून ठेवले होते. मग कपाळावर गुलाल वगैरे लावून एक बंदा राणीछाप रुपया त्यांच्या कपाळावर ठेवण्यात आला. त्यानंतर त्यांना खोलीत न नेता शिडीवर निजविले. भजन मंडळी पुढे व आजोबांची शिडी मागे अशी मिरवणूक दारातून बाहेर पडायला लागल्याबरोबर सर्व बायकामंडळी मोटमोठ्याने रडायला लागली. त्यावेळी दादाजींनी रडण्यात कोणाला अडथळा केला नाही. हे सर्व लोक कोठे जात आहेत ते बघायला म्हणून मीही त्यांच्यासोबत निघालो. एकदोघांनी मोडता घातला; पण मी हट्टच धरला तेव्हा काकाजींनी मला येऊ दिले. नदीकाठी रचलेल्या इंधनावर आजोबांना ठेवले, तेव्हा मी धावत त्यांच्याकडे गेलो. मग मात्र मला बळजबरीने पकडून घरी आणले.

कालान्तराने मी ते सर्वच विसरलो. खूप मोठा झाल्यावर कळले की, आजोबा त्या दिवशी मेले होते. तेव्हापासून आजपर्यंत मरणे म्हणजे काय ते कळत आले

आहे. पण अनेकदा माझा मलाच संशय येतो की, खरेच आपल्याला मरणे म्हणजे काय ते कळले आहे का ?

आजोबांचे मरण त्या वेळी कळले नाही हा अजाणपणाचा परिणाम होता. तशाच अजाणपणात माझी आत्याही एक दिवस गेली. तिला छातीस एक फोड झाला होता. तिच्या मृत्यूपेक्षा तो फोडच माझ्या जास्त लक्षात राहिला. कारण तो वाढता वाढता इतका वाढला की त्यातून शेवटी शेवटी तिच्या पोटातले भाग दिसायला लागले. मला जखमेचे दुःख कळले नाही. इतर लोक मोठा धीर धरून ते पाहात व खोलीच्या उंबरठ्यापर्यंत मोठ्या मुष्किलीने दाबून धरलेले रडू एकदम बाहेर फोडीत. दरवेळी आत्याच्या छातीच्या त्या खुल्या जागेबद्दल एवढी रडारड का व्हावी हेच मला कळेना. मला तर उलट ती फाटलेली जागा व तिच्यातून खोलपर्यंत दिसणारे आतले भाग पाहण्याचा छंदच जडला होता. त्या सर्व अवस्थेत आत्या बोलू शकत होती. देवाचे नाव मोठमोठ्याने व नित्य-नियमाने घेत होती. मला नेहमीची ठावी झालेली तिची गाणी ती म्हणत होती. एक दिवस वैद्याने तिचे पथ्य मोकळे केले. मायने तिच्या आवडीची शेव व बुंदीचे लाडू करून दिले. वास्तविक त्या साली आमच्या तोंडी दिवाळीचा सणही लागला नव्हता. घरात आजारपण असताना खायचे नाही म्हणून मावशीने पाठव-लेला डबादेखील आम्ही बत्या महारास देऊन टाकला होता. पण त्याच घरात आज बुंदीच्या लाडवाचा वास दर्वळू लागला. ते लाडू करताना मात्र माय हमसून हमसून रडत होती. आम्ही एखादा लाडू पळवला तर रागे भरणेही तिला जमत नव्हते. आत्याबाई कधी नव्हे ती त्या दिवशी बिछान्यावरून खाली उतरली. तुळशीजवळ उन्हात बसून तिने चवीने लाडू व शेव खाल्ली. मलाही दिली. ती रोज रोज तुळशीजवळ का बसली नाही म्हणून मी तिला विचारले तेव्हा ती म्हणाली, “ अरे, मला उद्या देवाघरी जायचे आहे. म्हणून आज हे सर्व करीत आहे. ”

आत्याबाईच्या बोलण्यावर माझा भरोसा बसला नाही. आजोबा देवाघरी गेले त्याच्या आदल्या दिवशी असे हिंडत नव्हते. लाडूबिडू तर त्यांनी मुळीच खाल्ला नव्हता. कित्येक दिवसांनी व कधी नव्हे ती आज आत्याबाई बिनबिमारासारखी दिसत असताना ही अशी देवाघरी जाण्याच्या गोष्टी का करते हेच मला कळेना. आत्याबाई माझ्याशी कधीच खोटे बोलत नसे. म्हणून चूप राहिलो. आणि

त्याच रात्री रडण्याच्या गडबडीने जागा झालो. आत्याबाईला ओसरीवर वोंगडी टाकून निजवले होते. आणि सकाळी हुबेहूब आजोबांचे केले होते तसे तिचे करण्यात आले. लोकांनी आजोबांसारखेच तिलाही नदी पेंडावर नेले तेव्हा न राहवून मी बापाला विचारले, " मामा तेथे नेऊन आत्याला काय करतील ? "

" जाळतील. "

मला हा अनपेक्षित धक्का होता. आजोबांचेही त्यांनी तसेच केले होते ! आजोबा व आत्या यांच्या अंगाचा दाह नाही का होणार ? माझ्या हाताला जरा कुठे गरम दुधाचा चटका बसला तर मी केवढी नाचणावळ करी !

त्या अजाण वयात मी अशी दोन मरणे पाहिली. अजाणपणामुळे ' मरण ' म्हणजे काय ते कळले नाही. घरात असलेल्या लोकांच्या सहवासामुळे ' वियोग' ही कळला नाही. आणि कोणी मेला की त्या दिवसापासून अनेक दिवस रोज होणाऱ्या पंगती व शेवटची खीर, नातलगांकडून गोड जेवण वगैरेमध्ये मरणाबद्दल काही कळण्याची शक्यताही संपत असे. दुःख फक्त त्यांना जाळतात याचे होते. मोठेपणी तेही गेले. मेलेल्या माणसाला वेदना जाणवत नसतात हे कळण्याचे वय झाले. पण त्या वयातही खरोखरच मरणाचा नक्की असा परिणाम मनाला झोंबलाच नाही. कधी एखादी प्रेतयात्रा समोरून जाते. त्यांतले कर्णकटू वाद्य तेवढे कसेसे वाटते. ते वाद्य मरणाबद्दल काहीसे सांगून जाते. पण ते सांगणेही अगम्य भाषेतलेच असते !

कळतेपणी मी एक दोन मरणे पाहिली. कॉलेजात शिकत असताना रेल्वे रुळासमोर एक खोली होती. एक दिवस दुपारी एक बाई पिठाचा डबा घेऊन रूळ ओलांडत होती. त्याच वेळी गाडी आली. तिचा गडगडाटच एवढा झाला की ती एकदम थांबली तेव्हाच माझे लक्ष तिकडे गेले. गाडीतले लोक भराभर खाली उतरत होते. मला मग एका चाकाच्या आसपास उडालेले रक्त व बांगड्या भरलेला तुटका हात माझ्या खिडकीतून स्पष्ट दिसू लागला. मी तिकडे धावलो. गर्दीत मिसळलो. पण का कोणाला ठाऊक, त्या तुटक्या हातापलीकडे मला काहीच उमजेना. मी तसाच माघारी वळलो. शेजारची कमल एकदम माझ्याकडे धावत आली. वयोमानानुसार मला नेहमी कमलशी बोलावेसे वाटत होते. ती मात्र माझ्या वाऱ्यालाही उभी राहात नसे. पण त्या क्षणाला ती आपणहून माझ्याकडे आली. अगदी धावत आली. मला जवळ जवळ लगटून तिने माझा हात

धरला. तो हात त्या तुटक्या हातासारखा मला वाटू लागला. आपण एका परक्या तरुणाशी असे वागत आहोत याचे तिला भानच नव्हते. ती घाईघाईने मला विचारू लागली, " तुम्ही तिकडून आला ना ? कोण होते ते ? "

मी काही उत्तर देणार होतो तोच तिचा भाऊ धावत धावत आला. " अग आपली आई किराणा दुकानासमोर दिसली ! " कमलने ते ऐकले मात्र ! ती झटकन माझा हात सोडून वेड्यासारखे हासत दुकानाकडे निघाली. मघाच्या तुटलेल्या हाताचा मला काही बोध होत नव्हता. गर्दीतल्या तिन्हाईत उसास्यांचा आणि नात्यांच्या हुंदक्यांचा मला काहीच बोध होत नव्हता. त्या तुटक्या हाताचा एकच अर्थ लागता लागत होता — कमलचे समाधान. आई दुकानावर आहे याची प्रसन्नता, तिने माझा धरलेला हात, भांबावलेली मुद्रा, तिने माझा सोडलेला हात, उजळलेला चेहरा — बस्स ! त्या तुटक्या हाताचा व त्या संपूर्ण मरणाचा मला एवढाच अर्थ लागला होता. मरण म्हणजे काय ते कळायचे राहूनच गेले होते !

एक मरण माझ्यासमोर — अगदी एका बोटाच्या अंतरावर घडले. मला रोज पान व सिगारेट विकणारा एक भैया. दुपारी दोन अडीचचा सुमार असेल. नेहमीसारखे न बोलता त्याने माझा विडा गुंडाळला. हात माझ्यासमोर केला. हात समोरच राहिला. हळूहळू गर्दी झाली. पोलिसांनी सारा कबजा घेतला. मला दिवसभर त्याच्या मुठीतले पान दिसत होते. तो गृहस्थ माझ्याशी फारच थोड्यांदा बोलला होता. न बोलता माझे पान बांधी. शेवटचे पान त्याने मला दिले. कुठले तरी राहून गेलेले नाते त्या दिवशी पुरे झाले. पूर्ण झाले तेव्हाच खलास झाले. मरण मरण ज्याला म्हणतात ते इतके समोर, इतके नजीक दिसले. पण दिसले म्हणजे काय दिसले ! एक नुकतेच बांधलेले पान. त्याचे पैसे द्यावे लागले नाहीत. त्या दुकानावर दुसऱ्या दिवशी दुसरा माणूस बसला असेल. अशी अनेक माणसे बसतील. त्या सर्वांनी मला पान दिले व ते हात पान देताना तसेच ताठ होऊन तेथे मला राहिलेले दिसले तरी मला मरण दिसले असे म्हणता यायचे नाही.

अजाणतेपणी पाहिलेली मरणे कळली नाहीत. जाणतेपणी मरणे दिसली. पण त्यातही कळले ते कमलचे घाबरणे, उजळणे, आणि कळला तो हाताचा ताठरपणा. मेलेला माणूस पुन्हा दिसत नाही हे एक दुःख असेल. पण न मरताही

अनेक माणसे दिसत नाहीत. परकी माणसे सोडा; जवळचीही दिसत नाहीत. सहवासातली माणसेही स्वतःला दरक्षणी लपवतात. जे मरणामुळे मुख्यतः घडते असे म्हणायचे ते सारे न मरताही घडतच असते. मरणाचे व्यवच्छेदक ते ठरत नाही.

मृत्यू माझ्या वडिलांच्या वेळी कळला असता. मोटार अपघातात त्यांच्या देहाचे तुकडे झाले. त्या देहाच्या कणाकणाबद्दल मला आपुलकी होती. त्या तुकड्यामधून मला मरण कळणार होते. पण दोन दिवस प्रेत घरात पडून राहिल्यामुळे कुजलेले ते तुकडे मी गोळा करताना मरणाची ओळख होते काय म्हणून शोधू लागतो. नाकात त्या व तेथल्या इतर प्रेतांची घाण शिरत होती. तेवढीच कळत होती. वडलांचा चेहरा पार बदलून गेला होता. त्या तुकड्यांना मी अग्नी दिला. पण तो अग्नी वडिलांना दिला असे कधीच वाटले नाही. दुसऱ्याच कोणाचे तरी ते प्रेत होते असे वाटत होते. प्रयत्न करूनही त्या प्रेताची ओळख पटत नव्हती. वडील मेले यावर भरवसाच बसत नव्हता. आजही तो बसत नाही. धावपळीत त्या दिवशी खूप थकलो होतो. सपाटून भूक लागली होती. दिवसभराच्या संपूर्ण घटनांचा एकच अर्थ लागत होता. जेवण, जेवण. मरण असे आले आणि अर्थ न देता निघून गेले.

अनेकदा दादा, माय यातले कोणीतरी मेले असे स्वप्न पडते. ओरडून जागा होतो. स्वप्नाचा स्वप्नपणा कळतो. त्या आनंदात मरणाचा अर्थ निसटून जातो. मरणाचे स्वप्न पडले म्हणजे आयुष्य वाढते म्हणतात. त्यामुळे या स्वप्नाची हुरहूरही निघून जाते.

मरणाचा अर्थ मरणाराला कळत असेल काय ? अचानक बेसावध मरण येणाराला तो कळत नाही. जगणारांना तो अनुभव तिऱ्हाईत असतो. माझ्या आत्याबाईस आपले मरण कळले होते. माझ्या मित्राची आई वारली. पाच तास आधी तिने मला बोलावले होते. कोणाजवळ निरोप दिला नाही. स्वतःच स्वप्नात आली. मी भररात्री रान तुडवीत त्या खेड्यात गेलो. केवळ स्वप्नात ती दिसली व आपण जात आहोत हा वेडगळपणा वाटत होता. पण पाय कुठल्या-तरी सूचनेने पुढे पडत होते. मी गेलो तेव्हा ती सावध होती. तिने मला अर्धा तास बसवले; आणि तेवढ्या रात्री पुन्हा परत पाठविले. गाडीबैल द्यायला लावले. मी परत जावे हा तिने हट्टच घेतला. तिला तिच्या मरणाची वेळ कळली होती.

" माझे मरण तुला पाहवणार नाही. " असे ती म्हणाली. नाइलाजाने मला परत फिरावे लागले. पुन्हा लगेच मी त्याच गाडीने तेथे गेलो. तेव्हा तिची तिरडी चालली होती. तेच दृश्य ! मला न कळणारे. अर्थ न लागणारे ! एक प्रेमळ बाई शांत पडली होती.

पुष्कळदा दाजीसाहेबांच्या कुष्टधामात जातो. महारोगी दर क्षणाला मरत असतात. कणाकणाने सरत असतात. देह जिवंतपणी मावळत असतो. तेथे काही अर्थ कळेल म्हणून जातो. रोगी फिरत असतात. एकमेकांशी भांडतात-देखील ! अर्थ हरवून जातो. इरविन अस्पताळात एकदोनदा भरती झालो. मायनर ऑपरेशने करून घेतली. दोन्ही वेळा योगायोग घडला. शेजारचा रोगी दगावला. कधी दगावला कळलेच नाही. सीरियस केस म्हणून भोवती पडदे लागले. नंतर तोंडावर पांढरी चादर पडली. कळली तेवढी पांढरी चादर व नातलगांचे रडणे. आणि तेथल्या नोकरांचे घाईघाईने स्ट्रेचर नेणे.

बाळदादा हा आळशी नाणावलेला सर्जन. त्याला मरणाचा अर्थ विचारायचा तर ऑपरेशनच्या वेळेला झालेल्या अपेक्षित-अनपेक्षित घटना तेवढ्या तो सांगतो. त्याच्या त्या सांगण्यातून कळणारे मरण काही पूर्ण उमगत नाही. एकदा त्याच्या-मुळेच एक जळलेली बाई पाहायला मिळाली. ती फार तर अर्धा तास जगणार असे डॉक्टरबाई म्हणत होत्या. तिलाही मरणाचा पत्ता लागला असावा; पण जळण्यापूर्वी घरात कोणत्या कपाटात काय ठेवले यापलीकडे ती बाई काहीच बोलत नव्हती. मरणाची त्यापेक्षा काहीही वेगळी ओळख तिला होत नव्हती. मलाही होत नव्हती.

अनेक अपघातांतून मी बचावलो. अपघात टळले. मोटारींचे धक्के बसले; मरण आले असे वाटले; काही सुचेनासे झाले ! मरण आलेच नाही ! येतो म्हटलेसे नुसते दूर उभे राहून गेले. गेल्या महिन्यात मात्र एकाएकी अंग थंड पडले. रक्त थिजत आहे असे पुन्हा पुन्हा वाटू लागले. डोळ्यांत काळोखाचे वादळ येऊ लागले. हेच ते मरण असावे अशी खात्री झाली. जिभेवर प्राण आणून मी घरच्या लोकांना सांगितले.

" डॉक्टरला आणा. " डॉक्टर येईपर्यंत आपण कधीही मरू असे वाटू लागले. अवसानवाताचे व निराशेचे झटके आले. सर्वांना मरतेवेळी असे वाटत असेल काय ? तो अनुभव जर सर्वसामान्य असेल तर मला मरण कळले असे मी

समजणार होतो. भयंकर मळमळून आले. वांती झाली. तेव्हा तर प्राण जाणार ही खात्रीच होऊन चुकली. डॉक्टर अजूनही आलेच नव्हते.

इतक्यात सतू रांगत रांगत माझ्या पलंगाजवळ आला. पलंगाची कडा धरून उभा झाला, व सरकत सरकत माझ्या तोंडाजवळ येऊ लागला. त्याचा अजाण हसरा चेहरा मी पाहिला. तो आपल्या भाषेत काहीतरी बोलत होता. मला एकदम आजोबांच्या मरणाची आठवण झाली. मी तेव्हा असाच होतो काय? सतू अकारण हसत होता. शब्दशून्य भाषेत काहीतरी बोलत होता. मी मेलो तर सतूचे कसे होणार? आपले मरण याला पाहवणार नाही म्हणून मला दूर पाठवणारी ती मित्राची आई आठवली. आपली आई गाडीखाली मेली नाही म्हणून पहाटेसारखी फुललेली कमल आठवली मी एकदम जोर करून ओरडलो, " छे, छे! मी मरत नाही. मला मरायचे नाही. "

मरण जाणण्याची उत्सुकता कोठल्या कोठे पळाली. मरणाचा अर्थ कळायचा राहून गेला. बोबडे लोबडे बोलणाऱ्या सतूच्या गालाकडे माझे ओठ धावण्याचा प्रयत्न करू लागले. त्याच्या असंबद्ध बोलांनी मला मरणाचा अर्थ मुळीच कळला नाही. जीवनाचा अर्थ मात्र कळला. लाड करताना माय हुंदके देत होती त्याचा अर्थ कळला. जीवनाचे हे सर्व अर्थ कळण्याआधी मी मरणाचा अर्थ शोधीत होतो. ती माझी चूक होती. भयंकर चूक.

● ● ●

## २५. आं ग ण

आजकाल जुनं बरंचसं जात चाललं. जे टाकाऊ असेल ते टिकलं नाही, त्याचं काही नव्हे. जीवनाचे कणच जर एखाद्या वस्तूत नसतील तर तिनं जगावं तरी का? पण प्रत्येकच बाबतीत हे काही खरं नव्हे. आता हे शहरातलं जागेच्या टंचाईचंच घ्या. मुंबईत लोक घरांत सामावत नाहीत हे ऐकलं होतं. आता तर मुंबईला जाणंयेणंच घडत असल्यामुळे तिथली माणसं फूटपाथवर झोपलेलीही प्रत्यक्ष बघायला मिळाली. जागेची ही टंचाई आहे तर तिच्यावर उपायही आलेच. एक मजली घरं आणि साधी कौलारू घरं जाऊन आता दुमजली तिमजली घरं व्हायला लागली. घरं पुरली नाहीत तेव्हा त्यावरचे मजले वाढले. हेही ठीकच झालं. खेडं सोडून आम्ही शहरात राहायला आलो. तेव्हा आमचं कौलारू पण मोठं घर आमच्यापासून दूर गेलं. आगगाडीच्या डब्या-सारख्या एकाशी एक जोडलेल्या चौकोनी खोल्या—त्याही फार फार तर दोन तीन—आमच्या वाट्याला आल्या. आणि एकेक खोली कशी टिचभर! शहरातच राहायचं तर तेही सहन केलंच पाहिजे. आता अधूनमधून थोडीशी त्या मोठ्या घराची आठवण होते; पण मनच मनाला समजावू शकतं. जुन्या माणसांनी बांधलेल्या ऐतिहासिक इमारती पाहिल्या म्हणजे आमच्या सध्याच्या चौकोनी खोल्या खुराड्यासारख्या वाटतात. अष्टकोनी, चंद्राकृती, लांबोळक्या, वाटोळक्या, तऱ्हेतऱ्हेच्या त्या खोल्या—नव्हे भव्य दालनं पाहिली म्हणजे वाटून जातं की, त्या मंडळींनाच केवळ राहावं कसं ते माहीत होतं. विसाव्या शतकातल्या माणसांचा

मधुकर केचे

जन्मच मुळी आठ बाय आठच्या चौकोनात राहण्यासाठी झालेला आहे. असं खारटतुरट समाधान करता येतं. ते सारं ठीक आहे. ठीक मानायलाच हवं.

पण मन मानत नाही ते एकाच गोष्टीत. पूर्वीची घरं गेली; जाऊ दे. पूर्वीची आंगणं मात्र जायला नकोत. इथं आमच्या मोहोल्ल्यात आंगणंच नाहीत. जरा कुठं जागा मोकळी दिसली रे दिसली, की तिथं एखादी रूम तयार होते. कॉलेजच्या नावानं या शहरात आलेली मुलं मग तिथं राहायला येतात. घरमालकांच्या व्यवहारी वृत्तीचं कित्येकदा मोठं कौतुक वाटतं. जरा म्हणून जागा रिकामी राहू द्यायचे नाहीत. मोकळी जागा तर यांच्या दृष्टीनं निरुपयोगी वस्तू. जागेचा बराचसा भाग आजकाल रस्त्यामध्ये खर्च होतो, याचं त्या महाभागांना फारच वाईट वाटत असलं पाहिजे. मुंबईला जसे काही ठिकाणी अंडरग्राउंड रस्ते आहेत तसे जर घरालाही करता आले तर इकडच्या घरमालकांची खूपच सोय होईल. मग जुन्या रस्त्यांच्या जागी हे लोक पुन्हा खोल्या बांधतील. एका पाठीमागे दुसरी निरुंद खोली बांधण्याचं जे आजकालचं तंत्र तेही असंच नव्हे का ? कुठलीही एक खोली ही दुसऱ्या खोलीचा रस्ताच ठरत असते. येण्या-जाण्यासाठी काही जागा मोकळी सोडूनच उरलेल्या छोट्याशा जागेत फर्निचर ठेवावं लागतं.

हे झालं आमच्या मोहोल्ल्याचं. हा बोलूनचालून आमचाच मोहोल्ला. बरं याचं जाऊ द्या, पण जिथं सुधारलेली वसती आहे तेथेही हाच त्रागा. सरकार अनेकदा सक्तीच करतं म्हणून नाइलाजानं लोकांनी घराभोवती जागा मोकळी सोडलेली असते. पण ती अशी बकाल असते ! सावत्र पोरासारखी तिची हेळसांड चाललेली. कोळसे, कचरा आणि अशाच कितीतरी बेवारस वस्तू ठेवण्याची हक्काची जागा असा त्या मोकळ्या जागेचा अर्थ ते लावतात. पाखरांची पिसं, सिगारेटीची थोटकं, भाजीचे अवशेष-काय काय तरी तिथं पडलेली असतात. हेही नसलं तर कुत्र्याच्या छत्र्या, गोखरू,गवत,धोत्रा असंच काहीबाही तिथं माजलेलं असतं. शहरी आंगण म्हणजे एक गंमतच झाली आहे. सुंदर हिरवळ राखली आहे, वेताच्या खुर्च्या टाकून मंडळी संध्याकाळी मजेत बसली आहे, सकाळी एखाद्या लुसलुशीत कुत्र्याबरोबर खेळत एखादं बाळ तेथे हुंदडत आहे, आजोबा वृत्तपत्र वाचीत कोवळं उन्ह खात आहेत--असा देखावा आंगणाच्या वाट्याला फारसा येतच नाही. एखाद-दुसऱ्या बंगल्याच्या वाट्याला तसं काही मनोहर रूप येतं. तिथली जागा तशी

खऱ्या अर्थानं आंगण होऊन नटते. पण त्याही ठिकाणी त्या मोकळ्या जागेला आंगणाचं रूपडं नसतंच. कसली तरी विलायती फुलावळ तिथं कागदी चेहऱ्यानं उभी असते. ऊन-पाण्यानं काळवंडलेला एखादा मुर्दाड झोपाळा तिथं बिनपोराच्या व्यथेत असल्यासारखा स्वतःशीच झुलत असतो. हिरवळ म्हणा, फर्निचर म्हणा, रोपटी म्हणा की मोठे छान रंगीत केलेले, तरतऱ्हेच्या तुकड्यांनी मढवलेले रस्ते म्हणा—सर्वांवर एक निर्जीव कळा असते. सगळं काही आखलेलं बंदिस्त असतं. जीवनाच्या खुणा, खेळकरपणाची कळा तशा त्या बंगल्याच्या आंगणावर नसते. एका कंपाउंडी भिंतीचा उग्र घट्ट दरारा त्या जागेवर असतो. फाटका-जवळची ती कोण्या रावबहादुराची अथवा आय्. ए. एस्. नावाची पाटी त्या आंगणाच्या शोभेला बुरडी करून सोडते. त्यांनाही ' कुत्र्यांपासून सावध ' ' येता जाता फाटक लावून घ्यावे ', ' कृपया घंटी दाबावी ', इ. वाक्यांमुळं तर त्या आंगणाच्या डोळ्यांमधला स्वागताचा भावच ओसरून जातो. मग त्या सूचनां-मधले ' कृपया ' देखील खटकते.

वास्तविक आंगण आणि घर हे एकाच वास्तूचे अविभाज्य घटक आहेत. एकाच आईच्या दोन सख्ख्या लेकरांसारखं. जे घरात चालेल त्याची छाया आंगणावर पडायला हवी. पण तसं होत नाही. घरात रेडिओचे सूर निनादतात. कपबश्यांचे व आग्रहांचे आवाज होतात आणि जिभल्या चाटणाऱ्या अधाशी कुत्र्याप्रमाणे आंगण खवखवल्या तोंडानं आ पसरून उभं असतं. घ रातल्या गोड जीवनाला आंगण पारखं होतं. मुशाफरखान्यांत दोन अपरिचित उतारू यावे तसे एकत्र असूनही आंगण व घर एकमेकाला परके असतात. आंगणात पडलेल्या सूर्यकिरणांची दाद घराला नसते आणि घरात घडणाऱ्या उत्सवी कळेचे काहीच आंगणाच्या वाट्याला येत नाही. म्हणजे जेथे आंगण असते तेथेही हीच कळा. घरातल्या पोरीसोरी चित्रकलेचं प्रदर्शन करण्यासाठी दस्ताभर कागद खर्ची घालतील. काही कारण नसताना दिवाणखान्यात आपल्या कलेची जाहिरात व्हावी म्हणून मोर, हरणं, बदकं लावतील, पण आंगणात रांगोळीची रेघोटी ओढायला त्यांच्या जीवावर येतं. जिथं कलाप्रदर्शनाची ही दुरवस्था तिथं मग पावित्र्य व संस्कृती यांच्या रक्षणासाठी सकाळी ' राम ', ' कृष्ण ' इत्यादी आंगणात लिहिणं तर कोसो दूर राहिलं.

चाळींच्या आंगणाबद्दल विचारायलाच नको. इमारतींना वर्षोंवर्षी रंग नसतो.

आणि त्या वय गेलेल्या खप्पड दिसतात हे आहेच. त्यातून आंगण तर आणखीनच वेवारस. जवळ पैसा नसल्यामुळं किंवा तो असूनही सरकारनं बंदी केल्यामुळं बांधता न आलेली जागा म्हणजे चाळीचं आंगण. त्यावर शेवाळ पसरणं, ते निसरडं राहणं व घातमानाप्रमाणं धूळ, चिखल इत्यादी असणं हेच त्याचं नशीब.

पण आंगण खरोखरच इतकं टाकाऊ असावं काय ? अशा वेळी आमच्या खेड्याच्या आंगणाची खूप आठवण येते. तेथे आंगणांना घरापेक्षा जास्त मान असतो. तिथलं आमचं जीवन घरापेक्षा आंगणातच जास्त रमत असतं. शहरातल्या आखीव व शिस्तबद्ध आंगणासारखे मिलिटरी चेहरे त्यांना नसतात. आंगणाचा आकार, प्रकार, सजावट तेथे म्युनिसिपालिटीनं ठरवून दिलेली नसते. जीवनाच्या आवश्यकतेतून, भोळ्याभाबड्या पण सौंदर्याच्या, पावित्र्याच्या कल्पनेतून आंगण रूप घेत असतं. तिथल्या आंगणांना नुसतं रूपच नसतं. त्या आंगणांना धर्म, जाती देखील असतात. असं स्पष्ट ओळखता येतं. हे बिजू पिंजाऱ्याचं आंगण. रुईची पिंजण तेथे आंथरलेली असते. हे महादेव चांभाराचं – नुसत्या चामडं मुरवण्याच्या कुंडाच्या उग्र वासावरून ओळखायला येतं. पाटलाचं आंगण वेगळं आणि मारवाड्याचं वेगळं, असंही दाखवता येतं. पाटलाच्या घरी नवं कोरं फर्निचर अमरावतीहून आणलेलं असेल, पण पलंग, खुर्च्या, टेबलं काहीही असू द्या; त्याचे पाय प्रथमतः आंगणातल्या सड्यानं काही दिवस तरी भिजायलाच पाहिजेत.

आणि आंगणांचं आवार तरी केवढं ! घरात न मावणाऱ्या धान्याच्या कणग्या ठेवतील आंगणांतच. फार तर बरसातीसाठी त्यांवर दोनतीन टिनपत्र्यांचं झाकण व वाऱ्यावादळांसाठी धड्या दोन धड्याच्या वजनाचे गोटे ठेवले की बस्स ! तशा दोन-तीन कणग्या आमच्या आंगणात अजून तेथे आहेत. सालबर्डीच्या यात्रेच्या वेळी जोलवाडीवाल्यांशी रस्त्यात पट खेळले तेव्हा मोडलेलं छकडंही अजून तसंच कोपऱ्यात पडलं आहे. इंधनाची मोठी सूड गोठ्यात ठेवली असली तरी मायला रोजच्यापुरतं म्हणून पुरुषभर उंचीचं इंधन आंगणातच रचून हवं असतं; तेही तिथं काही रचलेलं आणि काही विनरचलेलं असं पडलं आहे. मोठ्या आप्पाजीच्या घराच्या भिंतीवरून काही पोपड्यांनी व मातीच्या ढिवलांनी उड्या मारल्या. त्या कोणी उचलायच्या म्हणून दोन घरांच्या गड्यांचा वाद

मागच्या आहेरवाडीपासून संपलेला नाही. म्हणून तेही तसंच अटंग्यानं पडलं आहे. त्याच्या जोडीला अंग धुवायचा भला मोठा गोटाही आहे. घरात न्हाणीची जागा वेगळी नाही असं नाही. पण पै-पाहुण्याला आंघोळीला असो म्हणून मोठ्या काकाजीनं तो तिथं बरडावरून आणून ठेवला. पै-पाहुणे त्या दरम्यान कैक आले. ते गोष्टा पाळायचा म्हणून नदीवर स्नान करून गेले. आंगणातला गोटा अजून पारोसाच आहे. तरीही तो तिथं आहे. इतकं सारं तिथं आहे. म्हणून आंगण बुजलं म्हणता काय ? छे ! उन्हाळ्यात रात्री तिथं आताही दहा खाटा टाकून घ्या. वरून एक मारवाड्याच्या तिथं आहे तेवढा तख्तपोस टाका, अंगणात तरीही हुतुतू खेळायला जागा उरेल, असा मोठ्या दादाचा अंदाज आहे.

आंगणाच्या स्त्री व पुरुष अशाही जाती आहेत. ल्हान आंगण, मोठं आंगण अशी आंगणं एकाच घरात दिसतील, तेव्हा नक्की समजावं की ल्हान आंगण बायकांनी झोपण्याचं, मोठं ते माणसांनी झोपण्याचं. गड्यामाणसांनीही आंगणं वाटून घेतलेली असतात. मानवाईक नोकरचाकर सहसा बायांच्या आंगणाची सडाझाडण करीत नाहीत. आणि वाड्यातल्या बाया मोठ्या आंगणास कधी म्हणून केरसुणी लावणार नाहीत. मोठ्या आंगणाच्या वाट्याला सारे पुरुषी सोपस्कार येतात. संतुस, दवलत सारे पाण्याचे पोहरे रिचवून मोठं आंगण भिजवितात. झाडपुशीलाही पुरुषी मर्द खराटा असतो, मामुली फडा नसतो. तशा त्या आंगवणीनं ते आंगण खरंच मोठ्या मर्दपणानं खुलतं. त्याच्या सौंदर्यात एक पुरुषी दिमाख येतो. मग आमचं आंगण चांगलं की तुमचं असाही वाद घरच्या गडीमाणसांत व मालकिणींमध्ये व्हायला येतो. अर्थात त्या वादाची रंगत जेव्हा मालकिणींचं नोकरांशी दिरा-भासऱ्याचं नातं असेल तेव्हा फारच येते. त्या मानानं बायांची म्हणून समजली जाणारी ल्हानी आंगणं मोठीच बाळसेदार वाटतात. लेकरू नटवावं त्या ममतेनं व ईर्षेनं त्या आंगणाचे लाड केले जातात. तिथं त्या मोठ्या आंगणासारखा पाण्याच्या भडाभड खेपा ओतण्याचा आडदांडपणा नसतो. सारं काही मुलायम रीतीनं चालतं. ताज्या शेणाचा सडा नव्या सूनबाईनं टाकलेला असतो. तशा बिनसरावाच्या शिंपणानं सूनबाईही अर्धीमुर्धी सड्यात न्हाते. इतकंही करून जर दादीमायला तो सडा कुत्रे मुतल्यासारखा वाटला तर ती जातीनं कोपऱ्यातला फडा घेऊन शेणामातीच्या गिरबड्यात ते आंगण सारवून काढते. मोठ्या आंगणाच्या नशिबी उत्सवप्रसंगी आलेल्या

रांगोळ्या लहान आंगणाच्या भाग्यात रोजच रंगतात. चंदन लावल्यासारखं मग ते आंगण खुदकन हसतं. नणंदा भावजयाच नव्हे, तर चांगल्या पाच-पाच, दहा-दहा लेकरांच्या मायाही तिथं रांगोळीची कलाकुसर दाखवतात.

आंगणावरून घर कळतं. घरात चिलीपिली असली तर आंगणंही लेकुरवाळी दिसतात. 'मास्तर शाळेत' ( गोशाळा, धर्मशाळा इत्यादी शाळांच्या अनेक प्रकारांतून नेमकी लिहिण्यावाचण्याची शाळा वेगळी दाखवायला आमच्या गावी हा शब्द वापरतात.)जाणारी पोरं असली तरी त्यांच्या पाट्यांचा मुकाम घरांपेक्षा आंगणात जास्त आढळेल. गंगोनीचा पाला चिरडून त्याच्या रसात न्हालेल्या पाट्या तेथे ऊन खात बसलेल्या असतात. एखादं गोणपाट टाकून पोरगा बेकंबे रटत असतो. आंगणात खेळायचा फारच कंटाळा आलेला मुलगा तिकडे घरात आईच्या 'मागं मागं' करायला गेला असेल तर त्याचा लाकडी नंदीबैल, विटीदांडू किंवा बाराखडीचं पुस्तक आंगणातच पडलेलं असतं. ढोरं तिकडं गोठ्यात बांधायची असली तरी लाडाची वासरं, कालवडी, वगारं मात्र आंगणातच खुंट्याला किंवा डाळिंबाच्या बुडखाला बांधलेली असतात.दुधाची तावणी व ती तापतानाचा आभाळ-भिडया धूर आंगणाच्याच जगऱ्यावर असतात. घरात कितीही जागा असली तरी म्हशीचं आंबोण भिजतं ते आंगणातच डोहनीमध्ये. रानातली लक्ष्मी गाड्या-गाड्यांनी घरात येते, उमरावतीच्या मार्केटात जाते; पण तिचा आल्यावेळचा लंबा मुक्काम असतो तो आंगणातच. पुंडलीकराव पाटलांना यंदा तीळ किती पिकला त्याच्या जुड्या आंगणातच मोजून घ्या. पारबती पाटलीण यंदा पोरीचं लग्न करणार की नाही तेही आंगणात वाळणाऱ्या शेवयांच्या प्रमाणावरून ताडून घ्या. साठवणीच्या भाज्याधान्याचं वाळणचिळणही आंगणालाच विचारा.

असं हे आंगण बोलकं असतं, अस्ताव्यस्त असतं आणि अवाढव्यही असतं. भिंती नसलेलं घर म्हणजे आंगण. यापार दुसरा कसलाही फरक दोहोंत नाही. या तशा अंगणात आखीव रस्ते, जलाशय, कारंजी, विदेशी फुलं आणि जपलेली हिरवळ असा शहरी यांत्रिकपणा नसतो. आंगणात बसण्याच्या वेळाही ठरलेल्या नसतात. उठल्याबसल्या हरेकाची आंगणात धाव असते. लेकरू न्हाणायचं आहे; मग मांडा पाट आंगणात. उन्हात जेवायचं,– चांदण्यात जेवायचं – चला आंगणात. केस विंचरायचे तर मग कुणाची चोरी थोडीच आहे, विंचरा आंगणात. म्हणजे घरात फार तर रुग्णाइतानं राहावं. फारच

गुप्त, अति ओंगळ, लोकांना दिसू नये अशा गोष्टी असतील त्याच फक्त घरात करायच्या. बाकीचा सारा व्यवहार आंगणात. त्या छप्पर नसलेल्या व शंभर अर्थांनी घर वाटणाऱ्या जागेत.

नुसत्या घराचीच नव्हे अख्ख्या गावाचीच संस्कृती अशी आंगणात नांदते. अमक्याला एक, तमक्याला एक अशा वेगवेगळ्या जागा खेड्यात नसतातच मुळी. गोंधळी आला, गा आंगणात. पवाडे म्हणायचेत, म्हण आंगणात. याला त्याला दुकान अन् वेगळी जागा पाहिजे कशाला? बिल्लोरवाला येईल, बांगड्याची पाटी मांडून आंगणातच बसेल. साऱ्या सवासनी ' कुंकू मिशी हळद चुना ' वाल्या भवती गोळा होतील त्याही आंगणातच. ' आरसे, डावले, फणी, गळसरी, कंदिलाची वाऽऽत... ' अशी लांब ललकारी मण्यारीवाला मारील ती पहिल्यांदा गल्लीवर; पण दोनच क्षणांनी त्याचे पाय आंगणाकडे वळतील. त्याला ठावे असते की आपले माजघरातलं गिऱ्हाईक आंगणात भेटेल.

अर्ध्याहून अधिक जीवन असं आंगणात चालतं. दिवाळीची गवळण, गाईची गाणी इथं चालतात. तमाशे तिकडे गल्लीवर; ' यशोदे घराकडे चाल । मले जेवू घाल ॥ ' ही लावणी मात्र आंगणातच. मोहरमचा वाघही आंगणात नाचून जातो. बहुरुप्याला चावडीतूनच बिदागी मिळण्याचा रिवाज असला तरी त्याला हे पक्कं ठाऊक असतं की आंगणात सोंग नेल्यानं पाटलिणीकडून मिळणारी देणगी जरा जास्त असते. घराबाहेर पडण्याची संधी फारच कमी मिळणाऱ्या पडदेवाल्या देशमुख-पाटलिणींना आंगणातच जीवनाचं बहुविध दर्शन घडतं. त्यामुळं काही ऐकायपहायचं फारसं राहून जात नाही.

अशी आंगणं आता जात चालली आहेत. ती शहरातून चालली त्याचं फारसं नाही. साता समुद्रांपल्याडून आलेल्या नकाशांप्रमाणं, शहरांतली घरं बांधली जातात. एकासारखी दुसरी. एका मापाची, एका तोलाची. त्या निर्जीव कॉलनीतलं सारंच जीवन एकसाची व परस्परांना तिऱ्हाईत असतं. त्याचं मोठंसं नाही. पण आजकाल खेड्यांवरही त्या नकाशांचा जुलूम होत आहे असं ऐकलं. मागच्या पुरात आमचं अर्धं गाव गेलं. आता दुसरी वसती तयार होत आहे. तिथं म्हणे घरांची जागा आखून दिलेली आहे. हे आंगण, हे घर असं नक्की ठरवून दिलेलं आहे. आता ते आखलं म्हणून जीवनही आखलं जाणार. हे व्यवहार आंगणात आणि हे घरात अशी फारकत होणार.

गावातलं माझं हरवलेलं आंगण मला तेथून दिसतं. अजून कसं जसंच्या तसं आहे. आणि इतरही आंगणं. ते अनाबाईचं आंगण, शेंदरी वाढावी तिच्याच तुळशीजवळ. पसाभर फुलं आज न्या. उद्या कशी पुन्हा उमटून फुलेल. आता नव्या आखीव आंगणात घराचं काहीच उरणार नाही. पण जिथं खरी आंगणंच गेली तिथं ही सावत्र आंगणंही काही वाईट नाहीत. आमच्या गावाचं जीवन मोठं मटावृच्या वेलासारखं चिवट आहे. ते नकाशाबिकाशाला कसलं जुमानतं ? मोडके छकडे आणि जवारीच्या कणग्या तिथं कोणी ठेवणारच नाही असं थोडंच आहे ?

• • •

# टीपा

## १ : २

### दत्तात्रय बाळकृष्ण तथा आचार्य काकासाहेब कालेलकर ( १८८५ )

महात्मा गांधींच्या निष्ठावंत अनुयायांमध्ये काकासाहेबांची गणना होते. गांधीवाद, सर्वोदयवाद अशांसारख्या उदात्त ध्येयवादी दृष्टिकोनांचे प्रवक्ते म्हणून त्यांचा लौकिक फार मोठा आहे. मराठीप्रमाणेच गुजराती भाषेतून विपुल लेखन करून त्यांनी दोन्ही भाषांतील वाङ्मयामध्ये मोलाची भर घातली आहे. जीवना-बद्दलचे सर्व प्रकारचे कुतूहल त्यांच्या ललितनिबंधात्मक अशा स्फुट लेखनातून सारखे जाणवत असते. त्या कुतूहलामुळेच त्यांच्या लेखनाला जीवनाभिमुखता प्राप्त झालेली आहे. गांधीजींचे सान्निध्य, स्वातंत्र्यलढ्यामध्ये गांधीजींच्या प्रेरक व्यक्तिमत्त्वाशी झालेली समरसता, आणि सौंदर्यप्रवण परंतु चिंतनशील मनोवृत्ती यांमुळे त्यांच्या साध्यासुध्या विषयावरच्या लेखनातूनही उत्स्फूर्त आणि सुखद असा जीवनानुभव प्रत्ययास येतो. सहजता आणि मोकळेपणा हे तर त्यांच्या साऱ्याच लेखनाचे महत्त्वाचे विशेष होत. त्यांच्या विचारप्रवर्तक व संकलनात्मक लेखनालाही त्यामुळे प्रासादिकपणाचे वरदान लाभते.

जीवनविहार, स्मरणयात्रा, जीवनातील आनंद, हिंडलग्याचा प्रसाद, लोकमाता, हिमालयातील प्रवास, खेळकर पाने, इ. त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत.

पृ. ३. **हरफन मौला**–बहुविध अनुभव घेतलेला, असा भावार्थ.

पृ. ४. **मनू भगवान**–' मनुस्मृति ' लिहिणारे राजर्षि मनू.

पृ. ७. **पुरश्चरण**–धार्मिक अनुष्ठान.

पृ. १०. **कथाकली**–केरळमधील लोकनृत्याचा एक प्रकार

**पृ. १०. जटिलो मुण्डी लुंचितकेशः**:—जटा वाढविणे, वस्तऱ्याने केस काढणे व मुठीने केस उपटून काढणे असा त्रिविध मार्ग.

३ : ५

## इरावती कर्वे ( १९०५ )

पुण्याच्या डेक्कन कॉलेजातील समाजशास्त्र व मानववंश—शास्त्र या विषयाच्या नामवंत प्राध्यापिका. या विषयांच्या सखोल व्यासंगामुळे आजच्या समाजजीवनातील संगति—विसंगतीचे चित्र परिणामकारकतेने त्या उभ्या करू शकतात. व्यासंगाला मार्मिक विश्लेषणाची आणि आकर्षक अशा लालित्यपूर्ण मांडणीची जोड मिळाल्यामुळे सहजगत्या त्या कितीतरी गुंतागुंतीच्या जीवनविषयक प्रश्नांवर प्रकाशझोत टाकत जातात. त्यांच्या निबंधांतील अभिनवतेमुळे वाचक अंतर्मुख होतो आणि त्यांतील सखोल अशा विचारदर्शनामुळे त्याच्या जीवनविषयक जाणीवांमध्ये मोलाची भर पडत जाते. त्यांच्या ललित-निबंधांना समाजशास्त्राची बैठक लाभल्यामुळे केवढी व्यापकता येते हे मुद्दाम पाहण्यासारखे आहे.

आपल्या विषयांत त्यांनी इंग्रजीतून केलेले लेखन जगन्मान्य झाले आहे. परंतु गेल्या कित्येक वर्षांत त्यांनी लिहिलेल्या मोजक्याच अशा ललितनिबंधांमुळे मराठी वाङ्मयात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. परिपूर्ती, भोवरा, युगान्त इ. त्यांची मराठीतील पुस्तके विशेष प्रसिद्ध आहेत.

**पृ. १३. नायमात्मा**—आत्मविद्या किंवा ब्रह्मविद्या ही उपनिषदग्रंथांतून ‘ पराविद्या ’ या नावाने ओळखली जाते जाते. आत्मा किंवा ब्रह्म हे शब्दाने सांगण्यासारखे नसून प्रत्यक्ष अनुभवगम्य, स्वसंवेद्य आहे, ही या मागची भूमिका आहे. नाममात्मा...इ. हे मुण्डकोपनिषदातील ( ३—३ ) प्रसिद्ध सूत्र आहे. ( **टीप**—नायमात्मा प्रवचनेन लभ्यः **न मेधना**...असे छापले गेले आहे ते ‘ न मेधया ’ असे हवे. )

**पृ. १५. विश्वात्मकें देवें**—ज्ञानेश्वरांनी आपल्या अठराव्या अध्यायाच्या शेवटी पसायदान मागितले आहे; आतां विश्वात्मकें देवे। एणें वाग्यज्ञें तोषावें।

तोषोनि मज देयावें । पसायदान हें ॥ १८. १७७२ ( महाराष्ट्र शासन-प्रत )– त्याचा संदर्भ.

**पृ. १५. आत्मा एव**–सर्व जग ईश्वराने त्याच्या इच्छेनुसार निर्माण केले, अशा अर्थाचे ऋग्वेदातील ( १०–७१ ) विवेचन.

**पृ. २०. कालिदासानेच तरुण मुलींना**–कालिदासाने लिहिलेल्या रघुवंशातील हा संदर्भ आहे. रघुवंशाच्या सहाव्या सर्गात राजकन्या इंदुमतीच्या स्वयंवरप्रसंगी सुनन्दा नावाची तिची सखी हातात पुष्पहार घेतलेल्या इंदुमतीस निरनिराळ्या देशांच्या राजांची माहिती देते असा प्रसंग वर्णिलेला आहे. अंगराजाच्या वैभवाचे वर्णन संपल्यानंतर इंदुमती आपल्या सखीस पुढे चलण्यास खुणावते, त्याप्रसंगी कालिदासाने म्हटले आहे. ( ६।३० ), नासौ न काम्यो न च वेद सम्यग्द्रष्टुं न सा भिन्नरुचिर्हि लोकः। ( तो काही विलोभनीय नव्हता इ. ).

## ६ : ८

## दुर्गा भागवत ( १९१० )

संस्कृतीच्या अंगोपांगांचा, मानवी भावभावनांच्या विविध छटांचा, निसर्गाच्या रंग-रूप-गंधांचा अभ्यास करून, त्यांतून कधी गंभीरपणे तर कधी लालित्यपूर्णतेने लेखन करून मराठी वाङ्मयामध्ये वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त करून घेणाऱ्या स्त्रीलेखिकांत दुर्गाबाई अग्रगण्य आहेत. भाषाशास्त्र, समाजशास्त्र, महाकाव्ये, पुराणे आणि संस्कृत–प्राकृत भाषांतील विविध प्रकारचे साहित्य यांच्या परिशीलताबरोबरच निसर्ग आणि मानव, मानव आणि त्याच्या जीवनाच्या विविध तऱ्हा यांची, उत्कट अनुभवांधारे मांडणी करण्याचे त्यांचे कौशल्य त्यांच्या सर्वच प्रकारच्या लेखनांतून सतत प्रत्ययास येते. निसर्गसौंदर्याच्या बदलत्या छटांचे दर्शन घडविताना त्यांचे भावनिर्भर मन त्या निसर्गाशी तद्रूप होऊन आपल्या प्रतिभेचा नवनवा उन्मेष प्रगटविते. अज्ञात, अनाकलनीयाला मूर्त स्वरूप देण्यामध्ये त्यांच्या लेखणीला चांगलेच यश प्राप्त झाले आहे. चिंतनशीलता आणि काव्यमयता यांचा मनोज्ञ संगम त्यांच्या ललित-निबंधांतून झालेला आढळेल.

ऋतुचक्र, भावलेणी, व्यासपर्व इ. पुस्तकांतून त्यांच्या शैलीचे मनोहर अवि-

ष्कार पाहावयास मिळतात.

**पृ. ४३. कालिदास...कदंब...शिरिष–** कालिदास वाङ्मयामध्ये कदंबांची वर्णने-ऋतुसंहार २·१७, २.२४, ३·१३, रघुवंश १३·२७ व पूर्वमेघ २५, या ठिकाणी व शिरिषाची वर्णने–उत्तरमेघ २, रघुवंश १६·४८, शाकुंतल १·२५ व ६·१८ येथे आढळतात.

९ : १०

## वि. वा. शिरवाडकर ( १९१२ )

शिरवाडकरांची प्रकृती ही मूलतः कवीची व नाटककाराची आहे. परंतु त्यांनी लिहिलेले काही लघुनिबंध 'आहे आणि नाही' या संग्रहात प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. त्यांचे हे लघुनिबंध वाचत असताना रूढ चाकोरीपेक्षा काहीतरी वेगळे वाचत असल्याची जाणीव तात्काल होते. त्यांच्या कवितेप्रमाणेच त्यांच्या लघुनिबंधांना सामाजिक जाणिवेचे अधिष्ठानही आहे. विषयांचे वैचित्र्य, मोकळा परंतु व्यक्तित्वसंपन्नतेने युक्त असा आत्माविष्कार, व्यवहारातील अनुभवांची सांधेजोड यांमुळे त्यांचे लघुनिबंध उठून दिसतात. कल्पनविलासाची देणगी असूनही ते अनावश्यक कल्पनाविलासामध्ये गुरफटत नाहीत. कवी असूनही काव्यमयतेच्या आविष्कारात स्वतःला ते हरवून बसत नाहीत आणि परिचित अशा वस्तुविषयाच्या अपरिचित बाजूची तरफदारीही करीत नाहीत. परंतु तरी देखील या प्रकारच्या लेखनामध्ये त्यांनी पुरेपूर लक्ष घातले नाही याची जाणीव वरील संग्रह वाचल्यानंतर वाचकास झाल्याखेरीज राहत नाही.

**पृ. ५२ रामदास व केशवकुमार–** समर्थ रामदासांचे 'मनाचे श्लोक' प्रसिद्ध आहेत. त्यांचे विडंबन केशवकुमार म्हणजे आचार्य अत्रे यांनी आपल्या 'झेंडूची फुले' या संग्रहात केले आहे.

**प. ५४ भावस्थिराणि**–कालिदासाच्या 'अभिज्ञान शाकुंतल' या नाटकाच्या पाचव्या अंकातील 'रम्याणि विक्ष्य मधुराणि...' या श्लोकाचा शेवटचा चरण.

**पृ. ५६ देवसुद्धा एका पायाने लंगडा–** संत एकनाथांच्या; 'असा कसा

देवाचा देव बाई ठकडा । देव एका पायाने लंगडा ' या अभंगाचा संदर्भ.

## ११ : १२

**शांताराम ( प्रा. के. ज पुरोहित ) ( १९२३ )**

फडके-खांडेकरांच्या काळातच शांताराम यांनी त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन लिहावयास सुरुवात केली ती लघुनिबंधलेखनाने. त्यांचा ' सावळाच रंग तुझा ' हा लघुनिबंधसंग्रह प्रसिद्ध आहे. तत्कालीन रूढ लघुनिबंधांच्या तंत्रमंत्रांचे त्यामधून मोठ्या कौशल्याने केलेले अनुकरण जाणविले तरी त्यांच्या बहुश्रुततेने आणि नाट्यपूर्ण मांडणीमुळे त्यांना वैशिष्ट्यपूर्ण असा उठावदारपणा आला आहे. शांताराम हे इंग्रजीचे नामवंत प्राध्यापक आहेत, हे न सांगताही त्यांच्या लघुनिबंधांतून कळून येण्यासारखे आहे. डॉ. मा. गो. देशमुखांनी म्हटल्याप्रमाणे, ' पुढे जमाना बदलला, लघुनिबंध मागे पडला, जुनी कथा नवी झाली, इतकी की आता कथाविहीन कथा निपजू लागली. अनुकरणाच्या प्रवाहात सापडलेल्या शांतारामांच्या प्रतिभेचा मूळचा झरा या प्रवाहात आटून मात्र गेला नाही. उलटपक्षी लघुनिबंधात घटलेली भाषाशैली आता धारदार झाली. " शांतारामांनी पुढे काही उत्कृष्ट कथा लिहिल्या आणि लघुकथाकार म्हणून त्यांनी मराठी वाङ्मयात मोठे स्थान मिळविले. त्यांच्या सुरवातीच्या कथा आणि लघुनिबंध यांमध्ये बरेचसे साम्य आहे. नंतर त्यांनी लघुनिबंधलेखनच थांबविले. त्यांनी सातत्याने लिहिले असते तर कथेप्रमाणे लघुनिबंधाच्या प्रांतातही त्यांनी काही नवे परिवर्तन निश्चितच घडवून आणले असते.

**पृ. ५८. डार्विनचा सिद्धान्त**—चार्लस् रॉबर्ट डार्विन ( १८०९–१८८२ ) हा प्रसिद्ध इंग्रज सृष्टपदार्थशास्त्रज्ञ होता. जीवनार्थ कलहात योग्य असतील तेच टिकून राहतात व अयोग्य प्राणी मात्र नष्ट होतात. यावरून नव्या उपजातींची निर्मिती होते हा आपला पहिला सिद्धांत त्याने १८५९ साली ' The Origin of Species by means of Natural Selection ' या ग्रंथात सविस्तर मांडला. १८७१ साली त्याने खालच्या माकडासारख्या प्राण्यापासून उत्क्रांतित्वाने मनुष्यप्राणी सिद्ध झाला. हा सिद्धांत ' Descent of Man and Variation

in relation to Sex ' या ग्रंथातून मांडला. हे त्याचे दोन्ही सिद्धांत मोठे खळबळजनक असून ते खोडून काढण्यात आले आहेत.

**पृ. ६०. चर्चिल**–( विन्स्टन लिओनार्ड स्पेन्सर ( १८७४–१९६६ ). विख्यात इंग्रज राजकारणी पुरुष. ब्रिटनचा पंतप्रधान ( १९४०–४५ ). पहिल्या महायुद्धाचा विस्तृत इतिहास याने लिहिला आहे. चित्रकार व साहित्यिक म्हणूनही प्रसिद्ध.

**पृ. ६०. रमनकिरण**–सर चंद्रशेखर व्यंकटरमन (जन्म १८८८) या जगद्विख्यात हिंदी पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनी लावलेला शोध ' Raman effect ' किंवा ' रमनकिरण ' या नावाने प्रसिद्ध आहे. एखाद्या लोलकामधून जर आपण पारदबाष्पदीपामध्ये ( मर्क्युरीव्हेपर लँप ) आढळणाऱ्या प्रकाशाकडे पाहिले तर तो आपणांस निरनिराळ्या पट्ट्यांत विभागलेला दिसतो. परंतु हाच प्रकाश पाणी व बर्फ यांमधून जातो त्यावेळी त्यामध्ये आणखी काही नवीन प्रकाशरेखांचा उदय झालेला दिसतो. याच नव्या प्रकाशरेखांना ' रमनकिरण ' असे म्हणतात. या शोधाबद्दल रमन यांना नोबेल-पारितोषिक मिळाले. पदार्थविज्ञानशास्त्राच्या या थोर संशोधकांस संगीताची मोठी आवड आहे.

**पृ. ६१. बायरन**–जॉर्ज नोएल गोर्डन ( १७८८–१८२४ ). प्रख्यात आंग्ल कवी. सामाजिक नीतिमत्तेची कदर न करता बेछूटपणे लिहिण्यावागण्याबद्दल तो प्रसिद्ध आहे. १८१६–१८१८ मध्ये त्याने लिहिलेल्या लेखनामुळे साऱ्या इंग्लंडात खळबळ उडाली. १८१८ मध्ये तो आपल्या पत्नीपासून विभक्त झाला तेव्हा ही खळबळ पराकोटीला पोचली. त्यामुळे उत्तरायुष्यात त्याला इंग्लंडमधून हद्दपार होऊन ग्रीसमध्ये राहावे लागले.

**पृ. ६२. शेलीच्या जीवनावरील**–शेली पर्सी बुसी ( १७९२–१८२२ ) हा प्रख्यात आंग्ल भावकवी होता. त्याचे जीवनचरित्र मार्वाने ' Aerial ' या नावाने प्रसिद्ध केले आहे.

**पृ. ६५. संपूर्ण शॉ...शेक्सपीअर**–जॉर्ज बर्नार्ड शॉ ( १८५६–१९५० )–प्रख्यात आंग्ल नाटककार व विचारवंत; विल्यम शेक्सपीअर ( १५६४–१६१६ )–प्रख्यात आंग्ल नाटककार व कवी;–यांच्या समग्र किंवा संपूर्ण

वाङ्मयाचे खंड.

**पृ. ६५. केला जरि पोत ..या न्यायाने**–अतिशय बिकट संकटे आली तरी थोर लोक धैर्य टाकीत नाहीत या सामान्य सिद्धान्ताच्या समर्थनार्थ मशालीचे तोंड खाली केले तरी ज्वाला वरतीच उफाळून येतात, अशा अर्थाच्या श्लोकाचा संदर्भ. संपूर्ण श्लोक असा आहे : आली जरी कष्टदशा अपार । न टाकिती धैर्य तथापि थोर ।। केला जरी पोत बळेंचि खालें । ज्वाला तरी ते वरतीं उफाळे ।।

**पृ. ६५. रेनॉल्ड्स्च्या कादंबऱ्या**–रेनॉल्ड्स् हा १९ व्या शतकातील इंग्लंडमधील सामान्य अभिरुचीच्या वाचकांत अतिशय लोकप्रिय असा कादंबरीकार होता. भडक, रहस्यमय व स्त्री-पुरुषांच्या रहस्यमय गुप्त कृत्यांची वर्णने, हे त्याच्या कादंबऱ्यांचे विशेष होत. नाथमाधवांच्या (द्वारकानाथ माधवराव पितळे. १८८२–१९२८) कादंबऱ्यांवर त्याचा विशेष प्रभाव दिसतो. ‘वीरधवल’ ही त्यांची कादंबरी रेनॉल्ड्स्च्या ‘केनेथ’ या कादंबरीचे सरस असे रूपांतर होय.

१३ : १४

## म. ना. अदवंत ( १९१४ )

प्रा. अदवंतांनीही फडके–खांडेकरांपासून प्रेरणा घेऊन लघुनिबंधलेखनाला सुरुवात केली. ‘मनाचे संकल्प’ व ‘मनाची मुशाफिरी’ हे त्यांचे दोन लघुनिबंध–संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांच्या बरोबरीच्या बहुतेक लघुनिबंध-कारांनी आपले लेखन थांबवले असले तरी अदवंतानी मात्र पूर्वीच्या धीम्या चालीने आपले लघुनिबंधलेखन अद्यापही चालू ठेविले आहे. रूढ लेखनतंत्राचाच प्रा. अदवंतही अवलंब करताना दिसतात, परंतु जीवनात पदोपदी येणाऱ्या साध्यासुध्या अनुभवांद्वारे तत्त्वविमर्श घडवून आणण्याची त्यांची सौम्य दृष्टी या प्रकारच्या लेखनाला अतिशय उपकारक ठरली आहे. खांडेकरांनी म्हटल्याप्रमाणे, ‘वळणे वळणे घेत घेत घाटांतून एखादी मोटार जशी उतरते आणि अशा प्रत्येक वळणावर जसे निराळेच सुंदर दृश्य दिसते, तशी अदवंतांच्या अनेक लघुनिबंधांची रचना आहे...कल्पनेला कलाटणी देण्याची वृत्ती...आशावादी

मनोवृत्ती...इ. अनेक विशेषांनी त्यांचे लघुनिबंध नटलेले आहेत.'

**पृ. ७०. बालकवि**–त्र्यंबक बापूजी ठोंबरे ( १८९०–१९१८ ). १९०७ साली जळगाव येथे भरलेल्या कविसंमेलनात त्यांच्या कवितावाचनाने प्रभावित होऊन संमेलनामध्ये त्यांना 'बालकवि' ही उपाधी देण्यात आली. अव्वल दर्जाचे निसर्गकवी म्हणून बालकवी ओळखले जातात. फुलराणी; अरुण, संध्या-रजनी; कौमुदी; सृष्टिदेवीची बालके, ह्या सर्व बालकवींच्या प्रसिद्ध निसर्ग-कविता होत.

**पृ. ७३. दत्त**–दत्तात्रय कोंडो घाटे ( १८७५–१८९९ ) हे कवी. बडोद्या-तील विश्वामित्री नदीचे वर्णन करणारी, 'विश्वामित्रीच्या काठी' ही त्यांची प्रख्यात निसर्गकविता आहे.

**पृ. ७३. दिव्यरसी विरणे जीव**– बालकवींच्या 'निर्झरास' या कवितेतील पंक्ती.

**पृ. ७३. गोविंदाग्रज**– राम गणेश गडकरी ( १८८५–१९१९ ) यांनी काव्यलेखनासाठी घेतलेले टोपणनाव.

**पृ. ७३. एकदाच अनुभव त्याचा**–गडकऱ्यांच्या 'पहिले चुंबन' या कविते-तील पंक्ती. पहिले मूल, पहिले फूल, पहिले चुंबन, सर्व काही पहिले म्हणजे पहिलेच. पहिल्याची अजब जादू दुसऱ्यात नाही, हा या कवितेचा भावार्थ.

१५ : १६

**भगवंत देशमुख ( १९२२ )**

लघुनिबंध-लेखनाच्या पडत्या काळात डॉ. भगवंत देशमुखांचा 'आलोक' ( १९५६ ) हा संग्रह प्रसिद्ध झाला आणि त्यातील प्रगल्भ व टवटवीत स्वरू-पाच्या लघुनिबंधांचे मराठी रसिकांनी उत्सुकतेने स्वागत केले. स्वतःला नेहमी येणाऱ्या साध्यासुध्या अनुभवांतून एखाद्या विषयाच्या संदर्भात त्यांचा लघुनिबंध दखेपेस त्यांच्या जीवनविषयक जाणीवाच प्रामाणिकपणाने व्यक्त करीत असतो. त्यांच्या लघुनिबंधांतून व्यक्त होणारी आत्मनिष्ठा ही मुद्दाम लघुनिबंधासाठी

बुद्धयाच धारण केलेली अशी जुजबी वाटत नाही. त्यामुळे विषय साधे असूनही तत्त्वचिंतनाच्या आगळेपणामुळे त्याला मिळणारी कलाटणी मोठे लक्षणीय स्वरूप धारण करते. समीक्षक-संशोधक म्हणून प्रा. देशमुख प्रसिद्ध आहेत, परंतु त्यांची वृत्ती लघुनिबंधलेखनास अत्यंत उपकारक असल्याने त्यांनी आलोकनंतर थांबावे का असा प्रश्न पडतो.

**पृ. ८०. बॉस्वेल-जॉन्सन**–जेम्स बॉस्वेल (१७४०–१७९५) याने लिहिलेल्या डॉ. सॅम्युएल जॉन्सनच्या ( १७०९–१७८४ ) चरित्राचा संदर्भ.

**पृ. ८२. बुद्ध जातककथा**–जातक म्हणजे जन्मासंबंधी. बुद्धाच्या पूर्वजन्मासंबंधीच्या कथांना जातककथा असे म्हणतात.

**पृ. ८२. हैद्राबाद पोलिस-ॲक्शन**–स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचे पहिले गृहमंत्री सरदार पटेल यांनी भारतातील संस्थानांचा प्रश्न सोडविण्यात यश मिळविले. परंतु हैद्राबादच्या निजामाने याबाबतीत बरेच ताणून धरले. ‘ रझाकार ’ नावाच्या त्याच्या हस्तकांनी संस्थानभर दहशतीचे वातावरण निर्माण केले. शेवटी भारतीय पोलीस १९४८ मध्ये हैद्राबादमध्ये शिरले व त्यांनी हैद्राबाद रझाकारांच्या जुलमातून मुक्त केले.

**पृ. ८८. ही रात्र सरेल**–रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं...या प्रसिद्ध संस्कृत सुभाषिताचा संदर्भ.

**पृ. ९०. बुडाला औरंग्या पापी**–समर्थ रामदासांच्या स्फुट प्रकरणांपैकी ५८ वे प्रकरण ५९ श्लोकांचे असून ते ‘ आनंदवनभुवन ’ या नावाने प्रसिद्ध आहे. त्यामध्ये रामवरदायिनी भवानीमाता शिवकालात खड्ग घेऊन सरसावली व त्यामुळे महाराष्ट्रात जिकडेतिकडे आनंदीआनंद झाला असे वर्णन आहे. यातील औरंग्या म्हणजे औरंगजेब ( १६१८–१७०७ ) बादशाहा. समर्थांच्या हयातीत तो बुडाला नव्हता, म्हणूनच हे समर्थांचे एक भव्य असे स्वप्न गणले जाते.

**पृ. ९०. आधी कळस**–आध्यात्मिक अनुभवाचा गूढपणा वर्णन करणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या अभंगातील प्रसिद्ध चरण.

**पृ. ९२. सर्वेपि सुखिनः सन्तु**–आपल्या वेदोपनिषदांतील व्यापक आशीर्वचन.

अर्थ = येथे सर्वजण सुखी होवोत, सर्वांना निरोगी आयुष्य प्राप्त होवो, सर्व कल्याणप्रद गोष्टींचा सर्वांना अनुभव येवो; दुःख कोणाच्या वाट्याला येऊ नये.

**पृ. ९२ दुरितांचें तिमिर जावो**–ज्ञानेश्वरी, अध्याय अठरावा, ओवी क्र. १७७४. अर्थ = सर्व प्रकारच्या पातकांच्या ( दुष्कृत्यांचा ) अंधःकार नष्ट होवो. स्वधर्मरूपी सूर्याचा विश्वामध्ये उदय होवो. प्राणिजात जे जे इच्छील, ते ते त्याला लाभो.

**पृ. ९२. राजहंसाचें चालणे**–ज्ञानेश्वरी १८।१६९२. अर्थ = राजहंसाचे चालणे साऱ्या जगतात [ श्रेष्ठ म्हणून ] प्रख्यात पावले आहे म्हणून का इतरांनी ( त्याच्यासारखे सुंदर, ऐटबाज चालता येत नाही म्हणून ) का चालूच नये ?

## १७ : १९

### गो. वि. करंदीकर ( १९१९ )

अलीकडच्या काळात मराठी लघुनिबंध-वाङ्मयाने खऱ्या अर्थाने फार मोठा पुढचा पल्ला गाठला असेल तर तो करंदीकरांच्या लेखनातून. त्यांच्या काही लघुनिबंधांमध्ये पूर्वसूरींच्या पावलांवर पाऊल टाकण्याची सुरवातीची अवस्था दिसते. परंतु सापाने कात टाकावी, त्याप्रमाणे त्यांनी ' लघुनिबंध ' या वाङ्मय-प्रकारालाच एक नवी झळाळी, एक प्रकारचे नवे तेज प्राप्त करून दिले आहे. त्यांच्या लेखनामध्ये त्यांची आत्मनिष्ठा मूळ आशयाशी इतकी एकरूप होऊन येते की, त्यामुळे कित्येक वेळेला कवीच्या निखळ संवेदना, विशुद्ध भावनाच आपोआप शब्दरूप व्हावयाला लागतात. कविता किंवा कथा वाङ्मयप्रकारा-प्रमाणे लघुनिबंध या वाङ्मयप्रकारातील आत्मप्रकटीकरण्याचे सामर्थ्य किती परिणामकारक, किती ऊर्जःस्वल असू शकते, हे त्यांच्या काही लघुनिबंधांवरून लक्षात येते. लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराने करंदीकरांच्या लेखनासारखे विशुद्ध रूप धारण केले तर त्याचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

' स्पर्शाची पालवी ' आणि ' आकाशाचा अर्थ ' हे त्यांचे दोन लघुनिबंध-संग्रह.

**पृ. ९९ फ्रॉईड सिगमंड**–( १८५६–१९३९ ) ऑस्ट्रियन मानसशास्त्रवेत्ता.

**पृ. ९९. डार्विन––जगण्याची ओढ––मृत्यूची विलयवासना**–जीवनार्थ कलहात अयोग्य प्राण्यांचा संहार होत असला तरी शेवटपर्यंत या प्राण्यांची जगण्यासाठी धडपड चालू असते असे डार्विनने म्हटले आहे तर फ्रॉईड मृत्यू ही जीवनाचीच दुसरी बाजू आहे, असे म्हणतो. मृत्यूच्या भीतीची सर्वसामान्य माणसांवर जबरदस्त पकड असली तरी प्रेम ( Eros ) या मूलभूत भावनेप्रमाणे मृत्यू हीही तशीच मूलभूत भावना आहे, त्याच्याबद्दलची मानवांची ओढ युद्धासारख्या प्रसंगी कशी व्यक्त होते, हे त्याने दाखविले आहे.

**पृ. १०१. रसेल**– बर्ट्रांड आर्थर विल्यम ( जन्म १८७२ ) प्रसिद्ध आंग्ल तत्त्वज्ञ व गणिती.

**पृ. १०१. मूर**–जॉर्ज एडवर्ड ( १८७३–१९५८ ), प्रसिद्ध आंग्ल तत्त्वज्ञ, रसेलचा चाहता.

**पृ. १०१. विटगेस्टाइन**– लुडविग ( १८८९–१९५१ ) प्रख्यात तत्त्वज्ञ. त्याच्या सुरवातीच्या विचारावर रसेलची छाया आहे. परंतु नंतर त्याने रसेल-प्रमाणेच वेळोवेळी आपल्या विचारांचा नित्यनूतन आविष्कार घडविला आहे.

२० : २१

**मंगेश पाडगावकर ( १९२९ )**

शिरवाडकरांप्रमाणेच पाडगावकरांसारखा जातिवंत भावकवी लघुनिबंध-वाङ्मयाच्या दालनात आपल्या एकुलत्या एका ( निंबोणीच्या झाडामागे ) संग्रहाने महत्त्वाची भर घालून गेला आहे. हे लघुनिबंध लिहिताना त्यांच्या मनावर पूर्वसूरींच्या–विशेषतः फडके-खांडेकरांच्या–लेखनपद्धतीचा प्रभाव स्पष्ट दिसतो. ज्ञानेश्वर नाडकर्ण्यांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, ' पाडगावकरांच्या सर्वच निबंधांतील विचारपद्धतीवर आणि या पद्धतीतून अपरिहार्यपणे येणाऱ्या रचनेवर खांडेकरांची सूक्ष्म छाया पडलेली आहे असे वाटते. किंबहुना खांडेकरांनी ज्या क्षेत्रात आपल्या भाषाशैलीचे रूढ लालित्य खर्ची घातले; त्याच क्षेत्रात किंचित

विक्षिप्त आणि पुष्कळशी लहरी अशी पाडगावकरांची सौंदर्यदृष्टी जास्त सहजतेने लालित्य साधू शकली असा एक विरोध जाणवतो. ' पाडगावकरांचे या प्रकारचे लेखन ऐन बहरात येत असताना त्यांनी त्याकडे पाठ फिरविलेली दिसते.

**पृ. ११७. विवेकानंद**—नरेंद्र विश्वनाथ दत्त (१८६३–१९०४). प्रसिद्ध बंगाली साक्षात्कारी व वेदांतवादी पुरुष.

**पृ. ११८. वॉशिंग्टनची कुऱ्हाड**—जॉर्ज वॉशिंग्टन (१७३२–१७९९) हा अमेरिकेचा पहिला अध्यक्ष. त्याच्या लहानपणी त्याला वडिलांनी एक कुऱ्हाड आणून दिली. ती त्याने आपल्या बागेतील दिसेल त्या वृक्षावर स्वच्छंदपणे चालवायला सुरुवात केली, अशा अर्थाची कथा रूढ आहे.

**पृ. ११८. मार्क ट्वेन**—(१८३५–१९१०) सॅम्युअल लॅंगहॉर्न क्लेमेन्स या अमेरिकन ग्रंथकाराचे टोपण नाव. ट्वेन हा श्रेष्ठ विनोदी लेखक म्हणून प्रख्यात आहे.

## २२ : २३

**माधव आचवल**

स्थापत्य, शिल्प व चित्रकलेसारख्या दृश्य कलांकडे नाही म्हटले तरी आपले मोठे दुर्लक्ष आहे. या कलांच्या जाणिवेतून मराठीत लघुनिबंधाचे एक निराळेच विश्व आचवलांनी आपल्या ' किमया ' या संग्रहात उभे केले आहे. त्यांच्या या निबंधांत घरदारांना व्यक्तिमत्त्व प्राप्त होते. अवकाशातील चैतन्य शब्दाशब्दांतून साकार होऊ लागते. ह्या साऱ्या शब्दांमागे आचवलांचे सौंदर्यान्वेषी तरल मन सतत उभे असते. आवतीभोवतीच्या जगाकडे पाहताना आचवल आपल्या सौंदर्यनिष्ठ मनाची सूक्ष्म आंदोलने व्यक्त करण्याची धडपड करतात. मानवी संवेदनांच्या तळापर्यंत वाचकांना नेण्याचा प्रयत्न करतात. हे सारे वाचत असताना क्षणार्धात वाचक आचवलांच्या भावरूपाशी तदाकार होतो आणि शेवटी आपल्या आवतीभोवतीच्या दृश्य कलांकडे काहीतरी किमया घडावी, अशा बदलत्या नजरेने पाहू लागतो.

पृ. १२०. आइन्स्टाइन–अल्बर्ट ( १८७९–१९५५ ) जागतिक कीर्तीचा थोर शास्त्रज्ञ. १९०५ साली त्याने सापेक्षतावाद सिद्धांत (Theory of Relativity) मांडला. या सिद्धान्तामुळे काल, अवकाश, वस्तुमान, गती व गुरुत्वाकर्षण यांच्या कल्पनांमध्ये आमूलाग्र बदल घडून आला.

२४ : २५

**मधुकर केचे**

काव्यलेखनाबरोबरच तितक्याच उत्कटतेने ललित-निबंधाच्या प्रांताकडे वळलेला हा आणखी एक समर्थ कवी आणि लेखक. ललित-निबंध किंवा लघु-निबंध म्हणजे गमतीच्या विचारांचा आविष्कार नसून तो जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे, याची जाणीव केच्यांचे लेख वाचताना झाल्याखेरीज राहणार नाही.

केचे जीवनातील काही अनुभवांचे सरळ साध्या पद्धतीनेच मांडणी करतात. परंतु त्या मांडणीमागे जीवनाबद्दलचे उदंड कुतूहल असते. त्यामुळे त्यांचा ललितनिबंध फूल फुलते तसा उमलत जातो. मुद्दाम कलाटणी देणे, कृत्रिम नाट्यमयतेकडे वळणे अशांसारखी रूढ वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनाच्या संदर्भात म्हणून अनावश्यक ठरतात. त्यांच्या आत्मनिष्ठ अशा आविष्कारपद्धतीला वऱ्हाडी बोलीच्या वापरामुळे चांगलीच परिणामकारकता आली आहे.

'आखर आंगण' हा त्यांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे.

१६५८५
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ...
REFBK-0016585